

# प्रेमसंन्यास

(पाच अंकी नाटक)

**एकूण पृष्ठे -१३६**


- अंक पहिला ........................................ पृष्ठे ६ ते ४१
- अंक दुसरा ........................................ पृष्ठे ४२ ते ७०
- अंक तिसरा ........................................ पृष्ठे ७१ ते ९४
- अंक चवथा ........................................ पृष्ठे ९५ ते ११२
- अंक पाचवा ........................................ पृष्ठे ११३ ते १३६



समग्र गडकरी वाङ्मय.
सीडी प्रकल्पास
हार्दिक शुभेच्छा !

दि.सी.के.पी.
को-ऑप. बँक लि.

# गडकऱ्यांचे गुरू गोविंद चिमणाजी भाटे यांनी 'प्रेमसंन्यास'च्या पहिल्या आवृत्तीस लिहिलेली प्रस्तावना

प्रत्यक्ष संसारात आपण पुष्कळ वेळा असे पाहतो की, एखाद्या माणसाला स्वत:चे मूल नसते पण त्याला मुलांची फार आवड असते व हा त्या माणसाचा बालप्रिय स्वभाव जाणून मुले त्याला 'बाबा बाबा' म्हणून बिलगतात, व आईबापही आपली स्वत:ची मुले या माणसाकडे आणून टाकतात आणि हा मुनष्य या सर्वांचे लाड पुरवितो, त्यांच्याशी हसतो व खेळतो, त्यांच्यावर प्रेम करतो व ते इतके की, तिऱ्हाईतास ही त्यांची मुले नाहीत असे सांगितल्याखेरीज ध्यानातही यावयाचे नाही. वाङ्मयरूपी संसारात माझीही अशीच अवस्था होऊ पाहात आहे. मला स्वत:ची वाङ्मयात्मक मानसिक मुले नाहीतच म्हटले तरी चालेल; पण दुसऱ्यांनी आपली मानसिक मुले माझ्या मांडीवर आणून टाकण्याची इच्छा दर्शविली व मी ते नाकारले नाही व त्याप्रमाणे आधीच दोन-तीन मुले माझ्या मांडीवर मी घेतली आहेत व आज हे आणखी एक मूल मांडीवर घेत आहे. अलंकार टाकून बोलायचे म्हणजे आजवर दोन-तीन ग्रंथकारांच्या विनंतीवरून मी त्यांच्या पुस्तकांना प्रस्तावना लिहिल्या आहेत व आज पुस्तुतच्या पुस्तकास प्रस्तावना लिहिण्याचे मनात आणले आहे.

फर्ग्युसन कॉलेजातील विद्यार्थी व माझे विद्यार्थीमित्र रा. राम गणेश गडकरी यांनी ज्या नाटकांचे शेवटी 'प्रेमसंन्यास' म्हणून नामाभिकरण केले त्या नाटकाला प्रस्तावना लिहिण्याबद्दल मला विनंती केली व त्यांच्या समानशील व समानविचार अशा स्नेहामुळे त्यांचे मन मला मोडता येईना. कारण पुनर्विवाह हा माझा एक आवडता विषय आहे. याबद्दल कायावाचामनेकरून, नव्या परिभाषेत बोलावयाचे म्हणजे विचार, उच्चार व आचार या मार्गवयीने मी थोडीफार खटपट केली आहे व यामुळे या विषयावर लोकमत तयार करण्यास आपल्या हातून होईल तितकी मदत करण्यास मी सदा तयार असतो. असो.

आधीच सामाजिक सुधारणाविषयक प्रश्न आमच्या पुराणप्रिय जनतेला अप्रिय! त्यातल्या त्यात विधवाविवाहाबद्दल जनतेच्या मनात विशेष प्रकारचा दुराग्रह व अढी; परंतु अर्वाचीन विचारांचा जोर व सजीवपणा असा आहे की, समाजाची इच्छा नसतानासुद्धा या अप्रिय परंतु पथ्यकर सुधारणेवर आता मराठीत किती तरी नाटके व कादंबऱ्या झाल्या आहेत. बऱ्याच वर्षांपूर्वी झालेले अण्णा मार्तंडांचे 'सौभाग्यरमा' हे नाटक व भाजेकर मुन्सफ यांची 'मनोरमा' ही कांदबरी ही दोन पुनर्विवाहविषयक पुस्तके सोडून दिली, तरी पुनर्विवाह या विषयासंबंधी मराठीत कादंबरी व नाटके मिळून तीन ग्रंथ आहेत व आता राम गणेश गडकरी यांचे 'प्रेमसंन्यास' हे नाटक प्रसिद्ध होत आहे.

या सर्व ग्रंथांकडे बारकाईने पाहिले म्हणजे 'निरंकुशा: कवय:' या म्हणीलाही कसा अपवाद आहे हे चांगले दिसून येते. कवीला कोणी दाबत नाही; कविप्रतिभेवर कोणाचे दाब-दडपण चालत नाही; कविमनाला असा सामान्य समज आहे; परंतु कवीवर सुद्धा जुन्या मताचे व लोकभीतीचे दडपण पडतेच पडते व याचा प्रत्यय वरील ग्रंथांवरून चांगला येतो. मराठीतील अत्यंत प्रतिभावान कादंबरीकार व ज्यांनी आपल्या अनुपम कांदबऱ्यांनी मराठी भाषेमध्ये आपले नाव अजरामर करून

ठेविले आहे त्या रा. हरिभाऊ आपटे यांची 'भयंकर दिव्य' ही कांदबरी घ्या. या कादंबरीच्या नावावरून व त्यामधील नायिकेवरून रा. हरिभाऊ यांना पुनर्विवाहावर लिहावयाचे होते असे दिसते. कारण यातील नायिका कमला ही एक पुनर्विवाहित कुटुंबाचे अपत्य कल्पिले आहे; परंतु तिच्यावर आलेले प्रसंग, तिचा व तिच्या पतीचा झालेला बेबनाव व त्यांची झालेली ताडातोड वगैरे प्रसंग, यांचा कमलेच्या पौनर्भवसंभवाशी काहीच संबंध नाही. तसेच पुनर्विवाहाच्या प्रश्नाचा विशेष ऊहापोह या कादंबरीत मुळीच केलेला नाही. पुनर्विवाहित गृहस्थ बळवंतराव यांचे वर्णन फार खुबीदार आहे; परंतु एकंदर प्रश्नच रा. आपटे यांनी कादंबरीमध्ये मागे टाकल्या सारखा केला आहे व राजाराम नावाच्या दुष्ट मनुष्याच्या आपमतलबी कारस्थानाला प्राधान्य दिले आहे. थोडक्यात असे दिसते की, पुनर्विवाह विषयासंबंधी जास्त लिहिल्यास कादंबरी अप्रिय होईल अशी भीती रा. हरिभाऊंच्या मनात आली असावी व म्हणून त्यांनी लांबून व अत्यंत अप्रत्यक्ष रीतीने या विषयाला कादंबरीत जागा दिली असावी; परंतु पुनर्विवाहावर कांदबरी लिहिण्याचा संकल्प तरी हरिभाऊंनी कोठे प्रगट केला नव्हता; परंतु प्रसिद्ध नाटककार कोल्हटकर यांनी पुनर्विवाहावर म्हणून एक नाटक लिहिले, विधुरविवाह, स्त्रीशिक्षण, मद्यपान व विधवाविवाह अशा चार सामाजिक विषयांवर आपण चार नाटके लिहिण्याचा संकल्प केला होता व तद्नुरुप 'मतिविकार' हे पुनर्विवाहावरील अनुकूल नाटक आपण लिहिले, असे रा. कोल्हटकर आपल्या प्रस्तावनेत लिहितात; परंतु आश्चर्याची गोष्ट ही की, हा पुनर्विवाहाचा विषय एखाद्या पडदानशीन बाईप्रमाणे बुरख्यात घालून या नाटकात रा. कोल्हटकरांनी आणिला आहे. पुनर्विवाह करणारा नायक या नाटकात अगदीच फिक्का पडतो व त्याचा थोरला विधुर भाऊ शिक्षण वगैरेचा कैवारी-हाच नायक बनून त्याचे पवित्र चरित्र व त्याचे स्त्रीशिक्षणालय यांनी बहुतेक नाटक व्यापून जाते. पुनर्विवाहाच्या विषयाला फारशी जागा मिळत नाही व पुनर्विवाहावरील नाटकाचा लोकमनावर परिणाम काहीसा पुनर्विवाहाविरुद्ध होतो. तिसरे नाटक रा. सितारामपंत देवधर यांचे. हे गृहस्थ मागे काही दिवस सुधारकाचे संपादक होते व हे स्वत: पुनर्विवाहित आहेत. रा. देवधरांचे 'सुविचारविजय' नाटक पुष्कळ अंशाने चांगले साधले आहे, तरीपण या नाटकाचा पहिल्या प्रथमचा बराच भाग शारदा नाटकाच्या विषयाने व्यापला आहे व शेवटी या सामाजिक सुधारणेमध्ये श्रीमत् शंकराचार्यांचे शिष्य आणल्यामुळे नाटकाचा शेवट जरा निराळ्या तऱ्हेने करावा लागला आहे.

या तिन्ही किंवा विशेषत: दोन्ही प्रयत्नांपेक्षा रा. गडकरी यांनी पुनर्विवाह हा विषय फार जोरदार रीतीने समाजापुढे आणला आहे हे कबूल करणे भाग आहे; परंतु त्यांच्या लेखणीलाही, लोकमताला म्हणा किंवा कंपनीच्या मालकाच्या मताला म्हणा कशी मान वाकवावी लागली आहे हे पुढे दिसून येईल.

या नाटकातील संविधानक बरेच चटकदार असून रा. गडकरी यांनी त्यात अद्भुत व हृदयद्रावक असे बरेच प्रसंग आणले आहेत, हे वाचकांच्या ध्यानात येईल. संविधानकाकडे बारकाईने पाहता हे नाटक आनंदपर्यवसायी व्हावे असे दिसते. परंतु ग्रंथकर्त्यांनी त्याला मारून मुटकून दु:खपर्यवसायी केले आहे; व म्हणूनच संविधानकात व पात्रांच्या स्वभावात बराच अस्वाभाविकपणा आला आहे. ज्याप्रमाणे संस्कृतातील मृच्छकटिक नाटक हे स्वाभाविकपणे आनंदपर्यवसायी आहे व नाटकाच्या

संविधानकाची घडणही त्याला अनुरूप आहे, तशीच गडकऱ्यांच्या नाटकाची स्थिती आहे. त्यांची पहिल्यापासूनची घडण आनंदपर्यवसायी नाटकाची आहे; परंतु नाटकात पुनर्विवाह घडवून आणल्यास या काल्पनिक विधवाविवाहाने नाटक लोकांना अप्रिय होईल या लोकमताच्या बागुलबोवाला भिऊन म्हणा किंवा दुसऱ्या कोणत्या कारणाने म्हणा, रा. गडकरी यांनी आपला पहिला बेत फिरवून नाटक दु:खपर्यवसायी केले असावेसे दिसते; परंतु ज्या हिंदू समाजात दरवर्षी किती तरी पुनर्विवाह प्रत्यक्ष, बिनदिक्कत व राजरोस घडत आहेत त्या समाजात एका काल्पनिक पुनर्विवाहामुळे क्षोभ उत्पन्न होऊन नाटक अप्रिय झाले असते असे मानणे चुकीचे आहे. शिवाय या नाटकाचा एकंदर गुणसन्निपात इतका मोठा आहे व यातला विनोद तर इतका उच्च दर्जाचा आहे की, त्या गुणसन्निपातात पुनर्विवाह सहज बुडून गेला असता; परंतु रा. गडकरी हे भित्र्या सल्लागारांच्या भरी पडले व त्यांनी आपल्याला 'म्हातारा आणि त्याचा बैल' या गोष्टीतल्या म्हाताऱ्याच्या तोडीला आणून बसविले, किंवा दुसऱ्या उपमेत सांगावयाचे म्हणजे एखाद्या एंजिनिअरने फार काळजीपूर्वक नकाशा काढून इमारत बांधण्यास सुरुवात केल्यानंतर आयत्या वेळी इमारतीच्या रचनेत घाईघाईने फरक केला म्हणजे जसा इमारतीमध्ये बेढबपणा येतो तसा बेढबपणा रा. गडकरी यांनी आपल्या नाटकांत आणला व त्या पश्चात् बुद्धीमुळेच रा. गडकरी हे पुनर्विवाहाला प्रतिकूल आहेत किंवा अनुकूल आहेत अशी काही लोकांना शंका येते. परंतु हा आयत्या वेळी नकाशा बदलल्यामुळे उत्पन्न झालेला दोष सोडून देऊन रा. गडकरी यांच्या नाटकाकडे पाहिले म्हणजे रा. गडकऱ्यांचे साभिमान कौतुक केल्यावाचून राहवत नाही. कारण आजपर्यंत प्रसिद्ध झालेल्या सर्व नाटकांत रा. गडकऱ्यांचे नाटक सरस झाले आहे. वरवर पाहणारास जरी हे नाटक पुनर्विवाहाविरुद्ध आहे की काय अशी शंका आली तरी त्या नाटकाकडे व त्यायोगे दाखविलेल्या हिंदुसमाजाच्या चित्राकडे नजर फेकली म्हणजे कोणत्या सहृदय माणसाचे मन बालविधवांच्या दु:स्थितीने कळवळणार नाही! मनोरमा-जयंतसारखी स्वभावविरोधामुळे विजोड झालेली जोडपी आपल्या हल्लीच्या संक्रमणावस्थेतील समाजात हवी तितकी पहावयास सापडतील व याबद्दलही माणसाच्या मनात सुधारणा करण्याचे आल्यावाचून राहणार नाही. तसेच लीलेसारख्या प्रेमाच्या आधाराशिवाय पाण्यावाचून तडफडणाऱ्या माशासारख्या बालविधवा काय थोड्या आहेत! पाऊल वाकडे पडल्यावर लोकलज्जेस्तव आपल्या पोटच्या गोळ्याच्या गळ्यास नख लावणाऱ्या द्रुमनसारख्या बालविधवाही समाजात काही कमी नाहीत! सारांश रा. गडकरी यांनी समाजातील वस्तुस्थितीचे चित्र या नाटकात हुबेहुब दाखविले आहे, व यापासून समाजाने खरोखरीच धडा शिकण्यासारखा आहे. तो हा की, मनुष्यस्वभावाविरुद्ध भलत्या कल्पनेवर बसविलेल्या नियमांपासून समाजावर संकटे व दु:खे आल्याखेरीज राहणार नाहीत. या नाटकाचे संविधानक ज्याप्रमाणे चटकदार, अद्भुत व मनाला चटका लावणारे आहे त्याप्रमाणेच किंबहुना त्यापेक्षा जास्त या नाटकाची भाषा सरस, चटकदार व मनोहर आहे. रा. गडकरी हे मोठे प्रतिभावान कवी आहेत व त्यांची या नाटकांतील भाषा म्हणजे एक गद्यकाव्यच आहे असे म्हणणे अतिशयोक्तीचे होणार नाही. या भाषेपेक्षाही या नाटकांतील विनोद तर इतका उत्तम साधला आहे की, त्याची स्तुती करावी तितकी थोडीच होईल. या विनोदीची खुबी ही आहे की, त्यात अश्लीलपणाचा, फाजीलपणाचा, बीभत्सपणाचा, कुत्सितपणाचा किंवा हिडिसपणाचा अंशसुद्धा नाही. आजपर्यंतच्या बहुतेक नाटकांतील विनोदांत

वरच्यापैकी कोणता तरी दोष आहेच; परंतु असा निर्दोष, असा आनंद देणारा व असा उच्च दर्जाचा विनोद क्वचित् दृष्टीस पडेल. या दृष्टीने रा. गडकऱ्यांचे गोकुळ हे पात्र म्हणजे प्रतिभाशक्तीचा अद्वितीय मासला आहे असे म्हटल्यावाचून रहावत नाही.

रा. गडकरी यांची प्रतिभाशक्ती फार स्पृहणीय आहे. तसेच त्यांचे विचार उदात्त आहेत. तेव्हा त्यांनी प्रतिभाशक्तीने निर्माण केलेल्या पात्रांना जसेच्या तसे जगापुढे आणावे, त्यांनी लोकमताच्या बागुलबोवाला भिऊ नये, आपल्या 'निरंकुशाः कवयः' या जुन्या उक्तीची सार्थकता आपल्या भावी कृतींत निदर्शनास आणून द्यावी व असे त्यांनी केले म्हणजे त्यांच्या कृती मराठी भाषेतील अमोलिक रत्ने बनून त्यांचे नाव हरिभाऊ आपट्यांप्रमाणेच अजरामर होईल असे सांगून प्रेमसंन्यासाच्या सहवासाने आमच्या समाजात न्याय, बुद्धी व सद्सद्विचार यांचा विकास होवो अशी आशा प्रदर्शित करून व शेवटी प्रेमसंन्यासाला 'चिरंजीव' असा आशीर्वाद देऊन ही प्रस्तावना संपवितो.

**- गोविंद चिमणाजी भाटे**

## अंक पहिला
# प्रवेश पहिला

(बाबासाहेब, तात्यासाहेब व कमलाकर आगगाडीची वाट पहात आहेत.)

**बाबा** : तीन घंटा तर झाल्या ! ही तिसरीच घंटा ना? पण गाडीचा अजून पत्ता नाही. तात्या, गाडीची वेळ तर बदलली नाही ना?

**तात्या** : छे, छे, वेळ बदलली असेल तर घंटा कशाला होतील? हिंदू लोकांच्या गचाळपणाला हसता हसता साहेब लोकांनीही अखेर तोच मार्ग पत्करला आहेसे दिसते. कमलाकर, तपास करा बरे काय झाले आहे त्याचा.

**कमलाकर** : इथून विचारून जमायचे नाही. तात्यासाहेब, आपण आणि बाबासाहेब इथेच थांबा काही काळ. मी त्या बाजूला जाऊन तपास करतो.

(जातो.)

**बाबा** : तात्या, तुझ्याशी मघापासून बोलेन बोलेन म्हणतो, पण अजून धीर होत नाही; माझे बोलणे ऐकून तुला कदाचित विषाद वाटेल.

**तात्या** : विषाद! मला आपल्या बोलण्याचा विषाद कधीच वाटत नाही. बाबासाहेब, आपल्यातल्या सामाजिक मतभेदामुळे आपल्या दोघांच्या विचारात इतके अंतर पडत गेले, पण म्हणून आपल्या बालपणाच्या बंधुभावात अंतर पडले आहे का? काय सांगावयाचे असेल ते मोकळ्या मनाने सांगा.

**बाबा** : त्या मतेभेदाबद्दलच मी बोलणार आहे. सुशीला आणि लीला यांच्यावर- निदान लीलेवर-सुशीलेबद्दल मला फारसे भय वाटत नाही; पण लीला मात्र, तुला ठाऊकच आहे- जरा अल्लड आहे; म्हणून तिच्यावर नीट लक्ष ठेवून-

**तात्या** : म्हणजे माझ्या वीणेचा पिता या नात्याने माझी जबाबदारी तरी मला कळत नाही किंवा वीणा आणि लीला-सुशीला ह्यांच्यात मी अंतर तरी करितो असेच तुमचे म्हणणे दिसते!

**बाबा** : पहा! माझा हेतू न समजता रागावलास खरा! अविवाहित वीणेपेक्षा वैधव्यदशेत पडलेल्या लीला आणि सुशीला ह्यांच्याकडे विशेष लक्ष द्यायला पाहिजे. ह्यात अंतराचा प्रश्न मुळीच नाही. पाश्चिमात्य सुधारणेच्या गोष्टी ऐकून अविवाहित मुलगी फार झाले तर प्रीतिविवाहाचे चार करील- ते सुद्धा वाईटच म्हणा! पण अल्लड बालविधवा मात्र पुनर्विवाहाबद्दलची सारखी बडबड

ऐकून-

**तात्या** : काय? बडबड म्हणता?

**बाबा** : नाही; केवळ बडबड नाही. पण तो प्रश्न पुढच्या पिढीने सोडवावयाचा आहे. पण आज, दोन विधवा मुली म्हणजे उरावर दोन जळत्या शेगड्या समजणारी जी माणसे आहेत त्यांपैकीच मी आहे; तशातून आजच जयंत आणि त्याचा मित्र विद्याधर दोघेही यावयाचे आहेत.

**तात्या** : म्हणजे? मी नाही समजलो आपले म्हणणे! जयंत आपला सख्खा भाचा, आणि त्याच्या येण्याने आपले मन साशंक व्हावे, हे अगदी चमत्कारिक आहे! आणि त्याचा मित्र विद्याधर- केवळ जयंताचा तो मित्र आहे हीच गोष्ट त्याच्या चांगुलपणाची पुरेशी साक्ष आहे.

**बाबा** : तात्या, किती भलता विपर्यास केलास माझ्या बोलण्याचा! जयंत आणि विद्याधर यांच्याबद्दल सुद्धा माझ्या मनात आदरच आहे; मी सुद्धा त्यांच्यासाठी आजचा दिवस इथे राहणार होतो; पण दवाखान्यात बरेच नवीन रोगी आले आहेत असे माझ्या हाताखालच्या मनुष्याचे निकडीचे पत्र आल्यामुळे मला राहता येत नाही. शिवाय तेही वकिलीची सनद काढून आता नेहमीच इथे राहणार आहेत. माझ्या बोलण्याचा उद्देश अगदी निराळा होता.

**तात्या** : कोणता तो? माझ्या अजून लक्षात येत नाही!

**बाबा** : पहिल्याने भलताच तर्क केल्यामुळे तुझ्या विचाराची नसती दिशाभूल झाली. मी एवढेच म्हणत होतो की, तुमच्या घरी सदैव सुधारणेबद्दल वादविवाद चालतात, तो वसंतराव, त्याची बहीण ती द्रुमन, तुझी वीणा, हा कमलाकर, सारेच सुधारक; त्यात आणखी जयंत आणि विद्याधर ह्यांची भर पडली म्हणजे सुधारणा, पुनर्विवाह यांखेरीज विषय निघणार नाही बोलण्यात! जयंत शहाणा, समजूतदार असला तरी मोठा उतावळा, सहृदय आणि थोडासा अविचारी आहे. तो केव्हा काय बोलेल ह्याचा नेम नाही. आणि तशातून स्त्री-पुरुषांच्या अशा स्वैर संभाषणाला तुझे पूर्ण अनुमोदन! तेव्हा लीला-सुशीला ह्यांच्यावर अशा बोलण्याचा अनिष्ट परिणाम व्हायचा!

**तात्या** : अनिष्ट परिणाम तो कोणता? पुनर्विवाह हाच ना? मग आपल्याला जे अनिष्ट तेच मला इष्ट वाटते! त्यांच्यावर पुनर्विवाहाला अनुकूल परिणाम झाला, तर मी उलट त्यात आनंद मानीन!

**बाबा** : पण तशा प्रकाराला माझी मुळीच संमती नाही! पुनर्विवाहाचा प्रघात नसल्यामुळे

समाजाची मोठी हानी होते आहे असे मला मुळीच वाटत नाही! मी पुनर्विवाहाला अजून पहिल्या इतकाच विरुद्ध आहे. तू जरी माझा सख्खा भाऊ असलास तरी आपल्या वयांमध्ये निदान पंधरा वर्षांचे म्हणजे जवळ-जवळ एका पिढीचे अंतर आहे, तेच आपल्या विचारांतही आहे.

**तात्या** : जरा स्पष्ट बोलतो, रागावू नका! इंग्रजी ज्ञानाच्या अंजनाने आमच्या पिढीचे जसे डोळे उघडले तसे तुमच्या जुन्या पिढीचे उघडले नाहीत याचे राहून राहून मोठे नवल वाटते.

**बाबा** : यात मुळीच नवल वाटायला नको. नव्या मंडळीचे डोळे उघडले खरे; पण ते इतके एकदम उघडले की, ते अगदी बटारल्यासारखे दिसू लागले; आणि त्या भयाने जुन्या पक्षाने आपले डोळे एकदम मिटून घेतले. नव्या पक्षाने अगदी विलक्षण आचारभ्रष्टता करून आपल्या सुधारणेचा केवळ अनिष्ट परिणामच दाखविला नसता तर जुन्या पिढीनेही सुधारणेकडे अशी डोळेझाक केली नसती. पण नव्या लोकांनी सरसकट 'नवे ते हवे' असा हेका धरिला तेव्हा अर्थातच आघाताइतक्याच नेटाच्या प्रत्याघातामुळे 'जुने ते सोने' असा जुन्या लोकांनी आग्रह धरिला. तीव्र मतभेदामुळे जोडीत गोडी असते ह्याचे कोणालाच भान राहिले नाही. आणि शेवटी पहिल्या पिढीतल्या सुधारकांच्या स्वैर वर्तनामुळे सुधारणेला अनिष्ट स्वरूप मिळत गेले.

**तात्या** : हे मात्र खरे. पहिल्या पिढीच्या पुढाऱ्यांनी सुधारणेची वेळ रूढीच्या काटेरी कुंपणावरूनच जपून समाजवृक्षावर चढविली असती, तर आज तिला आचाराची सुंदर फुले खास आली असती. पण अनुकरणाच्या आंधळेपणाने त्यांनी तिला वरचेवर टाकून समाजवृक्षावर चढविताना घाईने खाली पाडून मातीला मात्र मिळविली. पण बाबासाहेब, आता त्या गोष्टीचा आपणावर परिणाम व्हावयाला नको आहे. पुनर्विवाहासारख्या इष्ट सुधारणेला आपण आड येणे फारच अनिष्ट आहे.

**बाबा** : माझा स्वभाव तुला ठाऊकच आहे. प्रत्यक्ष प्रमाणाच्या पुराव्याखेरीज माझ्या मतात बदल होणे शक्य नाही. पुनर्विवाहाचे माझे आक्षेप इतक्या घाईने सांगता येण्याजोगे नाहीत; पण मी पुनर्विवाहाच्या विरुद्ध आहे, इतकेच नाही तर तुझ्या घरातल्या ह्या स्त्री-पुरुषांच्या स्वैर संमीलनाच्याही मी विरुद्ध आहे. आणि त्याला काही आळा घालावा एवढ्यासाठीच मी हा विषय मुद्दाम काढला.

**तात्या** : क्षमा करा, स्त्री-पुरुषांच्या निर्दोष संमीलनात जो दोष दिसतो तो आनुवंशिक दृष्टीचा दोष आहे.

**बाबा** : हे म्हणताना तू आमच्या समाजावर दृष्टी टाकली नाहीस. स्त्री-पुरुषांच्या अशा अनियंत्र सहवासाने समाजात अतिरेकाचे परिणाम झालेले दिसून येत नाहीत का?

**तात्या** : कुठे कुठे असे होणारच! कोणताही निर्बंध एकदम मोडायचा म्हटले म्हणजे थोडासा अतिरेक हा ठरलेलाच! कोंडलेला नदीचा प्रवाह एकदम सुटताच प्रथम जोराच्या वेगाने वहायचा! त्याला आपली तयारी पाहिजे!

**बाबा** : मग ह्या प्रकाराला आळा घालण्याची तुझी तयारी नाही म्हणतोस?

**तात्या** : नाही, मुळीच नाही; तुमच्याच शब्दांची पुनरुक्ती होईल, पण प्रत्यक्ष प्रमाणाच्या पुराव्यावाचून माझे मत मुळीच बदलावयाचे नाही. इतकेच नाही तर इष्ट सुधारणेला संशयाचा सुद्धा मी फायदा देईन. आपल्या मंडळीच्या शुद्धाचरणाबद्दल माझी खात्री आहे, तोपर्यंत मी त्यांच्या एकजागी उठण्या-बसण्याविरुद्ध एक अक्षरही बोलणार नाही. उलट उत्तेजन देईन. पण त्यापैकी एखाद्याचे वर्तन जरी काडीइतके निराळे दिसले तर मात्र त्यांना एकमेकांशी एक अक्षरही बोलू देणार नाही.

**बाबा** : बरे, ते काही असो; सध्या लीला आणि सुशीला यांच्यावर माझ्या दृष्टीने लक्ष ठेव म्हणजे झाले.

**तात्या** : त्याबद्दल तुम्ही निर्धास्त रहा!

(कमलाकर हमालासह घाईघाईने प्रवेश करतो.)

**कमलाकर** : बाबासाहेब, जरा घोटाळा झाला! गाडी आज त्या बाजूला येणार. आपण दोघे या हमालाबरोबर पुढे व्हा! तोपर्यंत मी सामानाजवळ उभा राहतो. (हमालास) हं, उचल ते सामान आणि पुन्हा लवकर ये.

(हमाल, बाबासाहेब व तात्यासाहेब जातात.)

**कमलाकर** : (स्वगत) काय दैवयोग पहा! या बाबासाहेबांची त्या पोरीवरची देखरेख कमी होऊन माझ्या कर्तबगारीला थोडी सवड मिळणार तोच माझा लहानपणापासूनच प्रत्येक बाबतीत प्रतिस्पर्धी तो जयंत आताच येणार! आणि तात्यासाहेबांच्या सुधारणेचा फायदा त्याला मिळणार. या साऱ्या छबेल्या त्याच्यावर कशा आजन्म फिदा झालेल्या दिसतात. त्यामुळे शेवटी हा जयंत या गोपींनी भरलेल्या गोकुळात कृष्णाचे खेळ करणार आणि कृष्णविरहित गोपी आपल्यासाठी धुंडाळण्याचा निष्फळ प्रयत्न करून थकलेल्या नारदाप्रमाणे मला कलागतीवर भिस्त ठेवावी लागणार!

(हमाल येतो.)

**हमाल** : चला रावसाहेब लौकर; गाडी आली.

(दुसऱ्या बाजूस गाडी येताना दिसते. कमलाकर व हमाल घाईघाईने जातात. पडदा पडतो.)

# प्रवेश दुसरा

(गोकुळचे घर. गोकुळ सचिंत उभा आहे.)

**गोकुळ** : आता या विसराळूपणाला काय करावे! अगदी घटकेची सुद्धा आठवण राहात नाही! कोणकोणती कामे करावयाची आहेत त्यांची आठवण राहण्यासाठी उपरण्याला या गाठी मारून ठेवल्या. पण आता कोणती गाठ कशासाठी हेच विसरलो. मला स्मरणशक्ती द्यावयाला ब्रह्मदेव अजिबात विसरला की काय? चांगला पोषाख घालून कुठे जावयाला निघालो तो कुठे जावयाचे याचाच विसर पडला! म्हणून तिला तरी विचारून पहावे एवढ्यासाठी पुन्हा परतून आलो; बाकी ती सांगेल की नाही याचा संशयच आहे. हा विसराळूपणा आणि ही कजाग बायको या दोहोंनी माझ्या जन्माचे इथेच सार्थक झाले आहे. कोणतीही गोष्ट विसरायचे मी विसरत नाही! आणि कोणतीही गोष्ट विसरल्याबद्दल रागवावयाचे ती विसरत नाही! वाहवा! गोकुळ, धन्य तुझा संसार! पण अशा विचारात वेळ घालवून उपयोग नाही. नाही तर पुन्हा घरी कशासाठी आलो याचाच विसर पडेल! त्याची आठवण आहे तोच तिला हाक मारावी! अगं ऐकलेस का? जरा इकडे ये पाहू. ऐकलेस का? ए!

(एवढ्यात मथुरा ओरडते 'ऐकले हो. आले; जरा थांबा.')

**गोकुळ** : आता हाका मारण्याचा सपाटा सुरू ठेवावा! नाही तर थोडा उशीर झाला म्हणजे तिला कदाचित येथे येण्याची आठवण राहणार नाही. आलीस का? अगं ए ऐकलेस का? अगं ए-

(मथुरा हात पुशीत बाहेर येते.)

**मथुरा** : काय, झाले काय एकसारखे ओरडायला! जरा हात धूत होते तर पन्नास हाका झाल्या. वाघ का पाठीस लागला आहे तुमच्या?

**गोकुळ** : तशातला काही प्रकार नाही! तू अशी सदा हात धुऊन पाठीस लागल्यावर

वाघाला सवड कोठून मिळणार? म्हटले, कामामुळे पहिल्या हाकेची तुला आठवण राहणार नाही-

**मथुरा** : न राहावयाला काय झाले आहे मला? आपल्यासारखेच का जग आहे सारे?

**गोकुळ** : बरे, ते असो. काय विचारणार होतो मी तुला? पाहिलेस, हे असे होते.

**मथुरा** : काय हे? आपल्याला आपल्या नावाचा विसर कसा पडत नाही याचे-

**गोकुळ** : तू माझ्या नावाने नेहमी खडे फोडीत राहिली नसतीस तर खात्रीने मी नाव सुद्धा विसरलो असतो. आठवण म्हणून कशी ती राहात नाही!

**मथुरा** : आठवण राहात नाही तर उपरण्याला खूणगाठ बांधावी एखादी.

**गोकुळ** : ही बघितलीस खूणगाठींच्या फुग्यांनी उपरण्याची कशी सुतपुतळी झाली आहे ती!

**मथुरा** : हे काय? माझी आपली गाठ पडली आहे म्हणूनच आपली अब्रू ठिकाणावर आहे. इतक्या का गाठी देतात कुठे? करायचे ते भारीच! आता देशमुखांच्या येथे चार माणसे जमणार आणि तेथे असे सोंगासारखे-

**गोकुळ** : शाबास, हेच विचारणार होतो! देशमुखांकडे जायला निघालो होतो हेच वाटेत विसरलो! एकूण अंगवस्त्राच्या गाठीपेक्षा लग्नगाठच बरी म्हणायची!

(एक गाठ सोडतो)

**मथुरा** : बरे, मघाशी ते सामान आणायला सांगितले त्याचे काय झाले?

**गोकुळ** : काय व्हायचे! हेच झाले! वाण्याच्या दुकानापर्यंत गेलो आणि काय आणावयाचे ते विसरलो!

**मथुरा** : बाई, बाई, बाई, हद्द झाली आता! शेरभर साखर आणि तोळाभर केशर एवढेसुद्धा विसरला ना!

**गोकुळ** : जिनसा लक्षात होत्या, पण शेरभर साखर आणि तोळाभर केशर, की तोळाभर साखर आणि शेरभर केशर ह्याचा निर्णय होईना, तेव्हा टाकले ते उद्यावर काम.

**मथुरा** : ते नाही चालायचे; आधी सामान आणा नाही तर आज चूल बंद! रात्री जेवायला काही मिळायचे नाही.

**गोकुळ** : बरी आठवण केलीस! आज मला देशमुखांकडे पाहुण्यांच्या पंक्तीला बसावयाचे आहे हे मी विसरलोच होतो! आता तुला वाटेल तर ठेव चूल बंद!

**मथुरा** : मी म्हणते सामान आधी आलेच पाहिजे! मग जायचे होते कोठे भीक मागावयाला. आणखी ऊठपाय देशमुखांकडे काय असते हो तुमचे?

**गोकुळ** : काय असते म्हणजे? आज लहानपणापासून त्यांनी मला वाढविला, लिहायला वाचायला शिकविले, संसार थाटून दिला आणि म्हणे तिथे काय असते? मोठी शहाणीच की नाही तू? घरात काय वाट्टेल ते कर! आज तिकडे पाहुणे येणार, चार माणसे जमणार, आणि मी गेलो नाही तर-

**मथुरा** : तर, तर, अडून बसेल त्यांचे अगदी! हे पहा, तुम्हाला जर माझा छळ करावयाचा असेल तर मी जाते आपली माहेरी. माझ्या बापाच्या येथे अन्नवस्त्राला काही तोटा नाही.

**गोकुळ** : वा:! तुझा बाप म्हणजे हजारांचा पोशिंदाच की नाही! त्याच्या खाणावळीत रोज दोनशे पान जेवून उठते. तेव्हा अन्नाला काही तोटा नाही खरा! पण सात रुपये महिना तू कोठून देणार?

**मथुरा** : इतके हिणवायला नको काही; माझी आई खंबीर आहे मला पोसायला! म्हशीची शिंगे म्हशीला काही जड होत नाहीत!

**गोकुळ** : मग लग्नाची तरी उठाठेव कशाला केली? म्हणजे त्या म्हशीची शिंगे माझ्या डोक्यावर तरी बसली नसती.

**मथुरा** : लग्न तरी कुठे करणार होते माझे! पण हळदकुंकवाला आधार म्हणून-

**गोकुळ** : म्हणून माझ्या गळ्यात तुझ्या माळेची तात बांधली वाटते? मग तुला जेजुरीच्या खंडोबाची मुरळी केली असती तर भंडारा भरपूर नसता का मिळाला? पण मग ही ब्याद कशी निघाली असती घरातून? म्हणे मी त्यांना जड नाही! इतका उदार तुझा बाप असता तर मग दिवाळसणासाठी तुला न् मला महिनाभर ठेवून घेऊन अखेर नऊ रुपये दरमहाप्रमाणे दोघांचा अठरा रुपये आकार का केला असता माझ्यावर? त्याने केला दिवाळसण पण माझे निघाले दिवाळे!

**मथुरा** : आपल्यासारख्या दिवाळखोराला असेच पाहिजे. एरवी मी एकटी गेले म्हणजे माझा मानपानसुद्धा ठेवतात सारी माणसे! इतकी माणसे असतात आमच्या बाबांच्या खाणावळीत, पण माझ्याखेरीज पान हलत नाही.

**गोकुळ** : खरेच पान हलत नसेल! खाणावळीतली दोनदोनशे पाने हलवावयाला तुझ्यासारखी खंबीर बायकोच पाहिजे. आणि याच गुणामुळे मात्र तुझा बाप तुला अन्न तर देईलच; पण तुझ्या वाटेल त्या गुणावर पांघरुण सुद्धा घालेल!

**मथुरा** : लाज नाही वाटत हो तुम्हाला असे बडबडायला? काय माझे गुण आहेत हो

असे? खाई त्याला खवखवे! एवढ्यासाठी मात्र आपण जात असाल उठल्यासुठल्या देशमुखांकडे! हो, एरवी काय असणार दुसरे? त्या घरच्या साळकाया तर आहेतच आणि त्या विलायती वसंतरावाची बहीण द्रुमन का कोणशी, ती एक; बया कपाळी आली पण आईबापाचे कपाळ फुटले! तिला तर काही म्हणे दिवस लोटले आहेत! पोरीने पाऊल बाहेर टाकल्यापासून बापाने बाहेर पाऊल टाकायचे सोडले आहे! मी सुद्धा काल पाहिले, चेहेरा अगदी फिक्कट झालेला-

**गोकुळ** : तुझ्या तेजाने फिक्की पडली असेल बिचारी! तुझे लावण्यच आहे तसे!

**मथुरा** : उगीच काय हे बोलणे? डोळे सुद्धा तिचे खोल गेले आहेत.

**गोकुळ** : तुला भिऊन मागे सरले असतील कदाचित.

**मथुरा** : तुम्हाला त्यांच्याकडे जावे यावे लागते तेव्हा तुम्ही करा तिची तरफदारी-

**गोकुळ** : बरे झाले! मला जायची आठवण करून दिलीस, नाही तर-

**मथुरा** : उगीच तुमच्यासाठी खोळंबा; हो, राजाची निघाली स्वारी आणि मशालजीचा म्हणे घातवार!

**गोकुळ** : बरे, मी येईपर्यंत ओटीवर दिवा का ठेवीत नाहीस? मी घर विसरून कित्येक वेळा उगीच पुढे जातो! ठेवीत जा दिवा त्या कोनाड्यात.

**मथुरा** : कशाला? ढणढण जळून धुराने ओटी काळी करायला?

**गोकुळ** : आता दिव्याचा धूर नको म्हणून धुराचे दिवे आणणारच आहे मी.

**मथुरा** : दिवे ओवाळा धुराचे दिवे आणणारांवरून! घरात अकलेचा उजेड-

**गोकुळ** : बस्स्! हा ओवाळणीचा समारंभ आणि मुक्ताफळांचा वर्षाव बाहेर जाताना नको. नवरा परत आल्यावर बायकांनी मुक्ताफळे उधळून त्याला दिवे ओवाळावे! बाकी आपल्या उफराट्या संसारात नवऱ्याचे राज्य बायकोला मिळाल्यावर यायच्या वेळचे संस्कार जाते वेळी घडले तर नवल नाही म्हणा!

(दोघे दोहींकडे जातात.)

## प्रवेश तिसरा

(सुशीला व लीला बसल्या आहेत. लीला वाचीत आहे.)

**सुशीला** : लीलाताई, इतका वेळ मी इथे येऊन बसले आहे; पण अजून तू एक शब्दसुद्धा बोलली नाहीस. माझ्यावर रागावली आहेस वाटते?

**लीला** : काय बोलतेस ताई! तुझ्यावर, माझ्या सुशीलाताईवर मी रागावेन? आईच्या मागे तुझ्या लहानपणापासूनच मातृपदाच्या थोरवीने तू माझी जोपासना केलीस आणि तुझ्यावर रागावू? ताई, या काव्यरत्नावलीतही ही तांब्यांची कविता वाचली नाहीस वाटते तू?

**सुशीला** : कोणती? ही का? काय आहे? 'विधवेचे स्वप्न!' मी नाही वाचली अजून!

**लीला** : ताई, मी सुद्धा या अनाथ विधवेशी तद्रूप झाले होते; माझे जागतेपणाचे ते तंद्रीचे स्वप्न हाक मारून तू घालविलेस; तेव्हा मला फारच वाईट वाटले.

**सुशीला** : लीले, त्या विधवेचे स्वप्नातले स्वप्न ते! तिच्या दु:खमय स्थितीत जाऊन त्या स्वप्नाचा अनुभव घेऊन आपल्याला काय करायचे आहे? तिच्यापेक्षा आपले स्वप्न किती चांगले आहे!

**लीला** : आपले कोणते स्वप्न ते?

**सुशीला** : या संसाराचे! मायामोहाच्या निद्रेत आत्म्याला हे संसाराचे स्वप्नच पडत नाही तर काय? तेव्हा त्या विधवेप्रमाणे सौभाग्याच्या स्वप्नातून जागे होऊन भयंकर वैधव्याची जागृती भोगीत बसायचे त्यापेक्षा आपले हे वैधव्याचे स्वप्न संपून ईशज्योतीत एकरूप झालेल्या पतीबरोबर अखंड सौभाग्याची तेजोमय जागृती अनुभवणे किती तरी चांगले नाही का? त्या स्वप्नापेक्षा आयुष्याचे स्वप्न जरा लांबलचक मात्र असते; आणि म्हणूनच त्याच्यापेक्षा याचा खरेपणा जास्त भासतो; बाकी खरे म्हटले तर दोन्ही स्वप्नेच! भक्तिरूप सखीने ही मायानिद्रा मोडल्यावर जी अक्षय्य सौभाग्य जागृती मिळेल तिच्या मानाने ही दोन्ही स्वप्ने सारखीच.

**लीला** : ताई, तुला असे बोलताना ऐकले म्हणजे मला पुराणातल्या स्त्रियांची आठवण होते आणि सावित्रीने सत्यवानाला यमाच्या हातातून परत आणिले, सीमंतिनीने चित्रांगदाचा यमुना डोहातून उद्धार केला, तशी तू सुद्धा आपल्या पतीला त्या समुद्रातून वर काढशील असे वाटू लागते.

**सुशीला** : वेडी आहेस झाले! माझ्यावर तुझी ममता फार म्हणून तुला असं वाटतं. त्या थोर देवीची आणि माझी बरोबरी कशी होईल! जवळचे काचेचे दिवे

आकाशातल्या दूरच्या ताऱ्यांपेक्षा जास्त तेजस्वी दिसतात म्हणून त्यांची तुलना कोण करील? दु:ख सहन करण्याचा अभ्यास करीत गेलीस तर तुला सुद्धा माझी स्थिती सहज आणिता येईल.

**लीला** : ताई, माझ्या स्थितीची गोष्टच बोलायला नको. आई वारल्यानंतर माझी सुशीलाताई जवळ नसती तर या भयाण जगात माझ्याच्याने एक क्षणभर सुद्धा राहावले नसते. ताई, एका आंधळ्या मुलाने प्रकाश काय असतो असे विचारले आहे, तसेच सुख काय असते हे सुद्धा बालविधवेला दुसऱ्याच्या सांगीवरून कळेल तेवढेच. मला सुखदु:खाची भिन्नता कळेनाशी होऊन दु:खाची तीव्रताच काय ती जाणवते. वरातीच्या मिरवणुकी पाहून दृष्टी भांबावून जाते. मंगलवाद्यांचा आवाज ऐकला म्हणजे पोटात भडभडून येते. सुखाची वर्णने वाचली म्हणजे अंगावर शहारे येतात; आणखी ताई, रागावू नकोस, देवांच्या मूर्ती पाहिल्या, देवींच्याजवळ असलेल्या देवांच्या मूर्ती पाहिल्या, म्हणजे तिरस्कार येतो. सर्व दिवस अगदी एकसारखे वाटून आयुष्य म्हणजे एकाच दु:खदायक दिवसरात्रीचे चक्र वाटते. एकच विचार, एकच स्थिती, एकच दु:ख, एकटी मी- आणखी ताई मी एकटीच आहे, नाहीतर काय? बाळपणीच्या जगातल्या आनंदाचा आत्मा नाहीसा होऊन त्याचे आज नुसते चित्रच मी पहात नाही का? प्रत्येक वस्तूतले वस्तुपण नाहीसे झाले आहे. ताई, क्षमा कर; एका गोष्टीत मात्र अजून प्रेम, जिवंत प्रेम, अगदी या अगदी या अभागिनीच्या सुद्धा हाती लागणारे प्रेम अनुभवाला येते; आणि ते फक्त माझ्या ताईच्या या प्रेमळ अलिंगनातच! ताई एकेकदा मला वाटते की, आपल्या आईने मरताना तुझ्या देहात प्रवेश तर केला नसेल ना! अहाहा! ताई, पडू दे ती आसवे माझ्या या करपलेल्या हृदयावर! आईचे डोळे पाण्याने भरले म्हणजे अगदी असेच दिसत असत. ताई, या बालवयात तुझ्या अंगी इतके वैराग्य, वैधव्याच्या ब्रह्मचर्यात अशी आईची वत्सलता ही कुठून गं आली?

**सुशीला** : लीले, यात मी काही अधिक का केले आहे? वैधव्यदु:खाचा अनुभव घेत असताना त्याच प्रसंगात सापडलेली तू दिसलीस, त्यामुळे सहजच तुझ्या ठिकाणी मला हतभागी सुशीलाच दिसू लागली. आणि माझ्या दु:खाच्या जाणिवेने मी तुझ्याकडे पाहू लागले. तोच तितक्यात आईनेही आपल्याला सोडलं; तेव्हा तर माझे सारे लक्ष तुझ्याकडेच लागले. तुझ्या दु:खाचा अनुभव मला तुझ्या अंत:करणाची स्थिती पटविण्यापुरताच होऊन माझ्यावर आलेल्या जबाबदारीमुळे मन विचाराच्या स्वाधीन झाले. लीले, दु:खमय स्थितीतून परदु:खाची जाणीव झाल्याने खरे आपलेपण सर्वांठायी दिसून येते आणि नसत्या आपलेपणाचा विसर पडतो.

**लीला** : अहाहा! ताई, आपण जवळ-जवळ एका वयाच्या, पण तू विचाराने किती दु:खमुक्त झाली आहेस! माझ्या विचारशक्तीचा उपयोग मला माझ्या दु:खाची तीव्रता कळण्याइतका मात्र होतो.

**सुशीला** : आणखी म्हणूनच, लीलाताई, तुला मी नेहमी सांगते की, तू पुनर्विवाहाला- हं, असे तोंड वाईट का करितेस? मी काही हा तुझा कमीपणा समजत नाही. तुझ्यासारखी अति कोमल मनाची माणसे प्रेमाच्या आधारावाचून जिवंतच राहावयाची नाहीत.

**लीला** : आता कशाला हवी प्रेमाची गोष्ट? पण काय गं ताई, जयंत आणि त्यांचे मित्र विद्याधर अजून कसे बरे आले नाहीत? आज जयंत किती तरी दिवसांनी भेटणार!

**सुशीला** : (स्वगत) प्रेमाची गोष्ट काढताच ही शून्य दृष्टीने पाहू लागली आणि हिला एकदम जयंताची आठवण झाली; यावरून माझ्या मनातला चोरटा तर्क खरा आहे असे वाटू लागते. देवा, या निराशेच्या प्रेमाचा खेळ कसा संपविणार आहेस, तुझे तुलाच ठाऊक! (उघड) खरेच, गाडीची वेळ तर केव्हाच होऊन गेली. बरे, आपली वीणा, त्या वसंतरावांना आणि द्रुमनला आणण्यासाठी गेली आहे तिचाही अजून पत्ता नाही. पण हा पहा गोकुळ आलाच!

(गोकुळ येतो.)

**लीला** : काय रे गोकुळ, आले का जयंत?

**सुशीला** : आणखी पाहुणे आहेत का बरोबर?

**गोकुळ** : जरा दम खा; आधी तात्यासाहेबांनी सांगितलेले काम करतो आणि मग तुमच्या प्रश्नांची उत्तरे देतो. नाही तर त्यांचे काम विसरून जाईन आणि साराच घोटाळा होईल. जयंत आले आहेत; पाहुणेही आले आहेत! पाहुण्यांचे नाव पहा काय आहे-

**सुशीला** : अरे, तू पाहुण्यांचे नाव आधी विसरणार, की काकांचे काम आधी विसरणार?

**गोकुळ** : झाले! दोन्ही एकदम विसरलो. आता दोहींची एकदम आठवण करणार! काय बरे? तात्यासाहेबांचे नाव काय आणि त्या पाहुण्यांचे काम काय? छे बुवा, कोणकोणत्या गोष्टी आपण विसरलो याची माणसाला आठवण राहती कीनई तर काय बहार होती? पण आता आठवणीच्या विचाराला सवड कोठून मिळणार? हे पहा, इकडून हे जयंत आणि पाहुणे आले आणि इकडून या वीणाताई, वसंतराव आणि द्रुमनताई यांना घेऊन आल्या. अगदी नाटकी योगायोगच हा!

(एकीकडे जयंत, विद्याधर व कमलाकर व एकीकडून वीणा, द्रुमन व वसंत ही मंडळी येतात.)

**वसंत** : (काही वेळ गेल्यावर, जयंतास) वा:! जयंत, याचा काय अर्थ? पाहुण्यांचा आणि मंडळींचा परिचय अजून करून देत नाहीस याला काय म्हणावे? विलायतेत अशा दिरंगाईला शिष्टाचार समजत नाहीत! हिंदू, अगदी हिंदू आहेस तू.

**जयंत** : (वसंतास) माफ कर बुवा, मी आहे खरा हिंदू! तुझे हे विलायती शिष्टाचार मी ताबडतोब विसरतो. विद्याधर, आमचे थोरले मामा बाबासाहेब यांच्या कन्या या सुशीला आणि लीला! यांच्या दुर्दैवाची कहाणी मी तुम्हाला सांगितलीच आहे. या आमचे धाकटे मामा तात्यासाहेब यांच्या कन्या वीणाताई, या आमच्या घरातल्या सुधारणेच्या अधिष्ठात्री देवताच आहेत. स्त्रियांनी लग्न न केल्यापासून त्यांचे किती फायदे आहेत हे शिकण्यासाठी थोडे दिवसांपूर्वी यांचा विलायतेस जाण्याचा मानस होता; पण मध्यंतरीच हे आमचे वसंतराव विलायतेहून आल्यामुळे वीणाताई यांच्या प्रेमपाशात सापडल्या. लौकरच यांचे वसंतरावांशी हिंदू पद्धतीनेच लग्न व्हावयाचे आहे.

**विद्याधर** : हिंदू पद्धतीनेच म्हणजे? नाही तर दुसरी कोणती पद्धती?

**जयंत** : इंग्रजी! वसंतराव आणि वीणाताई यांना जे जे इंग्रजी ते ते मनापासून आवडते! हिंदू जीविताला ती दोघेही अगदी कंटाळलेली आहेत. आमच्या शहरातल्या सुधारणेची सारी भिस्त या वसंतरावांवरच आहे. हे नुकतेच विलायतेहून कायद्याची परीक्षा देऊन आले आहेत.

**विद्याधर** : विलायतेहून कायद्याची परीक्षा म्हणजे-

**जयंत** : समजलो; तुमचा तर्क बरोबर आहे. बरा आयताच विषय निघाला. विद्याधर, या आमच्या चिमुकल्या मित्रमंडळाने फार दिवसांपासून असा एक नियमच ठरवून टाकला आहे की, होता होईतो एक भाषा बोलताना तीत दुसऱ्या भाषेचे शब्दच आणावयाचे नाहीत. त्यातल्या त्यात आमच्या वसंतरावांनी सुद्धा अजून या नियमाला मान दिला आहे हे विशेष!

**विद्याधर** : वा:! मी तर असा नियम मोठ्या आनंदाने पाळीन! (द्रुमनकडे पाहून) बरे, या कोण?

**वसंत** : पाहिलेस जयंत, पुन्हा चुकलास! किती हिंदू आहेस रे! माझ्या आधी द्रुमनताईचीच ओळख करून द्यायला पाहिजे होती! विलायतेत अग्रपूजेचा मान नेहमी स्त्रियांनाच द्यावा लागतो! या नियमाच्या उल्लंघनाने शिष्टाचाराच्या राज्यात तिकडे मोठा गुन्हा केल्यासारखा होतो!

**जयंत** : याबद्दल मी तुझी पुन्हा क्षमा मागतो. विद्याधर, वसंतरावांच्या भगिनी या द्रुमन. दुर्दैवाने यांच्यावरही वैधव्याचा प्रसंग आलेला आहे. आणि हे आमचे कमलाकर, तात्यासाहेबांच्या शालकांचे चिरंजीव. हेही लहानपणापासून इथेच असतात. असे हे आमचे लहानसे मित्रमंडळ आहे.

**गोकुळ** : (स्वगत) म्हणजे? या सुधारकांचे हे मित्रमंडळ आणि मी जुन्या मताचा म्हणून शत्रुमंडळ वाटतं? मला वाटत होतं की, मी एकटाच विसराळू आहे. पण आज जयंत सुद्धा माझी ओळख करून द्यायचे विसरलेच की! काही हरकत नाही; आपल्याला हे सुधारकी चोचले कशाला हवे? आपणच आपली ओळख करून घ्यावी. पण काय नाव या पाहुण्यांचे? जयंतांनी आताच घेतले की! काय बरे? (आठवतो.)

**जयंत** : विद्याधर-

**गोकुळ** : (एकदम) हो खरेच, विद्याधर. अहो विद्याधरसाहेब, ओळख व्हायचा मीच चुकून राहिलो आहे तेवढा! माझे नाव गोकुळ. कृष्णावताराची खूणगाठ बांधून ठेवा म्हणजे नाव लक्षात राहील. लहानपणापासून तात्यासाहेबांनीच माझे पालनपोषण केले, पुढे लग्न करून दिले-

**जयंत** : गोकुळ, तुला चुकून विसरलो त्याची क्षमा कर. बाकी विसराळूपणाशी तुझा तसा निकट संबंध आहे यात शंका नाही. विद्याधर, हा आमचा गोकुळ; अगदी लहानपणापासून आमच्या इथे असतो; मनुष्य मोठा प्रामाणिक, ममताळू आणि गरीब आहे.

**गोकुळ** : मी उद्धारक मताचा आहे हे सांगावयाला विसरू नका. नाही तर सर्वांबरोबर पाहुणे मलाही सुधारकच समजावयाचे! हो, मी आहे जरा फटकळ. आपल्याला कोणी महार म्हटले तर चालेल, पण सुधारक म्हटलेले नाही खपायचे!

**सुशीला** : खरेच; विद्याधर, आमचा गोकुळ इतका धर्माभिमानी आहे की सिंहस्थात पत्त्यांतल्या राजाराण्यांची सुद्धा लग्ने लावीत नाही.

**वीणा** : आणि इकडे पुनर्विवाहाची चाल पाडण्यासाठी वसंतराव पत्त्यांतल्या राण्यांची मुद्दाम दोन दोनदा लग्ने लावतात.

**गोकुळ** : विद्याधरसाहेब, हा सारा फाजील शिक्षणाचा परिणाम!

**वसंत** : यात मात्र शंका नाही. या बाबतीत मात्र गोकुळ अक्षरश: बाळबोध वळणाचा आहे.

**गोकुळ** : असे कुत्सित नजरेने पाहू नका, वसंतराव; यात मला नाही काही कमीपणा

वाटत! विद्याधरसाहेब, आमचे घराणे खरोखरीच इतके बाळबोध वळणाचे की, स्त्रीशिक्षण तर आमच्या घरात नव्हतेच पण पुरुषांपैकीसुद्धा कित्येकांना तरी लिहितावाचता येत नव्हते.

**कमलाकर** : पण विद्याधर, गोकुळचा अजून मुख्य गुण राहिलाच आहे. विसर-भोळेपणात गोकुळ अगदी अद्वितीय आहे. पावसात भिजताना कधी कधी त्याला छत्री उघडण्याचा सुद्धा विसर पडतो.

**गोकुळ** : आणखी अहो- काय आपले नाव? पुन्हा विसरलो!

**विद्याधर** : विद्याधर माझे नाव.

**गोकुळ** : हो, खरेच विद्याधर! विद्याधरसाहेब, इतका काही मी विसराळू नाही. पण या कमलाकरांचा मुख्य गुण म्हणजे परनिंदा! आजपर्यंत सर्वांची निंदा करण्यातच यांचा सारा वेळ गेल्यामुळे निरुद्योगीपणामुळे हल्ली हेच सर्वांच्या निंदेला पात्र होऊन बसले आहेत.

**सुशीला** : गोकुळ, अशा वेळी आपण जर एकमेकांच्या उखाळ्या पाखाळ्या काढू लागलो तर हे पाहुणे काय बरे म्हणतील? विद्याधर, तुम्ही आमच्या गोकुळचा आणि वसंतरावांचा वादविवाद ऐकला नाही अजून!

**वीणा** : शास्त्रविहित आचारांचा त्याच्यासारखा पुरस्कर्ता सापडावयाचा नाही.

**वसंत** : हो, बाप जिवंत असल्यामुळे श्राद्धाचे पुण्यकर्म दवडण्यापेक्षा श्राद्धाचा हक्क मिळविण्यासाठी बापाचा घात करावा असे हे म्हणतात!

**विद्याधर** : वाहवा! अशी प्रखर धर्मजागृती असल्यावर सुधारकांना बीमोड व्हावयाला कितीसा उशीर लागणार?

**जयंत** : पण एक दोन बाबतीत मात्र गोकुळ स्वत:च सुधारक मताचा आहे!

**लीला** : हो, खरेच, बायकोच्या जाचाने असा विपरीत प्रकार झाला आहे खरा गोकुळचा!

**द्रुमन** : घरात स्त्री-पुरुषांना सारखे हक्क असावेत हे सुधारकांचे म्हणणे गोकुळला सर्वस्वी मान्य आहे; कारण त्याच्या घरात त्याचा कशावरही हक्क चालत नाही!

**लीला** : आणखी सुधारक आपल्या बायकांना नावानेच हाक मारतात तसा गोकुळही नेहमी बायकोच्या नावाने हाक मारीत असतो!

**विद्याधर** : म्हणजे, कजाग आहे वाटते याचे कुटुंब?

**कमलाकर** : ती कजाग कशाची? हाच अजागळ आहे झाले! नवऱ्याला डोके नसले म्हणजे बायका डोक्यावर बसतात!

**गोकुळ** : या म्हणण्यात काय अर्थ आहे? भगवान शंकराला एक सोडून पाच डोकी होती तरी गंगामाई डोक्यावर बसल्याच की नाही अखेर! आधीच बायका तोंडाळ; त्यातून ही तर इतकी बोलभांड आहे म्हणता, की दिवसभर तर बोलतेच बोलते पण रात्री झोपेत सुद्धा सारखी बोलत असते आणि ते सुद्धा अगदी खड्या सुरात! आवाज असा खणखणीत आहे की, लग्नात विहिणीचा कलकलाट चालला तरी हिचे बोलणे शेजारणीला साफ ऐकू जाते! बोला आता!

**सुशीला** : गोकुळला अव्वाच्या सव्वा गोष्टी सांगण्याचे भारी वेड आहे. अशी काही त्याची बायको मुलुखमैदान नाही अगदी!

**गोकुळ** : खरेच नाही! सुशीलाताई, आमच्या हिला मुलुखमैदान म्हणून तिची किंमत कोण कमी करील? विजापूरच्या मुलुखमैदान तोफेच्या आवाजाने नुसत्या गर्भिणीचेच गर्भपात झाले म्हणतात! पण हिच्या तोंडाची तोफ सुरू झाली म्हणजे माझ्यासारखा पुरुष सुद्धा गर्भगळित होतो!

**वसंत** : अरे, अरे! स्त्रिया म्हणजे गृहदेवता, पण आमच्या समाजात त्यांची कोण हेटाळणी चालते ही! विलायतेस आपल्या बायकोबद्दल असे बोलणाराला खरोखर तोफेच्याच तोंडी दिलं असतं!

**गोकुळ** : मग मलाही तिच्या तोंडाच्या तोफेला बळी दिलेलाच नाही का?

**कमलाकर** : कसले आले आहे तोंड? यांच्यातच पाणी नाही म्हणून! जरा तोंड करू लागली की, एक श्रीमुखात देऊन एका तोंडाची दोन तोंडे करावीत झाले!

**गोकुळ** : चांगला उपाय आहे हा! एका तोंडानेच सध्या मी बेजार झालो आहे; मग दोन तोंडे झाल्यावर काय करावे लागणार न कळे!

**वसंत** : या गोकुळला असे बोलताना ऐकला म्हणजे तळपायाची आग मस्तकाला जाते. पण एकट्या गोकुळलाच का दोष लावावा? सारा समाजच जेथे स्त्रियांच्या हक्कांची पायमल्ली करीत आहे तेथे एकट्यालाच जबाबदार कोणी धरावा?

**गोकुळ** : अशी काय पायमल्ली चालली आहे ती कळू तरी द्या! येऊन जाऊन पुनर्विवाह म्हणजे पाट लावावयाची मोकळीक नाही हेच ना?

**द्रुमन** : अमुक एकच गोष्ट कशाला हवी? पायापासून डोक्यापर्यंत सारखा अन्याय चालला आहे.

**वीणा** : एखाद्या बेइमान नवऱ्याच्यासाठी सुद्धा त्याच्या निर्दोषी स्त्रीला आपल्या सुंदर केशकलापाला मुकावे लागते, हा केवढा अविचार!

**गोकुळ** : वीणाताई, वपन केल्यावर सुद्धा जर या बायका मृतपतीचा केसांनी गळा कापावयाला चुकत नाहीत, तर मग वपन न केले तर काय होईल? प्रौढ विधवांना कदाचित हा केशवपनाचा आळा नसला तर एक वेळ चालेल, पण अल्लड वयाच्या बालविधवांना तर-

**सुशीला** : हे जुलमाचे नैतिक बंधन पाहिजेच म्हणतोस?

**विद्याधर** : अशा गोष्टींचा आमच्या समाजाकडून तीव्र निषेध होत नाही ही मोठ्या दुर्दैवाची गोष्ट आहे! सामाजिक सुधारणेला पाऊल पुढे टाकावयाला ही किती योग्य जागा आहे!

**गोकुळ** : याच काय, पण कुठल्याही बाबतीत, जुन्या चालीचा समाज विधवा पुढे आली की कधीच पुढे पाऊल टाकणार नाही!

**जयंत** : निषेधाची गोष्ट दूर राहिली, पण उलट हा निर्जीव समाज विधवांचा जिवंतपणीच जीव घेऊन पुरुषांना वाटेल तितकी लग्ने करण्याची मोकळीक देतो-

**वसंत** : वेश्यागमनाच्या निंद्य अन्यायाकडे कानाडोळा करतो यापेक्षा दुर्दैवाची सीमा कोणती?

**विद्याधर** : खरोखरी, आमच्या पुरुषवर्गाची शिथिल नीतिमत्ता वेश्येच्या रूपाने, समाजात उजळ माथ्याने वावरताना पाहिली म्हणजे उद्विग्न मनाला स्त्रियांना मिळणारे अन्याय द्विगुणित दिसतात आणि अशा क्रूर समाजाबद्दलच्या आपलेपणाचा सुद्धा क्षणभर विसर पडतो!

**वीणा** : ते काही नाही; सुशीलाताई, तुला मी बजावून ठेविते, आता पद्माकराकडून तात्यासाहेबांकडे तुझ्याबद्दलची पुनर्विवाहाची मागणी आली म्हणजे तू बिनदिक्कत त्याच्या मागणीला रुकार दे; तसेच द्रुमन, तू सुद्धा!

**वसंत** : द्रुमनताईच्या बाबतीत माझा नाइलाज झाला आहे.

**विद्याधर** : का बरे?

**वसंत** : आमचे निस्सीम हिंदू हाडाचे वडील द्रुमनताईच्या पुनर्विवाहाची गोष्ट काढताच, जानव्याचा गळफास घेण्याची तयारी करतात आणि मातोश्री चुलीत सती जावयाला तयार होतात.

**विद्याधर** : पण तुमच्या एकंदर बाण्यावरून तर तुमच्या घरी सुधारणेला इतका मज्जाव असेल असे कोणालाही वाटणार नाही.

**गोकुळ** : दिव्याखाली अंधार! यांच्या घरात हेच काय ते कुलदीपक निपजले आहेत, बाकी चहूकडे अंधार आहे सारा! गरीब बिचारे यांचे वडील, द्रुमनताईच्या शिक्षणाचे नाव काढल्याबरोबर माथ्यात राख घालून बसतात! एकदा तर- कधी बरे वीणाताई, काय झाले ते - (आठवतो.)

**वीणा** : बरे, आठवण झाली म्हणजे सांग एखादे वेळी! विद्याधर, एवढे मात्र खरे की, द्रुमनताईंना मराठी लिहिणे सुद्धा वसंतरावांनी अगदी चोरून मारून शिकविले आहे. द्रुमनताईंना आमच्या इथे यावयाची परवानगी मिळते ती सुद्धा फार दिवसांच्या घरोब्यामुळे! त्यांच्या पुनर्विवाहाबद्दल तूर्त शब्दच काढावयाला नको! पण सुशीलाताई, तू मात्र मागे घेऊ नकोस. पुनर्विवाहाची मुहूर्तमेढ घरात उभारावयाला तुझ्यासारखी देवताच पुढे व्हावयाला पाहिजे!

**विद्याधर** : काय, सुशीलाबाईंच्या पुनर्विवाहाचे घाटत आहे?

**कमलाकर** : (स्वगत) हा एक घटकेचा पाहुणा हे ऐकून इतका का बरे गांगरून गेला? घटकेच्या स्नेहाच्या मानाने ही चलबिचल अंमळ फाजीलच म्हणावयाची!

**वसंत** : अहो, मी तुम्हाला सर्व वृत्तांत सांगतो! विद्याधर, या गावात पद्माकर म्हणून एक सधन विधुर आहेत; शिक्षणही श्रीमंतीच्या मानाने बरेच झाले आहे म्हणायचे! त्यांचा आमच्या सुशीलाताईंशी पुनर्विवाह लावण्याचा जुना मानस-

**विद्याधर** : मग तो अजून सिद्धीस का जात नाही?

**गोकुळ** : तसे व्हावयाला सुशीलाताईंचीच आडकाठी आहे.

**कमलाकर** : (स्वगत) सुशीलाताईंची आडकाठी आहे हे ऐकून हा सात्त्विक महात्मा जरासा प्रसन्न झाल्यासारखा दिसला! एकूण शुद्ध मित्रत्वापेक्षा जास्त सलगीची महत्त्वाकांक्षा दिसते स्वारीची!

**वीणा** : आजपर्यंत चालत आलेली रूढी कशी मोडावी याचा सुशीलाताईला मोठा प्रश्न पडलेला आहे.

**विद्याधर** : का बरे? सुशीलाबाईंसारख्या सुशिक्षित माणसाला रूढींचे इतके भय नको आहे. इतर काही कारणे असल्यास गोष्ट निराळी!

**सुशीला** : इतर कारणांसाठीच पुनर्विवाह मला नको आहे. परोपकाराच्या मार्गानं सुखाची हानी सर्वापरी भरून येते.

**वसंत** : सुशीलाताई, काय हे बोलणे! कसला कर्माचा परोपकार करीत बसता आहात? विलायतेत कोणतीही बाई असे बोलायची नाही! परोपकाराचे वेड निव्वळ हिंदूपणाचे आहे! तुमच्या शिक्षणाचा तुमच्यावर मग काय परिणाम झाला?

**सुशीला** : वसंतराव, या गोष्टीची सांगून समज पडावयाची नाही! मला पाहिजे तर वेडी म्हणा, पण पुनर्विवाहाची मला तशी आवश्यकता वाटत नाही.

**विद्याधर** : जयंत, तुमचे सुधारणेबद्दल आजपर्यंतचे उद्‍गार ऐकून मला वाटत होते, तुम्ही तर सुशीलाबाईंना पुनर्विवाहाबद्दल सर्वांहून विशेष आग्रह कराल; पण मी मघापासून पाहतो आहे, तुम्ही अगदी मौन धरून बसला आहात! जरासे चमत्कारिकच आहे हे!

**जयंत** : माझ्या मौनाचे कारण हेच की, मलाही हा पुनर्विवाह इष्ट वाटत नाही.

**विद्याधर** : मग पुनर्विवाहाला तुमची संमती-

**जयंत** : पूर्ण आहे. पण हा पुनर्विवाह मात्र नको! पद्‍माकराच्या दुष्टपणाची ज्याला ज्याला चांगली माहिती आहे तो तो असेच म्हणेल.

**गोकुळ** : हे कारण नसते तरी सुद्धा आपण पुनर्विवाहाच्या आडच आले पाहिजे! श्रुतिस्मृतींचा पुनर्विवाहाला मुळीच पाठिंबा नाही!

**विद्याधर** : वा:! जसे काही बाकीचे सारे प्रकार श्रुतिस्मृतींच्या आधारानेच चालले आहेत! ज्या धर्मग्रंथांना आम्ही यच्चयावत् बाबतीत बिनदिक्कत धाब्यावर बसवितो त्यांच्याकडे या एकाच बाबतीसाठी धाव घेणे म्हणजे निव्वळ पोरखेळच आहे. अगदी अनाचार करताना सुद्धा श्रुतीचे ऐकावयाचे नाही आणि स्मृतीची स्मृति होऊ द्यावयाची नाही; त्यांच्या न्याय्य आज्ञांना फाटा द्यावयाचा; आणि एका अघोर अन्यायाच्या समर्थनासाठी मात्र त्यांची कास धरावयाची, हा कोठला न्याय?

**गोकुळ** : असे का बरे म्हणता? सनातन धर्माच्या पक्क्या पायाची उभारणी श्रुतिस्मृतींच्या जोरावरच झालेली आहे. ज्या ईश्वरदत्त संपत्तीच्या जोरावर आमच्या पूर्वजांनी अनार्यांचा नायनाट केला, ज्या जगमान्य महावाक्यांवरून आम्ही आजपर्यंत साऱ्या जगाला तुच्छ मानीत आलो, ज्यांच्या हृदयात आम्हा आर्यांचे आर्यत्व आज हजारो वर्षे आम्ही दडवून ठेविले आहे-

**वसंत** : आर्यत्व दडवून ठेविले आहे हे मात्र अगदी खरे.

**गोकुळ** : थांबा, वसंतराव, मला पुरतेपणी बोलू द्या! आर्यत्व दडवून ठेविले आहे, ज्या ग्रंथात विमाने आहेत, आगगाड्या आहेत, तारायंत्रे आहेत, पाश्चिमात्य

साऱ्या सुधारणा आहेत, ज्यात ईश्वराचे अंत:करण आहे, ज्यात आर्य ऋषींची वाणी आहे, ज्यात रूढीचा आत्मा आहे, ज्यात पापपुण्याची शहानिशा केलेली आहे, ते आमचे वेद, त्या आमच्या श्रृति, त्या आमच्या स्मृति, ती आमची उपनिषदे, ती ब्राह्मणे-

**वसंत** : ती तुमची ब्राह्मणे, ती तुमचे भटे! भले शाबास! कुठे पाठ केले होते हे सारे? आज तुझ्या या भाषणाने तू सुधारकांना अगदी चीत केलेस नाही? पापपुण्याच्या मोठ्या बहारीच्या कल्पना आहेत या. पण हे विचारांचे नवकोटनारायण आचाराच्या बाबतीत मात्र सुदाम्यापेक्षा दरिद्री असतात. ए कंगाल, या मोठमोठ्या ग्रंथांच्या नुसत्या जोरदार उच्चाराने आजच्या आचरट आचारांचे समर्थन कसे होणार? रामनाम पवित्र असले तरी पोपटाला त्याची पवित्रता काय कळणार?

**गोकुळ** : वसंतराव, आपल्याला उत्तर कोण देणार? मी थोडाच विलायतेस जाऊन जानवे तोडून शेंडी काढून मोकळा झालो आहे? मी जर देशी पोपट असेन तर आपण विलायती पोपट आहात इतकंच!पण हे पहा-अहो विद्याधर, मी अजून मुद्दाम बोललो नाही! अहो, पुनर्विवाहाचा प्रचार सुरू झाला तर कंटाळलेल्या बायका नावडत्या नवऱ्याला विष देऊन पुनर्विवाहाचा रस्ता मोकळा करतील, समजला? धडाधड हत्या होतील हत्या!!

**वसंत** : वा:! काय पण कल्पनेची कसरत ही! हिंदूखेरीज असली कल्पना दुसऱ्याला सुचायची नाही! विलायतेत कोणाला असे बोलताना मी कधीच ऐकले नाही! हा गोकुळ तर हिंदूंतला हिंदू आहे अगदी! हे पहा, ए हिंदू, असे होऊ लागले तर काही वाईट नाही! आज बालहत्या होत आहेत त्या बंद होऊन उद्या पतिहत्या होतील एवढेच. एक स्त्री फार झाले तर एक-दोन पतींचा नाश करील; पण आज एका विधवेला कितीतरी बालहत्या करता येतात! तेव्हा लोकसंख्येच्या दृष्टीने सुद्धा एकंदरीने फायदाच होणार! समजला? यापेक्षा या आचरट शंकेचे सरळ समाधान करीत बसण्याचे कारण नाही.

**विद्याधर** : गोकुळ, तुमची ती भीती निराधार आहे. आज ज्या जातीत पुनर्विवाह प्रचलित आहेत त्यांच्यात असे अनर्थ कितीसे होत आहेत? त्यांचीच साक्ष घ्या म्हणजे झाले!

**सुशीला** : मला या वादविवादाचा आता इतका कंटाळा आला आहे म्हणता, की काकांना या बाबतीत एकदा कायमचे उत्तर देऊन मी केव्हा मोकळी होईन असे झाले आहे मला!

**गोकुळ** : अरे, अरे, अरे! सुशीलाताई, तात्यासाहेबांनी सांगितलेले काम विसरलो

म्हणून म्हणत होते ते हेच! हे पहा, पद्माकरकडून आलेले पुनर्विवाहाच्या मागणीचे पत्र! हे तुमच्याजवळ द्यावयाला तात्यासाहेबांनी मला सांगितले होते. याचे उत्तर आजच द्यावयाला पाहिजे.

**सुशीला** : त्यात काय उत्तर द्यावयाचे आहे? मीच तात्यासाहेबांना जाऊन सांगते की, साफ नकाराचे उत्तर लिहा म्हणून! चला, सारी काकांच्या दिवाणखान्यात जाऊ!

(सर्व जातात. - जयंत जाऊ लागतो तोच मनोरमा येते.)

**मनोरमा** : अहो, जरा थांबा पाहू! आता तुम्ही चांगले आला, पण मला भेटायची आठवण होते का तुम्हाला? मी मघापासून आपली पाहते आहे, इतका वेळ झाला तरी तुमचा आपला नेहमीचा बाजार चाललाच आहे! म्हटले, आता चांगले चार-सहा महिने मुंबईस होता; तितक्या वेळात काही तरी अक्कल आली असेल!

**जयंत** : (स्वगत) अरेरे, आनंदाच्या भरात इतका वेळ माझ्या दुर्दैवाची मला आठवणच झाली नव्हती! क्षणभर का होईना, मी स्वत:ला विसरलो होतो; पण दैवाला ते कोठून रूचणार!

**मनोरमा** : काहो, झाला का गप्प? मी आल्याबरोबर तुमच्या तोंडाला असे कुलूप बसते आणि एरवी मोठ्या पंडितासारखे बोलत असता, असे मी तुमचे काय घोडे मारले आहे?

**जयंत** : मनोरमे, तू माझी पत्नी ना?

**मनोरमा** : होय बरे! मला चांगली आठवण आहे हो! पण आपण असे नेहमी विसरता, आणि म्हणूनच मला अशी आठवण करून द्यावी लागते!

**जयंत** : मनोरमे, मला दु:ख द्यावयाला का तू जन्मली आहेस?

**मनोरमा** : काय बाई बोलणे तरी! माझ्या बोलण्यापासून तुम्हाला त्रास होतो नाही? असे माझे बोलणे असते तरी काय? तुम्हाला गोकुळकाल्यात या घोड्याएवढाल्या पोरींबरोबर उधळू देत नाही हेच ना?

**जयंत** : अरेरे, मनोरमे, काय हे नसते कुतर्क! एवढ्यासाठी का मी सुशीलाताईशी आणि लीलाताईशी बोलत असतो?

**मनोरमा** : नाही तर कशासाठी? नेहमी पहावे तो तुमची संभाषणे चाललेली! दुसरे काय बोलावयाचे असते हो एवढे?

**जयंत** : मनोरमे, शुद्ध प्रेमाने एका मनुष्याला दुसऱ्या मनुष्यापाशी, त्यातून स्त्री-

पुरुषांना एकमेकांशी निष्काम बुद्धीने बोलता यावयाचे नाही, हीच जिथे साऱ्या समाजाची अनुदार दृष्टी, तेथे तुलाचा दोष कोणी द्यावा?

**मनोरमा** : अहाहा! मी काही अगदी बोंडल्याने दूध पीत नाही! या साळकायांशी तुम्ही हसता खिदळता आणि माझ्याशीच बोलताना का बरे तोंड कडू होते? बोला आता काय ते!

**जयंत** : काय बोलू हेच मला कळत नाही! मनोरमे, तू माझी पत्नी खरी, पण तुझ्या मनोवृत्तीत हा जो एवढा फरक आहे त्यामुळे काय बोलावयाचे याचाच निर्णय होत नाही! लहानपणापासून कल्पनेच्या काव्यानंदावर तरंगणारा माझा प्रेमात्मा वस्तुस्थितीच्या वणव्यात पार होरपळून गेला आहे! भावी आयुष्याच्या कल्पनाकाव्यात आपल्या लग्नाच्या-

**मनोरमा** : कवितेचा आणि लग्नाचा काय संबंध? आमच्या आईला माझ्यासारखेच कवितेचे नावही माहीत नव्हते. पण बाबांनी असा त्रागा केला नव्हता! त्या दोघांनी चांगला संसार थाटला. आठ मुलगे आणि आम्ही पाच मुली त्यांना झालो; आणि हे सारे कवितेची एक ओळ सुद्धा म्हटल्यावाचून!

**जयंत** : तुझा बाप मोठा खंबीर मनाचा! पण मी तसा नाही! जेथे जिवाचे प्रेम नाही, आयुष्याचे एकजीव काव्य नाही-

**मनोरमा** : पुन्हा आपले तेच! अहो, कवितेला काय चुलीत जाळावयाची आहे! आमटी आळणी झाली तर तेथे कवितेचे आधण ओतून काही होईल का? निगोड चहात कवितेची दोन पाने बुचकळून गोडी आणता येईल का? म्हणे तुला कविता कळत नाही! मग कवितेच्या चोपड्यांची एक रास करून तिच्याशी का नाही लग्न केले? सारी सोंगे! म्हणे तुझे माझे हृदय जमत नाही! आणि या बायकांच्या बाजारात मन रमते वाटते?

**जयंत** : राक्षसिणी, का उगीच वाग्बाण सोडतेस? दु:खित जिवाला दुसऱ्या तशाच दु:खी जिवांना धीर देण्यात थोडेसे समाधान वाटते, आणि एवढ्यासाठीच अनाथ बालविधवांकडे लक्ष वेधते!

**मनोरमा** : हो, हो, लक्ष पुष्कळ वेधेल; पण मी वेधू देईन तेव्हा ना! हजार रुपये हुंडा आणि शिवाय करणी, मानपान सारे करून बाबांनी मला येथे ढकलली, ती काही तुमचा हा तमाशा पहावयाला नाही!

**जयंत** : चल जा, काय बोलावयाचे असेल ते एकीकडे जाऊन बोल. माझ्या मनाला उगीच संतापवू नकोस! जा येथून !

**मनोरमा** : जाते बरे! काय न्याय आहे बघा! (स्वगत) माझ्या आता चांगलं ध्यानात

येत चाललं आहे सारे! एकदा स्वारीला चांगले राजरोस पकडते आणि मग दाखवते कसे काय सुख आहे ते!

(जाते)

**जयंत** : (स्वगत) हरहर, हेच का माझे संसारसुख! जमीन-अस्मानाप्रमाणे एकमेकांपासून दूर राहणाऱ्या दोन भिन्नवृत्ती जिवांना कृत्रिम उपायांनी एकत्र बांधावयाचे आणि एकजीव झालेल्या, देहमात्र भिन्न, पण एकवृत्ती हृदयांना एकमेकांपासून दूर ठेवावयाचे! परमेश्वरा, मी बालपणीच काढलेल्या आशेच्या चित्रावर-काव्याच्या आत्म्याने कल्पनासृष्टीत जवळ-जवळ सजीव खेळणाऱ्या भावी चित्रावर-असे निराशेचे काळे डाग टाकून मूळच्या मनोहर स्मृतीमुळे ते अधिक भयंकर केलेस, त्यापेक्षा बाळपणीच तो चित्रपट फाडून का टाकला नाहीस? प्रेमरंगाने भरलेला हृदयाचा पेला तेव्हाच फोडून टाकावयाचा होतास; वर्तमानाचे वातावरण भेदून भविष्याच्या पटावर लीलेने कल्पनाचित्र काढण्यापूर्वीच आशादृष्टीचे कलम मोडून टाकावयाचे होतेस. अरेरे! नीरस, हृदयशून्य, जडवृत्ती मनोरमेची प्राप्ती आणि तीही काव्यमय, हृदयसर्वस्व लीलेची आशा भग्न झाल्यावर! पण नको- आता लीलेचा विचार बंधुप्रेमाच्या दृष्टीनेच केला पाहिजे. प्रेम आणि लीला यांची कल्पनेतली जोडीसुद्धा जगाच्या दृष्टीने पापमय ठरेल! क्रूर कृत्रिम जगता! अशी किती हृदये तुझ्या बोजड नियमाखाली पार चुरडून गेली असतील! पण जगाचा यात काय दोष? लोकदृष्टी कल्पनेच्या क्षितिजाने दूरस्थ आकाशाला जमिनीशी स्वर्गाच्या बेसुमार वर्णनाने नरकयातनेचे स्वरूप देते! देवा! अद्‌भूतरम्य काव्यसृष्टी जर व्यवहाराच्या वस्तुस्थितीत कधीच उतरण्यासारखी नसेल तर प्रतिभाशाली कवी निर्माण करून त्यांच्या आशापूर्ण भविष्यचित्रांनी तरुणांना नसता मोह का पाडितोस? अहाहा! ही पहा लीला आली! आहे, काव्यसृष्टी खरी आहे! पण हृदया, आता बंधुप्रेमाला जागृत कर! परमेश्वरा, प्रेममय कल्पनांचे माझ्या मनातून आता निर्बीज करून टाक.

(लीला येते)

**लीला** : सारी मंडळी वर गेली आणि तुम्ही मागे राहिला तेव्हाच मला वाटले की, तुमचे मन स्वस्थ नाही आणि म्हणून मी मुद्दाम थांबत इकडे आले.

**जयंत** : लीलाताई, मी दुःखात असतो तर खरोखरीच तुझ्या या मायाळू साह्याने माझे समाधान झाले असते. (हंसून) पण जेथे दुःखच नाही, तेथे या तुझ्या ममतेने तुझ्या हृदयाची थोरवी मात्र दिसून येते!

**लीला** : नका, असे हसून आपले दुःख लपवू नका! भयाण खिन्नतेला झाकावयाला

या कृत्रिम हास्याचे विरल आच्छादन कसे पुरणार? त्याने उलट खिन्नता जास्त भयाण दिसते.

**जयंत** : लीले, तू म्हणतेस तेच खरे आहे! काळवंडलेले प्रेत झिरझिरीत मलमलीखाली झाकले तर विशेषच भयंकर दिसते. पण लीले, दु:ख दुसऱ्याला, त्यातून स्वत:च्या दु:खाने चूर झालेल्या तुझ्यासारख्या जिवाला सांगून काय उपयोग?

**लीला** : का बरे? तुम्ही नेहमी माझे सांत्वन करता तसे मीही तुमचे दु:ख हलके करण्याचा यत्न करीन!

**जयंत** : वेडी नाही तर! चल, मंडळी वर वाट पाहात असतील.

**लीला** : नका सांगू वाटेल तर मला आपले दु:ख! पण मला अगदी स्पष्ट दिसते आहे.

(त्याच्याकडे पाहते)

**जयंत** : (स्वगत) अहाहा! ही दृष्टी काय बोलत नाही? बोललेले फक्त कळते पण न बोललेले अगदी हृदयात भिनते! पण या दृष्टीला दृष्टी देऊन उपयोगी नाही! (तोंड फिरवितो.) अरे, ही पहा दुसरी नजर! मनोरमा संशयाच्या दृष्टीने आमच्याकडे पाहात आहे. आता येथे उभे राहून मुळीच उपयोगी नाही. (प्रगट) लीले, चल लौकर, तात्यासाहेब वाट पहात असतील.

(जातात)

## प्रवेश चवथा

(कमलाकर प्रवेश करतो.)

**कमलाकर** : (स्वत:शी) दुनिया एक दिवानोंका बझार है! परदेशच्या पेढीवर दर्शनी हुंड्या पटतात आणि शेजारच्या दुकानदाराला रोख रुपयाची मोड मिळत नाही! इकडे पाठीवर पाय देऊन आलेला भाऊ पोटावर पाय द्यावयाला सोडीत नाही, तर तिकडे शब्दाच्या शपथेखातर ज्यांची पुरतीशी तोंडओळख सुद्धा नाही अशी वधूवरे तोंडाशी तोंड भिडवायला तयार होतात! स्वर्गसुखाच्या मुदतीच्या हुंडीसाठी आज हातच्या सुखाच्या रोख रकमेची मनोती कापून द्यावयाची! आतबट्याच्या या अजागळ सट्ट्याला आंधळ्या श्रद्धेची साक्ष

आणि अनोळखी ईश्वराची जामीनकी! आणि हा जामीन जगाच्या आरंभापासून सदैव संशयाच्या धुक्याआड दडून बसलेला! जिकडे पहावे तिकडे विसंगतपणा! गळ्यात पडलेल्या मनोरमेला, ती अशिक्षित आणि कजाग आहे म्हणून टाकून देऊन लहानपणाच्या थट्टेतल्या लग्नाच्या लोभाने जयंत लीलेच्या निराश आशेवर जीव काढतो! अपार सुखभोगासह शरण आलेल्या आणि आजन्म सहवासाचे वचन देणाऱ्या पद्माकराचा सुशीला तिरस्कार करते आणि लग्नातल्या क्षणमात्र परिचयाच्या मेलेल्या नवऱ्यासाठी रडत बसते! लग्न लावणाऱ्या भटासाठी सुशीलेने का रडू नये याचेच नवल वाटते! त्याच्याशी ती दोन शब्द तरी बोलली होती! तिकडे लीला हक्काची हुकमत हरपली तरी जयंताच्या प्रेमाच्या भाडोत्री भांडवलाचा भरवसा धरून बसली आहे! दोघी सख्ख्या बहिणी, पण सुशीला जळक्या जिनगीच्या आठवणीची राख जपत बसण्याइतकी कंजूष, तर लीला मनोरमेची मालमत्ता आपली समजण्याइतकी उदार! तशीच मनोरमा! बाह्यांगाकडे डोळेझाक करणाऱ्या जयंतासाठी अंतरंगाचा होम मांडून बसली आहे! आणि माझ्या प्रेमयाचनेकडे ढुंकूनही पाहात नाही! पाठीस लागलेल्या अरबी समुद्राकडे पाठ फिरवून गोदावरीने हजारो कोसांवरच्या पूर्वसमुद्राकडे धाव घेतली त्यातलाच प्रकार हा! तशीच वीणा! तिच्या मूळच्या मूर्खपणाला शिक्षणाने निव्वळ दुजोरा मिळाला आहे! वसंत विलायतेहून जाऊन आला आहे एवढ्यावरूनच त्याच्यावर ती पोरगी फिदा झाली आहे. आणखी द्रुमन-तिच्या मूर्खपणाला तर पारच नाही! ती कायमची कबज्यात आल्यावर सुद्धा मी तिच्याशी पुनर्विवाह करीन असे तिला वाटत आहे! वेडे, मकरंद चाखल्यावर भ्रमर कमळाभोवती गुणगुणत राहात नाही. पण पाचव्या वर्षीच गोपींशी बागडणाऱ्या गोपाळाला सोडून पुत्रप्राप्तीच्या आशेने ब्रह्मचारी बजरंगाभोवती घिरट्या घालणाऱ्या बिचाऱ्या बायकांनाच दोष का द्यावा? जयंत, वसंत, पद्माकर, आणि स्वत: मी, सारे आपापल्या सुखाची साधने अगदी श्वासाच्या आटोक्यात असूनही उगाच विवेकाचे प्राणायाम करीत बसलो आहोत! आणि हे सारे का? तर केवळ लग्नसंबंधासाठी! प्रत्येक मनुष्य आपल्या मूर्खपणाने फार झाले तर स्वत:च्या कुटुंबाच्या सुखाचा नाश करील; पण ज्या महात्म्याने ही लग्नबंधनाची कल्पना शोधून काढली त्याने मात्र अतुल मूर्खत्वाने साऱ्या मानवी कुटुंबाच्या सुखाची धूळधाण करून ठेवली आहे! वा:! ही पहा, माझ्या म्हणण्याची मूर्तिमंत साक्ष देण्यासाठी मनोरमा रडत रडत इकडे येते आहे. तिच्या सुंदर पण रडक्या चेहेऱ्यावर तिच्या दुर्दैवाचा आणि जयंतच्या मूर्खपणाचा सारखाच छाप बसलेला आहे. (मनोरमा येते.) मनोरमाबाई! तुम्हाला अशा स्थितीत पाहून माझा जीव अगदी तिळतिळ तुटत असतो!

**मनोरमा** : मग तुमचा जीव डोंगराएवढा असला तरी त्याचे तिळाएवढाले तुकडे होतील! कारण माझे दु:ख कधीच कमी व्हावयाचे नाही.

**कमलाकर** : तुम्ही अशा अगदी निराश होऊ नका. पुढे मागे जयंतला तुमची दया येणार खास!

**मनोरमा** : त्यांना दया! अहो, मुसळाला कोठे अंकुर फुटले आहेत का? या जन्मात तरी असे होणार नाही! त्या अवदसेने माझ्या जन्माचे मातेरे केले हो मातेरे!

**कमलाकर** : अहो, त्यात त्यांचा वाईट हेतू नसेल सुद्धा! लीला आणि जयंत नेहमी कुजबुजत बसतात एवढ्यावरच जाऊ नका! त्यांची आज लहानपणापासून मैत्री!

**मनोरमा** : मैत्री! ही कसली मैत्री? तुमचा स्वभाव भारीच सरळ! अहो, बायका-पुरुषांची कसली ही मैत्री? अशा मैत्रीत काळेबेरे आपले असायचेच!

**कमलाकर** : मग आपण दोघे नाही का एकमेकांशी बोलत?

**मनोरमा** : म्हणून काय झाले? तुम्ही माझ्या माहेरच्या ओळखीचे!

**कमलाकर** : आणि जयंत नाही का लीलेच्या माहेरचा? तो तर तिचा सख्खा आत्येभाऊ! मग लोकांनी माझा तरी संशय का घेऊ नये?

**मनोरमा** : भलतेच! तुमचे बायकांशी वागणे कुणीकडे? नाही तर त्यांचे वागणे! बरोबरीच्या बायकांशी धांगडधिंगा घालीत बसायला त्यांना लाजा वाटत नाहीत का हो?

**कमलाकर** : मनोरमाबाई, ही सुधारणा आहे! तुम्हाला त्यातले रहस्य कळत नाही.

**मनोरमा** : कपाळाची सुधारणा! सावळा गोंधळ सारा! एकमेकांच्या हातात हात घालावयाचा, रात्री अपरात्री बोलत बसायचे, हसायचे, खिदळायचे; ही सुधारणा वाटते? मग बाजारबसव्या मोठ्याच सुधारक म्हणावयाच्या! इकडे अशी आंधळी कोशिंबीर खेळताना पाहिले की अंगाची अशी आग होते! पण काय करावयाचे? मेला बायकांचा जन्म!

**कमलाकर** : (स्वगत) मनोरमे, सुधारणेबद्दलच्या तुझ्या या उडाणटप्पू कल्पनांचा बरोबर फायदा न घेईन तर नावाचा कमलाकर नव्हे! (उघड) मनोरमाबाई, विधवांच्या दु:खाची तुम्हाला कल्पनाही नाही.

**मनोरमा** : चांगली कल्पना आहे हो! मला जिवंत नवऱ्याची विधवा, लग्न झालेली कुवारीण, काय वाटेल ते म्हटले तरी चालेल!

**कमलाकर** : असे म्हणू नका! जगातले सारे व्यवहार केवळ आपल्या नावाच्या पतीसाठी

आणि पतीच्या नावासाठी करावे लागतात! पुरुषाला पत आणि स्त्रीला पती!

**मनोरमा** : मी मात्र साऱ्या गोष्टी पतीच्या नावासाठी करीत नसून अगदी नावाच्या पतीसाठीच करते आहे. ते खरेखुरे पती आहेत त्या अवदसेचे.

**कमलाकर** : नका! नका! अशा बाबतीत एकदम त्यांचे नाव घेऊ नका.

**मनोरमा** : याच काय, कुठल्याच बाबतीत बायकांना नवऱ्याचे नाव घ्यावयाची चोरी. नाही तर असा लपंडाव खेळताना पाहून तिकडचा कान धरून विचारले असते, की हे काय म्हणून?

**कमलाकर** : काय हे बोलणे? मनोरमाबाई, पती म्हणजे स्त्रीची सारी शोभा, खरा अलंकार.

**मनोरमा** : अलंकार खरा! पण गहाणवट पडला आहे ना दुसऱ्याकडे!

**कमलाकर** : मग त्या दुसऱ्याशी खुशाल उभा दावा धरावा. जयंताकडे यात काही दोष नाही! त्याचा स्वभाव जरा दयाळू आहे.

**मनोरमा** : दयाळू आहे? काय बोलता? आपल्या बायकोचा गळा कापावयाचा आणि कोणा मेल्या भलतीच्या गळ्यात गळा घालावयाचा! ही कोठली दया? कमलाकर, फुकट हो फुकट बायकांचा जन्म! मला कीनई जीव सुद्धा जड झाला आहे.

**कमलाकर** : मनोरमाबाई, जगात जीव जड होऊन भागणार नाही! प्रसंगी दुसऱ्याचा जीव घेऊन मग स्वत:चाही जीव घेऊन पळत सुटण्याची तयारी पाहिजे! उठा, अशा रडू नका! जयंताला लीलेच्या नादातून सोडविण्यासाठी अनेक उपाय करिता येतील.

**मनोरमा** : एकूण तुम्हाला सुद्धा असा संशय आहे तर!

**कमलाकर** : मला संशय मुळीच नाही; माझी अगदी खात्री आहे, आणि तिच्या पुराव्यादाखल मला कित्येक गोष्टी माहीत आहेत.

**मनोरमा** : बाई, बाई, तुमच्या सुद्धा या गोष्टी लक्षात येऊ लागल्या, चारचौघात बोभाटा होऊ लागला, लोकांत ओरड झाली, तरी सुद्धा यांना लाज नाही ना? कोणत्या त्या गोष्टी? मला तरी सांगून ठेवा.

**कमलाकर** : मनोरमाबाई, त्या चोरट्या प्रेमाखेरीज करिता यावयाच्या नाहीत, मनोमन साक्ष असल्याखेरीज पटावयाच्या नाहीत, मत्सराच्या तीव्र दृष्टीखेरीज तिसऱ्याला दिसावयाच्या नाहीत, आणि अनुभवाच्या ज्ञानाखेरीज सांगून समजावयाच्या नाहीत! एकाने दुसऱ्याकडे उगीच सारखे पहात राहणे, त्याच्याखेरीज दुसऱ्याच्या बोलण्याकडे लक्ष न देणे, आपण काही बोलले

तरी दुसऱ्याच्या मनाला ते कितपत रुचते हे पाहण्यासाठी सारखे त्याच्याकडे पाहणे, एक उठून गेले तर दुसऱ्याचा अगदी विरस होऊन इतर मंडळींबद्दल त्याने शून्यवृत्ती होणे, एकमेकांच्या बोलण्याला दुजोरा देणे, अगदी नेणून सुद्धा नेहमी होता होईल तो जवळ जवळ बसणे, या साऱ्या चोरट्या प्रणयाच्या खुणा आहेत! या गोष्टी क्षुल्लक खऱ्या, पण ठळक गोष्टींपेक्षा जास्त महत्त्वाच्या!

**मनोरमा** : खरे, अगदी खरे! पाहिलेत ना? असा कोंडमारा केला माझा! याला काय करावे बरे?

**कमलाकर** : हां, मी सांगतो असे करा. जयंताला तुम्ही एकदा स्पष्ट सांगून पहा आणि माझी हेळसांड केली तर विष खाऊन प्राण देईन असे भय घाला!

**मनोरमा** : वा:! म्हणजे त्यांना बरेच ते! सुंठीवाचून खोकला गेला. म्हणतील खुशाल मर! तेव्हा आणखी या अपमानाचा अनुभव घेण्यापेक्षा-

**कमलाकर** : वेड्या आहात तुम्ही! त्याची काय छाती आहे असे म्हणावयाची? कायद्याच्या किचाटाची त्याला पुरी माहिती आहे. जिवावर उदार झाल्याचे सोंग मात्र सफै आणा! अगदी बेफाम झाल्याप्रमाणे त्याला असा त्रास द्याल म्हणता, की स्वारीला जीव नकोसा झाला पाहिजे! अगदी खनपटीस बसा की आलीच स्वारी ताळ्यावर! तुम्ही बतावणी मात्र चांगली करा म्हणजे झाले! सत्यापरता धर्म नाही हे खरे; पण पुष्कळदा सत्यापेक्षा सत्याच्या अविर्भावानेच जास्त कार्यभाग होत असतो. पहा, मी म्हणतो याचा तुम्हाला अनुभव येईल.

**मनोरमा** : बरे, करीन बापडी!

**कमलाकर** : अहो, एकेक यत्न करून पहावा! हा नाही साधला तर दुसरा. तुम्ही इतक्यातच निराश होऊ नका! चला, आता मी सांगितलेलं विसरू नका.

**मनोरमा** : नाही विसरावयाची! तुम्हाला दिसेलच आता सारे!

(मनोरमा जाते.)

**कमलाकर** : (स्वगत) ठीक, ही विषाची पेरणी सुरेख झाली! जयंता, आपल्या गोड बोलण्याने या कमलाकराचा लहानपणापासून जो सारखा पाडाव करीत आलास त्याची फळे भोगायला आता तयार हो. अपमानाचा, द्वेषाचा, तिरस्काराचा जो तीव्र रस आजवर या हृदयात साठवून ठेवीत आलो त्याचा आता कर्तबगारीच्या जोरावर अर्क- हा विषारी अर्क- निर्माण करून तुझ्या सुखाला ठार मारल्यावाचून मी कधी राहणार नाही! माझ्या आयुष्याचे साफल्य माझ्या सुखाने होणार नसून तुझ्या दु:खाने मात्र होणार आहे. माझ्या

या कर्तव्यात थोडा वेळ जी विश्रांती मिळेल तिलाच मी माझे सुख मानीन.

(जातो.)

## प्रवेश पाचवा

(लीला. स्थळ- नदीतीरावरील अमृतेश्वराचे तुळशीवृंदावन)

**लीला** : (वाचते)

(चाल - यादवराया भाई या हो)

आठवतो का सांग सखे तो काळ विवाहाचा।
बाळपणाचा, मुग्धपणाचा निर्मळ भावाचा॥
संसाराचे चित्र चिमुकले, चिमुकलेच जीव।
फुलले नव्हते हृदयांचेही राजस राजीव॥
पहात होते तात तदा त्या लीला बाळांच्या।
जणुं आठवती त्यांसही लीला त्याच सुकालाच्या॥
जपति परोपरि प्रसन्नहृदया पुण्यमयी माता।
गेले ते दिन सीते, यापरि हा बघता बघता॥
बाळपणीचे प्रसंग जणु ते घडति आज फिरूनी।
चित्रपटा या अश्रुजलाने चल टाकू धुउनी॥
तू सीता ती, राम तोच मी, त्याच आज माता।
परि जे गेले दिन ते आता येतील का हाता॥
कशास आशा आता नसती; झाले ते गेले।
सुकले फूल न देत वास जरी अश्रूंनी भिजले॥

छे:! नाहीच जमत हे! मुळातला श्लोक एवढासा, पण माझ्या इतक्या ओळी होऊन सुद्धा काही तरी चुकून राहिल्यासारखे वाटते! या उत्तररामचरित्राचे सारे असेच आहे! मनाला जितके पटते तितके शब्दांत वठवून दाखविता येत नाही. पहिल्या अंकात चित्रपट पहात बसलेल्या सीतारामांच्या मंगलमूर्ती नजरेपुढून हलत नाहीत अगदी! त्यांच्या बाळपणाची चित्रे त्यांच्या डोळ्यांपुढे उभी राहिली यात काय नवल? पण हे उत्तरराम वाचताना आम्हाला सुद्धा ती

चित्रे दिसतात. लग्नकाली एखाद्या बाहुलीएवढ्या सीतादेवीने आपल्या गोंडस हातांनी ती चिमुकली माळ मेघश्याम जगन्नाथाच्या कंठात- अगंबाई हा काय चमत्कार! रामचरित्रातल्या इतर प्रसंगी डोळ्यांसमोर खेळणारी त्या जानकी जीवनाची श्यामसुंदर मूर्ती विवाह प्रसंगाच्या चित्रांतून नाहीशी होऊन जयंताची लहानपणीची गोजिरवाणी मूर्ती तिच्या जागी का बरे दिसायला लागते? आणखी सीतादेवीच्या जागी आठ वर्षाची लीला! देवा, क्षमा कर; मनाचा कितीही धडा केला तरी सुद्धा लीला-जयंताची ही चिमुकली जोडी अशी डोळा चुकवून कल्पनेपुढे उभी राहते याला मी तरी काय करू? अहाहा! लहानपणी सर्वांनी या आमच्या चित्रासारख्या जोडीचे कौतुक करावे! आणि आज तेच मंगलदर्शन जगाच्या दृष्टीने पापचित्र दिसावे ना! देवा, तुझ्याही दृष्टीला ते पापचित्र वाटत असेल तर ही पहा मी, निर्दयपणाने त्या लहानग्या कल्पनाजिवांना या अश्रूंच्या पुरात बुडवून टाकते! ज्या काळाच्या प्रवाहात आमची खरी बाळरूपे वाहून गेली, त्याच्याच ओघात त्यांच्या चित्रांनाही लोटून देते! पण नको! त्या वेळच्या दहा वर्षीच्या जयंताला आणि आठ वर्षीच्या लीलेला, मायावी जगता, तुझ्या पापविचारांशी ओळख तरी होती का? मग झाले तर! या हतभागी लीलेच्या, तिच्या भोवती पसरलेल्या जगाच्या समजुतीसाठी त्या कल्पनाराज्यातल्या बाळजिवांचा कशाला विरस करू? त्यांचा आनंद तेव्हाही निर्दोष होता आणि आताही निर्दोषच आहे. श्रीरामचंद्रा, रावणाला मारल्यावर सीतादेवीला परत आणून, तिच्यासह अयोध्येच्या चौदा चौकड्यांच्या छात्रसिंहासनावर बसवून स्वर्गसुखाच्या ऐन भरात असताना सुद्धा, जर आपल्याला बाळपणाचा चित्रपट पाहून वाईट वाटले, तर मग या भाजलेल्या जिवाला ओलावा मिळण्यासाठी, बाललीलांच्या अर्काचा एखादा अश्रू या हृदयावर टाकिला, तर देवाधिदेवा, तू क्षमा करणार नाहीस का? अहाहा! त्या निर्दोष प्रेमचित्राकडे सारखी टक लावून किती वेळ पहात बसू असे मला झाले आहे. अंत:साक्षी अमृतेश्वरा! आज कल्पनेच्या किल्ल्यात पळून गेलेले हेच चित्र एकदा आम्ही तुला प्रत्यक्ष दाखविले होते ना? शुभ्र मोगऱ्यांच्या कळ्यांची एकच लांबलचक माळ गळ्यात घालून, याच नदीच्या काठी त्या पायरीवर उभे राहून, जयंत व मी किती तरी वेळ आमचे पाण्यात उमटलेले प्रतिबिंब पाहात होतो. इतक्यात कमलाकरांनी हळूच मागे येऊन थट्टेने ती माळ तोडून टाकली. तल्लीनतेमुळे आम्हाला गळ्यातली माळ तुटताना दिसली नाही, पण त्या चलचित्राच्या गळ्यातली तुटलेली माळ पाहून आम्ही जरा दचकलो. कैलासनाथा, तेच ना हे चित्र? कमलाकर, का बरे त्या वेळी ती माळ तोडून- (पाहून) कोण? कमलाकर? आज सुद्धा अशाच रीतीने यांनी ही सुखविचारांची माळ तोडून टाकली!

(कमलाकर येतो)

**कमलाकर** : लीलावती, नेहमी पहावे तो तू आपली या जागी बसलेली असतेस, इतकी काय या जागेत जादू भरली आहे न कळे!

**लीला** : जादूच आहे नाही तर काय? संथपणाने वाहणारी ही नदी, आमच्या रक्षणासाठी या एवढ्याशा देवळात सामावून बसणारा हा कैलासनाथाचा प्रतिनिधी, मावळण्यापूर्वी त्या टेकडीवर भरजरी गालिचा पसरून बसलेला सूर्यनारायण, वाऱ्याच्या एवढ्याशा झुळकीबरोबर सुवास पसरणारी ही पवित्र तुळशी, पलीकडच्या पटांगणात आनंदाने बागडणारी मुले-हसू नका, कमलाकर, जगाचा जादूगार याच गोष्टींनी आपली नजरबंदी करीत नाही का?

**कमलाकर** : लीलावती, तुझे, जयंताचे, देवभोळेपणाचे वेड अजून गेले नाही याचे मला नेहमी आश्चर्य वाटते. ज्या वेळी आपण नव्याने जगात आलो तेव्हा प्रत्येक नवाईने मनाला वेडावून सोडले हे ठीक झाले; पण आता काय त्याचे? त्याच त्याच गोष्टी पाहून रोज आश्चर्यचकित होणे हे मी मानवी बुद्धिमत्तेचे कमीपण समजतो!

**लीला** : कमलाकर, सर्वशक्तिमान सर्वेश्वराच्या कृतीपुढे मनुष्याच्या बुद्धीचा कमीपणा दिसला तर त्याची आपल्याला लाज का वाटावी? तुमची दृष्टी लहानपणापासूनच या सृष्टीसौंदर्याच्या बाबतीत बिघडलेली! हेच जयंत असते तर या वेळी ते सुद्धा माझ्यासारखेच वेडे झाले असते! पहा बरे! या नदीच्या सपाट पाणभुईवर हा निळीचा आणि दुसऱ्या जलवेलींच्या पानांचा हिरवा गालिचा पसरला आहे, याच्यावर घटकाभर कोणाची दृष्टी विसावणार नाही?

**कमलाकर** : माझी! लीलावती, नदीने आपले अंतरंग झाकण्यासाठी पांघरलेला हा हिरवा शालू फाडून माझी अंतर्भेदी दृष्टी नदीच्या तळाशी माजलेल्या चिखलावर- साऱ्या शहराच्या घाणीच्या बिछायतीवर- प्रत्यही बालविधवांनी टाकून दिलेल्या मुलांच्या कुजलेल्या देहावर खेळू लागली म्हणजे या नदीच्या अंतरंगात आणि एखाद्या नटव्या वेश्येच्या अंत:करणात मला काहीच फरक दिसत नाही!

**लीला** : इश्श! काय घाणेरडे विचार हे! कमलाकर, या अशा संध्याकाळी, अशा रमणीय जागी, अगदी प्रत्यक्ष देवाजवळ असताना सुद्धा असल्या हिडिस कल्पना तुमच्या डोक्यात येतात तरी कशा?

**कमलाकर** : देवांच्या सान्निध्याने, या दगडी देवांच्या सान्निध्याने, लीले, माझ्या अशा कल्पना उलट बळावतात! लीलावती, साधे सृष्टचमत्कार पाहून, पूर्वीच्या नेभळट मनुष्यांची बुद्धिमत्ता दीपून, हबकून, जागच्या जागी मरून ठार झाली.

आणि ईश्वर हे त्या मेलेल्या बुद्धिमत्तेचे भूत उत्पन्न झाले! पूर्वजांच्या मेलेल्या बुद्धिमत्तेचे हे ईश्वरी भूत आजच्या त्यांच्या नादान पोराबाळांना भेडसावीत आहेत! पण, लीले, खरे म्हटले तर प्रत्येक दगडी मूर्ती म्हणजे मानवी बुद्धिमत्तेच्या प्रेतावर, तुमच्या भाविकपणावर, बांधलेली समाधी आहे; आणि प्रत्येक देऊळ हे मेलेल्या बुद्धिमत्तेचे स्मशान आहे! ते बघ, लीलावती, पलीकडे ते स्मशान आहे; ऐक-अशी कानावर हात का ठेवितेस? त्या स्मशानातल्या प्रत्येक राखेच्या ढिगाखाली, जळून गेलेल्या प्रेताबरोबरच खाक झालेल्या, शेवटपर्यंत आशानिराशा ज्यांच्या कैचीने कातरलेल्या, सुखदु:खांच्या पेचात पिळून निघालेल्या हृदयातल्या हजारो गूढांची, मनुष्याच्या मेलेल्या आशांची जशी राख सापडेल तशी प्रत्येक देवाच्या मूर्तीखाली, तर्कवितर्कांच्या पंखांनी सृष्टीची रहस्ये शोधण्यासाठी धडपडणाऱ्या, पण अखेर आश्चर्याने चमकून आणि भयाने भेदरून प्राण सोडणाऱ्या हताश कल्पनेची राखच सापडेल.

**लीला** : कमलाकर, नका, नका, असे बोलू नका! तुमच्या प्रत्येक शब्दासरशी माझ्या अंगावर शहारे येत आहेत. त्या मावळत्या सूर्यनारायणाकडे पहा! मला वाटते, साक्षात सर्वसाक्षी परमेश्वराचा हा नेत्र सुद्धा तुमच्या शब्दांमुळे रागाने लाल झाला आहे! कमलाकर, त्याची करुणा भाका! ते पहा, त्याच्या कृपाकिरणांनी पावन झाल्यामुळे, वाऱ्याने उडालेल्या अगदी धुळींचे सुद्धा सोने झाले आहे! मग त्याच कृपेने आम्हा मनुष्याचे सोने होणार नाही का?

**कमलाकर** : धुळीचे सोने! लीले, रात्रीचे खेळ खेळण्यासाठी ही सृष्टी तुझ्या देवाच्या डोळ्यात दिवसाढवळ्या ही धूळ टाकीत आहे, समजलीस!

**लीला** : जाऊ द्या, कमलाकर, मला असल्या हिडिस गोष्टी ऐकायची इच्छा नाही! चांगली संध्याकाळ झाली, सूर्य मावळायला झाला, मनोरमा वहिनीला या तुळशीवृंदावनात तेवढा दिवा लावून ठेवायला सांगते!

**कमलाकर** : थांब; लीले, तुझ्या प्रत्येक करणीचे आज मला हसू येत आहे! या तुळशीची सेवा करून तुला कोणता मोक्ष मिळवावयाचा राहिला आहे?

**लीला** : कोणता म्हणजे? सुशीलाताईने मिळविला आहे तोच! माझ्यासारख्या विधवेने धर्माचरणाने जर नाही तर मग दुसऱ्या कशाने मनाची शांती मिळवावी? सुशीलाताईने तरी याच मार्गाने ती मिळविली आहे ना?

**कमलाकर** : अशी शांती मिळविणारी ती सुशीला एक वेडी, तिच्या पावलावर पाऊल टाकणारी तू सातवेडी, आणि तुम्हा विधवांना वैराग्य मिळविण्यासाठी या तुळशीभोवती आणि देवळाभोवती भटकायला सांगणारी ती धर्माज्ञा

शंभरवेडी! लीलावती, तुमच्या देवांच्या भाकडकथा खऱ्या मानल्या तरी त्यांच्या पारायणाने वैराग्य कसे मिळणार? ही तुळशी काय सांगते? सोळा हजार एकशे आठ गोपींचा मेळा भोवती नाचत होता; पण कृष्णाने एका वृंदेच्या शोकामुळे तिच्या स्मशानात- या तुळशीवृंदावनात, धाव ठोकिली, हीच गोष्ट तुळशी सांगणार ना? तुझ्या हातातले हे उत्तमरामचरित; हे तरी हेच सांगेल की, सुखाच्या वेळी योगवासिष्ठाच्या गप्पा झोकणारा राम, सीता जराशी दूर झाल्याबरोबर राज्यपदावर लाथ मारून सारखा रानोमाळ रडत सुटला. तसाच हा नंदिकेश्वर! दरवाज्याच्या महिरपीवर आपल्या पोराला- त्या गणपतीला- बसवून पार्वतीबरोबर गाभाऱ्यात बसलेल्या त्या भोळ्या शंकराची दंतकथा ऐकून तर लीले, तुला किळस येईल. सांग पाहू आता या असल्या देवांच्या रडगाण्यांनी भरलेल्या पोथ्यापुराणांनी कोणत्या विधवेला वैराग्यप्राप्ती होणार? ती पहा, सूर्य मावळल्यामुळे घरी जायला निघालेली मुले देवासमोर हात जोडून उभी आहेत. तू आणि जयंत लहानपणी असेच देवासमोर हात जोडून वेड्यासारखी उभी रहात होता. तेव्हा ते शोभून गेले, पण आज जर तुम्ही या फत्तरासमोर- या शून्यवृत्ती पाषाणासमोर तद्रूप शून्यवृत्तीने फत्तरासारखी उभी राहिला, तर मग वाढत्या वयाचा तुमच्यावर- निदान अकालवैधव्याने भाजलेल्या तुझ्या मनावर- काहीच परिणाम झाला नाही असे नाही का होत? बावळट बाळपणाला भाबड्या भाविकतेची जोड ठीक होती; पण आज त्या बालवृत्तीची काय किंमत? त्या मुलांनाच विचार; ती सुद्धा म्हणतील, हे बाळपण नको; आमची मोठे होण्याची इच्छा आहे.

**लीला** : त्या बिचाऱ्यांना मोठेपणाच्या दु:खांची कल्पना कशी असणार? मोठेपणाची एकांगी बडेजावी पाहून त्या अजाण अर्भकांना तसे वाटले तर त्यात काय नवल? पण लहानपण आणि मोठेपण या दोहींचा अनुभव घेतलेल्या लोकांना पुन्हा मागे जाण्याची परवानगी मिळाली, तर एका क्षणात सारी सृष्टी बालकांनीच गजबजून जाईल!

**कमलाकर** : लीलावती, ही तुझी केवळ कल्पना आहे! डोंगर चढताना आपण एक टप्पा चढून गेल्यावर जर मागे नजर टाकली तर मागच्या वाटेवर नुसत्या झाडांची कोवळी हिरवळच दिसते; तिच्यातून पसार होताना पायाला रुतणारे खडे आणि अंगाला ओचकारे भरणारी काटेरी झुडपे दूरपणामुळे त्या हिरवळीखाली दडून बसतात; हीच रमणीयता पुढच्या वाटेवरही पसरलेली दिसते; पण उलटपक्षी, पायाखालच्या वाटेवरचा मात्र वाईटपणाच जाणवतो. आणि त्याला शोभविणारी हिरवळ आपल्या डोक्याच्या वरकल्पनेच्या आटोक्याबाहेर असते. लीले, हीच गोष्ट आयुष्याच्या प्रवासाची! भूतकालाची रमणीयता वाटते ती याचमुळे; आणखी याचमुळे भविष्याची

आशा सुटत नाही! वर्तमानाचा वाईटपणा दूर लोटून द्यावयाची ताकद आपण अंगी आणली पाहिजे.

**लीला** : तुमच्याच दृष्टान्ताप्रमाणे पाहिले तरी बाळपणाचे मोठेपण तिळमात्र कमी होत नाही. प्रवासाचे सारे टप्पे सारखेच त्रासदायक असले तरी सुरुवातीच्या हुषारीमुळे बाळपणाचा टप्पा तितका अवघड वाटत नाही; शिवाय त्यावरून खाली पडले तरी फार लागण्याचे भय नाही. वाढत्या वयाच्या प्रवासाबरोबर पडण्याची भीतीही उंचावत जाते. बाळपणी सुखदु:खाचे चक्र सारखे फिरते खरे, पण त्याच कारणामुळे त्याची तीव्रताही क्षणिकच भासते. ती मुले पाहा; आजच्या सुखदु:खांच्या त्यांच्या कल्पना रात्री झोपेत थकव्याबरोबर विरून जातील; उद्याचे जग निराळे; उद्याच्या आशानिराशा निराळ्या! वाऱ्याच्या प्रत्येक लहरीसरशी-सृष्टीदेवीच्या प्रत्येक श्वास-निश्वासासरशी-बालमनाच्या सुखदु:खाची हालचाल बदलते! तेच आपले मन पहा! एकेक विचारांचे ओझे अगदी जन्मभर वागवावे लागते! कमलाकर, ही मुले-आपल्याच लहानपणाच्या खेळगड्यांची ही हालचाल करणारी, हुबेहुब त्यांच्यासारखीच दिसणार चित्रे- सारखे पहात बसले म्हणजे आपल्या बाळपणाचाच काळ अजून चालला आहे- सृष्टी सर्वकाळ एकरूपच आहे असे वाटायला लागते. कमलाकर, सृष्टीच्या या कायमच्या चित्रपटावर, आपली नाही! तुमचीही जमा आमच्यातच कशाला करू? देव तुमचा तरी संसार यशस्वी करो- पण कमलाकर, आमची चित्रे ठेविल्यावाचूनच आम्ही- मी म्हणा, जयंत म्हणा, सुशीलाताई म्हणा- सारखी काळाच्या ओघात वाहात चाललो आहोत! अहाहा! एकेकदा मनात येते की, बाळपणाचाच सारखा ध्यास करून मनाने- तसेच शरीराने पण बालरूप व्हावे, आणि या मुलांत मिसळून आमच्या पुसलेल्या प्रतिमा कायमच्या कालपटावर पुन्हा लिहून काढाव्या! कमलाकर, तुम्हाला नाही असे वाटत?

**कमलाकर** : मुळीच नाही. लीलावती, तारुण्यात तुझी, तुम्हा सर्वांचीच निराशा झाली- झाली कसची? पापपुण्याच्या नसत्या कल्पनेने तुम्हीच करून घेतली! म्हणून या वयातल्या सुखोपभोगाला लागणारा वेळ ते सुख नसल्यामुळे तुम्हाला जड झाला आहे; आणि या रिकामटेकड्या वेळात तुम्ही बाळपणाच्या वेड्यावाकड्या मूर्खपणाला सुख मानू लागला! लीले, तारुण्याच्या सुखाची तुला कल्पना नाही. लहानपणी तू चांगली दिसत होतीस, त्या वेळी मी तुला हजारदा पाहिली; पण आजच्या दृष्टीने तुझ्याकडे पाहण्याची शक्ती त्या कोवळ्या कमलाकरच्या अंगी नव्हती. लीलावती, पापपुण्याच्या, देवाधर्माच्या कल्पना- लीले, हा पहा तुझा हात धरून तुला सुखाच्या मंदिरात नेऊन सोडतो, (तिचा एकदम हात धरतो.) हं, लीलावती, एकदम ओरडू

नकोस, मी तुझा गुलाम आहे; लीले, तुझी पायधरणी करण्याऐवजी एकदम हात धरिला त्याची क्षमा- असा हात सोडवू नकोस!

**लीला** : कमलाकर-

**कमलाकर** : तुझा हात सोडून हे पहा तुझे पाय धरितो. (तिचे पाय धरतो.) तुझ्या तोंडातून मोठ्याने एक शब्द निघाल्याबरोबर सारी माणसे जमून मी रसातळाला जाईन हे मला माहीत आहे. पण तुझ्यावर विश्वास ठेवून मी आपले प्राण तुझ्या हाती दिले आहेत. लीले, मला तारणार किंवा मारणार तूच आहेस! लावण्यलतिके, विचार कर, दूर गेलेल्या सूर्याच्याच वैभवाने रंगलेल्या या सोनेरी ढगांकडे पहा, या नुकत्या उगवणाऱ्या चांदण्यांकडे पहा, पूर्वेकडे तोंड काढणाऱ्या त्या चंद्राकडे पहा! ही संध्या आपल्या मृत पतीच्या वैभवाची, या ढगांच्या आणि तारांच्या सोन्यामोत्यांची रास पसरून त्या चंद्राला भुलविण्यासाठी नटून बसली आहे! लीले, सृष्टीला पापपुण्याच्या कल्पना मान्य नाहीत! दर महिन्याला सत्तावीस तारांची घरे धुंडाळणाऱ्या चंद्राची साक्ष घे! सारी सृष्टी हेच सांगते. लीले, नसत्या नीतीच्या कल्पनेने माझा तिरस्कार-

**लीला** : तुझा तिरस्कार- तुझ्या छायेचा- तुझ्याबद्दल कल्पनेचा सुद्धा तिरस्कार येईल; ऊठ, सोड माझे पाय! नाही सोडत पाय? ओरडू मोठ्याने?

**कमलाकर** : नको; झाली ही आगळीक केवळ चुकून; अगदी क्षणिक आवेशामुळे! लीले, तुझ्या उदारतेची, तुझ्या पवित्रतेची तेजस्विता क्षणभर कामांध झालेल्या या माझ्या पापी डोळ्यांना दिसली नाही म्हणूनच तुझा असा उपमर्द माझ्या हातून झाला! पण लीले, माझे प्राण तुझ्या हाती आहेत. माझ्या हातून चुकून झालेल्या या भयंकर अपराधाचा कोणाजवळ उच्चार करणार नाही असे मला आश्वासन दे; त्याखेरीज मी तुझे पाय सोडणार नाही! तुझ्या विलक्षण तेजाने मी दिङ्मूढ झालो आहे!

**लीला** : उठा! या गोष्टीचा कुठेही बभ्रा न करण्याचे हे घ्या मी तुम्हाला वचन देते.

**कमलाकर** : नको; तुझ्या हाताला पुन्हा स्पर्श करण्याची माझी योग्यता नाही! तुझ्या नुसत्या शब्दावर माझा विश्वास आहे. तुझे पाय धरण्याचीच माझी योग्यता आहे!

**लीला** : उठा, या अमृतेश्वराची शपथ घेऊन सांगते की, या जन्मी ही गोष्ट मी कोणाजवळ बोलणार नाही!

**कमलाकर** : अहाहा! लीले, धन्य आहे तुझी! पापात पडणाऱ्या माझ्या आत्म्याचा आज तू उद्धार केलास! माझ्या आयुष्याला आज तू नवीन दिशा दाखवलीस!

कमलाकराचा आज नवीन जन्म झाला! तूच हा नवा जन्म देणारी माता! लीले, या चुकलेल्या लेकराला नीट मार्गाला लाव!

**लीला** : यात मी काय केले? कमलाकर, याबद्दल त्या अमृतेश्वराचे उपकार माना! त्याच्याजवळ चांगली बुद्धी मागा! तुमच्या मघाच्या घाणेरड्या कल्पना-

**कमलाकर** : तुझ्या स्पर्शाने पावन झालेल्या देहात कशा राहतील? लीले, देवाबद्दल माझे विचार अशा तऱ्हेचे व्हावयाला आधी तूच कारण झालीस! आणि आज माझा उद्धार व्हावयाला कारणही तूच झालीस! लहानपणी तू आणि जयंत एकमनाने ज्या ज्या गोष्टी करीत आला त्या त्या गोष्टींचा मी तिरस्कार करायला शिकत आलो! तुम्ही मला नेहमी एकीकडे टाकीत होता म्हणूनच मी असा पतित झालो! तुमची देवाबद्दलची निष्ठा वाढत गेली तसा माझा तिरस्कार वाढत गेला! पण आज तू मला देवाची साक्ष पटवून दिलीस! ज्या देवाच्या कृपेने तुझ्या अंगी इतके प्रखर तेज आले, तो देव- लीले, मला सुमार्गाला लावणाऱ्या देवतेचा देव- मला पूज्य कसा नसेल?

**लीला** : कमलाकर, चला, झाले ते झाले. आजपर्यंतच्या जयंतच्या कृतीचा तुम्ही तिरस्कार केला, आता तिचे अनुकरण करा! त्यांचा मनोनिग्रह, त्यांची उदार पुण्यशीलता, त्यांची उदार विचारशीलता डोळ्यांसमोर ठेवून यापुढे वागत चला!

**कमलाकर** : (तुळशीवृंदावनातल्या महादेवावर हात ठेवून) या कैलासनाथाची शपथ घेऊन सांगतो की, तुझी आज्ञा मला शिरसामान्य आहे. लीले, जा तू आता. आजपर्यंत मनात आलेल्या नास्तिक कल्पनांचे, आताच्या अमंगल पापविचारांचे, क्षालन करण्यासाठी मी आज मोकळ्या मनाने त्या भगवंताजवळ प्रथमच क्षमा मागणार आहे! घटकाभर हृदय मोकळे करून मला या मूर्तीला अश्रूंचा अभिषेक करू दे! लीलावती, या पाषाण हृदयातून वाहणाऱ्या अश्रूंच्या गंगेत ही पाषाणमूर्ती सुद्धा विरघळून टाकल्याखेरीज मी इथून हालणार नाही.

(एकाग्र दृष्टीने देवाकडे पाहता राहतो. लीला जाते.)

**कमलाकर** : (एकदम उठून) उठा, कैलासनाथ, या नदीच्या तळातल्या गाळात बुडी मारून खरोखरीच कैलासवासी व्हा! (देव नदीत झुगारतो.) माझा, माझ्या छायेचा, माझ्याबद्दलच्या कल्पनेचा सुद्धा तिरस्कार आ! आकाशातल्या दिवट्यांनो! पाहिलात आजचा हा नाटकी प्रकार? लौकरच या नाटकाचा शेवटचा अंक तुम्हाला दिसेल! जयंताचा मनोनिग्रह, त्याची पुण्यशीलता- लीले, तुम्हा सर्वांची पुण्यशीलता मला चांगली समजते! जयंतासाठी

रात्रंदिवस झुरणाऱ्या या छबकडीने मला नीतिपाठ शिकवावे काय? इतका मी मूर्ख नाही! नीतीचे फाजील डावपेच मी ओळखून आहे! ठीक आहे, तुमची नीतिमत्ता पायाखाली तुडवून तुमच्या चोरट्या सुखाची राखरांगोळी करीन तरच नावाचा कमलाकर! मनोरमेचा जयंताला शह लावून त्याला सळो का पळोसे केले म्हणजे आपोआप तो या पोरीच्या पायाशी लोळण घेईल; हळूहळू यांच्या पायाला पाय फुटून ते चारचौघांत रांगू लागले म्हणजे लीले, तुला एखाद्या बाजारबसवीच्या पायरीवर नेऊन बसवायला कितीसा उशीर लागणार? इकडे मनोरमेला, केवळ ती जयंताची लग्नाची बायको, एवढ्यासाठीच फसवून तिचे धिंडवडे काढतो आणि जयंताच्या तोंडाला काळे फासतो. आणि नंतर सुशीलेचा समाचार! खवळलेल्या पद्‌माकराने सुशीलेला घरातून दरवडा घालून पळविण्याचा घाट घातला आहे आणि त्या बाबतीत माझ्या साह्याबद्दल त्याने दहा हजार रुपये देऊ केलेच आहेत! ठीक आहे. दहा हजारांचा सुशीलेच्या पातिव्रत्याचा सौदा काही वावगा नाही! लीले, या दुखवलेल्या सापाचा डाव किती भयंकर असतो याची तुला लौकरच ओळख पटेल!

(जातो.)

## अंक पहिला समाप्त

## अंक दुसरा
# प्रवेश पहिला

(सुशीला निजली आहे; विद्याधर भीत भीत प्रवेश करतो.)

**विद्याधर** : परमेश्वरा, या साहसात मला यश देऊ नकोस! माझ्या या साहसी हेतूला ही वेळ आणि त्याचा विषय किती तरी प्रतिकूल आहेत. बाहेर शीतरश्मी निशापतीने आपल्या अमृतवर्षी कोमल किरणांनी या भूतलावर चंद्रिकेचा पाऊस पाडून अंतराळाला दुग्धवर्णाची शोभा आणिली आहे! या उरफाट्या दुग्धसमुद्राचा नीलवर्ण तळाशी मंदतेजोमय तारकामौक्तिके विरल पसरली आहेत! या पुण्यस्नानाने आनंदलेली भूदेवी मंदवायूच्या रूपाने वाहणाऱ्या समाधानाच्या निश्वासाबरोबर गगनमंडलात पुष्पराग उधळीत आहे. पुण्यवंताच्या निकट सहवासाने पापवृत्तीसुद्धा पुष्कळशी मावळून जाते, त्याप्रमाणे छायारूपाने वृक्षाखाली दडून बसलेल्या मूळच्या काळ्याकुट्ट अंधाराला सुद्धा या चांदण्याच्या निकटवर्ती प्रभावाने किती तरी उजाळा आला आहे! सारे निर्दोष, प्रेमवृत्ती जग निद्रावश होऊन चोहीकडे शांतता दिसत आहे! सजीव सृष्टीच्या शांतवृत्तीमुळे चंद्रिकेत हा सौम्य, शांत, स्पष्ट दृग्गोच्चार होणारा शहराचा भाग पहात असताना, सृष्टीच्या सत्यतेचा विसर पडून, दुर्बिणीतून एखाद्या चित्रातला देखावा मी पहात आहे असे वाटते! आणि चंद्रिका म्हणजे रवितेजाचे चित्रात उतरलेले, मंद आणि दृष्टीसुसह रूपच नाही तर काय? या देखाव्यात पुण्यशील सुशीला तर मूर्तिमंत शांतिदेवीच शोभते आहे. अहाहा! किती अलौकिक शोभा, मनोहर लावण्य, तेजोमय पवित्रता, गंभीर वृत्ती ही! या शांत, पवित्र आणि रम्य चित्राकडे पाहून मला काश्मीरची, त्या रमणीय झेलम नदीची, आणि तिच्या भोवतालच्या गुलाबाच्या ताटव्यांची आठवण होते! हिंदुस्थानच्या नंदनवनातल्या त्या मंदाकिनीच्या- झेलम नदीच्या- दुतर्फा पसरलेल्या त्या गुलाबी गालिच्यावर, जर ही शांतिसुंदरी निजवली तर वेडावलेल्या कवींना तरी शारदादर्शनाचा भास होईल आणि झेलम नदीचा रमणीय प्रवाह कवितेचा मूर्तिमंत ओघच वाटेल. अहाहा! हे दर्शनसुख चिरकाल लाभेल काय? जगदीश्वरा, कधी काळी सृष्टीचा लय करण्याचा तुझा खरोखरच हेतू असेल तर तो आताच, या स्थितीत कर, आणि माझी दृष्टीची शक्ती मात्र जिवंत ठेव. अथवा ही पूर्वेकडची खिडकी उघडतो म्हणजे चंद्राला हिच्या मुखमंडलाचे पूर्ण दर्शन मिळून मोहाने तो येथेच थांबेल आणि ही सुखमय रात्र अशीच चालू राहील. पण नको; अशा रीतीने काळाला फसविण्याच्या प्रयत्नापेक्षा अधिक सुख देणाऱ्या या सुखमूर्तीलाच

मोह पाडण्याचा प्रयत्न करावा. हिला स्पर्श करू का? नको, माझ्या नुसत्या उष्ण निश्वासाने सुद्धा ही शांतिदेवता जागी होईल. सुशीले-

(सुशीला उठून उभी राहते.)

**सुशीला** : कोण विद्याधर?

**विद्याधर** : सुशीलाबाई, अशा अकल्पित स्थितीत मला पाहून तुम्ही भ्याला नाही किंवा ओरडला नाही, यावरून आताच मी तुम्हाला शांतिदेवता म्हटले त्याची तुम्ही सार्थकता केलीत; आणि त्यावरून माझ्या विनंतीचा विचार सुद्धा तुम्ही शांत मनाने कराल अशी मला आशा वाटू लागली आहे!

**सुशीला** : एकंदर प्रकारावरून मला तुमचा हेतू अर्धामुर्धा कळून चुकून, तुमच्याबद्दल तिरस्कार मात्र वाटतो! पण यात भिण्याचे किंवा ओरडण्याचे कारणच नाही! आत्मविश्वास हेच संरक्षणाचे साधन आहे! उत्कट पातिव्रत्याच्या अलोट शक्तीवर माझा फारच भरवसा आहे. पापाचे पारिपत्य करण्यासाठी अणूरेणूंत भरून उरलेला परमेश्वर, पतिव्रतेचा पाठिराखा असतो! शिवाय, त्यांचा आत्मा- या निशिगंधाच्या सुवासात मिसळून चंद्रकिरणांवर तरंगणारा, माझ्या नाथांचा अदृश्य आत्मा- माझ्याभोवती नेहमी पहारा करीत असतो! तेव्हा मला भिण्याचे कारणच नाही! तसेच, अगदी बिकट प्रसंग आल्याखेरीज चारचौघांना जमवून बाजार भरविण्याचाही मला कंटाळा आहे! बरे, तुमची कोणती विनंती आहे?

**विद्याधर** : पण आधी हे सांगा, की तुमच्याशी बोलत बसायला काही भय नाही ना ?

**सुशीला** : भय, संशय ही सारी पापाची भावंडे आहेत! माझ्या शीलाबद्दल सर्वांची चांगली खात्री आहे. बोला लौकर काय बोलायचे आहे ते.

**विद्याधर** : सुशीले, कालपर्यंत माझ्या आयुष्याचे गलबत शून्य हेतूच्या समुद्रात वाटेल तिकडे संचारत होते, पण तुझ्या या तेजस्वी नेत्रदीपकाच्या खुणेने माझ्या विश्रांतीचे स्थान मला दाखविले! सुशीले, तुझ्याशी पुनर्विवाह करून सदैव या दिव्य दीपकाच्या प्रकाशात राहण्याची माझी उत्कट इच्छा आहे! तू माझा स्वीकार करशील का?

**सुशीला** : समुद्रातले जसे खुणेचे दिवे खाली खडक आहे असे दाखवित असतात, त्याप्रमाणे माझ्या या डोळ्यांची उभारणी सुद्धा माझ्या अभेद्य पाषाण हृदयावर झालेली आहे! तेव्हा तुमच्यासारख्या धाडशी खलाश्याने त्यापासून आपले गलबत दूर ठेवावे हेच बरे. विद्याधर, कालच्या वाटाघाटीनंतर आजच्या प्रश्नाचे कारणच नाही. आणि त्यातून तुमच्या आताच्या हिडिस धाडसाने तर तुमच्याशी पुनर्विवाह करण्याची कल्पना सुद्धा मनाला सहन होत नाही!

**विद्याधर** : सुशीले, लोकापवादाच्या भीतीने कदाचित उघड पुनर्विवाहाला तुझी तयारी नसेल तर-

**सुशीला** : (रागाने) तर काय? - विद्याधर, तुम्ही शुद्धीवर नाही वाटते?

**विद्याधर** : सुशीले, दया कर, माझी निराशा करू नकोस! तुझ्या सहवासावाचून सारे जग मला शून्य होईल! पुनर्विवाह नको तर निदान गुप्तपणे तरी माझा स्वीकार कर!

**सुशीला** : तुमच्या प्रत्येक शब्दाने तिरस्काराची परमावधी होते आहे विद्याधर, कालचा तुमचा विनय, ज्ञान, लज्जा ही काय झाली?

**विद्याधर** : सुशीले, मी वेडा झालो आहे. बाहेर चंद्राच्या प्रकाशाने चोहीकडे उजेड पसरला आहे; पण तुझ्या मुखचंद्राच्या प्रकाशाने माझ्या हृदयात अंधार पडून मला पापमार्गच स्पष्ट दिसत आहे; त्याच्या तेजाने माझे डोळे दीपून पापपुण्याचा भेद मला दिसत नाही! आश्चर्याने भांबावल्यामुळे माझी विचारशक्ती नष्ट झाली आहे! सुशीले, प्राणेश्वरी, माझा तिरस्कार करू नकोस. तुझ्यापायी माझे प्राण आणि प्राणांपेक्षाही अमूल्य असे माझे सच्छील अर्पण करावयास मी तयार आहे!

**सुशीला** : सच्छील अर्पण करणार! तुमचे सच्छील तुमच्याजवळ आहे कोठे? तुम्ही चोरासारखे आत शिरताना शील बाहेरच राहिले आहे! सच्छील परस्त्रीच्या खोलीत कधीच शिरणार नाही!

**विद्याधर** : रात्रीच्या पडद्याआड चोरट्या प्रेमाला झाकून ठेवले तर-

**सुशीला** : माझ्या बालपतिराजाच्या हक्काचा अभिलाष करणाऱ्या राक्षसा, चल नीघ येथून! इतकेच नाही, तर सूर्योदय झाल्याबरोबर या घरातूनही काळे कर! तू दृष्टीआड झाल्याखेरीज मी अन्नग्रहण करणार नाही!

**विद्याधर** : अशी प्रतिज्ञा करू नकोस. निदान माझ्या दृष्टीसुखाच्या तरी आड येऊ नकोस! चातक मेघमालेच्या नुसत्या दर्शनाने जिवंत राहतो तसे तुझ्या दृष्टीच्या अमृतवर्षावानेच माझ्या दग्ध प्रेमाचे पुनर्जीवन होईल! तुझ्या पतीच्या वैभवाचा उपभोग मिळाला नाही, तर त्याचे नुसते चित्र पाहण्यात मी समाधान मानीन! कैलासनाथाप्रमाणे शशिकला प्रत्यक्ष मस्तकी धारण करता आली नाही तरी तिच्या चंद्रिकेच्या प्रभेवरच चकोर आपली तृषा भागवितो! सुशीले, माझा स्वीकार केला नाहीस हेच माझे मोठे दुर्दैव! तशात मला हद्दपार करून माझ्या दुर्दैवाच्याही सीमेपलीकडे मला लोटू नकोस!

**सुशीला** : यानंतर तुम्हाला या घरात राहू देणे फार भयंकर नाही का?

**विद्याधर** : सुशीले, या घरातून बाहेर पडताच मी या जगालाही मुकेन. नको, प्रेमाने विचारशून्य झालेल्या या तुझ्या वेड्या भक्ताची हत्या करू नकोस!

**सुशीला** : मला तुमची दया तर येते, पण तुमच्या राहण्याने स्वत: मला भय नसले तरी लीला, वीणा किंवा द्रुमन यांच्यासाठी तरी मला तुमचा बंदोबस्त केला पाहिजे! दैवी रूपाखाली लपून बसलेल्या तुमच्या राक्षसी कृतीचा त्यांच्या अल्लड मनाला मोह पाडून-

**विद्याधर** : ही तुझी भीती निराधार आहे! लीला जशी तुझी बहीण तशीच माझीही. तुझ्याखेरीज सर्व स्त्रिया मातेसमान आहेत! शिवाय परमेश्वराची माझ्यावर कृपादृष्टी झाली तर मागेपुढे तुझे माझ्याबद्दलचे इतके वाईट मत एका क्षणात बदलून टाकीन अशी मला आशा आहे!

**सुशीला** : एका क्षणात दुसऱ्याचे आपल्याबद्दलचे मत अजिबात बदलून टाकण्याची अद्भूत शक्ती तुमच्यात आहे, याबद्दल वाईट अनुभवाने का होईना माझी खात्री झालेली आहे. बरे, तुम्हाला या घरात राहण्याची मी परवानगी देते; पण ज्या दिवशी मला तुमचे वर्तन वाईट दिसेल-

**विद्याधर** : त्या दिवशी, त्या क्षणी, हे घर सोडावयास माझी तयारी आहे. पण तोपर्यंत माझ्या आजच्या अपराधाची क्षमा करून त्याबद्दल कोठे उच्चार करू नकोस.

**सुशीला** : ठीक आहे. जा आता आपल्या ठिकाणी! परमेश्वर तुम्हाला तुमच्या पापाची क्षमा करो!

**विद्याधर** : उदार सुशीले, शाबास तुझ्या मोठेपणाची! आजचा हा अपराध विसरून यापुढे मला तुझी भक्ती करण्याची आज्ञा दे! आज ना उद्या माझ्या तपश्चर्येचे फळ मला मिळाल्यावाचून राहणार नाही. तोपर्यंत मात्र अशाच उदारपणाने माझ्या या धाडसाच्या प्रवेशावर विस्मृतीचा पडदा टाकून हा देखावा दृष्टीआड कर, एवढीच, देवी, तुझ्या पायाजवळ याचना आहे.

(पडदा पडतो.)

## प्रवेश दुसरा

(तात्यासाहेब व कमलाकर फाशांनी सोंगट्या खेळत आहे. घाईने गोकुळ प्रवेश करतो.)

**गोकुळ** : (स्वगत) जी दुर्वार्ता तात्यासाहेबांना सांगण्यासाठी मी इतका धावत आलो, जी ऐकल्यापासून माझ्या मनात तिच्याखेरीज दुसरा विषय घोळत नाही, ती कोणती? इतक्या महत्त्वाची बातमी विसरलो म्हणावे तर हेही शक्य नाही. का गडबडीत ती बातमी ऐकून घेण्यापूर्वी ती सांगण्यासाठी मी पळत सुटलो? काय बरे असावी ती?

(विचार करीत उभा राहतो.)

**तात्या** : काय रे गोकुळ, असा सचिंत का? काही मला आणलेला एखादा निरोप विसरला आहेस काय?

**गोकुळ** : छे: छे: तसे काही नाही! सहज उभा आहे आपला. (स्वगत) कोणती गोष्ट ती?

**तात्या** : (कमलाकरास) किती पडले? पोबारा! मग पळालीच ती! आता हाती लागत नाही.

**गोकुळ** : (स्वगत) हां! द्रुमन पळून गेली हीच बातमी. (प्रकट) तात्यासाहेब, एक मोठी चमत्कारिक बातमी सांगायची आहे आपल्याला! हो; विसरेन म्हणून टाचण सुद्धा करून ठेवले आहे. हा घ्या वाचा कागद.

(एक कागद तात्यासाहेबांस देतो.)

**तात्या** : (आश्चर्याने) काय, द्रुमन नाहीशी झाली? सांग पाहू, काय काय झाले ते? केव्हा गेली, कुठे गेली, कुणाबरोबर?

**गोकुळ** : त्याचा काही मागमूस सुद्धा नाही! काल रात्रीपासून तिचा पत्ता नाही; वसंतराव सारखा तपास करीत आहेत; पण कुठे थांग लागत नाही.

**तात्या** : फारच आश्चर्य म्हणावयाचे! का हो कमलाकर, तुम्हाला काहीच आश्चर्य वाटत नाही यात?

**कमलाकर** : (स्वगत) द्रुमन पळाली हे ऐकून यांना आश्चर्य वाटते; पण मला हे ऐकून आश्चर्य का वाटत नाही हे यांना कळले तर मात्र हे आश्चर्याने वेडे होतील! (प्रकट) मला यात मुळीच आश्चर्य वाटत नाही! तिच्याबद्दल अलीकडे माझ्या कानी थोडी कुजबूजही आली होती!

**गोकुळ** : कानी थोडी कुजबूज? आमची ही तर माझ्या कानी कपाळी सारखी ओरडत होती रोज! हा सारा स्त्रीस्वातंत्र्याचा परिणाम! सोडा म्हणावे बायकांना आणखी मोकळ्या! आता परत नाही आणता येत कुठे? सुधारणा, सुधारणा बरे ही कमलाकर!

**तात्या** : फारच आश्चर्य आहे म्हणायचे! बरे, जा, वीणेला आधी इकडे पाठीव! विसरू नकोस!

**गोकुळ** : (स्मरणवहीवर टिपतो.) वीणेला आधी इकडे पाठीव. (जातो.)

**तात्या** : काय बोलाफुलाला गाठ पडली पहा! त्या दिवशी बाबासाहेबांजवळ बोलल्याप्रमाणे वागण्याचा प्रसंग इतक्या लवकर येईल असे वाटले नव्हते.

**कमलाकर** : म्हणजे? स्त्रीस्वातंत्र्याच्या विरुद्ध खरेच जायचा विचार आहे आपला?

**तात्या** : विचार नाही. निश्चय आहे! पण ही पाहा आलीच वीणा! (वीणा व गोकुळ येतात.) वीणे, ऐकली ना ही विलक्षण बातमी?

**वीणा** : हो बाबा, आणि म्हणून तिकडेच जायला निघाले आहे मी!

**तात्या** : वीणे, वसंतरावाकडे जायचे कारण नाही.

**वीणा** : बाबा, अशा वेळी सुद्धा जाऊ नको म्हणता?

**तात्या** : अशा वेळी नाही, पण इथून पुढे केव्हाही त्यांच्याकडे जाण्याची मी तुला मनाई करतो आहे!

**वीणा** : मनाई? स्त्रियांच्या स्वतंत्रतेला तुम्ही स्वत:च निर्बंध घालणार?

**तात्या** : हो, स्त्री-पुरुषांच्या स्वैर संचारापासून अनिष्ट परिणाम होतील असे मला वाटते.

**वीणा** : म्हणजे द्रुमनच्या चुकीबद्दल मला शासन!

**तात्या** : तुलाच काय? सुशीला, लीला यांना सुद्धा मी बंदी करणार! आजपासून पुरुषांची बैठक निराळी, आणखी स्त्रियांची निराळी! कारणावाचून कोणी कोणाशी संबंध ठेवायचा नाही. गोकुळ, सर्वांना माझ्या दिवाणखान्यात घेऊन ये. (गोकुळ जातो.) आणखी वीणे, वसंतरावांशी यापुढे तुझा कोणताही संबंध असता कामा नये! मीच त्याला आपल्या इथे न येण्याची ताकीद करणार आहे!

**कमलाकर** : काय, वसंताला इथे येण्याची बंदी? त्याचा काय अपराध आहे यात?

**तात्या** : असे करणे थोडेसे निर्दयपणाचे आहे खरे, पण प्रत्यक्ष त्याच्या बहिणीनेच असा विपरीत प्रकार केल्यानंतर आता त्याला घरी येऊ देणे म्हणजे शुद्ध वेडेपणाचे

होईल. चर्चाविषय झालेल्या मनुष्याच्या आसपासच्या माणसांवर सुद्धा कुटाळांची निंदाव्यंजक दृष्टी फिरते! एखादा अंधुक तारा दाखविण्यासाठी लोक आधी शेजारच्या ठळक ताऱ्यांकडे बोट करितात.

**वीणा** : बाबा, माझे त्यांच्यावर प्रेम आहे हे विसरता तुम्ही!

**तात्या** : आणखी आता तुलाही हे विसरले पाहिजे!

**वीणा** : पण तुम्हीच आधी मला त्यांच्यावर प्रेम करायला सांगितले!

**तात्या** : तसेच आता न करायला सांगतो! वीणे, याबद्दल अधिक वाटाघाट करण्याचे कारण नाही, माझी आज्ञा तुला ऐकलीच पाहिजे.

**वीणा** : ऐकली पाहिजे म्हणजे? मी नाही ऐकणार! स्त्रियांना वाटेल त्याच्यावर प्रेम करायला अधिकार आहे! प्रेमाच्या बाबतीत काही मी तुमची बांधलेली नाही! माझ्या मनाप्रमाणे वागायला मी माझी मुखत्यार आहे.

**कमलाकर** : (स्वगत) उच्छृंखल मनाला मोकळे सोडण्याचा हा परिणाम!

**तात्या** : वीणे, जसे मी तुला पूर्वी स्वातंत्र्य दिले तसेच आज परत घेणार!

**वीणा** : घेणार म्हणजे? ही गोष्ट काही तुमच्या हातची नाही. पक्ष्याला पिंजऱ्यातून मोकळे सोडणे सोपे, पण पुन्हा कोंडणे कठीण!

**गोकुळ** : (स्वगत) ऐका ही मुक्ताफळे! आमच्या इकडे असले चोचले मुळीच उपयोगी नाहीत. मला तर स्त्री-पुरुषांच्या तसबिरा सुद्धा एकत्र ठेवण्याची भीती वाटते! (पाहून-प्रकट) तात्यासाहेब, ते पहा वसंतरावच इकडे येत आहेत. सांगू का त्यांना आपली आज्ञा?

**वीणा** : थांबा, थांबा, आताच असा निष्ठुरपणा करू नका! मला त्यांची शेवटची भेट तरी घेऊ द्या!

**तात्या** : ठीक आहे; मी वर जातो. मला त्यांची भेट घ्यावयाची इच्छा नाही; तू पण लौकरच ये! फार वेळ बोलत बसू नकोस.

(वीणाखेरीज सर्व मंडळी जातात.)

**वीणा** : विलायतेत असा अंधार खास नसेल! काय बाबांची लहर ही! हे ऐकून बिचाऱ्या वसंतरावांना काय वाटेल? माझे मस्तक अगदी फिरून गेले आहे. वसंतरावांनाच यावर तोड विचारली पाहिजे! (वसंतराव येतो.) या. कळली सारी हकिकत मला! पण प्रिया, त्या बातमीपेक्षाही विलक्षण आणखी दु:खकारक बातमी तुम्हाला ऐकवायची आहे. तुमच्याशी न बोलण्याबद्दल

बाबांनी मला ताकीद केली आहे आणि तुम्हालाही आमच्या घरी येण्याची बंदी होणार आहे. काय उपाय करावा आता?

**वसंत** : हा निव्वळ जुलूम आहे. विलायतेत एखाद्या मुलीवर असा प्रसंग आला तर ती खुशाल आपल्या वल्लभाबरोबर निघून जाते!

**वीणा** : होय ना? मग मी पण तसेच करणार! झाली याबद्दल बाबांची नाचक्की तर मी काय करणार? त्यांची चूक झाली म्हणूनच मी तरी चूक करणार. पर्वतावर चिखल झाला म्हणजे नदीचा प्रवाह गढूळ व्हायचाच!

**वसंत** : पण पळून गेली यात द्रुमनने काय वाईट केले? माझ्या प्राणा, विलायतेत असे प्रकार दररोज शेकडो होतात! मला द्रुमनबद्दल काहीच वाटत नाही. ती तरी आपल्या वल्लभाबरोबर निघून गेली असेल! तुझी आहे ना तयारी?

**वीणा** : अगदी या घटकेला! चला आत; विशेष काही होण्यापूर्वी बेत ठरवून टाकू. (गोकुळ येतो.)

**गोकुळ** : (स्वगत) थकलो बुवा ही धावपळ करून. द्रुमन पळून गेली पण तिला माझ्या इतके काही पळावे लागले नसेल! (प्रकट) वसंतराव, हे घ्या पत्र!

**वसंत** : (पत्र वाचून) यात तात्यासाहेबांनी मला येथे येण्याची बंदी केली आहे. गोकुळ, त्यांना सांग तुमची आज्ञा मला मान्य आहे म्हणून!

(गोकुळ जातो.)

**वसंत** : चल लाडके, पुढचा एकंदर बेत ठरवून टाकू.

(जातात.)

## प्रवेश तिसरा

(भूतमहाल- द्रुमन व कमलाकर)

**द्रुमन** : एकूण मी कुठे आहे याचा कुणालाही संशय आला नाही?

**कमलाकर** : मुळीच नाही! मी तुला सांगतच होतो! अपराधाच्या जागेपासून प्रथम फार दूर जाण्याचा प्रयत्न कधीच करू नये! दूरच्या प्रवासाच्या आटाआटीत पकडणाराला सुगावा मात्र लागायचा! मी पसरून दिलेल्या बातम्यांमुळे त्यांचे भलभलत्या रीतीने तपास चालले आहेत.

**द्रुमन** : तुम्ही येईपर्यंत माझ्या जिवात जीव नसतो अगदी. सारखी तुमच्या वाटेकडे

नजर लावून बसते.

**कमलाकर** : पण कोणाच्या नजरेस पडत नाहीस ना?

**द्रुमन** : मुळीच नाही. या घराची भुताटकीबद्दल बोलवा असल्यामुळे या रस्त्याने सुद्धा कोणी फारसे जात नाही! पण प्रिया, असा बंदिवास आणखी किती दिवस काढावा लागणार? अज्ञातवासाचे हे दिवस संपवून लग्नाच्या बंधनात कायमची मोकळी होऊन, एकदोन महिन्यांनी अवतार घेणाऱ्या आपल्या कुलदीपकाला घेऊन राजरोस चारचौघांत केव्हा हिंडेन असे झाले आहे मला! कधी निघणार आता?

**कमलाकर** : लाडके, थोडा धीर धर! आजच मी इथून निघालो तर उगीच संशयाला कारण होईल! एक-दोन दिवसांत तात्यासाहेबांच्या कामासाठी मला मुंबईसच जायचे आहे; तेव्हा सर्व व्यवस्था आपोआप होईल!

**द्रुमन** : मुंबईस कोणाला पत्ता लागणार नाही ना पण?

**कमलाकर** : वेडी कुठली! मुंबईसारख्या ठिकाणी बिनचूक पत्ता माहीत झाला तरी नेमके माणूस हुडकून काढता येत नाही; मग मुद्दाम नापत्ता झालेल्या माणसाची गोष्टच नको! पण माझी ओळख फार असल्यामुळे, मुंबईपर्यंतचा प्रवास माझ्यापासून दूर म्हणजे बायकांच्या डब्यात बसून करावा लागेल.

**द्रुमन** : आपल्याबरोबर जन्माचा प्रवास करण्याच्या आशेवर हा एवढा प्रवास मी सहज पत्करीन! पण प्रिया, मी घर सोडण्याबद्दल फार तगादा लाविला होता त्याची क्षमा केली आहे ना?

**कमलाकर** : अगदी मनापासून! बरे, तू तुझ्याबरोबर आणलेला तो दागिन्यांचा डबा काढून ठेव! आलोच मी. (द्रुमन जाते.) सुधारक चिखलात पडलेल्या गाईचा उद्धार करण्याचा प्रयत्न करतात. पण अशा सवत्स धेनूचा उद्धार करण्याचा हा पहिलाच प्रयत्न आहे. काय मूर्ख पोर! माझ्या वाटेकडे नजर लावून बसते! ठीक आहे! तुला वाटेला लावल्याखेरीज माझी वाट मोकळी होणार नाही. आता मुंबईस जाण्यापूर्वी बायकांच्या डब्यात बसवून सोडून द्यावी झाले! मग जाईल नशीब फिरेल तिकडे.

(जातो. पडदा पडतो.)

# प्रवेश चवथा

(गोकुळचे घर. गोकुळ विचार करीत उभा आहे.)

**गोकुळ** : उपरण्याला गाठी मारून आठवण राहात नाही म्हणून स्मरणवही तयार केली, पण तिचाही उपयोग होत नाही; कित्येक गोष्टींचे टाचण करण्याची आठवण होत नाही; टाचून ठेवलेल्या गोष्टी पाहण्याची आठवण होत नाही; आणि आज तर स्मरणवही कुठे ठेवली हेच स्मरत नाही. स्मरणवही सापडती म्हणजे विद्याधरांच्या भेटीचा दिवस आजचाच ठरविला आहे की नाही याचा शहानिशा करून घेता आला असता. मला वाटते आज त्यांनी यायचे आम्ही ठरविलेले नाही. नाही तर त्यांच्या नियमितपणावरून म्हणजे या वेळेस त्यांनी यायलाच हवे! का कबूल केल्याप्रमाणे यायचा त्यांना विसर पडला? या लोकांना आठवण राहत नाही तर स्मरणवह्या का ठेवीत नाहीत? त्यांच्या स्वागताची तयारी तर चोख झाली आहे. या देशमुखांकडच्या जुन्या खुर्च्या वगैरे किती उपयोगी पडल्या आज! (पडद्यात- गोकुळ, अहो गोकुळ) आले वाटते विद्याधर! (मोठ्याने) या हो असेच नीट! (विद्याधर येतो.) या, बसा. मला वाटले तुम्ही आता येत नाही म्हणून.

**विद्याधर** : एकदा कबूल केल्यावर माझ्याकडून दिरंगाई व्हावयाची नाही.

**गोकुळ** : बरे, आता आमचे कुटुंब गेले आहे बाहेर, सोबतीणीकडे बसायला! आणखी आपल्याला तिच्याबद्दल बोलायचे आहे; तेव्हा ती आली तर आपल्याला कळावे म्हणून एकदा सगळ्या दारांना कड्या आहेत की नाहीत ते पाहून येतो. मग बोलू अगदी मोकळ्या मनाने.
(जातो.)

**विद्याधर** : मला इथे बसवून हा गृहस्थ बाहेर गेला खरा, पण परत यायची याला आठवण कशी होणार? मी गेलो असतो बरोबर तरी बरे झाले असते. बरे हा महात्मा आता काय बोलणार आहे याचा तर्क सुद्धा होत नाही. या आताच्या प्रस्तावनेवरून त्याच्या बायकोबद्दल बोलणार आहेसे दिसते! परस्त्रीबद्दल अशा वाटाघाटी करण्याचा हा प्रसंग जरासा बिकट तर खराच! (गोकुळ येतो.) या! आलातच ताबडतोब! मला वाटले पुन्हा यायचे विसरता वाटते!

**गोकुळ** : छे:; विसरतो कसचा! मी इतका विसराळू नाही; या लोकांनी उगीच बभ्रा केला आहे झाले! मी हे तुम्हाला पूर्वीच सांगणार होतो; पण आठवणच राहिली नाही! बरे; विद्याधरपंत, तुम्हाला येथपर्यंत येण्याची तसदी देण्याचे

कारण सांगतो आता. दोन-चार दिवसांच्या बोलण्यावरून तुम्ही ताडलेच असेल की, आमच्या खटल्याचा प्रकार थोडासा विचित्र आहे!

**विद्याधर** : तुमच्यावर खटला वगैरे-

**गोकुळ** : गैरसमज झाला तुमचा! खटले म्हणजे कुटुंब! माझी बायको, द्राष्ट, कजाग आणि भांडकुदळ आहे! तेव्हा तिला ताळ्यावर आणण्यासाठी काय युक्ती करावी? तुमच्यासारख्या पोक्त विचाराच्या मनुष्याचा या बाबतीत सल्ला घ्यावा म्हणून तुम्हाला ही तसदी दिली आहे! सांगा पाहू आता एखादा उपाय!

**विद्याधर** : अशा बायकोला हळूहळू धाक दाखवून-

**गोकुळ** : धाक दाखविण्याचे दूरच राहिले; अहो, तोंडावाटे ब्र काढायची चोरी! घरात मला तोंड उघडायचा प्रसंग फक्त जेवतानाच काय तो येतो. फार कशाला? गेल्या वर्षी वायूमुळे एकदा तिची दातखिळी बसली तेव्हा वैद्यबुवांना तिच्या प्रकृतीचे मान मी सांगितल्यामुळे ती माझ्यावर रागावली! दातखिळी बसली होती तरी सुद्धा आपणच वैद्यबुवांना समजावून सांगावे अशी तिची इच्छा दिसली. शेवटी त्याच संतापाच्या भरात तिची दातखिळी उघडली; आणि तिचा त्या वेळचा आवेश पाहून भीतीने बिचाऱ्या वैद्यबुवांची मात्र दातखिळी बसली! तिच्या तोंडाशी तोंड देण्याची सोय नाही. तिच्या भांडखोरपणाची साक्ष ही सारी आळीच देईल! भुतांच्या भुताटकीने एखादे दुसरे घरच ओसाड पडते! पण या डाकिणीच्या तोंडामुळे ही आळी उठून गेली आहे. शेजारच्या घरात तीन माणसांच्या कुटुंबाची वस्ती आहे; तिच्यावर आमच्या हिच्या तोंडाची मात्राच चालत नाही. कारण त्या गृहस्थाला बोललेले ऐकायला येत नाही, त्याच्या बायकोला ऐकलेले बोलता येत नाही; आणि मुलीला बोललेले आणि ऐकलेले दोन्ही कळत नाहीत.

**विद्याधर** : ही दातखिळीची कथा म्हणजे खरोखरीच दंतकथा आहे. मला वाटते तुमचा स्वभाव जरा विनोदी आहे.

**गोकुळ** : यात विनोद मुळीच नाही. नदीच्या पुरात वाहून जात असताना तिच्या वेगाला कसली उपमा द्यावी याचा विचार कोण करीत बसेल? खरे विचाराल तर मी आता जिवाला सुद्धा कंटाळून गेलो आहे!

**विद्याधर** : अरेरे! मग तुम्ही काडी का मोडून देत नाही?

**गोकुळ** : अहो, काडी मोडून द्यायला घरात काडीवर तरी सत्ता चालली पाहिजे ना! विद्याधर, ब्रह्मांडात मायेने जसे ईश्वरालाही व्यापून टाकले आहे, तसेच आमच्या घरात बायकोने नवऱ्याला अगदी त्रासून टाकले आहे.

(हळूच मथुरा येते व विद्याधरला गप्प बसण्याची खूण करते.)

**मथुरा** : (स्वगत) माझीच निंदा चालली आहे वाटते! ऐकले पाहिजे सारे बोलणे.

**गोकुळ** : तिच्या रूपाचे वर्णन तर विचारूच नका! दुसऱ्या कोणत्या प्राण्याशी सादृश नाही एवढ्यासाठीच तिला मनुष्य म्हणायचे!

**मथुरा** : (स्वगत) आणि यांना तर मनुष्य म्हणायचे कारण नाही. परक्या माणसाला घरी आणून त्याच्यासमोर माझी नालस्ती करीत आहेत काय?

**गोकुळ** : तिचा तो मर्दानी बांधा, पहाडी आवाज, भरदार अवयव, तेल्या रंग वगैरे लक्षात आली म्हणजे शूर्पणखा, हिडिंबा यांची वर्णने खरी वाटू लागतात. जुन्या कवींच्या ठरावीक उपमांची अदलाबदल केली तर तिचे यथायोग्य वर्णन थोडक्यात देता येईल. कोकिळेचा आवाज आणि नागिणीची कांती यांचा विपर्यास होऊन, कोकिळेचा काळा कुळकुळीत वर्ण आणि नागिनीचे फोफावणे यांची ती धनीण झाली आहे. हत्तीची मंदगती आणि हरिणीचे विशाल नेत्र यांची अशीच दिशाभूल होऊन हत्तीचे बारीक डोळे आणि हरिणीची चंचल गती तिच्या वाटणीस आली आहेत. दातांच्या बाबतीतही हत्तीचेच तिच्यावर ऋण आहे. नाकाचा सरळपणा भिवयांकडे जाऊन त्यांच्या धनुष्याची कमान नाकावर वठली आहे. ओठांनी केसांच्या काळेपणाचा पत्कर घेऊन त्यांच्यावर आपली गुलाबी छटा पसरून दिली आहे.

**विद्याधर** : मला वाटतं आता हे वर्णन तुम्ही थांबवाल तर बरे.

**गोकुळ** : नाही हो; मला तिची इतकी ओकारी आली आहे की, तिच्या साऱ्या गोष्टी कोणापाशी केव्हा ओकून टाकीन असे झाले आहे. तिचा वर्ण इतका काळा आहे की, अमावास्येच्या काळोखात सुद्धा ती स्पष्ट दिसते. मेरू आणि विंध्याद्रीप्रमाणे दोन गालांत उंच होण्याची स्पर्धा चालली आहे आणि नाकाने गालांच्या त्या खिंडीत बैठक मारली आहे. जिभेच्या सहवासाला भिऊन आळीतल्या लोकांप्रमाणे हनुवटीही नापत्ता झाली आहे. याप्रमाणे साऱ्या अवयवांचा ठळकपणा नाहीसा झाल्यामुळे चेहेऱ्याचे सपाट मैदान झाले आहे!

**विद्याधर** : हे पाहा, गोकुळ, तुम्ही स्वत:च त्यांचा असा डांगोरा पिटू लागला तर लोकांना बरेच होईल. आपण आपला आब राखिला पाहिजे! मागे कोण काय बोलेल हे पाहिले पाहिजे!

**गोकुळ** : पाठीमागे कोण काय बोलते याची मी मुळीच पर्वा करीत नाही.

**मथुरा** : (स्वगत) आणि तोंडावर बोलू लागले तर तोंड देत नाही!

**गोकुळ** : विद्याधर, माझा असा बेरंग करू नका! आजपर्यंत तिच्या निंदेचे सुख सुद्धा मिळाले नाही. ऐका पुढे! तिचे गाल मुळचे गुलाबी तर नाहीतच, पण काळ्या रंगाचे त्यांच्यावर इतके तकतकीत रोगण चढले आहे की, रागाने किंवा लज्जेने लाली आलीच तर गालांवर करड्या रंगाची छटा दिसेल! पण दुर्दैवाने हे रंगीत काम अजून कोणालाही पहायला सापडले नाही! कारण रागाने लाल झाल्यावर तिच्या तोंडाकडे पाहण्याची कोणाची छाती नाही. आणि लज्जेने म्हणाल तर, ती कोणाला लाजल्याचे मला स्मरत नाही. का, कशी आहे गालांची शोभा?

**मथुरा** : (स्वगत) माझ्या गालांना नावे ठेवीत आहेत आणि यांचे गाल मात्र अगदी गुलाबी असतील नाही? गुलाबाचा रंग तर नाहीच; पण भोवतालच्या मिसाळ खुंटांनी आणि त्या बरखुंडांनी काट्यांचे रान मात्र माजले आहे खरे!

**विद्याधर** : (स्वगत) या बाईच्या धुमसणाऱ्या आवेशावरून लौकरच याचे गाल मात्र लाल होण्याचा रंग दिसतो, आणि हा तर ऐकत नाही. (प्रकट) गोकुळ, स्त्रियांच्या सौंदर्यावर असे तोंड टाकणे चांगले नाही.

**गोकुळ** : का बरे, तिच्या गालावर तोंडसुख घेण्याचा माझा अधिकार नाही का?

**विद्याधर** : पण त्यात इतकी अतिशयोक्ती नसावी.

**गोकुळ** : अतिशयोक्ती? मुळीच नाही! तुम्ही तिला पाहिली तर तुमची खात्री होईल की, तिच्या कपोलवर्णनात कपोलकल्पित असे काहीच नाही!

**विद्याधर** : पण आता हे वर्णन पुरे करा. एवढ्यावरून मला त्यांच्या रूपाची सहज कल्पना होईल.

**गोकुळ** : कल्पना होईल? निव्वळ कल्पना आहे ही! तिच्या सर्व अवयवांचा सलोखा सांभाळून तिच्या रूपाची एकदम कल्पना करणे शक्यच नाही. इकडे काळ्या कुळकुळीत रंगावरून वाटते की, ही आफ्रिकेची हुंडी गफलतीने पत्ता चुकून हिंदुस्थानच्या पेढीवर आली असावी; तर तिकडे काही अवयवांच्या फाजील वाढीमुळे आणि काहींच्या फाजील कमीपणामुळे थबकट बनविलेल्या चेहेऱ्या तबकडीवरून, हे जपानी कलाकौशल्य असावे असे वाटते. मग अशा लपंडावात तिच्या रूपाची कशी कल्पना होणार तुम्हाला?

**विद्याधर** : अहो, नुसती कल्पनाच नाही, पण त्यांची प्रत्यक्ष मूर्ती उभी आहे माझ्यापुढे!

**गोकुळ** : भ्रम आहे तुम्हाला! तिचे तोंड तुम्हाला दिसले तर तुम्ही तोंड तिकडे फिरवाल! अहो, आमची आई प्रथम सुनमुख पाहताच घाबरून रामरक्षा म्हणायला लागली! याच घरातली गोष्ट.

**विद्याधर** : (स्वगत) आता विषय तरी बदलावा. (प्रकट) घर सुरेख आहे मोठे! काय भाडे देता याचे?

**गोकुळ** : ते सारे तिला माहीत! आमच्या हिशेबी कामाची निम्मेनिम वाटणी झाली आहे. खर्चाचे खाते तिच्या हाती असून जमा माझ्या हस्ते व्हायची. साखरेच्या गोण्या तिच्या कामी आणि मी नुसता ओझ्याचा बैल!

**मथुरा** : (स्वगत) हे मात्र अगदी खरे! म्हणून तर ऋषिपंचमीच्या दिवशी मला खणखणीत उपास पडतो!

**विद्याधर** : (स्वगत) मी मुद्दाम विषय बदलतो आणि हा पूर्वपदावर येतो. (प्रकट) का हो, एवढ्या घरात सोबतीवाचून तुम्हाला भीती वाटत नाही?

**गोकुळ** : एकटा असलो तर नाही वाटत भीती! पण ती जन्माची सोबतीण जवळ असली तर मात्र भीती वाटते!

**विद्याधर** : तुम्ही तुमच्या कुटुंबाला फार भिता असे दाखविता, पण तुमच्या बोलण्यावरून तसे दिसत नाही!

**गोकुळ** : दिसत नाही? ती इथे असती तर दाखविले असते कसे काय आहे ते! अहो, ती इथे नाही म्हणून तर मी हे बोलतो आहे. मागे एकदा अशीच ती बाहेर गेलेली पाहून मी जयंतांना घरी आणले आणि असाच या बाबतीचा खल करीत बसलो! अगदी असाच प्रसंग! पण मागे तिने चोरून उभे राहून सारे बोलणे ऐकून घेतले आणि मग काय गहजब माझ्यावर! माहेरी जायला काय तयारी झाली! बाकी ती हजारदा ही भीती घालते, पण खरोखरी काही कधी जात नाही! ती माहेरी गेली तर तिच्याऐवजी माझा तरी सासुरवास चुकेल खास!

**विद्याधर** : बरे, त्या अशा मागे उभ्या आहेत हे तुम्हाला कसे कळले?

**गोकुळ** : त्यात काही विशेष नाही! तिला पाहून जयंतांनी मला विचारले की, हे बोलणे चोरून ऐकून तुझ्या बायकोने तुझ्यावर तोंड टाकिले तर काय करशील? मीही जोराने म्हणालो, की तिने तोंड टाकले तर मी अस्से इकडचे तोंड तिकडे करून टाकीन! असे म्हणून असा झटक्याने मागे पाहतो-

**मथुरा** : तो मी ही अशीच मागे उभी! असेच ना? बोला! आता का वाचा बसली?

**गोकुळ** : भीमरूपी महारुद्रा वज्र हनुमान मारुती!

**मथुरा** : आता हे सोंग करिता काय! म्हणे गालावर रोगण बसले आहे! करू का आपल्या गालावर रोषणाई? मी आफ्रिकेची हुंडी, जपानी कलाकौशल्य! मला लाज नाही! होय ना? बोला, आता का गप्प!

**गोकुळ** : मी तुझ्या पाया पडतो! माझी चूक झाली! एवढा अपराध पदरात घे!

**मथुरा** : कशाला एवढे पण! तुम्हाला माझा सासुरवास होतो नाही?आणि जन्माची सोबतीण नको नाही का? ही मी जाते माहेरी! म्हणे ती खरोखरच जात नाही! आता पाहा डोळे फाडून! माझा अडला आहे खेटर या घरात-

**गोकुळ** : हवी तितकी खेटरे मला दे! पण पाहुण्यांच्या देखत तरी नको!

**मथुरा** : आणि तुम्ही मात्र पाहुण्यांजवळ माझी नाही नाही ती नालस्ती करावी! पण पाहुण्यांचे मला काय भय! पाहुणे तुमचे! त्यांना नाही लाज वाटली परक्या बायकोबद्दल वाटाघाटी करिताना?

**गोकुळ** : (एकीकडे) विद्याधर, आता पळा, त्या खिडकीतून, धुरांड्यातून, जिथून सापडेल तिथून रस्ता गाठा आणि जीव वाचवा! आमची ओळख ठेवा! पळा!

**मथुरा** : माझे कान काही फुटले नाहीत! त्यांना कशाला जायला सांगता? मीच जात्ये आपल्या माहेरी!

**गोकुळ** : आज आपल्या दोघांचा पुनर्जन्म झाला! माझ्या अशा यमपुरीच्या वेशीपर्यंत कैक फेऱ्या झाल्या आहेत म्हणा! पण तुम्हाला हा प्रसंग जरा नवीनच आहे! मघाशी दार लावलेले पहावयाला गेलो खरा; पण पहायचे विसरलो त्याचा हा परिणाम!

**विद्याधर** : पण त्याचा परिणाम काय होणार पुढे?

**गोकुळ** : आज ती खास माहेरी जाणार! आता काय करावे?

**विद्याधर** : बरे, यांचे वडील तरी चांगले सुखी आहेत का?

**गोकुळ** : सुखी आहे साधारण! पण तो हिला फार दिवस राहू देणार नाही! पक्का चिकू आहे तो! दसऱ्याचे सोने सुद्धा त्याच्या हातून सुटत नाही! कोणी निरोप एखादा सांगितला तर त्यातले देखील चार शब्द दलालीदाखल ठेवून घेईल!

**विद्याधर** : मग आता कसे करू? तात्यासाहेब वगैरे त्याच्या ओळखीच्या मोठ्या माणसांच्या सहीचे तुमच्या सासऱ्याला पत्र पाठवू? त्यात सर्व हकिकत कळवून तुमच्या कुटुंबाला थारा देऊन चढवून ठेवू नये असे लिहू? म्हणजे तो समजूतदार असला तर आपणच तिला येथे आणून पोचती करील! अशा निराधार स्थितीचा अनुभव आला म्हणजे त्यांचा वरचढपणा आपोआप नाहीसा होईल!

**गोकुळ** : आली ती; जरा थांबा!

(मथुरा येते.)

**मथुरा** : चला जरा आत! मला त्या भिंतीच्या लगीवरून माझी पेटी काढायची आहे म्हणून भिंतीखाली या खुर्च्यांची उतरंड लावायची आहे. ओढा त्या खुर्च्या! (विद्याधरास) तुम्हीही उचला एक! तुमचेही अंग आहेच या चारगटपणात; तेव्हा तुम्हालाही शिक्षा पाहिजेच! चला, बघता काय? माझी गाडी चुकेल! मी याच गाडीने जाणार बाबांकडे!

**गोकुळ** : विद्याधर, चला; उचला ते मेज; काही इलाज नाही!

(खुर्च्या ओढीत सर्व जातात.)

## प्रवेश पाचवा

(घराच्या मागील बाजूचा बाग. एका बाकावर बसून लीला व जयंत बोलत आहेत.)

**जयंत** : लीले, तात्यासाहेबांनी तुझ्याशी बोलण्याची बंदी केल्यामुळेच आपल्याला या रमणीय वेळी चोरून भेट घेण्याची बुद्धी उत्पन्न झाली. काय मनुष्य स्वभाव आहे पाहा! आजपर्यंत कित्येकदा तरी दिवसच्या दिवस आपण एकमेकांशी बोलल्यावाचून काढिले असतील; पण स्वाधीनच्या गोष्टीमुळे त्याचे आपल्याला काहीच वाटले नाही! तेच आता पाहा! ही बंदी केल्याबरोबर कारण नसतानाही आपल्याला एकमेकांच्या सहवासावाचून एक क्षणभरही रहावेनासे झाले आहे! आणि अगदी निर्दोष भेटीसाठी सुद्धा अशी पहाटेची चोरटी वेळ ठरवून ठेवणे भाग पडले आहे!

**लीला** : जयंत, लहानपणी थट्टेत आपले लग्न ठरल्यामुळे म्हणा, किंवा कशामुळे तरी म्हणा, काय असेल ते असो; निष्पाप बुद्धीने तुमच्याशी चार शब्द बोलत बसून मनाचे दु:ख हलके करण्याइतके समाधान मला दुसऱ्या कशानेही वाटत नाही!

**जयंत** : लीले, हा उष:काल किती रमणीय आहे. पश्चिमेचे पटांगण बहुतेक ओलांडून, चंद्रमा मार्गश्रमाने खिन्न झाल्यामुळे, पलीकडच्या गोलार्धाकडे वळण्यापूर्वी अस्ताचलावर थोडा वेळ विसावा घेत आहे आणि म्हणूनच त्याची प्रभा थोडी मंद झाली आहे! तिकडे उदयाचलावर भगवान चंडकिरणाच्या रथावर तांबड्या यशोध्वजाचा एखादा दुसरा पदर दिसू लागला आहे! पूर्वेकडे तारका कमी कमी होत चालल्या आहेत; जणू काय रथवेगाने उद्‌भवलेल्या ध्वजपटाच्या वाऱ्याने ही आकाशातील फुले उडून जात आहेत!

**लीला** : या तारका मंदतेज झाल्या तरी त्यांची चमक अजून तशीच कायम आहे! या मंद चंद्रिकेच्या वृष्टीवरून असा भास होतो की, सृष्टिदेवता दिवसाच्या श्रमासाठी आपल्या बालकांना या दुग्धपानाने ताजीतवानी करीत आहे!

**जयंत** : (स्वगत) मातृपदाला मुकलेल्या लीलेची ही प्रेमळ कल्पना किती हृदयभेदक आहे! (प्रकट) लीले, अनंतकालापासून तारका या पापी पृथ्वीला शिवल्या नाहीत म्हणूनच त्यांचे तेज चिरकाल चमकत आहे! आपल्या पदापासून ढळणारा उल्का पृथ्वीच्या पापी वातावरणात शिरताच जळू लागून तिचा स्पर्श होण्यापूर्वी भस्म होऊन जातो.

**लीला** : आकाश आणि भूमी यांच्यात किती तरी विरोध हा! तिकडे आकाशातील फुले सूर्यप्रकाशाच्या दूरदर्शनानेच कोमेजून जाताहेत आणि खाली आपल्या चिमुकल्या बागेतली फुले उमलत आहेत!

**जयंत** : या हिरव्यागार तृणशय्येवर पडलेल्या दवाच्या थेंबांतून मावळत्या चंद्राची किरणे चमकत असल्यामुळे मखमालीच्या गालिच्यावर जरतारीचे काम केले आहे असे वाटते! ही सुंदर फुले तारकांच्या प्रतिबिंबासारखी शोभत आहेत! तो पाहा, लीले, जगन्नाथाच्या या उपवनात खेळण्यासाठी आकाशगंगेचा पाट काढला आहे! ही शीतल चंद्रिका तिच्या अमृतजलाची तुषारवृष्टी तर नसेल ना?

**लीला** : जयंत, आपल्या फुलांप्रमाणेच तारकांना- जगदीशाच्या बागेतील या तेजस्वी फुलांना सुद्धा सुवास असेल का?

**जयंत** : (हसून) किती स्वैर आणि मनोहर कल्पना ही! लीले, या प्रश्नाचे उत्तर देणे शक्य नाही. आपल्या पापक्षालनासाठी अनंत यातना भोगल्यानंतर कालांतराने आपण ज्या वेळी गगनमंडलात तारकारूपाने चमकू लागू त्या वेळी अनुभवानेच आपल्या तेजोमय आत्म्याला या प्रश्नाचे उत्तर सापडणार आहे! तोपर्यंत अनुमानानेच समाधान मानून घेतले पाहिजे!

**लीला** : पुण्यवंतांचे आत्मे आकाशात तारे होऊन राहतात! तेव्हा त्यांच्या पुण्याईच्या तेजाप्रमाणे त्यांच्या कीर्तीचा सुवासही खास पसरत असेल, पण पृथ्वीच्या पापगंधाने त्याचा नाश होत असेल, एवढेच.

**जयंत** : लीले, लहानपणी एकएकदा मला असे वाटे की, या चांदण्या म्हणजे मृतांच्या प्राणांनी स्वर्गात जाण्यासाठी केलेले मार्ग असावेत आणि या आकाशाच्या चाळणीतून त्याच्या पलीकडचा स्वर्गाचा तेजोमय प्रदेश आम्हाला दिसत असावा! आईच्या मरणानंतर मी दररोज एका ठळक ताऱ्याकडे किती तरी आशेने आणि उत्कंठतेने पहात असे!

**लीला** : अगदी लहानपणी त्यांच्या मांडीवर बसून आपण मोठमोठाल्या चांदण्या आळीपाळीने वाटून घेत होतो आणि वेळोवेळी अगणित ईश्वरी संपत्तीच्या वाटणीसाठी भांडत होतो; आठवते का तुम्हाला?

**जयंत** : हो! एकदा तर आईने तुझी कागाळी ऐकून तुला सांगितले होते की, या चांदण्यांसाठी एवढी भांडतेस का? त्यांची लक्ष-माळा अखेर जयंताच्याच गळ्यात घालणार ना? लीले, अगदी कालच्या या गोष्टी! सुखाच्या त्या प्रत्येक क्षणाचे आज दु:खमय प्रेत मात्र राहिले आहे! हा सारा आठवणीचा प्रभाव! मनुष्याला जर स्मृती नसती तरी किती तरी दु:खांचा नाश झाला असता! अरेरे! त्या वेळच्या त्याच या तारका आम्हाला आज अशा स्थितीत पाहून काय म्हणत असतील? आमचे मनोरथ ऐकून क्रूर काळपुरुषाचे हे दिव्य डोळे त्या वेळी असेच लुकलुकत होते! हे अनंतयुगसाक्षी तारकांनो, आमच्यासारखी अल्लड अर्भके आशेने आमच्याप्रमाणे भविष्यकालाची सुखदायक चित्रे काढताना कधी तुमच्या दृष्टीस पडली तर आमच्याप्रमाणेच त्यांच्याकडे पाहून निर्दयपणाने डोळे मिचकावून हसू नका. तुमच्या त्रिकालदर्शी किरणांच्या प्रकाशात भविष्याचे भयानक खेळ दाखवून त्यांना वेळीच सावध करा. (दचकून) हा पाहा माझ्या अंगावर दवाचा थेंब पडला! आमची ही करुणस्थिती पाहून द्रवलेल्या माझ्या मातेच्या ताऱ्याचा हा अश्रुबिंदू तर नसेल ना?

**लीला** : जयंत, मागच्या आठवणी कशाला काढता? या वेळी त्यांनी आजचा अल्प आनंद मात्र नाहीसा होत आहे! या सरत्या रात्रीच्या शोभेने जिकडे तिकडे आनंदवृष्टी चालविली आहे! हा आनंद पाहून नेहमी दुसऱ्याला दु:ख देण्यात आनंद मानणारा विधाता आज मेला असावा असेच वाटत नाही का?

**जयंत** : लीले, तुझी करुणमूर्ती पुढे असताना तो निर्दय विधाता मेला असावा असे माझ्या मनाला कसे वाटेल? या सरत्या रात्रीप्रमाणेच तुझी शोभा सुद्धा उदासपणाची आहे! तुझी मूळची आरक्तगौर कांती या निर्जीव चांदण्यांप्रमाणे फिकट झालेली आहे; पूर्वेकडे नुकत्याच दिसू लागणाऱ्या संध्यारागाप्रमाणे तुझ्या गालावर कोमेजलेल्या गुलाबाची छाया मात्र राहिली आहे! या निस्तेज ताऱ्याप्रमाणे तुझ्या डोळ्यांची चमक क्षणोक्षणी कमी होत आहे! हा मंद वात तुझ्या निराशेच्या श्वासाप्रमाणे नाही का? आणखी नुकत्याच पुसून टाकिलेल्या कुंकवाचा तुझ्या कपाळावर अजून राहिलेला हा पांढरा व्रण या फटफटीत चंद्राची साक्ष पटवीत आहे! अरेरे! लीले, आणखी किती दिवस तू अशी दु:खात राहणार? या रात्रीचा आणखी घटकेने रम्य, आनंदमय अशा प्रभातकाळात शेवट होईल; पण तुझ्या आयुष्याची अघोरी रात्र मात्र शेवटपर्यंत

अशीच राहणार ना? तुला या करुणस्थितीतून सोडविण्याचा मृत्यूखेरीज-हरहर, निराशेने आलेल्या भयाण मृत्यूची आणि तुझ्यासारख्या नाजूक बालिकेची सांगड कल्पनेला सुद्धा सहन होत नाही!

**लीला** : जयंत, वेड्या मनाची फसवणूक करण्यासाठी जरी भविष्य आपण आपल्यापुढे कधीही येऊ दिले नाही, तरी अशाने ते खरोखरीच चुकणार आहे का? अनाथ विधवेला दु:खमुक्त होण्यासाठी समाजाने मरणाखेरीज एक तरी मार्ग मोकळा ठेविला आहे का?

**जयंत** : लीले, या निर्जीव नेभळ्या समाजाची का तू पर्वा करीत बसणार? प्रत्येक घटकेला जिथे नि:पक्षपाताने न्याय मिळतो तिथेच समाज या नावाची सार्थकता होते. पण आमच्या एकदृष्टी, एकहाती, जुलमी समाजाच्या आज्ञा आस्थेने कोण पाळणार? विधवांच्या माना मुरगळण्यात पुरुषार्थ मानणारा, शिक्षणापासून स्त्रियांना दूर ठेवून केवळ पशुवृत्तीने त्यांची पायमल्ली करणारा समाज वंदनीय कसा होणार? अरेरे! एकाच धर्माच्या छायेखाली विसावा घेणाऱ्या स्त्रियांच्या आणि पुरुषांच्या आचारबंधनात किती भयंकर विसंगतपणा! संसारातील जोडी फुटली तर विधवेच्या मस्तकावरचा केशकलाप नाहीसा होतो आणि विधुराच्या मस्तकाला बाशिंग बांधण्यात येते! गुडघ्याएवढ्या पोरीशी लग्न लावण्यासाठी उतावळेपणाने गुडघ्याला बाशिंग बांधणाऱ्या विधुराला अगदी वृद्धपणी सुद्धा नवरामुलगा बनून आपल्या पोरकटपणाची वरात चंद्रज्योतीच्या प्रकाशामध्ये मिरविण्याचा परवाना मिळतो; आणि गुडघ्यात मान घालून बसलेल्या बिचाऱ्या बालविधवेला अंधारकोठडीत जुलमाने बाळपणी संन्यासदीक्षेची शिक्षा भोगावी लागते! एकाच घरात एखादा थेरडा नवरदेव इकडे मंगलवाद्यांच्या कडकडाटामध्ये एखाद्या अजाण अर्भकाची विवाहमोहात आहुति टाकितो, आणि तिकडे त्या अमंगल मंगलकार्यात आपल्या विद्रूप दुर्दैवाचा अपशकून होऊ नये म्हणून कोपऱ्यात तोंड घालून बसलेली बालविधवा आपल्या अंत:करणाच्या होमात स्वत:ची आहुति देत असते! बालवधूचे गतायुष्य वृद्ध वराच्या शेषायुष्याइतके असले तरी त्या विवाहाला परवानगी मिळते; इतकेच नाही तर तो थेरडा मेला तर त्या बालिकेचे काळे केस जाऊन कपाळ पांढरे फटफटीत व्हायची भीती; आणि ती वधू मेली तर त्या थेरड्याला मात्र पुन्हा दुसऱ्या बालिकेला फसविण्यासाठी पांढऱ्या केसांना काळा कलप लावण्याची मुभा! विधवेला स्वत:च्या दाराबाहेर पडण्याची चोरी, तर विधुराला परदारागमनापर्यंत आणि विश्वदारागमनापर्यंत मोकळीक! जिवंतपणी जिवलग मित्रांचे सुद्धा केसाने गळे कापणाऱ्या नीचाला मेल्यावर आपल्या स्त्रीच्या वेणीच्या पिळदार पेडाच्या दोरखंडाने स्वर्गाच्या किल्ल्यावर चढून, आपल्या पापाची पताका फडकविण्याची धार्मिक सवलत, आणि पवित्र

आचरणाच्या त्याच्या अनाथ विधवेला जिवंतपणीच अपमानाच्या नरकयातना भोगण्याचा देहदंड! लीले, अशा प्रकारच्या दुहेरी अन्यायात गढून गेलेल्या समाजाची पर्वा कोण करील?

**लीला** : पण अशा भयंकर अन्यायाचे सुद्धा प्राचीन ऋषींच्या वचनांचे आधार दाखवून आजचे शास्त्री समर्थन तर करतात ना?

**जयंत** : वर्षाकाळाच्या मेघगर्जनानंतरची ही नुसती बेडकांची ओरड आहे. यथाकाळी वृष्टी करून परोपकाराने पृथ्वीवर समाधान पसरणाऱ्या त्या वर्षामेघांची ती गंभीर गर्जना कोणीकडे- आणि त्यांच्यानंतर, त्यांच्या चार थेंबांनी रंग बदलून पिवळ्या शालजोड्या पांघरणाऱ्या, ज्ञानगंगेच्या तळ्यातल्या चिखलात रुतून बसलेल्या, या बेडकांची ओरड कोणीकडे! शापाने दग्ध करून उ:शापच्या सामर्थ्याने ब्रह्मांडाला पुन: चिरंजीव करणारे ते प्राचीन ऋषी, आजच्या या शिव्याशापांच्या धन्यांना, आपल्या जागी बसून आपल्या त्या काळी लिहिलेल्या, त्या वेळच्या बालसमाजाला योग्य असलेल्या, धर्मसूत्रांचा गळफास आजच्या वाढत्या समाजाच्या गळ्यात अडकविताना पाहून काय म्हणत असतील! लीले, धर्मशास्त्र प्राणिमात्राच्या कल्याणासाठी आहे, आजचा आमचा धर्म पूर्वीच्या ऋषिप्रणीत मृत धर्माचे केवळ पिशाच्च आहे; आणि या पिशाच्चाची भीती घालून धर्ममार्तंड म्हणविणारे हे पोटभरू जादूगार बायका-पोरांच्या डोळ्यात धूळ टाकीत आहेत! लीले, तू धाडस करून पुन:विवाहाला तयार हो!

**लीला** : पण पुनर्विवाहाच्या प्रसंगी तुमचाच हात द्याल का?

**जयंत** : म्हणजे?

**लीला** : या प्रश्नाचे उत्तर द्यायलाच पाहिजे का? जयंत, सुशीलाताईचा पती परलोकी गेल्यामुळे तरी तिला दु:ख भोगावे लागते; पण माझ्या प्रेमाचे पती- माझ्या जिवाचा विसावा-

**जयंत** : कोण! अजून मीच?

**लीला** : नाही तर दुसरे कोण? जयंत, बाळपणीच्या भोळ्या मनाने बांधलेल्या खूणगाठी सोडविणे मोठे कठीण आहे! पुनर्विवाहाबद्दल मी कधी फारशी उत्कंठा दाखवत नाही याचे कारण हेच; दुसऱ्या कोणाबद्दल माझ्या मनात प्रेमाचा उद्‌भव होणे कालत्रयही शक्य नाही! केवळ तुमच्या मूर्तीवर माझे अढळ प्रेम-

**जयंत** : आणि मनोरमेची तितकीच अढळ सत्ता आहे हे विसरू नकोस. लीले,

लहानपणच्या गोड कल्पना आपण वस्तुस्थितीला बळी दिल्या पाहिजेत! भोळ्याभाबड्या भूतकाळाला त्याच्या विरोधी वर्तमानकाळाखाली झाकून भयानक भविष्याशी टक्कर द्यायला आपली तयारी असली पाहिजे! मनोरमेला- माझ्या लग्नाच्या स्त्रीला सोडून-

**लीला** : नको, नको, ती कल्पना सुद्धा नको! विवाहित स्त्रीचा तुमच्या हातून असा अनादर झाला तर मला सुद्धा तुमच्याबद्दल अनादरच वाटेल! त्यापेक्षा आपण समदु:खित्वाने अशीच जीवयात्रा संपवून परमेश्वराजवळ जाऊ आणि त्याच्या पायाजवळ दाद मागू!

**जयंत** : लीले, अशा दु:खातही बालप्रेमाची तू अजून जोपासना करीत असशील आणि त्यामुळे आपले दु:ख द्विगुणित करून घेत असशील अशी माझी मुळीच कल्पना नव्हती!

**लीला** : जयंत, दु:खतापाची प्रखरता अगदी असह्य असली तरी तिने हृदयातला प्रेमाचा समुद्र कसा आटणार? क्षणोक्षणी दिसणाऱ्या आपल्या मुखचंद्राच्या दर्शनाने भरती येऊन त्याच्या अमर्याद लाटा अश्रुरूपाने कितीदा तरी, या पहा, अशा उचंबळून बाहेर येतात. जयंत, माझ्या दुर्दैवाला सीमा आहे का? काळ्या रात्रीच्या अंधारात चक्रवाकीला प्रियवियोगाचा भास व्हावयाला कमळाचे पान तरी आड यावे लागते; पण या सामाजिक अन्यायाच्या अंधारात तुमच्या माझ्यामध्ये काही देखील अंतर नसून तुम्ही मला अंतरला आहात, हाताजवळ असून हाती लागत नाही, अगदी जवळ असल्यामुळे विरहाची वृद्धी करीत आहात-

**जयंत** : लीले, रडू नकोस! ही पहा, उष:काल आणि प्रभात यांच्यामध्ये अल्पकालीन कालिमा पसरली आहे, तशी माझ्या आणि तुझ्यामध्ये मनोरमा उभी आहे! मनोरमेच्या लग्नाच्या शृंखलेने चतुर्भुज झाल्यामुळे हातपाय जखडले गेले नसते तर लीले, लाडके लीले, या हाताने अशी प्रेमाने जवळ ओढली असती, (तिचा हात आपल्या हातात धरतो.) आणि अर्ध्या घटकेने प्रभात होण्यापूर्वीच तुझ्यावर प्रभातसृष्टीची शोभा पसरून दिली असती. रक्तवर्ण बालरवीप्रमाणे सौभाग्यसूर्याचा कुंकमतिलक या भव्य निटिलाकाशावर लावताच ही नेत्रकमले प्रफुल्लित झाली असती; आनंदाश्रूंच्या दवाने धुतलेल्या या गुलाबाच्या शोभेने संध्यारागाची रक्तिमा लाजली असती! स्मितहास्यामुळे दृगोच्चार होणाऱ्या दंतावलीने कुंदफुलांचे तोंड बंद केले असते, आणि या तुझ्या द्विजपंक्तीच्या मंजुळ हास्यध्वनीने द्विजगणाच्या अस्फुट संगीताला कर्णकठोर ठरविले असते! पण लीले, एक विवाहबंधनामुळे माझा नाइलाज झाला आहे!

**लीला** : ही सकाळची वेळ मोठी पापी आहे आणि मन मोठे स्वार्थी आहे. दशदिशांत दरवळणाऱ्या या सुवासाशी एकजीव झालेल्या आणि हिमतुषारात स्नान केल्यामुळे शीतस्पर्शी झालेल्या या सकाळच्या वाऱ्याने गारठलेल्या या माझ्या देहाला आपल्या उष्ण श्वासाचा विसावा सोडावासा वाटत नाही! मनोरमावहिनीच्या हक्काची चोरी करताना थरथर कापणाऱ्या पायांचा आधार या शरीराला अपुरता असल्यामुळे या हाताचा आधार सोडवत नाही!

**जयंत** : (हात सोडवून) दूर हो, लीले, दूर हो, मन पापी आहे तसेच ते अनावरही आहे! अशा स्थितीत शुद्ध भगिनीप्रेमाचा लोप झाल्यावाचून कसा राहील? हा निर्मल बंधुप्रेमाचा ओघ आहे असे मी माझ्या मनाला सांगण्याचा प्रयत्न करीत आहे: पण त्याची साक्ष अगदी निराळी पडते आहे! लीले, लीले, दूर हो! माझ्या कोंडलेल्या कंठातून कसाबसा बाहेर येणारा हा कंपित स्वर ऐकून तरी दूर हो! अविचाराच्या अमावास्येमुळे खळबळणाऱ्या हृदयसमुद्रातल्या प्रेमजलाच्या लाटांचा हा धडधडाट तुला ऐकू येत नाही का? या उष्ण नि:श्वासाने दग्ध होत चाललेल्या विवेकाच्या या धुराने तुझी कोमल काया करपून जाणार नाही का? चोरट्या पापरंध्रांतून आत शिरू पाहणाऱ्या या अस्थानी आनंदाला बाहेरच्या बाहेर थांबवून माझ्या शरीराच्या किल्ल्याच्या रक्षणासाठी प्रतिरंध्राजवळ पुलकांच्या बुरुजावर उठून उभी राहिलेली ही रोमांचसेना तुला मागे लाटीत नाही का? दूर हो, लाडके लीलावती, संमोहाने अर्धवट मिटलेल्या आपल्या डोळ्यांची शक्ती अजून थोडी तरी कायम आहे तोच विवेकाचा मार्ग शोधून काढू! नाही तर एका क्षणात या कसोटीच्या कड्यावरून लटलटणाऱ्या शरीराचा तोल चुकून आपण दोघेही पापाच्या समुद्रात पडू!

**लीला** : जयंत, दया करा; हा कठोरपणा एक क्षणभर आवरून धरा! अशा निर्दयपणाने आपल्या अनाथ भगिनीला- पण नको, खोटे कशाला बोलू? आपल्या मनोमन साक्षी पत्नीला, या लहानपणच्या लाडक्या लीलेला लोटू नका! आजपर्यंत दु:खाच्या आगीत करपणाऱ्या, पुढेही त्यातच भाजून निघणाऱ्या, या सुकलेल्या जिवाला एक क्षणभर तरी जिव्हाळ्याचा ओलावा मिळू द्या! संसाराच्या अरण्यात भ्रमिष्टासारखे भटकणाऱ्या या तापसीला, तिच्या एक वेळच्या या हक्काच्या हृदयमंदिरात, पण आजच्या केवळ धर्मशाळेत एक क्षणाचा तरी विसावा घेऊ द्या! माझ्या पापस्पर्शाने आपली पवित्र काया भ्रष्ट झाली तर अलोट अश्रूंच्या मंगलस्नानाने तिला अशी धुऊन काढीन!

**जयंत** : नको, नको! लीले, हा अश्रूंचा पूर आवरून धर! चौदा रत्नांपेक्षाही अमूल्य अशा या अश्रूंची, अदृश्य प्रेमसूत्रांत गुंफलेली ही मोहनमाळ या अभाग्याच्या गळ्यात कशाला घालतेस? हे पापी वैभव परमेश्वराला आवडणार नाही.

**लीला** : गतसुखांच्या देवांनी आणि चालत्या दु:खाच्या दानवांनी आतड्यांच्या पिळाने आवळलेल्या मनाच्या मेरूने हृदयसागराचे मंथन करून बाहेर काढलेल्या या अश्रुमय रत्नांची वैजयंती, या माझ्या वैकुंठेश्वराखेरीज दुसऱ्या कोणाच्या गळ्यात घालू? प्राणजीवन, आपणच माझ्या दैवाचे देव, प्रेमाचे परमेश्वर, भाग्याचे भगवंत, विश्वासाचे वैकुंठेश्वर आहात. देवा, आजवर खोल हृदयसागरात दाबून ठेवलेली ही प्रेममौक्तिके ज्या मनकवड्या पाणबुड्याने बाहेर काढिली त्यालाच ती दिली नाहीत तर तू सुद्धा मला क्षमा करणार नाहीस! (त्याला अलिंगन द्यावयास पुढे जाते; तो तिचे दोन्ही हात धरतो.)

**कमलाकर** : (स्वगत) वा!- हरवलेल्या वीणेच्या ऐवजी ही जोडी सापडली! ठीक! आवाजाच्या धोरणाने इकडे आलो ते वाजवीपेक्षा फाजील सफळ झाले! आता तात्यासाहेबांच्या लांबलचक कानात अगदी खुबीने यांचा आवाज घुमवायला किती वेळ लागणार! आंधळ्या जयंता, मात्र आणखी एक क्षणभर असाच रहा!

(जातो.)

**जयंत** : परमेश्वरा, सर्वहृदयसाक्षी परमेश्वरा, क्षणोक्षणी खचत चाललेल्या माझ्या दुबळ्या हृदयाला या वेळी मेरुमांदारांचे स्थैर्य देऊन या कसोटीच्या प्रसंगातून मला पार पाड! लीले, लीले, लज्जाललिते लीले, दूर हो! आपल्यावरची जबाबदारी ओळखून दूर हो! आपल्या प्रत्येक आचाराबद्दल, उच्चाराबद्दल, प्रत्येक विचाराबद्दल- अगदी स्वप्नातल्या स्वप्नात येणाऱ्या तरळत्या कल्पनेबद्दल सुद्धा आपण आपल्या समाजाला, देवी मानवतेला, आपल्या हृदयस्थ परमेश्वराला जबाबदार आहोत! पापविचाराच्या नुसत्या छायेनेही दूषित झालेल्या हृदयाच्या सिंहासनावर विश्वसम्राज्याचा पवित्र प्रभू एक क्षणभर सुद्धा विसांबणार नाही! ती पाहा, राक्षसी रूढीशी जिवापाड झगडून मोठ्या कष्टाने आमच्या समाजात एकेक पुढते पाऊल टाकणारी देवी सुधारणा, आमची मूढवृत्ती पाहून खिळल्यासारखी जागच्या जागीच थबकून उभी राहिली आहे! आमच्या उद्धारासाठी, लोकनिंदेला न जुमानता स्त्री-पुरुषांवार अमृताची समवृष्टी करणारी श्रीविद्यादेवी, आमच्या आचरणाकडे पाहून थरथर कापावयाला लागली आहे! तशीच ती पाहा, केवळ परमपावित्र्याच्या दिव्यामृताचेच पान करून अखिल मानवकोटीच्या कल्याणसर्वस्वासाठी हृदयाच्या मंगल ब्रह्मांडात भराऱ्या मारणारी, तुझ्या हृदयाचे शुद्ध संदेश एकमेकांना सांगणारी श्रीकवितादेवी- आपली आवडती कवितादेवी! आपल्या पापनि:श्वासांच्या वातावरणात तिचे कोमल पंख करपून शिथिल होऊन, ती गगनदेवता मातीत मिसळून मातीमोल होऊन जाईल! आणखी या सर्वांच्याही वरच्या विश्वात तरंगणारी तेजोमय देहधारिणी, देवींची देवी श्रीनीतिदेवी

आमच्याकडे पाहून काळवंडून जाईल! नको, नको, लीले, या ईश्वरमय देवतांच्या शापापासून दूर हो! आपला क्षणिक प्रमाद या सर्वांच्या उज्ज्वल मुखमंडलाला काळे फासल्यावाचून राहणार नाही! ते पाहा, पूर्वेकडे मनोमय महन्मंगलाने आपला सर्वसाक्षी नेत्र उघडला आहे! आमच्याकडे पाहून तो रागाने किती लाल झालेला आहे! भगिनी, पवित्रप्रेम- पूर्ण भगिनी, आपल्या बंधूचा हात धर! चल, इहलोकच्या सर्व आशा, प्रेम कल्पना, हृदयवृत्ती या सर्वांच्या, ईश्वरी महायज्ञातल्या या उषेच्या निर्मल वेदिकेत आहुति देऊन टाकू, आणि शुद्ध प्रेमाने एकमेकांचे हात धरून उष्ण अश्रूंच्या अर्घ्यांनि या उगवत्या भगवंताला प्रसन्न करून घेऊ! त्याची करुणा भाकू! म्हणजे पुढच्या जन्मी तरी आमच्या अंतर्दग्ध आशा पुन्हा सजीव होतील! प्रीतीच्या साम्राज्यात जेवढे दिव्य, मंगल, पवित्र असेल तेवढ्याचाच काय तो समावेश होतो!

(दोघेही गुडघे टेकून व डोळे मिटून सूर्यासन्मुख होतात. तात्यासाहेब, कमलाकर, मनोरमा व गोकुळ येतात.)

**तात्यासाहेब** : काय पाहतो हे मी? एकाएकी वीणा नाहीशी झाली. तिच्या तपासासाठी घरभर फिरताना, बागेत बोलण्याचा आवाज ऐकून इकडे आलो. तो हा अघटित प्रकार!

**मनोरमा** : (स्वगत) अगंबाई! दिवसाढवळ्या असा अंधार! एकमेकांचा हातात हात! सूर्यनारायणा, तूच साक्षी आहेस रे!

**गोकुळ** : (स्वगत) स्त्रीशिक्षण! स्त्रीस्वातंत्र्य! पुनर्विवाह! घ्या साऱ्या सुधारणा एकदम!

**तात्यासाहेब** : जयंत, लीले, पुरे झाला हा फाजीलपणा! (दोघे दूर सरतात.) फार चांगले आरंभिले आहे हे! इष्ट सुधारणेला अशी अनिष्ट फळे येतील असे मला वाटले असते तर तिचा रोपटा उगवण्यापूर्वीच मी तिचा बीमोड केला असता! तिकडे वीणेचा पत्ता नाही, इकडे तुमचा हा रोजगार! तोंड काळे करण्याची वेळ आणलीत अगदी!

**जयंत** : मामा, क्षमा करा; अगदी स्वत:चा विसर पडून तुमची आज्ञा-

**तात्यासाहेब** : चूक झाली माझी. आता तिची फळे मला भोगलीच पाहिजेत. जयंत, मी काय म्हणतो ते नीट ऐकून घे. आजपासून लीलेशी बोलावयाचे नाही, तिच्याकडे पहावयाचे सुद्धा नाही. अगदी योग्य कारणाशिवाय आपल्या खोलीतून घरात फिरकावयाचे नाही. हे जर कबूल असेल तर याउपर माझ्या घरात तुला आश्रय मिळेल; नाही तर चारी दिशा तुला मोकळ्या आहेत! सुधारणेचा आला तो अनुभव पुरा झाला! जर पाश्चिमात्य सुधारणा इष्टच असतील तर त्यांची पेरणी अगदी सावकाश व्हावयाला पाहिजे. व्यक्तीप्रमाणे समाजावरही

आनुवंशिक संस्कार होत असतात. स्त्रियांना पुरुषांत मिसळण्याची मनाई करण्याचे कारण व्याभिचारभय; आणि हाडीमांसी खिळलेल्या या रूढींचे बीज, दुरून एकमेकांकडे पाहणाऱ्या स्त्री-पुरुषांच्या मनात सदैव वागत असल्यामुळे थोडीशी मोकळीक मिळताच आधी तेच डोळ्यापुढे येऊन उभे राहते! हा संस्कार जाण्याला कालावधी पाहिजे.

**कमलाकर** : भिन्न पायांवर उभारलेल्या समाजाच्या रूढी एकदम एकमेकांवर लादण्याचा प्रयत्न केला तर हेमाडपंती देवळावर मंगलोरी कौलांचे छप्पर घातल्यासारखे विसंगत होईल! (सुशीला घाईने येते.)

**सुशीला** : काका, वीणेच्या खोलीत हे पाहा तुमच्या नावाचे पत्र सापडले. त्यात ती म्हणते की, मी वसंतरावांबरोबर निघून गेले; माझा त्यांच्याशी लग्न करण्याचा निर्धार झालेला आहे. लग्न झाल्यावर आम्ही आमचा पत्ता कळवू; तोपर्यंत तपास करण्यात अर्थ नाही!

**तात्यासाहेब** : वसंतरावाबरोबर कारटी गेली ना?

**कमलाकर** : मग ती दोघे मुंबईसच गेली असतील! कारण त्या विलायती वेड्याला विलायतेचे चार करायला थोडीशी सवड फक्त मुंबईसच मिळण्याजोगी आहे.

**तात्यासाहेब** : तुमचा तर्क बरोबर आहे. कमलाकर, आताच्या आता जी गाडी सापडेल तिने मुंबईस जाऊन बारकाईने तपास करा. चला, एक क्षणही घालवू नका. जयंत, मी मघाशी सांगितले त्याचा नीट विचार कर. लीले, चल पुढे.

(तात्यासाहेब, कमलाकर, लीला व सुशीला जातात.)

**गोकुळ** : (स्वगत) बायकांना पाय फुटण्याचा हा हंगाम दिसतो! द्रुमन गेली, वीणाताई गेली, लीलाताई गेल्यासारखीच आहे. आमच्या घरातील सुद्धा गेली; तेव्हा आता सुशीलाताईच्या पाळतीवर असले पाहिजे! अजून विद्याधर रिकामा आहे! या समवयस्क जोडप्यांचा भरवसा धरवत नाही! मी तर प्रत्यक्ष तात्यासाहेब आणि स्वयंपाकीण आजीबाई या दुकलीवरही आपली दुरून टेहळणी ठेवणार!

(जातो.)

**जयंत** : (स्वगत) परमेश्वरा, आमच्या शुद्धत्वाचा साक्षी तू आहेस! मामांच्या या नसत्या गैरसमजाचे निराकरण तुझ्यावाचून दुसरे कोण करणार!

**मनोरमा** : का आता उघडले का डोळे?

**जयंत** : कोण, तू का? दु:खावर तिरस्काराचा कळस पाहिजेच होता!

**मनोरमा** : बघितले, घरच्या बायकोला टाकून तिसरीच्या पायावर लोळण घातली म्हणजे चारचौघात अश्शा लाथा बसतात! आता तरी ठिकाणावर या!

**जयंत** : नागिणी, मामांच्या वाग्बानांनी झालेल्या जखमांवर हे विष कशाला ओततेस?

**मनोरमा** : अगंबाई, अजून हेच बोलणे! इतकी फजिती झाली तरी अजून लाज नाही ना?

**जयंत** : मनोरमे, जा. माझ्या सहनशीलतेचा अंत पाहू नकोस.

**मनोरमा** : अहाहा, वाटते का काही बोलायला? फार दिवस ऐकून घेतले हो! आज आपल्याला चांगले राजरोस पकडले आहे!

**जयंत** : मनोरमे, मनोरमे, जा; आपले तोंड काळे कर.

**मनोरमा** : आपलेच तोंड काळे झाले आहे बरे! चला, आता कान धरून नेते आणि घरात अडकवून ठेवते, समजला!

**जयंत** : त्या घरावर अशी लाथ मारून चालता होतो; समजलीस!

(रागाने निघून जातो.)

**मनोरमा** : (रडत) देवा, मेल्या तुझे डोळे फुटले का आहेत?

(कमलाकर प्रवेश करतो.)

**कमलाकर** : (स्वगत) मनोरमेला घरातून काढावयाला हीच संधी आहे! हिचा हा राग शांत झाला नाही, तोच आजच्या आज माझ्याबरोबर माहेरी जाण्याची कल्पना तिच्या डोक्यात भरवून दिली पाहिजे! घरातून पाऊल टाकले की पुरी ताब्यात आली. (प्रकट) मनोरमाबाई, उठा, रडू नका अशा!

**मनोरमा** : कमलाकर, आज अगदी अखेर झाली हो! मला अगदी लाथेने तुडविले!

**मनोरमा** : प्रत्यक्ष नाही हो! पण घरावर अश्शी लाथ मारतो म्हणून निघून गेले! आता घर म्हणजे मीच नाही का? शहाण्याला शब्दाचा मार नि मूर्खाला टोणप्याचा मार!

**कमलाकर** : अरेरे, सुधारणेची सारी फळे बरे ही! पण असे रडून काय होणार? चल घरात!

**मनोरमा** : कमलाकर, आता मी घरात पाऊल सुद्धा टाकणार नाही! अश्शी विहिरीचा रस्ता धरणार!

**कमलाकर** : तुम्ही आईबापांच्या इतक्या आवडत्या, तुमच्या आईला काय वाटेल?

**मनोरमा** : आईला, बाबांना, तुम्हीच सांगा सारे आता.

**कमलाकर** : तुमच्या वडिलांनी हा प्रकार पाहिला असता तर आकाशपाताळ एक करून

सोडले असते!

**मनोरमा** : त्यांच्या हाती काय आहे बिचाऱ्यांच्या?

**कमलाकर** : काय आहे? मला वाटते त्यांनी जयंतावर फिर्याद ठोकली असती!

**मनोरमा** : नवरा-बायकोच्या कज्जांत कायद्याची कास धरून काय उपयोग?

**कमलाकर** : का बरे, दिवाणीत दावा केला तर सरकार उडाणटप्पू नवऱ्याला सक्तीने त्याच्या बायकोच्या ताब्यात देते!

**मनोरमा** : होय का? मग मला पोचवा बाबांकडे! माझे म्हणणे ते खास ऐकतील.

**कमलाकर** : पण मी कसा पोचविणार? मला आताच्या गाडीने जावयाचे आहे.

**मनोरमा** : मग मी सुद्धा आताच्या गाडीने येते! ही अश्शी निघते!

**कमलाकर** : वा:! तात्यासाहेबांना विचारले पाहिजे! असे कसे जाता येईल तुम्हाला? हा सारा प्रकार प्रथम त्यांनी जयंताला मोकळीक दिल्यामुळे जरी झाला असला तरी ते तुम्हाला जावयाला परवानगी खास देतील.

**मनोरमा** : भलतेच काही तरी! तुम्ही फारच भोळे! अहो, त्यांची नाही का यात फजिती व्हायची? ते कशाला देतात परवानगी आणि मी विचारते तरी कशाला? तेच या साऱ्या अनर्थाला कारण!

**कमलाकर** : पण तुम्हाला माहेरी नेऊन पोहोचविल्याबद्दल ते माझ्यावर रागावल्याखेरीज कसे राहतील?

**मनोरमा** : अहो, त्यांना काहीच कळवायचे नाही यातले. मी मुकाट्याने निघते तुमच्याबरोबर म्हणजे झाले.

**कमलाकर** : मग माझी काही हरकत नाही; पण मी पहिल्या गाडीने दिवसा-

**मनोरमा** : आता काही अडचणी काढू नका! कसेही करून मला बाबांच्या घरी नेऊन पोचवा, नाही तर मी काही जीव ठेवणार नाही!

**कमलाकर** : बरे असे करू. मी आत्ताच्या गाडीने जातो म्हणून घरातून बाहेर पडतो आणि रात्री बरोबर साडेनऊ वाजता टांगा घेऊन आपल्या मागल्या रस्त्यावर उभा राहतो. साडे नवाची तोफ झाल्याबरोबर तुम्ही घरातून निघून या म्हणजे झाले. चालेल असे केले तर?

**मनोरमा** : चालेल. कसे तरी करून मला माहेरी पोचवा म्हणजे झाले! पण कोणाजवळ याबद्दल अगदी चकार-

**कमलाकर** : वा:! इतका का मी मूर्ख आहे? चला, ते पाहा विद्याधर इकडे येत आहेत. ठरल्याप्रमाणे यावयाला मात्र चुकू नका!

(मनोरमा जाते.)

**कमलाकर** : (स्वगत) मानी मनोरमे, शेवटी सापडलीस माझ्या जाळ्यात! आज रात्रीच्या गाडीने द्रुमनला आणि मनोरमेला एकमेकीच्या नकळत निरनिराळ्या डब्यात बसवून मनोरमेसह मध्येच उतरून पडतो म्हणजे झाले! सकाळच्या गाडीने जावयाचा बहाणा केला म्हणजे मनोरमेबद्दल मागे जी ओरड होईल तिच्यात माझे नाव मुळीच निघणार नाही. पण ही पीडा कशाला मध्येच आली?

(जातो. विद्याधर येतो.)

**विद्याधर** : झालेला प्रकार फार गैर झाला! खरेखोटे केल्यावाचून तात्यासाहेबांनी जयंताला एकदम कडक शासन केले! एकट्याला एका बाजूला नेऊन नीट विचारले असते तर फार चांगले झाले असते! त्याला गाठून तसाच थोपवून धरिला पाहिजे. नाही तर या रागाच्या भरात तो आत्महत्या करावयाचा! जयंत जरी उतावळा आणि आत्यंतिक मनोवृत्तीचा आहे तरी अगदी खुल्या दिलाचा, नीतिमान आणि काटेतोल सरळ चालीचा आहे! त्याच्याकडून रेषामात्र वाकडे पाऊल पडणार नाही अशी माझी बालंबाल खात्री आहे. परिस्थितीचा परिणाम अशा माणसावर फारच लौकर होतो. लौकर जाऊन त्याला थांबविला नाही तर भलताच प्रकार झाल्यावाचून राहणार नाही.

(जातो.)

## प्रवेश सहावा

(घाटातील पुलावर गाडी उभी राहिली आहे. कमलाकर व मनोरमा एका डब्यात)

**मनोरमा** : मेल्या मांगा, एका भोळ्या भाबड्या गाईला अशी एकटी गाठून तिचा गळा कापतोस? परमेश्वरापुढे याचा काय जाब देशील?

**कमलाकर** : परमेश्वरासमोर उभे राहण्याचा माझा मुळीच विचार नाही! मनोहर मनोरमे, आता आरडाओरड करण्यात काय हशील आहे? घाट संपण्यापूर्वीच माझा मनोरथ-

**मनोरमा** : मेल्या, तुझी जीभ झडून जावो! आता अशी उलट गाडीने जाऊन तुझ्या काळ्या कर्माचा जगभर डांगोरा गाजविते.

**कमलाकर** : मूर्ख मनोरमे, तुझ्या घरातून बाहेर पडणाऱ्या चोरट्या चालीकडे लक्ष देऊन

मग या पोरखेळाच्या गोष्टी सांग! आपण होऊन माझ्यामागे निघून आलीस असे मी सांगितले तर तुझी काय वाट होईल? बायकांची बदनामी करण्यात आनंद मानणारे आमचे लोक तुझ्या कडू सत्यापेक्षा माझ्या गोड असत्यालाच उचलून धरतील! मग अशा साहसाने निर्दोषपणावरही पापाचा शिक्का मारण्यापेक्षा पापावरच निर्दोषपणाचा मुलामा का लावीत नाहीस?

**मनोरमा** : राक्षसा, तात्यासाहेब मामंजींच्या पायावर लोळण घेईन, तिकडच्या मनाची खात्री करून देईन, आणि तुला त्यांच्याकडून तुझ्या पापाचे शासन देववीन!

**कमलाकर** : ते काय शासन करणार! फार झाले तर त्यांच्या घरचा आश्रय तुटेल! पण लहानपणाइतकी मलाही त्यांच्या आश्रयाची आता जरूर नाही. पंख फुटलेल्या पक्ष्याच्या पिलाला घरट्याचा आधार देणाऱ्या फांदीची काय परवा? ती फांदी कडाडली तरी ती मोडून पडण्यापूर्वीच त्याला दुसऱ्या झाडावर झेप टाकता येते. पण काय मी मूर्ख! उगीच बोलून वेळ घालवीत आहे. मानी मनोरमे, जितक्या उतावळेपणाने घरातून माझा हात धरून बाहेर निघालीस तितक्याच उतावळेपणाने अस्सा तुझा हात धरून (तिचा हात धरावयास जातो.)

**मनोरमा** : पण त्यापेक्षाही उतावळेपणाने मी जगाबाहेर निघून जाते! देवा, घे मला पदरात!

(डब्यातून खाली पुलावर उडी टाकते. पण पुलाच्या तारांतच अडकून मूर्च्छित पडते.)

**कमलाकर** : मूर्ख मनोरमे, गेलीस! प्राणाचे मोल देऊन शील सांभाळलेस! दोन पर्वतांच्या विशाल ओठांवरून आणि पुलाच्या दंतपंक्तींतून काळाच्या या खोल दरीच्या जबड्यात गडप झालीस! अरे, क्षणभर थांबलेली गाडीही चालू झाली! काही हरकत नाही. उद्या सकाळी, घारीगिधाडांना मनोरमेच्या दगडांवर पडलेल्या मांसखंडांची मेजवानी दिल्याचे समाधान काही थोडे-थोडके नव्हे!

(गाडी निघून जाते. पडदा पडतो.)

## अंक दुसरा समाप्त

## अंक तिसरा
# प्रवेश पहिला

(दवाखान्यातील एक खोली. द्रुमन वळकटीवर बसली आहे. जवळ बाबासाहेब व शिपाई उभे आहेत. द्रुमनने तोंडावरून पदर घेतला आहे.)

**बाबासाहेब** : बाई, आता शेजारच्या खोलीतल्या रोग्यांनी अशी खबर दिली आहे की, पहाटेस तुमच्या खोलीत मुलाच्या रडण्याचा आवाज ऐकू आला! पुढे एक तशाच आवाजाची किंकाळी ऐकू आली आणि नंतर रडण्याचा आवाज बंद झाला! बाई, त्यामुळे दवाखान्याचा अधिकारी या नात्याने मजवर तुमच्या खोलीची झडती घेण्याचा वाईट प्रसंग आला आहे! (शिपायास) हं, पाहा रे नीट खोली तपासून. (शिपाई खोली तपासतात) बाई, तुम्ही कोण आहात? कुठल्या राहणाऱ्या? का? बोलत का नाही? आज चार दिवस मी येथे नव्हतो, त्यामुळे मला तुमची माहिती मिळाली नाही. नाही तर प्रत्येक रोग्याची मी स्वत: वास्तपूस करीत असतो!

**शिपाई** : बाई, जरा बिछान्यावरून उठा!

(द्रुमन एकदम वळकटीतून मृत बालक काढते.)

**द्रुमन** : देवा! अखेर हे केलेस ना! कशाला उठा? बाबासाहेब, हे पाहा माझे पाप आणि ही मी!

**बाबासाहेब** : कोण द्रुमन! राक्षसिणी, हे काय केलेस?

**द्रुमन** : कोण राक्षसी? मी कशाची राक्षसी? मी या बाळाची आई आहे.

**बाबासाहेब** : पण हे अघोर कर्म करायला तुझा हात कसा वहावला!

**द्रुमन** : ते राक्षसी रूढीला विचारा. राक्षसी समाजाला विचारा, राक्षसी धर्माला, त्या धर्माने पावणाऱ्या तुमच्या राक्षसी देवाला विचारा! बाबासाहेब, मी प्रत्यक्ष याची आई- आई आपखुशीने पोटच्या गोळ्याच्या मानेला नख कसे हो देईल? मातृप्रेमाची कल्पना करा! आईच्या आतड्याचा गळफास बाळाच्या गळ्याभोवती कसा हो बसेल? मी पातकी, पतित आणि दुराचारी तर खरीच; पण माझ्या सोनुल्याच्या मानेला नख देताना पाण्याने डबडबलेल्या डोळ्यांनी त्याला पुरतासा पाहिला सुद्धा नाही हो! पाहा, पाहा, कोळशाच्या खाणीतून निघाला म्हणून हिऱ्याची चमक कमी होते का? पाहा, अगदी चित्रासारखा नाही का? पण, हाय, हाय! एका घटकेपूर्वी सारख्या चमकणाऱ्या या हिरकण्या

अगदी चित्राच्या काचेच्या डोळ्यांसारख्या थिजल्या आहेत!

**बाबासाहेब** : अरेरे! द्रुमन, कोणत्या अधमाने-

**द्रुमन** : नका, नका त्या कपटी विश्वासघातकी राक्षसाचे नाव तोंडावाटे उच्चारण्याचा प्रसंग माझ्यावर आणू नका! मी फसले. बाबासाहेब, पुनर्विवाहाच्या नुसत्या आशेने मी पापाच्या पंकांत बुडाले! सुखाचा मोह मला आवरला नाही. ज्या कामजलात वृद्ध वयाचे, पोक्त विचाराचे, अनुभवाचे, मोठमोठाले, महात्मे, तपस्वी, तेजस्वी ऋषी, प्रत्यक्ष देवदानव सुद्धा अडकून पडले त्यांतून माझ्यासारखी अबला कशी सुटेल? वाघसिंहांना गुरफटून टाकणारे जाळे एखाद्या बालमृगीला कसे तोडिता येईल!

**बाबासाहेब** : पोरवय, भोवतालची सुखाची सृष्टी, स्वत:च्या सुखाची पूर्ण निराशा, आणि मानवी स्वभावाचा कमकुवतपणा, अशा परिस्थितीत अल्लड विधवेचे पाऊल वाकडे पडले तर त्यात तिला दोष कसा द्यावा? पण द्रुमन, तू तुझे संकट कोणाला सांगितले असतेस तर-

**द्रुमन** : कोणाला सांगणार! संकटात सापडलेल्या, निस्सहाय, फसलेल्या विधवेचे दु:ख कोण ऐकून घेणार! सुखावलेल्या मनुष्याला दु:खीकष्टी माणसाच्या अंत:करणाची जाणीव कोठून होणार! शास्त्रीमंडळींच्या आरडाओरडीचा पोकळ नगारा वाजत असता विधवेच्या आतड्यांच्या तारांचा करुणारव कोणाला ऐकू येणार? अनाथ गाय चुकून पाय घसरून पापाच्या चिखलात रुतली तर तिच्या भोवती गुप्त कृष्णकर्माच्या काळिमेने काळवंडलेल्या कावळ्यांची कावकाव मात्र सुरू होते. तिच्या दीन दशेचा मोठ्या मनाने विचार करून, तिच्या पापाकडे मनुष्य स्वभावाच्या जाणिवेने पाहून उदार बुद्धीने तिच्यावर आपल्या पंखांची छाया पसरणारा राजहंस कुठे तरी आढळेल का! मनुष्याला परदु:खाची कल्पना आत्मदु:खासारखी होत असती, तर आज, पापाच्या पडद्याआड झाकलेल्या माझ्या या छबकड्याला, धुक्याआड झाकलेल्या या चंद्राला, कृष्णमेघाच्या आड लपलेल्या या माझ्या सूर्यनारायणाला मी नाहीसा केला असता का? समाजनिंदेच्या भीतीने हृदयाच्या चिंधड्या झाल्या नसत्या तर माझ्या लाडक्याला या हृदयात सुद्धा लपवून ठेवला असता! पण चहूकडून कोंडमारा झाल्यामुळे केवळ पिंजऱ्यात सापडलेल्या वाघिणीच्या क्रूरपणाने मी या पोटच्या गोळ्याचा घास घेतला! बाळा, जा! देवाच्या पायांजवळ जाऊन त्याची करुणा भाक. तो दीनांचा दयाळू, अनाथांचा नाथ, पतितांचा पिता, पाप्यांचा पाठिराखा, पातक्यांचाही पालनहार, अगदी अधमाधमांचा सुद्धा आधार, तुझ्या केविलवाण्या तोंडाकडे पाहून तुझी करुणेची किंकाळी ऐकून द्रवेल, आणि तुझ्या या पातकी भांबावल्या

आईलाही लवकरच पायाजवळ आणील.

**बाबासाहेब** : अरेरे! धिक्कार असो अशा या धर्माला, अशा समाजाला आणि अशा रूढीला! भूतदया हाच साऱ्या धर्माचा धर्म. भूतदयेला थारा देत नाही, पतितांचे समाधान करीत नाही; दु:खितांचे दु:ख जाणत नाही तो धर्म कशाचा? विकारवश मनुष्याच्या अंगी जुलमाच्या टाकीचे घाव घालून असाध्य देवकळा आणण्याच्या नसत्या नादी पडून मानवी मनोवृत्तींना राक्षसी रूप मात्र देण्यापेक्षा मध्यम दर्जाचा मनुष्यपणाच राखिलेला काय वाईट? संसाराचा गाडा मोडून पडल्यावर परलोकचा पल्ला एकदम गाठण्यासाठी विधवेला वैराग्याचे विमान मिळाले तर सर्वोत्तम, यात शंकाच नाही. पण त्याला लोकोत्तर विवेकपाशाची बळकटी पाहिजे. अल्लड, विकारवश, अविचारी, अदूरदृष्टी, सुखासक्त किंवा पोरवयाच्या साऱ्याच विधवांना अशा धोक्यात घातले तर त्यांचा सर्वस्वी नाश होण्याचेच फार भय! तेव्हा त्यांच्यासाठी पुनर्विवाहाची पाऊलवाटच पडायला हवी. द्रुमन, त्यापेक्षा तुझा पुनर्विवाह झाला असता तर किती चांगले झाले असते! पण लोकलज्जेला चुकविण्यासाठी या अघोर साहसात पडताना उलट तू कायद्याच्या कैचीत मात्र सापडलीस!

**द्रुमन** : बाबासाहेब, मी तुमची धर्माची कन्या आहे. माझे रक्षण करा आणखी सरकारच्या तावडीत देऊन माझे जगापुढे धिंडवडे काढू नका. वणव्यात होरपळणाऱ्या हरिणीवर अश्रूंची वृष्टी करा. बाबासाहेब, माझे रक्षण करा, या संकटातून वाचवा, मी भांबावून गेले आहे.

**बाबासाहेब** : ऊठ, द्रुमन, ऊठ- मी मनुष्य आहे. मला अंत:करण आहे. परमेश्वरा! अनाथ प्राण्याच्या रक्षणासाठी एवढे असत्याचरण करितो याची क्षमा कर. (शिपायास) अरे, या मुलाची व्यवस्था लावा आणि कोणाजवळ याबद्दल बोलू नका.

**शिपाई** : छे! छे! रावसाहेब, आम्ही का पांढरपेशे आहोत? का ब्राह्मण आहोत? आमचा दिल अगदी फाटून गेला! मूल जिवंत उपजले पण थोड्या वेळाने आटोपले असे सांगू म्हणजे झाले.

**बाबासाहेब** : द्रुमन, मी सर्व व्यवस्था नीट करतो. तू घाबरू नकोस. आताच्या गाडीने मला पाच-सहा दिवसांकरिता परगावी जावे लागणार आहे. तोपर्यंत तू हुषारीने रहा. चला रे. (जातात.)

**द्रुमन** : (मुलाच्या प्रेताकडे पाहून) बाळ! काय रे तुझ्या जन्माची कथा ही! लाडक्या, पुन्हा जन्म घेण्याचा तुझ्यावर प्रसंग आला तर देवाजवळ हट्ट घेऊन बैस

आणि एखाद्या हलक्या जातीत जन्म घे! म्हणजे शास्त्राची कोरडी बडबड, उंचपणाचा नीच अभिमान, यांचा त्रास चुकून तुला शुद्ध, सरळ, भाबड्या मनुष्याच्या प्रेमाचा तरी अनुभव मिळेल.

(मनोरमा येते.)

**मनोरमा** : द्रुमनताई, घाबरू नका. तुमची दशा पाहून माझ्या जिवाचे पाणी पाणी झाले आहे. तेव्हा तुम्हाला त्रास मी कशी देईन? वेड्यावाकड्या प्रसंगांत अडलेल्या बाईबापडीच्या पुरुषजात कुटाळक्या करील; पण आम्हा बायकांचे तसे नाही! द्रुमनताई, असला प्रसंग पाहून एखाद्या मेल्या धोंड्याचे सुद्धा पाणी होईल! मग बायकांचे मन कसे विरघळणार नाही? देवा रे देवा, या नाडलेल्या गाईवर काय रे ही वेळ आणलीस?

**द्रुमन** : मनोरमाबाई, पुढच्या प्रसंगाच्या कल्पनेनेच माझ्या काळजाने ठाव सोडला आहे! बायकांनीच बायकांचा कड घेतला पाहिजे! तुम्ही नाही ना माझा घात करणार?

**मनोरमा** : सख्ख्या बहिणीप्रमाणे माझ्यावर भरवसा ठेवून असा! आम्हा बायकांना असले प्रकार पाहायला मिळत नाहीत म्हणूनच ही धर्माची ढोंगे चालतात. यापेक्षा तुमच्यासारख्यांनी पुन्हा लग्ने केलेली काय वाईट? बरे पण ते राहू द्या तूर्त! तुम्ही येथे कशा आला?

**द्रुमन** : कशी आले? मनोरमाबाई, ज्या मेल्याने मला पुनर्विवाहाची आशा लावून या पापमार्गाला लावले त्यानेच आलेला हा प्रसंग टाळण्यासाठी आणि पुनर्विवाह लावण्यासाठी मला घरातून बाहेर पडायची बुद्धी दिली. आपल्याबरोबर नेण्याचे आमिष दाखवून मेल्या मांगाने विश्वासघात करून, मला एकटीलाच गाडीत बसवून दिली आणि आपण तोंड काळे करून निघून गेला. अखेर गाडीतच माझ्या पापाची घटका भरत आल्यामुळे नाइलाजाने मी या घटपायथ्याच्या दवाखान्यात आले! पुढचा सारा प्रकार तुम्हाला दिसतोच आहे. पण तुम्ही येथे कशा आला?

**मनोरमा** : अशाच फसगतीने! तिकडच्यांवर रागावून मी जीव द्यायला निघाले तो अशाच एका राक्षसाने मला माहेरी पोचविण्याचे कबूल केले; रागाच्या भरात मी तशीच कोणाला न कळत त्याच्याबरोबर निघाले; पण गाडी घाटात आल्यावर त्या मेल्याची पापवासना माझ्या लक्षात आली आणि पातिव्रत्याचे रक्षण करण्यासाठी मी एकदम पुलावरून खाली उडी टाकली!

**द्रुमन** : उडी टाकली! अहाहा! मनोरमाबाई, धन्य तुमची! बरे पुढे?

**मनोरमा** : पुढे मी पुलावरून खाली न पडता पुलाच्या तारांतच अडकून राहिले. थोड्या

वेळाने कामावरचे लोक येऊन त्यांनी मला या दवाखान्यात टाकिले. पण इथे पाहते तो बाबासाहेब मामंजी! आज चार दिवस ते इथे नव्हते म्हणून वेळ निभावली; पण आता कसे होणार?

**द्रुमन** : त्याची नका तुम्ही काळजी करू! ते आज पुन्हा बाहेरगावी जाणार! त्यांची बदली झाल्याचे ठरल्यासारखे आहे! तेव्हा ते फारसे पुन्हा इथे राहाणार नाहीत. तितक्या वेळात तुम्ही साफ बऱ्या होऊन आपल्या माहेरी जाल! पण हो, तुम्हाला फसविणारा कोण हे नाही सांगितले तुम्ही! कोणत्या राक्षसाने-

**मनोरमा** : कमलाकराने!

**द्रुमन** : कमलाकराने! अरे मांगा! मनोरमाबाई, त्यानेच माझा आणखी माझ्या बाळाचा असा गळा कापला हो! मनोरमाबाई, आता माझा संताप अनावर झाला आहे! माझ्या अश्रूची मला मुळीच चाड वाटत नाही. अशी मी जाते आणि त्या मांगाची कसाबकरणी साऱ्या जगाला कळविते! तुमच्या नावावरचा नसता कलंक तरी उडून जाईल!

**मनोरमा** : पण त्याचे सारे कृत्य लोकांच्या नजरेस आणल्याखेरीज मी जिवंत आहे असे त्याला कळू देऊ नका, नाही तर तो मेला मांग माझ्या नावाच्या नसत्या कंड्या पिकवत बसेल!

(शिपाई येऊन मूल उचलतात.)

**द्रुमन** : हाय! बाळा, हेच तुझे शेवटचे दर्शन! देवा, माझ्या बालराजाला तुझ्या वरच्या राज्यात तरी सुखी ठेव.

(पडदा पडतो.)

## प्रवेश दुसरा

(वसंत व वीणा. दुर्वास चहा घेऊन प्रवेश करितो.)

**दुर्वास** : चहा आणला आहे साहेब!

**वसंत** : अगदी हिंदू! दुर्वास कोणत्या वेळी काय आणावयाचे हे तुम्हाला अजून कळत नाही ना! अगदी हिंदू आहात. विलायतेतले खाणावळवाले किती हुषार असतात! दुर्वास, हा माझा आताचा पोषाख चहा पिण्याचा नाही.

**दुर्वास** : मग कोणत्या वेळचा आहे, साहेब!

**वसंत** : हा कॉफी पिण्याच्या वेळचा आहे! विलायतेत या पोषाखाकडे फार लक्ष द्यावे लागते! चहा पिण्याचा पोषाख निराळा, कॉफीचा निराळा, विडी ओढण्याचा निराळा. अहो, काही दिवसांनी तर जांभई देण्याचा पोषाख निराळा आणि शिंक देण्याचा पोषाख निराळा, इतकी सुधारणा होईल तिकडे! जा; कॉफी आणा.

( तो जातो. )

**वीणा** : अहाहा! इतकी सुधारणा आहे ना तिकडे! नाही तर आमचा समाज!

**वसंत** : आमचा समाज! छि:! हिंदू,अगदी हिंदू! वीणे, या अजागळ समाजात तू किती उत्कृष्ट मनोधैर्य दाखविले आहेस! माझ्याबरोबर पळून येऊन तू प्रीतिविवाहाच्या सुधारणेची साक्षात विजयपताकाच झाली आहेस!

**वीणा** : प्रिया, द्रुमनताई घरातून निघून गेली एवढ्यावरून बाबांनी काय गहजब केला हो! बाबा सुद्धा अगदीच हिंदू, नाही? ज्या चर्चेच्या नुसत्या सहवासाला ते भीत होते तिचा आता स्वत:च अनुभव घेत असतील!

**वसंत** : वीणे, विलायती सुधारणेची खरी किंमत तुला कळली. प्रणयाचे रहस्य तूच ताडिलेस! अशा हजारो तरुण मुली जेव्हा प्रेमासाठी भडाभड पळत सुटतील तेव्हाच आम्ही इंग्रजी शिकल्याचे चीज होईल!

**वीणा** : अहाहा! साऱ्या कुमारिकांची लग्ने अशी चोरून, आणि साऱ्या विधवांची लग्ने राजरोस होताहेत असा सोन्याचा दिवस आमच्या अज्ञानी समाजात कधी तरी उगवेल काय?

**वसंत** : लाडके, खात्रीने उगवेल! तुझ्यासारख्या देवी घरोघर पळू लागून मनोधैर्य दाखवू लागल्या तर काय नाही होणार? लवकरच असा दिवस उगवेल की, झाडून साऱ्या कुमारिका वल्लभांबरोबर पळून जाऊ लागल्यामुळे उपवर मुलींचे बाप बेफिकीर होतील आणि म्हाताऱ्या आजींचा पुनर्विवाह जमविण्यासाठी त्यांचे नातू वरशोधनाच्या फिकिरीत पडतील!

**वीणा** : त्या वेळी पुढच्या पिढीला आजच्या विधवांची कल्पना होण्याकरिता प्रदर्शनांतून विधवांची चित्रे ठेवावी लागतील आणि पोरीच्या लग्नाबद्दल काळजी करीत असलेल्या नटीसूत्रधारांचा संवाद असंभवनीय ठरेल!

**वसंत** : अज्ञानाने घोरत पडलेल्या समाजाचे डोळे कधी उघडतील ते उघडोत! अजून आमच्या बायकांचे लाजणे सुद्धा पुरे झाले नाही!

**वीणा** : हे काही खोटे नाही! आमची आई आता पोक्त झाली, पण अजून बाबांना

लाजते! कधी त्यांच्या गळ्यात हात घालते का त्यांचे मोकळ्या मनाने चुंबन घेऊन आम्हा पोरींना धडा घालून देते; नाव नाही! विलायतेत असे नसेल, नाही!

**वसंत** : छट्, तिकडे बायका परक्यांची सुद्धा चुंबने घेतात! उगीच सुधारणा झाली आहे इतकी? फुकट नाही राज्य करीत ते आमच्यावर! नाही तर तुझी आई! अजून लाजतात ना? हिंदू, अगदी हिंदू! गचाळ!

**वीणा** : आईवरून आठवण झाली. प्रिया, आता लग्नाचा विचार कधी करायचा?

**वसंत** : करायचा खरा! मला सुद्धा तुझा असा अपुर्ता सहवास असह्य वाटतो. पण, सध्या पैशाची टंचाई पडली आहे, त्या विवंचनेत मी आहे! वकिली करीन तर उघडकीस यावे लागते; उघडकीस यावे म्हटले तर तुझा वियोग होणार.

**वीणा** : तो कसा? मी मुळीच बाबांचे ऐकणार नाही!

**वसंत** : नाही खरी; पण कायदा त्यांच्या बाजूला आहे ना? कायद्याने तू अजून अज्ञान ठरशील. काय करावे हेच कळत नाही.

(मथुरा येते.)

**मथुरा** : (स्वगत) ते विचित्र जोडपे कधी पाहीनसे झाले आहे! (पाहून, प्रकट) हा मेल्यांनो, या तर वीणाताई आणि हे वसंतराव!

**वसंत** : कोण ही- अगदी हिंदू! वर्दी दिल्यावाचून कशी आत आलीस? विलायतेत या आगळी-

**वीणा** : थांबा, असे तिच्यावर रागावू नका! अहो, ही आपल्या गोकुळची मथुरा. मथुराताई, तुम्ही इकडे कुणीकडे? आमच्यासारखाच काही प्रकार झाला आहे का?

**मथुरा** : नाही, नाही; तुमच्या अगदीच उलट- तुम्ही बापाच्या घरून नवऱ्याकडे पळून आला आणि मी नवऱ्याच्या घरून बापाकडे पळून आले आहे.

**वसंत** : अस्से; हे दुर्वास तुमचे वडील एकूण!

**मथुरा** : तर काय! बाबांच्या शांतिसदनाबद्दल मी रोज सांगत नव्हते तुम्हाला! मला माहीत नव्हते, तुम्हीच आमच्या खाणावळीत आहा म्हणून! आज चार दिवस बाबा तुमच्या गोष्टी सांगतात, म्हणून म्हटले पहावे तरी असे कोण आहे ते! पण तुमची बाबांना ताकीद, की कोणाला आत सोडू नका म्हणून. आज अखेर त्यांचा डोळा चुकवून आले आत आणि पाहते तो तुम्ही!

**वसंत** : आम्ही येथे गुप्तपणाने राहिलो आहोत म्हणून आत येऊ देत नाही.

**वीणा** : आता तुम्ही तरी कोणाजवळ बोलू नका! नाही तर, आम्हाला आणखी दुसरा गाव पहावा लागेल.

**मथुरा** : मी कशाला बोलते! तुम्ही खाणावळ सोडून गेला तर बाबांचे नुकसान नाही का?

**वीणा** : आणि घरी गेल्यावर गोकुळाजवळ सुद्धा बोलू नका!

**मथुरा** : त्यांच्याजवळ बोलायला मी घरी जाते आहे कशाला! माझा अडला आहे आता खेटर सासरी जायला-

(हातात एक पत्र घेऊन दुर्वास येतो.)

**दुर्वास** : अस्से काय? पाहतो कशी जात नाहीस ती! अगं कारटे, इतकी मस्त झालीस काय?

**मथुरा** : इतकं रागवायला काय झाले बाबा?

**दुर्वास** : हे बघितलेस तुझ्या नवऱ्याकडून आलेले पत्र! त्याचा असा नेहमी पाणउतारा करतेस नाही? नवऱ्यावर तुझा तोरा! कारटे, आमच्या घराण्यात असा प्रकार कोणी केला नाही!

**वसंत** : (स्वगत) खाणावळ काढणाऱ्या बहाद्दराचे घराणे मोठे तर खरेच!

**मथुरा** : अहो बाबा, खोटे ते सारे! त्यांना काय, काही तरी भरकटले झाले!

**दुर्वास** : काही तरी भरकटले काय? थोरामोठ्यांच्या सह्या आहेत पत्रावर! काय म्हणे, त्यांनी माझे हाल केले! मला खरे वाटले सारे! पण खरा प्रकार निराळाच! चल, आताच्या आता आपल्या नवऱ्याच्या घरी जा, त्यांच्या पाया पड, त्यांच्यापुढे नाक घास आणि तेथे राहा!

**वसंत** : अहो दुर्वास, हा जुलूम काय कामाचा! मथुराबाईची खुषी नसेल-

**दुर्वास** : माफ करा, साहेब, या बाबतीत माझे मला चांगले कळते आहे.

**मथुरा** : अहो बाबा, असे बोलू नका, ते विलायतेला जाऊन आले आहेत-

**दुर्वास** : विलायतेचा काय येथे संबंध! मला एवढे कळते, बायकोने नवऱ्याच्या आज्ञेत रहावे, त्याच्या लाथा खाव्या, वाटेल ते करावे, पण त्याच्या बाहेर जाता कामा नये. नवऱ्याला मुठीत ठेवावयाचा तो गोडीगुलाबीने. गरिबाच्या अंगी गरिबीच पाहिजे.

**वसंत** : अहो, 'यत्र नार्यस्तु पूज्यन्ते रमन्ते तत्र देवता:!'

**दुर्वास** : देवता रमतात पण देव उपाशी मरतात. चल, पोरी, कर तयारी, ऊठ.

**वसंत** : हिंदू, अगदी हिंदू! या हिंदू लोकांच्या अंगात हिंदूपणा कसा अगदी खिळून राहिला आहे! अहो दुर्वास, बापाची मुलीवर किती सत्ता असते ठाऊक आहे का?

**दुर्वास** : मी आहे खंबीर त्याचा विचार करायला! आम्हा गरिबांना हे विलायती विचार नकोत! म्हणे हिंदूंत हिंदूपणा खिळला आहे! नाही तर काय विलायती थेर शिरणार? चल, अजून उभीच?

**मथुरा** : पण बाबा, मी एवढ्या ह्याने घरातून निघाले आणखी आता कशी नाक मुठीत धरून गेले तर लोक काय म्हणतील?

**दुर्वास** : लोक तारीफ करतील तुझी आणि माझी सुद्धा! तेच तुला जड वाटते आहे! पण बायकोच्या जातीला इतका ताठा पाहिजे कशाला? चल.

**वीणा** : मथुराबाई, तिकडे आमच्याबद्दल बोलणार नाही ना?

(ती जाऊ लागतात.)

**मथुरा** : नाही, मुळीच बोलायची नाही. तुम्ही बिनघोर रहा!

(दुर्वास व मथुरा जातात.)

**वसंत** : अरेरे, अगदी हिंदू जिकडे तिकडे! आणखी हजार वर्षे हिंदुस्थानात सुधारणा होत नाही! चल लाडके, आपणही हा तमाशा पाहू!

(जातात. पडदा पडतो.)

## प्रवेश तिसरा

(भूतमहाल. द्रुमन व कमलाकर)

**कमलाकर** : द्रुमन, हे वेड डोक्यातून काढून टाक! नीट दूरवर पाहा.

**द्रुमन** : मला आता काही सुद्धा परवा नाही; मी रागाने अगदी आंधळी झाले आहे-

**कमलाकर** : हे मात्र खरे; नाही तर दुसऱ्यांदा फसून माझ्या जाळ्यात सापडली नसतीस. द्रुमन, माझा सूड घेण्याची कल्पना सोडून दे!

**द्रुमन** : कशाला, दुसऱ्या भोळ्याभाबड्या पोरींचे गळे कापायला? अशी जाऊन साऱ्या जगात तुझ्या नावाचा डांगोरा पिटते! तुझी प्रतिष्ठा मातीला मिळवते! तुला मरेपर्यंत कैदेत कोंडून तुझ्या पापाचे पुरे पुरे प्रायश्चित्त तुला देते!

**कमलाकर** : मूर्ख पोरी, येथे आल्याबरोबर जर तू प्रथम माझ्या दृष्टीस पडली नसतीस तर मात्र कदाचित हे सारे झाले असते; पण तडजोडीच्या गोड गोष्टींनी फसून तू पुन्हा येथे आलीस! आता तू मला कैदेत घालण्याऐवजी मी मात्र तुला कैद केले आहे! द्रुमन, आता मरेपर्यंत तू माझ्या ताब्यात आहेस!

**द्रुमन** : मेल्या राक्षसा, किती पापे करशील अशी? तुझ्या पापांचा पर्वत उंच होता होता अखेर तुझ्यावरच कोसळून पडेल! कर, हवा तसा माझा छळ कर; पण माझा प्राण जाईपर्यंत मी तुझ्या नावाने ओरडत राहणार!

**कमलाकर** : वा, अशाने तुझी अब्रू फारच वाढेल!

**द्रुमन** : माझी नाही तर नाही- जी अब्रू मूळची खोटी तिची कशाला परवा करू? पण बिचाऱ्या मनोरमेवर आलेला खोटा कलंक तरी दूर करीन!

**कमलाकर** : काय? मनोरमेची हकिगत तुला ठाऊक आहे?

**द्रुमन** : हो, हो! तिने स्वत:च मला हे सारे सांगितले; आणि म्हणूनच खवळून मी येथे आले.

**कमलाकर** : अस्सं!- तर तू मनोरमेचे कल्याण करणार! द्रुमन, फळाला टोचणाऱ्या पक्ष्याला अविचाराने दगड मारिला तर त्याने पक्ष्याला तर काही होत नाहीच, पण फळ मात्र उगीच तुटून पडते आणि एखादे वेळी दगड उलटून आपलाच नाश होतो. कदाचित तुझी मला दया आली असती, पण आता मनोरमेचा बंदोबस्त करून-

**द्रुमन** : मेल्या, त्यांचा कसला बंदोबस्त करणार? ती बिचारी माऊली केव्हाच जग सोडून गेली. तूच तिला मारलीस!

**कमलाकर** : ती आपल्या हेक्याने मेली!

**द्रुमन** : आणखी माझे बाळ- किती गोजिरवाणे आणि किती सुंदर होते! मेल्या, त्याला चांगल्या मार्गाला लावीन, त्याची जोपासना करीन, असे गोड बोलून

मला कशी भुरळ पाडलीस; पण राक्षसा, शेवटी तुझ्या कपटामुळे माझ्या हाताने मला त्याची मान मुरगळावी लागली!

**कमलाकर** : (हसत) वा, स्वर्गाच्या मार्गापेक्षा आणखी कोणता चांगला मार्ग काढावयाचा! आपल्या धाडसाला शोभण्याजोगा छावा खरा! इतरांना आयुष्य किती तरी वर्षे कंठीत बसावे लागते! पण त्या हिंमतवान बहाद्दराने क्षणमात्रात आयुष्याच्या एका टोकावरून दुसऱ्या टोकावर उडी टाकली! निधड्या छातीचा खरा! जगता वाचता तर बापाला सुद्धा बाप न म्हणता!

**द्रुमन** : मेल्या, आणखी हे विष कशाला ओततोस? तुला दया-माया काहीच का नाही? त्या पोराचा जीव घेऊन तुझी तृप्ती झाली नाही म्हणून आता माझा जीव घ्यायला पाहतोस!

**कमलाकर** : मुळीच नाही! तुझा जीव घेण्याचे काय कारण? मनोरमा, तू, यांसारख्या माणसांचा मी फार भुकेला आहे.

**द्रुमन** : राक्षसासारखा!

**कमलाकर** : अगदी बरोबर! आपल्या छबकडीला पेटीत कोंडून फिरणाऱ्या राक्षसासारखा मी सुद्धा तुला या घरात कोंडून ठेवून सुद्धा सौंदर्याची-

**द्रुमन** : मेल्या, तुझी जीभ झडून जावो! कल्पान्तापर्यंत रौरवनरकात कुजत पडशील! यमदूत तुझ्यावर आगीची वृष्टी करतील! तुझ्या पापाने भरलेल्या शरीरीचे तुकडे तुकडे-

**कमलाकर** : द्रुमन, वाफेची शक्ती मोठी असली म्हणून तोंडाच्या वाफेने काय होणार? या शिक्षा भयंकर असतील; पण त्यांच्या वर्णनाने काय होणार? या माझ्या अटीप्रमाणे राहण्याला तू तयार नाहीस?

**द्रुमन** : चंडाळा, तुझे शब्द सुद्धा ऐकायला नकोत!

**कमलाकर** : तर मग अन्नपाण्यावाचून या घरात कोंडून पडावे लागेल आणि शेवटी कुत्र्याच्या मौतीने मरावे लागेल!

**द्रुमन** : येथे अशी ओरडून तुझे पाप साऱ्या जगाला सांगेन!

**कमलाकर** : तुझ्या ओरडण्याने काय होणार? या घराच्या भुताटकीबद्दल लोकांत बोलवा आहे, ती तुझ्या आरडाओरडीने दृढ होईल. कोण तुझ्याकडे लक्ष देणार! तितक्यातून वेळ आलीच तर चांदीच्या किल्लीने कोणाच्या तोंडाला कुलूप बसणार नाही? सोनेरी सलामाने कोण खूष होणार नाही?

**द्रुमन** : मेल्या, मनुष्यांनी माझी हाक ऐकली नाही तर निदान देव कोणाच्या तरी मुखी

उभा राहील! सर्व मनुष्यांना निर्माण करणारा तो परमेश्वर तर तुझ्या चांदीसोन्याला भाळणार नाही ना?

**कमलाकर** : परमेश्वर! द्रुमन, परमेश्वराने मनुष्य निर्माण केला नाही; मनुष्यांनीच परमेश्वर निर्माण केला आहे. कमी शक्तीच्या पण जास्त बुद्धीच्या धूर्तांनी, आपल्यापेक्षा जास्त शक्तीच्या पण अज्ञान लोकांपासून त्रास होऊ नये म्हणून त्यांना बिचकविण्यासाठी ईश्वर हे एक बुजगावणे करून ठेवले आहे! मला ईश्वराची मुळीच भीती वाटत नाही!

**द्रुमन** : तर काय, माझाही तू जीव घेणार!

**कमलाकर** : अलबत्! भोवताली पसरलेल्या विश्वाचा मध्य पाहणारा स्वत:च असतो! तू जर माझ्या अब्रूवर उठू लागलीस तर तुलाही मनोरमेच्या मागोमाग पाठवायला काय हरकत आहे? पाहा, नीट विचार कर! आज थोडेसे तरी अन्न ठेविले आहे; पण उद्यापासून तेही मिळणार नाही! असे कुत्र्याच्या मौतीने मरावे लागेल! नाही तर मी सांगेन तेथे दूरदेशी रहावयाला तयार हो! उद्या याच वेळी किंवा रात्री येईन तोपर्यंत आपला कायम विचार करून ठेव!

(दार बंद करून बाहेरून कुलूप लावतो. पडदा पडतो.)

## प्रवेश चवथा

(तात्यासाहेबांचे घर. तोंड झाकून घेतलेले काही दरोडेखोर)

**पहिला दरोडेखोर** : तात्यासाहेबांच्या घरात हे दोन चार घोटाळे झाले नसते तर कमलाकराचा हा बेत यापूर्वीच पार पडला असता. सुशीलेला घरातून पळवून तिला भ्रष्ट करण्यासाठी कमलाकर अगदी फारच उतावीळ झाले आहेत! (वरून एक दोर सुटतो.) हा पाहा, कमलाकराने दोर तर सोडलाच! पण आता पुढे कोण होणार?

**दुसरा** : कमलाकर आल्याखेरीज वर चढून जाणे धोक्याचे आहे! आतला प्रकार काय आहे हे नीट समजले पाहिजे. घरात कोणी जागे असले तर पंचाईत व्हावयाची!

**तिसरा** : पंचाईत कशाची त्यात? सुशीलेच्या तोंडात एखादा बोळा कोंबला आणि हातपाय चांगले बांधून टाकिले की तिची धडपड बंद झालीच! तिला फुलासारखी उचलून नेऊ! त्यातून दुसरे कोणी आलेच तर त्याचाही समाचार घ्यायला कितीसा वेळ लागणार?

(कमलाकर येतो.)

**कमलाकर** : हं, लागा आता कामाला! अगदी वेळ घालवू नका! दोन दिवस घरात सारख्या भानगडी होत असल्यामुळे सुशीलेने आपल्या खोलीला आतून कडी लावून घेतली आहे! म्हणून तिसऱ्या मजल्यावरून तिच्या खिडकीच्या बाजूने हा दोर सोडावा लागला! आता एकाने दोराने वर चढून खोलीची कडी काढावी आणि बाकीच्यांनी घरातून वर जाऊन खोलीत शिरावे!

**दुसरा दरोडेखोर** : पण वर कोण चढून जाणार? आपली छाती होत नाही!

**तिसरा दरोडेखोर** : हट् नामर्दा, हा पाहा मी जातो! चला तुम्ही आतून!

(दोराने चढून जातो.)

**कमलाकर** : शाबास, अगदी आवाज करू नकोस! कडी अगदी सावकाश काढ. चला आता बाकीचे माझ्याबरोबर आत! किती झटपट आणि बिनबोभाट काम कराल म्हणता! याच दाराने परत यायचे. (दोर हलवून) दोर ओढून घे! हं. चला आता! अगदी भिऊ नका!

(ते सर्व आत शिरतात. शेजारच्या खिडकीतून विद्याधर तोंड काढतो.)

**विद्याधर** : (स्वगत) काही तरी घोटाळा चालला आहे खास! आता येथे कुजबुजणे ऐकू आले. हा काही झोपेतला भास नाही! काही का असेना आपण सावध असावे हे ठीक; अथवा तसेही नको! तात्यासाहेब वगैरे मंडळींना जागे करावे हेच श्रेयस्कर! अशा विलक्षण प्रसंगी एकटेच राहणे धोक्याचे आहे! कदाचित सारे लचांड आपल्यावर यावयाचे! हळूच सर्व मंडळींना जमवून आणावे हेच उत्तम.

(जातो; इकडून सुशीलेला बांधलेली अशी घेऊन दरोडेखोर येतात.)

**पहिला दरोडेखोर** : चला, चला, लवकर चला! वेळ घालवू नका! सुशीला भीतीने अगदी बेशुद्ध झाली आहे.

**दुसरा दरोडेखोर** : माझे हातपाय लटपट कापू लागले आहेत!

**तिसरा दरोडेखोर** : भितोस का असा? हा पाहिलास सोटा? चला लौकर.

(विद्याधर, तात्यासाहेब वगैरे मंडळी खिडकीजवळ येतात. विद्याधर खिडकीतून उडी टाकून बाहेर येतो.)

**विद्याधर** : कोण आहे? हरामखोरांनो, थांबा एकदम तेथेच!

**तात्यासाहेब** : हं, हं, विद्याधर, एकदम पुढे जाऊ नका!

(बाहेर येतात. मागाहून कमलाकर, गोकुळ वगैरे येतात.)

**दुसरा दरोडेखोर** : अरे बापरे, पळा पळा, टाका तिला!

**विद्याधर** : तिला? कोण आहे ती? गोकुळ, धावा, दिवा आणा लौकर!

(गोकुळ जातो; विद्याधर दरोडेखोरांवर चालून जातो. त्यांची झटापट होते.)

**विद्याधर** : सोडा, सोडा, तिला; नाही तर प्राणाला मुकाल!

(सुशीलेला सोडवितो; गोकुळ दिवा आणतो; दरोडेखोर पळू लागतात.)

**तिसरा दरोडेखोर** : पण आधी तुझी व्यवस्था करितो!

(विद्याधरला सोटा मारतो)

**विद्याधर** : (पडता पडता) तात्यासाहेब, पाहा कोण आहे ती?

**तात्यासाहेब** : (पाहून) कोण? विद्याधर, सुशीलाबाई ही!

**विद्याधर** : अहाहा! परमेश्वरा, धन्य आहेस तू! तात्यासाहेब, चला लौकर, त्या हरामखोरांना पकडू! नाही तर ते निसटून जातील!

**गोकुळ** : मला वाटते जाऊ द्यावे त्यांना! कदाचित-

**विद्याधर** : नाही हो- चला लौकर!

**तात्यासाहेब** : नका, नका. विद्याधर, तुम्हाला जबर लागले आहे. तुम्ही येथे सुशीलेला सांभाळा! आम्ही जातो त्या हरामखोरांच्या मागे!

(विद्याधर व सुशीलेखेरीज सर्व जातात.)

**विद्याधर** : (सुशीलेला सावध करून) उठा, सुशीलाबाई, परमेश्वराने तुमचे संकट नाहीसे केले आहे! चला.

(तिला उठवू लागतो. सुशीला एकदम उभी राहते.)

**सुशीला** : नका,नका, विद्याधर, तुमच्या हातांचा मला स्पर्श सुद्धा करू नका! मी चांगली सावध आहे! व्हा दूर!

**विद्याधर** : काय? अजून मी दूर होऊ? सुशीले, त्या चांडाळांच्या हातातून ज्या हाताने तुला सोडविले त्या हातांचा स्पर्श नको म्हणतेस? त्या हातापेक्षा हा हात अधिका पापी आहे काय?

**सुशीला** : त्या हातांचे पाप अज्ञात तरी आहे? पण या हातांचे पाप मला चांगले माहीत झाले आहे!

**विद्याधर** : वा! चांगली कृतज्ञता ही! तुमच्यासाठी आपले प्राणही संकटात घालणाराला या कठोर शब्दांचे बक्षीस!

**सुशीला** : तसा प्रसंग आला तर तुमच्या प्राणासाठी मी माझेही प्राण आनंदाने देईन! पण प्राणांच्या मोबदल्यात माझ्या पातिव्रत्याची अपेक्षा करिता? भलत्या बक्षिसाच्या मागणीने तुमचा हा परोपकार नुसता स्वार्थी दिसून येत आहे!

**विद्याधर** : काय? प्राणांच्या मोलाने केलेला हा परोपकार स्वार्थी?

**सुशीला** : हो, हो! दुष्ट पार्श्वभूमीवर सुंदर चित्र सुद्धा भेसूरच दिसते! तुमची मागची वर्तणूक आजच्या परोपकाराची किंमत कवडीमोल ठरविते! हा निव्वळ स्वार्थ आहे!

**विद्याधर** : सुशीले, चंद्राच्या शुभ्र बिंबावर एकच कलंक त्याची शोभा वाढवितो; त्याप्रमाणे माझा त्या वेळचा एकच अपराध इतर निष्कलंक वर्तनांमुळे चांगलाच का बरे वाटू नये?

**सुशीला** : तुमचा मागचा अपराध शुभ्र बिंबावरचा कलंक नाही, पण आताचा परोपकार मात्र काळ्याकुट्ट मेघपटलावरचा विजेचा भयानक चकचकाट आहे. तुमचे काळेकुट्ट अंत:करण मात्र त्याने चांगले दिसून येते! पण हे बोलत बसण्याची ही वेळ नाही. या आजच्या उपकाराबद्दल योग्य रीतीने उतराई होण्यासाठी, तुमच्या पापवृत्तीची तुम्हास क्षमा करण्याबद्दल मी देवाची विनवणी करीन! परमेश्वर तुमचे मन शुद्ध करो! नको, मला तुमचे साह्य आता नको आहे. जाते मी. (जाते.)

**विद्याधर** : (स्वगत) शाबास! सुशीले, शाबास! अशा प्रसंगी सुद्धा आपल्या कर्तव्याला तू विसरत नाहीस! माझ्या साहसाला तू स्वार्थ म्हणालीस! पण अशा अमोल बक्षिसाची हक्काची आशा असल्यावर यापेक्षाही भयंकर साहस कोण करणार नाही? (जयंत येतो.) कोण, जयंत! बाकीची मंडळी कुठे आहेत?

**जयंत** : विद्याधर, माझ्यासारखा दुर्दैवी मीच. सर्व मंडळींची गडबड ऐकून मी जागा झालो आणि त्या चोरांचा तपास करण्यासाठी, मंडळींच्या मागोमाग धावत गेलो! पण तेथेही त्या जगनिंदकाने आपला डाव साधला!

**विद्याधर** : कोणी?

**जयंत** : माझी खात्रीची समजूत आहे की, कमलाकराने! मला यायला थोडासा वेळ झालेला पाहून त्याने संशयाच्या स्वराने तात्यासाहेबांना विचारले की, सर्व मंडळी तर इथेच दिसतात, मग तो दोर आधी कोणी सोडला असावा? आणि इतके बोलून त्या सापाने आपली विषारी नजर माझ्याकडे फिरविली! हलक्या

कानांच्या तात्यासाहेबांनाही-

**विद्याधर** : तसाच संशय आला काय?

**जयंत** : पण त्यांनी तो बोलून दाखविला नाही. रागाच्या स्वराने मला तात्यासाहेबांनी मागेच रहायला सांगितले हे काय थोडे झाले? विद्याधर, या कमलाकराने माझ्याबद्दल मामांचे मन अगदी गढूळ केले आहे! करू का एकदा मामांची चांगली कानउघाडणी?

**विद्याधर** : छे, छे, कानउघाडणीची ही वेळ नव्हे! हलक्या कानांचा मनुष्य एकदा एक बाजूने वाहवू लागला म्हणजे दुसऱ्या बाजूकडे त्याची दृष्टी शुद्ध भावाची राहत नाही. काळ हाच अशा प्रसंगी खरा प्रकार कळवितो! आज तुमचे निकराचे बोलणे त्यांना ढोंगाचे वाटेल!

**जयंत** : तर काय या निंदकाचे वाग्बाण असेच सहन करीत बसावे?

**विद्याधर** : त्याला उपायच नाही! आपण खवळून आपल्या निंदेचे उत्तर देऊ लागलो तर रागाने निघालेल्या आपल्या शब्दांवर जग विश्वास तर ठेवीत नाहीच; पण त्याचा फायदा त्या निंदकाला मात्र मिळतो. आपल्या रागाच्या एका शब्दावर निंदकाला शंभर शब्दांची इमारत उभारता येते. रागाच्या भरात आपल्याला आपल्या वर्तनातल्या बारीकसारीक गोष्टींचे समर्थन करण्याचे भान रहात नाही; आणि कदाचित राहिलेच तरी अनेक बाबतींचे एका वेळीच केलेले समर्थन लोकांना हजरजबाबीपणाचे आणि कादंबरीसारखे वाटते! उलट निंदक त्या त्या गोष्टींना योग्य वेळीच आपल्या मनाचा रंग लावीत असतो आणि त्याच्या शांतवृत्तीमुळे लोकांच्या त्या नजरबंदीवर भरवसाही बसतो.

**जयंत** : पण लोकांनी अशा बातम्यांची चौकशी का करू नये?

**विद्याधर** : जो तो आपल्या भानगडीत दंग असल्यामुळे दुसऱ्याची इतकी चौकशी कोण करीत बसतो? तमासगीर जग केवळ ठळक गोष्टींकडे चालता चालता पहात असते. आपणच संशयाला जागा न देणे हा एकच सुरक्षित मार्ग आहे.

**जयंत** : अरेरे, तुमच्या या साऱ्या कडू सत्याचा मला अक्षरश: अनुभव येत आहे! लीलेच्या बातमीने माझ्या दुर्लौकिकाचा पाया घातला, मनोरमेने काळे करून त्यावर इमारत उभारली; आणि आता ही सुशीलेची बाबत त्यावर कळस चढविणार!

**विद्याधर** : जयंत, लीलेच्या तुमच्या बाबतीत लोकांनी तुमचा संशय का घेऊ नये? अशा बाबतीत शुद्ध प्रकारांवर सुद्धा लोक हेतूची स्थापना करितात. मनोरमेबद्दलच्या तुमच्या तिरस्काराने या अफवेला दुजोरा मिळतो! काही कारण दिसत नसताना

तुम्हाला मनोरमेचा तिटकारा आला तर लोकांना तो खरा कसा वाटेल?

**जयंत** : विद्याधर, त्या तिटकाऱ्याचे कारण लोकांपुढे चवाठ्यावर मांडावे कसे? आणि लोकांना ते खरे वाटावे कसे? विद्याधर, लहानपणापासून स्त्रीबद्दल मी एक मनोरथाचे सुंदर चित्र काढून ठेविले होते! मी मनोवृत्तीचा गुलाम असल्यामुळे म्हणा, किंवा प्रेमसाम्राज्याची काल्पनिक वर्णने वाचल्यामुळे म्हणा, माझ्या कल्पनेतली माझी भावी स्त्री एखाद्या कादंबरीतल्या नायिकेसारखी होती! पण मनोरमेच्या एका क्षणाच्या अनुभवाने त्या सुंदर चित्राचे तुकडे तुकडे केले! तिचे पहिलेच बोलणे माझ्या मनाला विषासारखे वाटून मला तिचा वीट आला! ते बोलणे कशा प्रकारचे होते ते स्त्री-पुरुषांच्या रहस्याच्या किल्ल्यात आहे!

**विद्याधर** : अरेरे! तुमच्यासारख्या आत्यंतिक वृत्तीच्या माणसावर मनोभंगाचा असा भयंकर परिणाम व्हावा हे साहजिक आहे! पण जयंत, लोकमर्यादेसाठी तरी तुम्ही तुमचा तिटकारा झाकून ठेवला पाहिजे होता!

**जयंत** : विद्याधर, आत एक, बाहेर एक असा लपंडाव मला मुळीच साधत नाही! एक वेळ जो मनोभंग झाला तो झाला! पुढे मनोरमेच्या अफाट बोलण्यामुळे माझा तिरस्कार प्रतिक्षणी वाढत जाऊन तिच्या सौंदर्याचीही उत्तरोत्तर मला किळस येऊ लागली! विद्याधर, क्षमा करा! तुम्हाला मी वडील भाऊ समजून मोकळ्या मनाने बोलतो. संसार म्हणजे स्त्रीसुखावर उभारायचा; आणि स्त्रीसुख म्हणजे केवळ पशुवृत्ती नव्हे! लहानपणापासून उराशी बाळगलेली काव्यमय कल्पना ऐन फलप्राप्तीच्या वेळी अशी समूळ नाश पावल्यामुळे मी संसाराविषयी अगदी उदास झालो! वाटेल तशा तोंडाळ स्त्रीला वागवून घेण्याची साधुवृत्ती माझ्यात नाही हे माझे मलाच कळते आहे! आणि या घटकेला तर त्याची इतकी ओकारी आली आहे की, उद्याच्या उद्या मी देशत्याग करणार! नको हा लोकापवाद आता!

**विद्याधर** : छे, छे, असे काही अविचाराने करू नका! लोकापवाद आपोआप निवळेपर्यंत त्याला धैर्याने पाठ दिलीच पाहिजे! तुम्ही निघून गेलात तर तुमच्या निंदकांना चांगलेच फावेल!

**जयंत** : निदान या घरात राहणे तर शक्यच नाही!

**विद्याधर** : ठीक आहे! उद्या परवा दुसरीकडे कुठे तरी जागा पहा! पण एकदम असे त्रागा करून लोकांच्या संशयाला जागा करून देऊ नका! घर सुद्धा एकदम सोडू नका! मला मात्र उद्याच्या उद्या या घराचा आश्रय सोडिला पाहिजे. घरात एकामागून एक घोटाळे चालत असताना माझ्यासारख्या तिऱ्हाइताने इथे

राहणे कोणालाच हितकर व्हायचे नाही. मला कमलाकराने जागा पाहून देण्याचे वचन मागेच दिले आहे!

**जयंत** : तुम्ही सुद्धा जाणार तर! मग मी एकटा या सापाच्या-

**विद्याधर** : जयंत, तुम्ही हा उतावळा स्वभाव हळूहळू सोडीत चला! तोच तुमचा नाश करतो!

**जयंत** : आणखी काय नाश करणार आता! एकवार बिचाऱ्या लीलेची भेट घेऊन तिचे शेवटचे समाधान करितो आणि या शहराचा कायमचा निरोप घेतो! पण चला, आपल्याला या बाबतीबद्दल बोलताना कोणी ऐकले तर आणखी तुमची बेअब्रू व्हावयाची!

**विद्याधर** : शाबास! अशीच सावधगिरी प्रत्येक बाबतीत ठेवा म्हणजे झाले.

## प्रवेश पाचवा

(भूतमहाल. कमलाकर प्रवेश करतो.)

**कमलाकर** : अहाहा! या वर्षाकालीन संध्यासमयाची किती भीषण रमणीय शोभा ही! गगनमार्ग चालण्याच्या श्रमाने उरी फुटल्यामुळे सूर्याने रक्ताची गुळणी टाकून नुकताच प्राण सोडिला आहे; रक्ताने भरलेल्या या त्याच्या मृत्युशय्येवर हा सोसाट्याचा वारा ढगाचा शेणगोळा फिरवित आहे! इकडे मरता मरता सूर्याने मारलेल्या हृदयभेदक भाल्यांनी झालेली इंद्रधनुष्याची जखम अजून पुरतीशी भरून आली नाही म्हणून हे कृष्णमेघ थोडे अश्रू गाळीत आहेत. दक्षिणेकडे एकटाच चमकणारा हा अगस्तीचा तारा मृतशय्येजवळच्या दक्षिणमुखी समईची साक्ष पटवीत आहे! आणि भिजण्याच्या भीतीने घरट्यांकडे धावणारे हे पक्षी मित्राच्या स्मशानयात्रेनंतर स्नान करून ओलेत्याने त्या दिव्याचे दर्शन घेऊन घरोघर जात आहेत असे वाटते! रात्री माजणाऱ्या पापाच्या चिखलाची हा पायाखालचा चिखल प्रस्तावनाच करीत आहे! अशा वेळी मनुष्याची स्वभावसिद्ध पापवासना अनावर होऊन बाहेर येऊ पाहते यात नवल ते काय? वाहवा, झाले! दिवसाची तोंडमिळवणी करताना तात्पुरती आणलेली लज्जेची लाली नाहीशी करून रात्रीने आपले खरे कृष्णस्वरूप दाखवावयास सुरुवात केली आहे! अंधार! भयाण अंधार! या भयाण पार्श्वभूमीवर भयानक मृत्यूचे उग्र चित्रच खेळावयास पाहिजे! या प्रसंगी या भूतमहालाजवळ फिरकण्याची साक्षात भूतांची सुद्धा छाती होणार नाही! बिचारी द्रुमन आत भयाने अगदी मेल्यापेक्षा मेली होऊन गेली असेल!

चला, आता आत जावे म्हणजे मृत्यूच्या चित्राबद्दल माझी कल्पना थोडी तरी खरी झालेली पहावयाला मिळेल! पण हा चोरकंदील काढून मग दरवाजा उघडावा! खवळलेल्या वाघिणीच्या पिंजऱ्यात एकदम उडी घालून उपयोग नाही!

(चोरकंदील काढून त्याच्या प्रकाशात दरवाजाचे कुलूप काढतो व दार उघडतो. तोच दरवाज्यात टांगलेले द्रुमनचे प्रेत दृष्टीस पडते. कमलाकर दारातून त्यावर सारखा प्रकाश पाडून पाहतो.)

**कमलाकर** : (मोठ्याने हसून स्वगत) वाहवा! माझ्या लाडकीने माझी कल्पना अक्षरश: खरी केली म्हणावयाची! द्रुमन, अखेर अशा रीतीने मेलीस ना! किती सुंदर आणि भयानक चित्र हे! या भयानक सौंदर्याला अलिंगन देण्यासाठी हे बाहू कसे पुढे धाव घेतात! पण हिच्या प्रेताच्या आणखी जवळ गेलो तर बिनवारशी गालांच्या चुंबनाचा मोह आवरणार नाही; आणि इतक्यातच अशा रीतीने मृत्यूशी तोंडओळख करून घ्यावयाची माझी तयारी नाही! पण असे दूर राहून काय उपयोग! पुढच्या तजविजीचा विचार केलाच पाहिजे! (तिच्या तोंडाजवळ दिवा नेतो.) चेहेऱ्यावर किती भयंकर निराशा पसरली आहे ही! हं, समजलो! जन्मभर सारखा ज्याचा ध्यास केला तो परमेश्वर खरोखरीच नाही, अशी मरणानंतर खात्री झाल्यामुळे ही आत्म्याची अंतकाळची निराशा तर प्रेतावर पसरली नसेल ना? बोल, द्रुमन, बोल, खरोखरीच ईश्वर नाही ना? बोल, या भेसूर तोंडाने, काळ्या पडलेल्या, पथ्थर झालेल्या जिभेने नास्तिकपणाचा एक तरी शब्द बोल! का तुझ्या सौंदर्याचा अनादर करितो म्हणून रागावलीस? खरेच द्रुमन, गळफासामुळे साकळलेल्या रक्ताने हे एक वेळचे गुलाबी गाल असे काळे पडले नसते तर त्यांच्या चुंबनाचा सन्मान मी खात्रीने केला असता! पण हे काय? या तारवटलेल्या डोळ्यांकडे माझी दृष्टी सारखी का बरे लागत आहे? बोल, द्रुमन, या थिजलेल्या डोळ्यांच्या काचांतून, मरताना तुझ्या मस्तकात भिनलेली कृतान्ताच्या क्रूरतेची चित्रे दाखवून मला काही अमानुष विचार शिकविणार आहेस का? अहाहा! असे असेल तर हा पाहा सारखा तुझ्या डोळ्यांकडे टक लावून पाहतो! (काही वेळ तटस्थ उभा राहतो.) आहे, डोळ्यांत राक्षसी जादू आहे खास! हे पाहा, भयंकर विचारांनी माझ्या डोक्यात थैमान चालविले आहे! बस्स, ठरले, असेच करणार! या लाकडी प्रेताचे तुकडे तुकडे करून आणि हा तोंडाचा पडदा न ओळखता येण्याजोगा छिन्नविछिन्न करून पेटीत भरतो! ती पेटी तात्यासाहेबांच्या घरी मागल्या बागेतल्या विहिरीजवळ ठेववितो. लीलेची शेवटची भेट घेण्यासाठी धडपडणाऱ्या जयंताला गफलतीने उद्या रात्री त्याच वेळी नेमका तेथे आणतो आणि देतो जाऊन सरकारी शिपायांना वर्दी, म्हणजे

झाले! लीलेच्या नावाचे खोटे पत्र जयंताला देण्यासाठी गोकुळची योजना केली म्हणजे घोटाळ्याला तोटा नाही. मनोरमेची डब्यात राहिलेली ही पेटी कोणाला पत्ता लागू नये म्हणून येथे आणिली, तिचाच या कामी उपयोग करावा आणि भरतीला तिचे काही दागिने टाकावे म्हणजे भरपूर पुरावा झाला! याशिवाय जयंताच्या बायकोबद्दल तिटकाऱ्याचीही हवी तितकी मदत होईल. मनोरमा मेली हेही कोणाला ठाऊक नाही आणि द्रुमन मेली हेही कोणाला ठाऊक नाही. त्यामुळे हा हा म्हणता जयंताने मनोरमेला मारिली याबद्दल सर्वांची खात्री होईल! आता या प्रेताचे तुकडे मनोरमेच्या पेटीत भरले, की झाले काम! विद्याधरावर वार करणारा तो पद्माकराचा दरवडेखोर, अगदी उरफाट्या काळजाचा आहे, त्याचा ही पेटी नेण्यात चांगलाच उपयोग होईल! आज ही व्यवस्था करून उद्याच जयंताला लीलेच्या नावाचे एक पत्र पोचवितो. या जगात मूर्खपणाचे मासले असे विलक्षण घडून येतात की, आपल्याला पायापासून उभारणी करीत बसण्याचे कारणच नाही! आपोआप घडत जाणाऱ्या गोष्टींच्या परिणामाचा ओघ आपल्या हिताकडे वळविला म्हणजे झाले! चल द्रुमन, तुझ्या मूर्खपणाचा मी कसा फायदा घेतो पाहा? पण हे तुझ्या हातात काय? पत्र कशाचे बुवा हे (वाचून पाहतो.) वा! मनोरमेची आणि आपली सारी हकिकत लिहिली आहे यात! शाबास! द्रुमन, ही तुझी सावधगिरी अशी जगाच्या दृष्टीआड लपवून टाकितो!

(पत्र पैशाच्या पाकिटात ठेवतो. दार आतून लावून घेतो.)

( पडदा पडतो.)

## प्रवेश सहावा

(विद्याधर व गोकुळ बोलत येतात.)

**गोकुळ** : हे पाहा प्रत्यक्ष बाबासाहेबांचे पत्र! यात त्यांनी लीलाताई आणि सुशीलाताई यांना मनास वाटल्यास खुशाल पुनर्विवाह करण्याची स्पष्ट परवानगी दिलेली आहे. विद्याधर, एका य:कश्चित् बालविधवेने आपले पोर मारिले हे पाहून बाबासाहेबांसारख्या पोक्त मनुष्याने आपले मत बदलावे ही केवढी नामोशीची गोष्ट आहे.

**विद्याधर** : मग यात गैर काय झाले? असा हृदयद्रावक देखावा पाहून कोणाचे मन बदलणार नाही?

**गोकुळ** : असे म्हणण्यात काही अर्थ नाही! अहो, पूर्वीच्या ऋषींनी असा प्रकार पाहिला

असता तर त्यांनी आपले मत बदलले असते का?

**विद्याधर** : त्यांचे मत उलट दृढ झाले असते!

**गोकुळ** : हं, तेच मी म्हणतो-

**विद्याधर** : नाही, तुम्ही भलतेच म्हणत आहा! गोकुळ, पूर्वीचे ऋषी खरोखरीच पुनर्लग्नाला संमती देऊन गेले आहेत. आपल्या ऋषिप्रणीत आर्यधर्माने विधवांना अशी आडकाठी मुळीच ठेवलेली नव्हती. त्यांच्या तेजोमय उदारतेवर ही सारी रूढीची राखुंडी जमली आहे. अशा राक्षसी रूढीला मान देणे म्हणजे जुन्या मतांचा अस्थानी अभिमान केल्यासारखे होईल.

**गोकुळ** : वा! रूढीला मान द्यावयाचा नाही तर काय एखाद्या चवचाल माणसाच्या लहरीला मान द्यावयाचा? सुधारणा म्हणजे साहेबी चार करण्याचा परवाना! शिकलेल्या पण बहकलेल्या माणसाच्या मोकाट कल्पनेची लहर! रूढी समाजाचा जीव आहे!

**विद्याधर** : छे: छे:, मी तर उलट म्हणतो की, रूढी म्हणजे समाजाचा निर्जीवपणा आहे! परिस्थिती बदलली, की समाजबंधनात सुधारणा ही झालीच पाहिजे. मनुष्याला पूर्णत्वाचा पल्ला गाठण्यासाठी नेहमी पुढे चाल करीतच गेले पाहिजे. सर्वतोपरी रूढीच्या बंधनांनी चालणारा- चालणारा कसला जखडलेला- समाज मृतवतच समजला पाहिजे.

**गोकुळ** : छे: छे: छे:! आम्हाला कोणत्याही सुधारणेची गरज नाही. मी तर आजकालच्या एकापेक्षा पूर्वीच्या पूज्याची किंमत जास्त समजतो. सुधारणा करण्याचा आव घालणे म्हणजे पूर्वजांना मूर्ख म्हणण्यापलीकडे काही नाही.

**विद्याधर** : प्रगमनशील पूर्वजांना मूर्ख म्हणण्याइतके पातक दुसरे कोणतेच नाही.

**गोकुळ** : झाले तर; मग त्यांनी पाडून दिलेल्या प्रघाताला नावे ठेवणे म्हणजे त्यांना मूर्ख म्हणण्यासारखेच नाही का?

**विद्याधर** : मुळीच नाही. त्यांचे ते प्रघात त्यांच्या काळाला अनुरूप होते; पण आपण त्यांच्यापुढे जावयाला नको का? प्रतिक्षणी पुढे पाऊल टाकीत आल्यामुळेच आमच्या पूर्वजांना भटक्या राहणीला सोडून, सुस्थिर समाजाची स्थापना करिता आली ना? त्यांना पूर्वज नव्हते का? गोकुळ, अशा सुधारणाप्रिय पूर्वजांचे खरे अनुकरण त्यांच्याप्रमाणे सारखी पुढे चाल करीत गेल्याने होणार, की ठरावीक आणि अयोग्य रूढीने शेकडो वर्षे मिठी मारून बसल्याने होणार?

**गोकुळ** : हे म्हणणे दिसावयाला सयुक्तिक आहे; पण याचे खंडण सहज करता येईल.

कालच मी 'हिंदूधर्म आणि सुधारणा' हे पुस्तक वाचले; त्यात स्पष्ट म्हटले आहे की- मला आता आठवत नाही; आणि ते म्हणणे इथे तितके लागू पण होणार नाही. शिवाय, आपण वादाच्या मुख्य मुद्द्यापासून बरेच घसरलो आहो! मूळ बोलणे कशावरून निघाले बरे? तुम्हाला आठवतो का?

**विद्याधर** : बाबासाहेबांवरून.

**गोकुळ** : हो खरेच; आता आठवले सारे; काय बरे केले त्यांनी?

**विद्याधर** : तात्यासाहेबांना पत्र पाठविले-

**गोकुळ** : खरेच की हो; आणि हे पत्र सुद्धा माझ्या हातात, तरी विसर पडला त्याचा! बाकी हे विसरभोळेपणामुळे नाही झाले! मी आठवीत होतो दोन्ही गोष्टी एकदम! त्या पुस्तकातले म्हणणे आणि आपल्या वादाचा विषय! तेव्हा कसे समजणार ते? हो, दोन दोन डोळे असून एका वेळी माणसाला काही दोन निराळ्या गोष्टी पाहता येत नाहीत; मग एका स्मरणशक्तीने दोन हरपलेल्या गोष्टींचा पाठलाग कसा होणार?

**विद्याधर** : बरे, हे पत्र घेऊन चालला होता कुठे त्याची तरी आठवण आहे ना?

**गोकुळ** : वा! म्हणजे काय झाले! इतका मी विसरभोळा आहे वाटते? हे पत्र लीलाताईजवळ नेऊन द्यायला-पण नाही- मला वाटते हे दुसरे जयंताचे पत्र लीलाताईंना द्यायचे आणि हे बाबासाहेबांचे पत्र कमलाकरांना- अंहं-त ... से न...नव्हे. कमलाकरांचे पत्र जयंतांना द्यायचे- पण कमलाकरांचे पत्र आहे कुठे आधी- हे लीलाताईंनी जयंताला लिहिलेले पत्र कमलाकरांनी जयंताजवळ देण्यासाठी मजजवळ दिले- पण हेच त्यांनी दिले, का तात्यासाहेबांना आलेले हे पत्र लीलाताईंना देण्यासाठी त्यांनी- काय बरे?

**विद्याधर** : गोकुळ, आता हा विचार राहू द्या जरा! डोके स्थिर असताना तुम्हाला एखादी सरळ गोष्ट सुद्धा आठवत नाही आणि आता तर तुमचे डोके या वादाने तापलेले; तशातून बाबा काही सरळ नाही. दोन तीन पत्रे आणि पाच सहा नावे एवढ्यांच्या चक्रव्यूहातून तुम्ही कसले बाहेर पडता!

**गोकुळ** : चला, कमलाकरांनाच भेटून त्याचा निकाल करून घेऊ!

**विद्याधर** : कमलाकरांनाच विचारावयाचे हे तरी नीट लक्षात ठेवा. नाही तर, पुन्हा मी दृष्टीस पडलो तर माझ्यावरच चौकशीचा मारा सुरू कराल!

**गोकुळ** : भलतेच; इतकी साधी गोष्ट सुद्धा विसरतो की काय? चला.

(जातात.)

## प्रवेश सातवा

(डोक्यावर पेटी घेऊन दरोडेखोर व मागाहून हातात द्रुमनचे डोके घेऊन कमलाकर भीतभीत प्रवेश करतात. तात्यासाहेबांच्या घरामागील बाग.)

**कमलाकर** : हं ठेव ती पेटी विहिरीजवळ! अस्से! आता जाऊन सांगितल्याप्रमाणे शिपायांना कोणाकडून तरी सावध करीव! हं, ही घे तुझी मजुरी! एवढ्याशा कामगिरीबद्दल ही शंभर रुपयांची नोट! आता ही गोष्ट कोठे फुटणार नाही ना?

(पाकिटातून घाईने त्याला कागद देतो.)

**दरोडेखोर** : छे: छे: रावसाहेब! आपल्यासारख्यांच्या जिवावर आमच्या साऱ्या उड्या! ही गोष्ट आता यापुढे माझी मला सुद्धा समजणार नाही. पण शंभराचीच नोट आहे ना? नाही तर दहाबिहाची असेल-

**कमलाकर** : जा, जा, शंभराचीच आहे; मी दुसऱ्या नोटा बाळगीतच नाही! चल, पळ, आपल्या कामाला लाग. (एकीकडून दरवडेखोर जातो. दुसरीकडून जयंत येतो.) सावज तर ठरल्याप्रमाणे आले; आता काही वेळाने हा दगड विहिरीत टाकून आपण दूर व्हावे म्हणजे आपोआप स्वारी इकडे येईल!

(पेटीवर द्रुमनचे डोके ठेवितो.)

**जयंत** : (स्वगत) वर मेघांचा गडगडाट चालला आहे; मधून एखादा दुसरा विजेचा चमकारा होतो आहे, क्षणिक उजेडाच्या लकाकीने काळोख दुणावतो आहे; पण या विमनस्क स्थितीत मला या सर्व प्रकाराचे काहीच वाटत नाही! लीलेने बोलविल्याप्रमाणे आलो तर खरा! आता एकदा तिचे शेवटचे समाधान करितो आणि घेतो या कंटाळवाण्या संसाराची रजा! झाला हा संसाराचा अनुभव पुरे झाला! पण अजून लीला का येत नाही? (कमलाकर विहिरीत दगड टाकून निघून जातो; जयंत दचकतो.) पावले वाजून कसला बरे विहिरीकडे आवाज झाला? घाईने येताना अंधारामुळे लीला चुकून विहिरीत तर पडली नाही ना? (विहिरीजवळ जातो.) अंधारामुळे काहीच दिसत नाही; पण ही पेटी कसली? आणि तिच्यावर हे काय? हाताला केस कसले लागताहेत?

(द्रुमनचे डोके उचलतो. शिपाई येऊन त्याला पकडतात.)

**शिपाई** : धावा, धावा, रावसाहेब! घरात चोर शिरला आहे! धावा!

**जयंत** : कोण आहे? अरे, मी चोर नाही!

(घराच्या खिडक्या उघडतात.)

**शिपाई** : चोर नाही तर कोण चोराचा बाप!

(मंडळी आतून पाहतात. लीला, सुशीला वगैरे; तोच वीज चमकते.)

**जयंत** : अरे बापरे! हे काय माझ्या हातात!

**शिपाई** : अरे बापरे! हा तर खून!

**जयंत** : पण केला कोणी?

**शिपाई** : तूच!

**जयंत** : काय मी? हा दुर्दैवा!

(वीज चमकते. पडदा पडतो.)

**अंक तिसरा समाप्त**

## अंक चवथा
# प्रवेश पहिला

(स्थळ- भूतमहाल)

**विद्याधर** : कमलाकराने जागा पाहून दिली खरी, पण ती गावापासून इतकी दूर, की एखाद्या निकडीच्या कामासाठी लौकर गावात जाऊन येईन म्हटले तर सोय नाही! आणि या जयंताच्या खटल्यामुळे सारखे गावात जावे यावे लागते! बाकी आजपर्यंत झालेल्या जबान्यांवरून आणि साक्षीवरून खटल्याचा निकाल काय होणार हे उघड दिसून येतच आहे! कोणी कपटाने पसरून ठेविलेल्या जाळ्यात बिचारा जयंत अचूक सापडला आहे! अशा जिवलग आणि उदार मित्रासाठी काय वाटेल ते करण्याची माझी तयारी आहे! पण उपयोग काय? फिर्यादी पक्षाचा पुरावा इतका भरपूर आहे की, जयंताने मनोरमेचा खून केला असा निकाल पंचांना एकमताने द्यावाच लागेल! मनोरमेच्या प्रेताचे तुकडे पेटीत भरून ती विहिरीत टाकण्यासाठी रात्री जयंत आला कसा हे मोठे नवल आहे! नाही म्हणावे तर तिचे डोके त्याच्या हातात! प्रेत मनोरमेचे नाही म्हणावे तर पेटीत तिचे दागिने, पत्रे वगैरे पुराव्याला हजर! आता खटला बहुतेक संपल्यासारखाच झाला आहे! येऊन जाऊन त्या पत्राबद्दल आमच्या बाजूने गोकुळची तेवढी साक्ष व्हावयाची राहिली आहे! पण तिचा काय उपयोग? ती होऊन न होऊन सारखीच! अरेरे! गरीब बिचारा जयंत फुकट प्राणाला मुकणार! पण या उलाढाली कोणी केल्या? परमेश्वरा, मानवी मतीला कुंठित करणारे हे कोडे सोडवायला तूच अकल्पित दैवी साहाय्य पाठवशील तरच बिच्चारा निरपराधी जयंत सुटणार आहे!

(दरोडेखोर येतो.)

**दरोडेखोर** : राम राम, रावसाहेब! आज इतके दिवस हेलपाटे घालतो आहे, तेव्हा आज आपली गाठ पडते आहे!

**विद्याधर** : कोण रे बाबा तू?

**दरोडेखोर** : मी आपला मानकाप्या दरवडेखोर नव्हे का?

**विद्याधर** : (स्वगत) हरहर, परमेश्वरा, निव्वळ थट्टा मांडली आहेस आमची! मी साह्याची अपेक्षा करताच हे उत्तर पाठविलेस!

**दरोडेखोर** : का, रावसाहेब, अंधारातली ओळख उजेडात पटत नाही वाटतं! आपणच नाही

का त्या दिवशी रात्री ती पेटी मला उजेडात न्यावयाला सांगितली?

**विद्याधर** : (स्वगत) पेटी? खास कमलाकराचे काही कुलंगडे असावे हे! (प्रकट) पेटी? हा हा, ती पेटी म्हणतोस? आले लक्ष्यात. बरे मग, तिचे काय म्हणतोस आता?

**दरोडेखोर** : त्या वेळी आपण मला शंभर रुपयांची नोट दिली-

**विद्याधर** : दिली. मग- पुढे काय?

**दरोडेखोर** : अहो, ती नोट नाही? हा पहा चुकून आपण भलताच कागद मला दिला! हा घ्या आपला कागद आणि-

(विद्याधरास कागद देतो.)

**विद्याधर** : (कागद पाहून चपापतो. स्वगत) काय? मनोरमा अजून जिवंत! परमेश्वरा तुला दोष दिला त्याची क्षमा कर!

**दरोडेखोर** : आहे ना आपलाच कागद?

**विद्याधर** : शंकाच नाही! मी आज किती दिवस त्याच्याच तपासात होतो; शाबास, तू मोठेच काम केलेस.

**दरोडेखोर** : मग आता मला नोट मिळावी एवढाच अर्ज आहे!

**विद्याधर** : (नोट देऊन) या घे एक सोडून दोन! ही एक शंभराची तुझ्या पहिल्या कामाबद्दल; आणि ही दुसरी, हा कागद परत आणून दिल्याबद्दल.

**दरोडेखोर** : वाहवा! रावसाहेब! आपणच आमच्यासारख्या गरिबांचे पशिंदे!

**विद्याधर** : पण माझे अजून तुझ्याशी बरेच काम आहे!

**दरोडेखोर** : आपला गुलामच आहे मी, साहेब!

**विद्याधर** : कोठला आहेस तू?

**दरोडेखोर** : मूळचा राहणारा होय? चोरांच्या आळंदीचा.

**विद्याधर** : नाही; नाही. येथे राहतोस कोठे? तुझा पत्ता पाहिजे!

**दरोडेखोर** : असे म्हणता? मी राहतो वेताळ पेठेत, मोठ्या म्हसोबाच्या समोर आणि खुन्या मुरलीधराच्या उजव्या हाताला! (विद्याधर पत्ता टिपून घेतो.)

**विद्याधर** : नेहमी तुझ्याशी काम पडते; तेव्हा पत्ता उतरून घेतला! नाव काय म्हणालास तुझे?

**दरोडेखोर** : तंट्या मानकाप्या. दिवसा हमेशा घरी सापडावयाचा मी.

**विद्याधर** : बरे जा तू आता! सध्या मी फार कामात आहे!

**दरोडेखोर** : ठीक आहे- आपली गरिबाची ओळख असू द्या एवढेच मागणे आहे.

**विद्याधर** : वा! हे काय विचारतोस? तुझ्यावर तर सारी आमची मदार!

(दरोडेखोर जातो.)

**विद्याधर** : (स्वगत) अहाहा! परमेश्वरा, निरपराध्यांचा तू खरा खरा साह्यकरी आहेस! हा कागद म्हणजे जिवलग मित्राचा प्राण वाचविणारी साक्षात संजीवनीच! याच्या साह्याने जयंत एका क्षणात दोषमुक्त होईल! मुळी खूनच झाला नाही तर अपराध कोठला राहणार? द्रुमनने आत्महत्या केली, तिचे प्रेत कमलाकराने पेटीत भरून त्या विहिरीवर नेले, लीलेला भेटण्यासाठी आलेला जयंत आयताच या हरामखोराच्या जाळ्यात सापडला, आणि मनोरमा घाटपायथ्याच्या दवाखान्यात पडली आहे. द्रुमनने स्पष्ट स्पष्ट लिहून ठेवले आहे सारे! द्रुमन, मरता मरता केवढा उपकार करून गेलीस! कमलाकराबरोबर कशा फसगतीने गेली याचा सुद्धा साफ उलगडा या पत्रात केला आहे! चला, आता कामाला लागले पाहिजे. नुसत्या या पत्राने काम भागावयाचे नाही! मरणोन्मुख झालेली मनोरमा कदाचित मेली तर पुन्हा पंचाईत व्हावयाची! गाडीची वेळ झाली आहे, याच गाडीने निघतो. ती कोणत्या दवाखान्यात आहे हे नक्की कळले असते तर बरे झाले असते. घाटपायथ्याला जातो आणि तिचा तपास करतो! निदान ती मेली असल्यास तिच्या मरणाच्या खऱ्या प्रकाराचा तेथील अधिकाऱ्यांचा दाखला आणतो! गावात जाऊन ही हकिगत सांगावयाला सुद्धा वेळ नाही; वेळ तर घालवून उपयोगी नाही! घाटपायथ्यावरून तात्यासाहेबांना तार करून खटल्याची मुदत वाढविण्याचा अर्ज करायला सांगतो! परमेश्वरा, मी जाईपर्यंत मनोरमेला मात्र जिवंत ठेव म्हणजे झाले.

(जातो. पडदा पडतो.)

## प्रवेश दुसरा

(हातात कागद घेऊन गोकुळ प्रवेश करतो.)

**गोकुळ** : (कागदाकडे पहात काही वाक्ये पुटपुटून) छे: बुवा! या जयंताच्या खटल्याने जीव जेरीस आणला अगदी! आज इतके दिवस ही साक्ष सारखा पाठ करीत आहे; पण चार प्रश्नोत्तरांपलीकडे मजल जात नाही, आणि या वकिलांचा म्हणजे साक्षीदारांवर मोठा कटाक्ष! भारतीय युद्धातल्या सेनापतींची आणि या वकिलांची लढण्याची एक रीत आहे अगदी! म्हणजे मुख्य मालक धर्मदुर्योधनाप्रमाणे रहावयाचे बाजूला आणि खटल्यातल्या या सेनापतींचा साक्षीदारांच्या फौजेवर सारखा हल्ला! फेरतपासणीच्या चक्रव्यूहात एखादा प्रतिपक्षाचा वीर सापडला, की मारे त्याच्यावर दरखास्त, सुनावणी, कैफियत, हुकूमनामा या वाग्बाणांचा मारा सुरू व्हावयाचा! काय हे शब्द! दरखास्त, जातमुचलका, फैसला! बोलताना कसे अवसान भरते अंगात! मला वाटते या साऱ्या शब्दांना एकच अर्थ असावा किंवा एकाही शब्दाला कोठलाच अर्थ नसावा. आज पंधरा दिवस या शब्दांनी अगदी भंडावून सोडिले आहे! स्वप्नात सुद्धा मोठमोठाल्या अक्षरांनी लिहिलेले हेच शब्द दिसतात! वकिलांचे नेहमी कसे होत असेल कोणास ठाऊक? आमच्या समोरच्या वकिलाने जर माझ्यावर या शब्दांचा मारा केला तर मीही पण उलट मारा करणार! त्याने म्हटले 'दरखास्त' की आपण म्हणावे 'कैफियत'! आणि मला सतावून सोडण्यासाठी तो खात्रीने हे विचारणार. वकिलाच्या अंगात पक्षकार संचरला, की तो अगदी बेफाम होतो. परकाया प्रवेशाच्या विद्येवर ज्याचा भरवसा नसेल त्याने वकिलाकडे पहावे! पानी तेरा रंग कैसा? जिसमे मिलावे वैसा! छे:! पण पाण्याचा रंग दुसरा पदार्थ त्यात असेपर्यंत तरी कायम राहतो! वकील खटला संपण्याचीही वाट पहात नाही! आता एकमेकांच्या मानगुटीस बसणारे वकील घटकेने एकमेकांच्या गळ्यात गळा घालून बसतील! वकिलाला फक्त एका परिसाची उरफाटी उपमा शोभेल. परिसाचा स्पर्श होताच लोखंडाचे सोने होते आणि वकिलांच्या स्पर्शाने सोन्याचे लोखंड होते! वकिलाने पक्षकाराला एकदा हाती धरले, की बिचाऱ्याच्या हातातल्या सोन्याच्या सलकड्यांच्या लोखंडी बेड्या बनावयाच्या! वकिलांचा धंदाच असा! हजारो पक्षकारांची घरे बसवावयाची आणि आपले घर उभारावयाचे! लोकांनी बेअब्रू केली, की यांची अब्रू वाढली! मग का पैशाच्या देवघेवीच्या खटल्यात पैसे काढून जसे हे पैसेवाले बनतात, तसे अब्रूनुकसानीच्या खटल्यातून प्रतिवादीने घेतलेली वादीची अब्रू परत भरून देवविताना मध्ये अब्रूची दलाली काढून अब्रूदार होतात कोणास ठाऊक! बरे इतक्या तंट्याबखेड्यांच्या घालमेलीत

जन्म घालविला तरी वकील स्वत: त्यात कधी पडावयाचा नाही! न्यायाच्या बाजारातला हा दलाल स्वत: कब्जेदलाल कधी नसावयाचा! संसारात राहून संसारापासून अलिप्त राहिल्याबद्दल तुकाराम प्रौढी मिरवितो; पण या वकिलांत असे हजारो संसर्गरहित तुकाराम दाखविता येतील! पण जाऊ द्या! या खटल्याच्या दगदगीने मी सुद्धा अर्धामुर्धा वकीलच झालो आहे, तेव्हा पर्यायाने स्वत:चीच नालस्ती करण्यात काय अर्थ? ही साक्ष उद्याला पाठ झालीच पाहिजे! काय करावे? नुसते सवालजवाब आपल्याशी म्हणून उपयोगी नाही. प्रश्न कोणी तरी विचारावयाला पाहिजे होते; म्हणजे उत्तरे द्यावयास ठीक पडले असते! पण कोण मिळणार असे? ती जर या वेळी असती तर किती उपयोगी पडली असती! पण ती कोठली यावयाला येथे या वेळी!

(मथुरा येऊन एकदम त्याचे पाय धरते.)

**गोकुळ** : अरे बापरे! कोण? मथुरा? दरखास्त! कैफियत!

**मथुरा** : हो मीच! मी चुकले! मला क्षमा करा!

**गोकुळ** : (स्वगत) पत्राचा परिणाम झाल्यासारखा दिसतो. (प्रकट) मला नाही खरे वाटत! मथुरे, तू क्षमा मागणार? छे:, ही भुताटकी असली पाहिजे!

**मथुरा** : आता माझा अंत पाहू नका! मी आजपासून आपल्या आज्ञेबाहेर कधी वागणार नाही! हे पाहा बाबांनी पत्र दिले आहे!
(पत्र देते.)

**गोकुळ** : (पत्र वाचून) अस्से! ऊठ, तुझ्या क्षमेचा अर्ज आहे एकूण! मला वाटले की, माझे पाय धरून तू माझा कब्जा करून घेणार! ऊठ!

**मथुरा** : मला क्षमा केल्याखेरीज मी हे पाय सोडणार नाही.

**गोकुळ** : हा क्षमेचा अर्ज आहे! मथुरे, याचा निकाल कायद्याबरहुकूम केला पाहिजे! ऊठ; रहा अर्जदारासारखी समोर उभी! अर्जाची सुनावणी ही झालीच पाहिजे! ऊठ!

(मथुरा उठून दूर उभी राहते.)

**मथुरा** : का बरे उगीच छळ असा हा? क्षमा करावयाची एकदा लौकर.

**गोकुळ** : छे: छे: छे:! अशी कायद्याच्या कामात धांदल उपयोगी नाही! त्यातून हा तर घरातला ताबा मिळविण्याचा दिवाणीतला दावा! यात तर तारखा पुढे सारख्या टाकीतच गेले पाहिजे! दिवाणीच्या दाव्यांत दिरंगाईखेरीज शोभा नाही! एकदा एका गृहस्थाने बायको ताब्यात मिळण्यासाठी दिवाणीत दावा केला; तेव्हा,

तो खटला त्या गृहस्थाच्या हयातीपर्यंत चालून अखेर त्याच्या मुलाच्या नावाने हुकूमनामा झाला!

**मथुरा** : पुरे ही थट्टा! करायची ना क्षमा?

**गोकुळ** : ही नुसती खटल्याची सुनावणी झाली! अजून इंगा तर पुढेच आहे! दरखास्त न् कैफियत न् मुकदमा! बरे, तुझ्यातर्फे वकील कोणता?

**मथुरा** : माझे वकील, माझे न्यायाधीश, सारे आपणच.

**गोकुळ** : वेडी रे वेडी! न्यायाधीशाला कधी वकील होता येईल का? बरे, एकतर्फी निवाडा देऊ! ऐक आता निकाल. अर्जदार मथुरा कोम गोकुळ- अं हं- कोम हलक्या जातींसाठी वापरावयाचा- ब्राह्मणांसाठी काय बरे शब्द आहे?

(आठवण करीत बसतो.)

**मथुरा** : बाई, बाई, शर्थ झाली आता!

**गोकुळ** : ठीक आहे: चूकभूल द्यावी घ्यावी. शब्द आठवला म्हणजे कळवू! हं, अर्जदार मथुरा कोम गोकुळ, तू अर्जात मागितल्याप्रमाणे तुझ्या नावे क्षमेचा हुकूमनामा देण्यात येऊन सरकारात ताबेगहाण पडलेल्या घराचा हक्क तुझ्या नावे नोंदविण्यात येत आहे; परंतु एक महिनाभर सरकारकडे ही मिळकत नजरगहाण राहून तुझ्या वागण्याकडे सरकार सारखे लक्ष देईल! वर्तन कमजास्त दिसले, की मिळकतीवरचा हक्क उडवून तुला माहेरी राहण्याची शिक्षा होईल! आहे कबूल?

**मथुरा** : आहे कबूल! आहे कबूल! पण हे काय भलतेच वेड?

**गोकुळ** : हं, कोर्टाचा अपमान होत आहे हा! वेडे, या जयंताच्या खटल्यासाठी कोर्टात बसून बसून ही किफायत केली आहे. समजलीस? फौजदारी खटल्याची तोंडाला मिठी बसली की, चव बदलण्यासाठी दिवाणीकडे धाव घ्यायची.

**मथुरा** : बिचाऱ्या जयंतावर नसते संकट आले हे!

**गोकुळ** : बरी आठवण केलीस! माझी उद्या साक्ष आहे! तेवढी पाठ म्हणून घे पाहू. मी आताच तुझी आठवण केली! आता तू कोर्ट हो. बैस या खुर्चीवर. हं, लाजू नकोस! ही सारी रंगाची तालीम झालीच पाहिजे! घे हा कागद! चल बैस लौकर.

**मथुरा** : इश्श, हे काय भलतेच!

**गोकुळ** : बैस लौकर, हं, बसते आहेस का पाठवू माहेरी पुन्हा कोर्टाला?

**मथुरा** : हं, ही घ्या बसले!

**गोकुळ** : अस्से; लकडीशिवाय मकडी वळत नाही! या कागदातला एकेक प्रश्न विचार आता!

**मथुरा** : (कागद वाचून) ईश्वरसाक्ष खरे सांगेन, खोटे सांगणार नाही.

**गोकुळ** : ईश्वरसाक्ष खरे सांगेन, खोटे सांगणार नाही. अं:! हा काही प्रश्न नाही! नुसते म्हणा, मम आत्मन: श्रुतिस्मृती यातला हा प्रकार आहे! हं, पुढे.

**मथुरा** : तुमचे नाव काय?

**गोकुळ** : गोकुळ.

**मथुरा** : बापाचे नाव?

**गोकुळ** : वृंदावन.

**मथुरा** : आडनाव?

**गोकुळ** : विसरभोळे.

**मथुरा** : तुमचे वय काय?

**गोकुळ** : वय काय बरे ठरविले आहे? छे:, नाही येत लक्ष्यात! एक अक्षर सांग पाहू!

**मथुरा** : पं-

**गोकुळ** : पंधरा!

**मथुरा** : भलतेच काही तरी! खरे तरी वाटेल कोणाला?

**गोकुळ** : अरे हो, पंचवीस! (घोकतो.) छे:! हे वय दगा देणार! आकडा लक्ष्यात ठेवणे मोठे कठीण! आण पाहू तो कागद. (कागद घेऊन घोकतो.)

**मथुरा** : काही तरी खूण बसवून ठेवावी त्या आकड्याची.

**गोकुळ** : हो, हो, हा प्रश्न आहे पाचवा; तेव्हा पाचा पाचा पंचवीस! प्रश्नसंख्येचा वर्ग केला, की झाले काम! पंचवीस!

**मथुरा** : आणि वकिलाने चवथ्यांदाच हा प्रश्न विचारला तर?

**गोकुळ** : अरेच्चा, खरेच! फट्दिशी चारचोक सोळा होऊन नऊ वर्षांची खोट बसायची! काय करावे बरे?

**मथुरा** : खरेच मोठी पंचाईत आहे ही!

**गोकुळ** : हा, पंच असतात पाच! तेव्हा पाच पंचात हातापायांची बोटे मिळविली की झाले पंचवीस.

**मथुरा** : पण भीतीने घाबरून हातपायच गळाले तर बोटे कोठली आणणार?

**गोकुळ** : आणि डोळ्यांपुढे अंधारी आली तर पंच तरी कोठून दिसणार! इकडूनही अडचण आहे! (कागदाकडे पाहून) हा हा, आठवली अगदी सोपी युक्ती!

**मथुरा** : कोणती ती?

**गोकुळ** : गोकुळ वृंदावन विसरभोळे! माझ्या नावात अक्षरे आहेत बारा! तेव्हा स्वत:च्या नावातल्या अक्षरांना दोन्ही बाजूंच्या दोन वकिलांनी गुणून त्यात एक न्यायाधीश मिळवला, की झाले बारादुणे चोवीस आणि एक पंचवीस!

**मथुरा** : पण न्यायाधीशाकडे पहावयाचा होईल का धीर?

**गोकुळ** : अं! न्यायाधीश नाही तर आरोपी मिळवला! नगास नग असला म्हणजे झाले! बरे, पुढे, सहावा प्रश्न.

(कागद तिला देतो.)

**मथुरा** : तुमचा धंदा काय?

**गोकुळ** : अरे, धंदा कोणता सांगावा? हं! धंदा- वाटेल ती गोष्ट विसरण्याचा!

**मथुरा** : आणि जेवणा-खाण्याची सोय?

**गोकुळ** : तेही विसरलो! पण नाही, हा प्रश्न तुझा आहे! मी फिरून उत्तर देतो की, मी उत्तर देण्याचे नाकारितो! या प्रश्नाला माझी हरकत आहे! अशी सावधगिरी ठेवावी लागते बघितलीस!

**मथुरा** : बरे, ही इतकी सावधगिरी ठेवण्यासारखी साक्ष तरी महत्त्वाची आहे का?

**गोकुळ** : महत्त्वाची? अगं, माझ्या साक्षीवर तर सारी भिस्त आहे आमची! नाही तर जयंताला चार वेळा फाशी जाण्याइतका पुरावा आहे! पण माझ्या शब्दासाठी त्याची सुटका होणार आहे! या खटल्याचा चालक, याचा सूत्रधार, तर मीच आहे! उगीच नाही साक्षीसाठी जिवाचा आटापिटा चालविला इतका! घरात ती कायद्यांच्या पुस्तकांची रास पाहिलीस? वकिलावर ताण झाली आहे माझी!

**मथुरा** : एका खटल्यातल्या साक्षीने वकिलीपर्यंत मजल गेली, मग चार खटल्यांच्या भानगडीने आपण न्यायाधीशच व्हाल! आता आपल्या बाजूला काही वकिलाची जरूर राहिली नसेल?

**गोकुळ** : अरेरे, अगदी विसरलो! आमच्या तर्फेचा विद्याधर वकील कालपासून कोठे गडप झाला आहे, पत्ता नाही; आजपर्यंत खटल्यांतले आरोपी फरारी होत असत; पण वकीलच परागंदा झाल्याचा हा पहिला खटला आहे! त्यामुळे तात्यासाहेब मोठ्या फिकिरीत पडले आहेत आणि सारखे वकिलाच्या शोधात आहेत. मी दोन चार वकिलांकडे नन्नाचा पाढा ऐकून आलो, ते तात्यासाहेबांना सांगावयाचे राहिले आहे! वकील कोणी नाही.

**मथुरा** : मग आपले वसंतराव नाही का चालावयाचे? ते वकीलच आहेत ना!

**गोकुळ** : पण त्यांचा पत्ता आहे कोठे? ते वीणेताईबरोबर कधीच फरारी झाले आहेत.

**मथुरा** : हात्तीच्या. एवढेच ना! त्यांचा पत्ता मी सांगते. ती दोघेही आमच्या बाबांच्या शांतिसदनात आहेत.

**गोकुळ** : काय म्हणतेस? मग आत्ताच्या आता हे तात्यासाहेबांना कळविले पाहिजे. म्हणजे तारेने बोलावल्याबरोबर उद्याच वसंतराव येथे येतील! जा, तू घरातले पाहा आता! मी जाऊन येतो. (ती जाते.) वसंतरावांचा पत्ता सांगितला हे फार नामी झाले! आणि मथुरा ताळ्यावर आली हेही नामी झाले! आता आपला मूळचा विसराळू स्वभाव विसरला पाहिजे. आणि तेवढेच जरा कठीण आहे. एखादी गोष्ट विसरण्याची अडचण मला जन्मात प्रथम भासते काय ती याच वेळी! हिला अगदी कह्यात ठेवले पाहिजे सारखे! हं, याच त्या खुर्च्या! आम्हाला तिने ओढावयाला लावल्या, नाही का? आता घेतो सूड! अगं ए, मथुरे, आलीस का? दरखास्त! कैफियत! (मथुरा येते.) त्या दिवशीच्या त्या खुर्च्या, ने पाहू ओढून आत! चलाव, मुकदमा, हुकूमनामा? काय जोर आहे शब्दात! (मथुरा खुर्ची नेते.) आपण तर पुढे मागे पोरांची नावे सुद्धा हीच ठेवणार! दरखास्त, कैफियत, जप्ती ही मुलींची नावे; आणि मुकदमा, हुकूमनामा, फैसला ही मर्दानी नावे मुलांना! आणि स्वत: मुकत्यार वकील होणार! बस्स, ठरला हा कायम बेत!

(जातो. पडदा पडतो.)

## प्रवेश तिसरा

(कमलाकर प्रवेश करतो.)

**कमलाकर** : काय चमत्कार आहे! जयंताच्या गळ्याभोवती फास बसावयाची वेळ आली तरी या मूर्ख पोरीच्या त्याच्या गळ्याभोवतालच्या मिठ्या सुटत नाहीत. अजून एका दृष्टीने भाग्यवानच म्हणायचा! एकंदर जगात हाच प्रकार दिसून येतो! ज्याला जे नको तेच त्याला मिळावयाचे! तात्यासाहेब, तरी या जयंताला सोडविण्याची खटपट का करीत आहेत कोणाला ठाऊक? विद्याधर मात्र मनुष्य खरा! जयंताच्या वशिल्याने घरात नाचावयाचा यापुढे संभव नाही असे पाहून त्या राजश्रींनी पळता पाय काढला! त्याची या पोरीवर खरोखरीच नजर होती, की नुसता हा माझा तर्क आहे? उंटाची उपजत पाठीची कमान पाहून मांजराला उंट रागावल्याची शंका यावी तशातला माझ्या मनाचा संशय तर नसेल? या वसंताने जयंताचे वकीलपत्र घेतले हे ठीक झाले! या विलायती वेड्याच्या हातून काय होणार?

(तारवाला येतो.)

**कमलाकर** : काय रे? काही तार आहे काय?

**तारवाला** : होय भाऊसाहेब, तात्यासाहेबांच्या नावाची तार आहे.

**कमलाकर** : मग मी सही करून दिली तर चालेल ना?

**तारवाला** : न चालायला काय झाले? नेहमी तर तुम्ही त्यांची तार, पत्रे घेता; ही घ्या.

(तार देतो. कमलाकर सही करून देतो.)

**तारवाला** : रामराम साहेब.

**कमलाकर** : (आश्चर्याने) विद्याधराची तार ही! खटल्याची तहकुबी मागावी म्हणून तात्यासाहेबांना सांगतो आहे हा! का बरे? याला काही पत्ता लागला आहे की काय? आठ दहा दिवस यावयाला सापडत नाही; जरुरीचे काम आहे म्हणतो; ठीक आहे! तार माझ्याच हाती आली हे नशीब म्हणायचे! ही तार आता चालली काळाच्या कबजात! इतकेच नाही, पण आता टपालावर सात-आठ दिवस विशेष नजर ठेवली पाहिजे! चला, खटला चालावयाची वेळ झाली! आज खटल्याचा निकाल, बहुधा जयंताचाच निकाल लागणार!

(जातो. पडदा पडतो.)

## प्रवेश चवथा

(विद्याधर, डॉक्टर, फौजदार, मनोरमा मरणोन्मुख निजली आहे.)

**मनोरमा** : विद्याधरपंत, माझ्या अविचाराने मी त्यांना इतक्या संकटात पाडिले आणि आता स्वत: तर घटकेची सोबतीण होऊन बसली आहे.

**विद्याधर** : मनोरमाबाई, झाल्या गोष्टीला इलाज नाही. अरेरे! तुम्ही घाटपायथ्याच्या दवाखान्यात राहिला असता तर मला तुमचा पत्ता लौकरच लागून जयंताची आणि तुमची दृष्टीभेट तरी झाली असती.

**मनोरमा** : हे काळे तोंड घेऊन त्याच दवाखान्यात कसे राहता आले असते? बाबासाहेब मामंजी दोन दिवसांतच परत दवाखान्यात येणार होते, म्हणून द्रुमनताई गेल्याबरोबर मी पण तेथून निघून या दवाखान्यात आले. आता माझ्याने जास्त बोलवत नाही.

**विद्याधर** : मग काय, डॉक्टरसाहेब, यांना आता येथून हलविणे शक्य नाही म्हणता?

**डॉक्टर** : (हळूच) हा प्रश्न विचारण्याचे कारणच नाही. आज पाच सहा दिवस बाईंची प्रकृती सारखी बिघडत चालली आहे. आज तर आता घटकेचा भरवसा नाही; बहुतेक अर्ध्या तासाच्या आतच-

**मनोरमा** : डॉक्टरसाहेब, आता हळू कशाला बोलता? मरायला मी भीत का आहे?

**विद्याधर** : मग फौजदारसाहेब, आपण यांची ही स्थिती पाहिलीच आहे; त्याबरहुकूम एक दाखला मला लिहून द्या, की जिचा खून झाला ती बाई येथे आहे म्हणून!

**मनोरमा** : आता आहे म्हणून कशाला हवे! विद्याधर, त्यांचे पाप पुरे झाले. त्याबद्दल त्यांनी भोगावयाच्या त्या यातना भोगल्या! त्यासाठीच देवाने मला जन्माला घातली! माझ्यासाठी त्यांच्याजवळ क्षमा मागा! झाले! माझ्याने आता बोलवत नाही. जयंत, क्षमा करा- देवा आले- आता मला ---

(मरते.)

**विद्याधर** : अरेरे! किती भयानक शेवट हा! हा सारा आततायी वृत्तीचा परिणाम!

**फौजदार** : जाऊ द्या; ही खेद करीत बसण्याची वेळ नाही. खटल्याची तुम्ही जरी दहा दिवस तहकुबी मागितली आहे तरी तुम्ही लवकर जावे हे बरे. आमच्याकडला आणि डॉक्टरसाहेबांकडला दाखला घेऊन तुम्ही आताच्या गाडीनेच येथून निघा. खरे की नाही डॉक्टरसाहेब?

**डॉक्टर** : रास्त आहे आपले म्हणणे!त्याचप्रमाणे विशेष पुराव्यासाठी हे प्रेत आम्ही

असेच ठेवतो.

**फौजदार** : प्रेत ठेवण्याची काही जरुरी नाही. येथील चार वजनदार लोकांसमक्ष पंचनामा केला म्हणजे झाले!

**विद्याधर** : हो, तसे करावे तेच बरे. चला, आता त्याच खटपटीला लागू.

## प्रवेश पाचवा

(स्थळ - कारागृह)

**जयंत** : (हातातील पत्राकडे पाहून) एक गोष्ट- लीले- केवळ एकच गोष्ट समजण्यासाठी मी आज इतके दिवस तुझी विनवणी करीत असताना आज या पत्राच्या रूपाने माझे समाधान करीत आहेस! मी अपराधी आहे असे सर्वांचे एकमत झाले तरी लीले, तुझ्या आश्वासनाच्या एका शब्दासरसा मी स्वत:ला धन्य समजेन! लीलेची प्राप्ती करून घेण्यासाठी मी मनोरमेला मारीन काय? मग यापूर्वीच दुसरे लग्न करून घ्यावयाला मला कोणाची हरकत होती? पुरुषांच्याच सुखासाठी अवतरलेल्या आमच्या समाजाने दुसऱ्या लग्नाच्या वेळी माझ्यावर पहिल्याइतकाच उत्साहाने आनंदाच्या अक्षता उधळल्या असत्या; आणखी तिसरे लग्न केले असते- चौथे केले असते- अगदी वेश्यागमन केले असते तरी सुद्धा समाजाने माझे तोंडापुरते अभिनंदन केले असते- मला कृष्णस्वरूप समजूनही माझी अवतारी पुरुषांत सुद्धा गणना केली असती! पण लीले, असल्या अन्यायी सवलतीचा फायदा घ्यावयाची कल्पना माझ्या मनाला तरी शिवली होती का? या एकतर्फी सुटकेने मी कदाचित सुखी- तुझ्याशी पुनर्विवाह करून खात्रीने सुखी झालो असतो. पण, लीले, माझ्या दुसऱ्या लग्नाच्या समारंभाचे चित्र डोळ्यांसमोर उभे राहताच मनोरमेची मूर्ती माझ्यासमोर उभी रहात असे. त्या स्थितीतल्या तिच्या मनाची कल्पना करताना माझे मन विरघळून जात असे. माझ्या सुखाची हानी झाली तशी तिच्या सुखाची हानी झाली आहे, या विचाराने मी भांबावून जात असे; तोच मी, लीले, बाबासाहेबांनी तुला पुनर्विवाहाची मोकळीक देताच तिचा जीव घेईन? - छे: छे:! असा नुसता उडता विचार माझ्या डोक्यात आला असता तर मी आपल्या हाताने माझे डोके उडवून टाकले असते! माझे हृदय कसे आहे याची पुरेपूर साक्ष तुला पटली असूनही, लीले, मी निर्दोष आहे की नाही हे मला कळविण्यासाठी तू हा पत्राचा रस्ता शोधून काढिलास! या पत्रात कदाचित अनिष्ट मत असेल या भीतीमुळे अजून मला ते उघडून पाहण्याचा धीर होत नाही. उद्या न्यायाधीशाच्या तोंडचे निकालाचे शब्द ऐकण्यापेक्षा या पत्रातल्या शब्दांभोवतीच आत्मा

घुटमळत राहिला आहे. पण नाही; मी आता मनाचा पक्का धडा केला आहे. पत्राच्या आरंभीच जर भलत्या कल्पनेचा पूर्वरंग दिसू लागला तर अश्रूंनी पत्राचा पुढचा भाग साफ धुऊन टाकीन, आणि संशयमग्न चित्ताने लीले, तुझा कठोर निवाडा पुरतेपणी ऐकून घेतल्यावाचून उद्या प्राण सोडीन! (पत्र फोडून पाहतो.) काय पाहतो हे मी? अगदी कोरे पत्र! लीले, माझ्या हृदयाप्रमाणेच शून्यवृत्ती झालेल्या या कोऱ्या पत्रावरून मी काय समजू? या कारागृहातल्या या अंधारामुळे ही पुसटलेली अक्षरे दिसत नाहीत? (नीट पाहून) छे: छे:! आता या पत्राचा अर्थ पुरता लक्ष्यात आला! या पत्रावर नुसता अश्रूंचा पाऊस पाडून ठेविला आहे. कारागृहातला काळोख कितीही काळाकुट्ट असला तरी हृदयात असा लख्ख प्रकाश-प्रेमाचा प्रकाश- पडल्यावर ही प्रेमाक्षरे कुठे लपून राहतील? अहाहा! मी निरपराध आहे, अशीच लीले, तुझी खात्री आहे ना? पण आता असल्या शंकेचे कारणच नाही! तुझे माझ्याबद्दल वाईट मत असते तर ते दाखविण्यासाठी हा अश्रूंचा पूर धावत आलाच नसता. पत्र पुढे ठेवून कोणत्या शब्दांनी आपल्या हृदयाचे प्रतिबिंब त्यावर उमटवावे या विचाराने तू क्षणभर गोंधळली असशील, इतक्यात हृदयातल्या या अश्रूंनी पत्रावर उडी टाकून तुला नकळत त्याचे हे निर्मल चित्र रेखाटले असेल. लीले, आजपर्यंत चित्रकारांनी मनुष्याच्या बाह्यांगाचे चित्र काढले असेल, महाकवींनी त्यांच्या जरा पुढे जाऊन मनुष्याच्या हृदयाचे केवळ कल्पनेचे चित्र वेड्यावाकड्या शब्दांनी चिताडले असेल; पण लीले, मर्यादित अर्थाला उजेडात आणण्यासाठी अवतरलेल्या आणि अनुचित उपयोगाने भ्रष्ट झालेल्या शब्दांना दूर झुगारून प्रेमपूर्ण हृदयातून निघालेल्या शुद्ध अश्रूंनी आज तू मात्र हे खरेखुरे हृदयचित्र काढिले आहेस. होऊ दे, लीले, माझ्यावर याहूनही काळ्याकुट्ट आरोपाचा वर्षाव होऊ दे! डोळे मिटून घेऊन, बाहेरच्या जगाला विसरून, या चित्तचित्रावरची ही अश्रूंची अक्षरे, ही मनाची मिताक्षरी, हृदयाच्या डोळ्यांनी वाचीत असताना, जगाची कर्कश कोल्हेकुई कोण ऐकत बसणार! आनंदामुळे द्विगुणित जोराने धडधडणारे हे हृदय जणू काय या प्रेमशब्दांचा प्रतिध्वनीच करीत आहे! परमेश्वरा, उद्या माझ्या आयुष्याचा जर शेवट व्हावयाचा असेल तर हे चराचर जग, हे शरीर सुद्धा मी मोठ्या आनंदाने इथेच टाकीन, पण हा एवढा हृदयलेख- दु:खाच्या दाबाखाली हृदयाचे फूल पिळून काढून निर्मिलेल्या अश्रूंच्या अत्तराने सुवासिक केलेली ही प्रेमपत्रिका मात्र वर नेण्याची मला आज्ञा दे, म्हणजे लीला स्वर्गात येईपर्यंत आत्मानंदाने मी या हृदयवेदाची सारखी पारायणे करीत राहीन! अरेरे! इतके प्रेमळ, इतके शुद्ध हृदय, हृदयापासून हातावर असताना- पण नको, याच विचारामुळे आज या स्थितीत येऊन पडलो आहे! देवा, पवित्र प्रेमाचे असे अपुरतेचे चित्र काढून का बरे थांबलास?

परमेश्वरा, पुढचा जन्म जर असाच असेल, आमच्या धर्मशास्त्राप्रमाणे खरोखरीच आत्म्याची लग्ने लागत असतील आणि त्याप्रमाणे पुढल्या जन्मीही पुन्हा मला मनोरमेचीच जोड मिळायची असेल तर मात्र लीलेला माझ्या आणखी जवळ आण. असे दोन्ही प्रकारचे प्रेम अर्धवट दाखविण्यापेक्षा आम्हा दोघांना एकाच मातेच्या उदरात जन्म दे. सख्ख्या बहीण-भावंडांच्या प्रेमाचा तरी आम्हाला पुरता अनुभव दे आणि एकाच जागी जन्म आणि एकाच जागी मरण देऊन एका शुद्ध प्रेमाचाच आस्वाद घेऊ दे! अशा कोणत्याही शुद्ध, पवित्र आणि निकट प्रेमाने आमची अंत:करणे जोडून टाक, की ज्यापासून ऐहिक सुखाच्या कल्पनेचा सुद्धा उद्‌भव होणार नाही.

## प्रवेश सहावा

(कचेरीचा देखावा. सर्व मंडळी. साक्षीच्या पिंजऱ्यात गोकुळ.)

**शिरस्तेदार** : ईश्वरसाक्ष खरे बोलेन, खोटे बोलणार नाही.

**गोकुळ** : ईश्वरसाक्ष खरे बोलेन, खोटे बोलणार नाही.

**शिरस्तेदार** : तुमचे नाव काय?

**गोकुळ** : गोकुळ.

**शिरस्तेदार** : बापाचे नाव काय?

**गोकुळ** : वृंदावन.

**शिरस्तेदार** : आडनाव?

**गोकुळ** : विसरभोळे

**वकील** : बरे, आता सांगा पाहू, तुमचे वय काय?

**गोकुळ** : (स्वगत) हं; तोच प्रश्न! आता काय करायचे? नावातल्या अक्षरांना दोन्ही वकिलांनी गुणून त्यात न्यायाधीश मिळवावयाचा? हो, असेच! नाही पण, मला वाटते अक्षरांना न्यायाधीशाने गुणून दोन वकील मिळवावयाचे असावे! हं, हेच बरोबर आहे! बारा एके बारा न् दोन चवदा. (प्रकट) चवदा वर्षे!

| | |
|---|---|
| **वकील** | : चवदा वर्षे? तुम्ही शुद्धीवर आहात का? |
| **गोकुळ** | : (स्वगत) चुकलो; वकिलांनीच गुणावयाचे! बारा दुणे चोवीस न् एक पंचवीस (प्रकट) पंचवीस. |
| **वकील** | : पहिल्याने चवदा कशी सांगितली? |
| **गोकुळ** | : पहिल्याने फुकट गेलेली वर्षे जमेस धरली नव्हती. |
| **वकील** | : वा! या हिशेबाने पहिल्याने शून्यच उत्तर द्यायला हवे होते. तुम्ही घाबरला काय? |
| **गोकुळ** | : मी घाबरलो? तो काय म्हणून! मी काही माझ्या बायकोचा खून केला नाही! |
| **वकील** | : तुम्ही आरोपीला ओळखता का? |
| **गोकुळ** | : तुम्ही आपल्या बंधूंना ओळखता का? न्यायाधीशसाहेब या शिरस्तेदारांना ओळखतात का? |
| **वकील** | : माझ्या प्रश्नाचे नीट उत्तर द्या. तुम्ही आरोपीला ओळखता का? |
| **गोकुळ** | : हो; त्यांना ओळखतो आणि आपल्याला पण चांगला ओळखून आहे बरे मी! |
| **वकील** | : जयंताला सोडविण्यासाठी तुम्ही एखादी खोटी शपथ घ्याल का? |
| **गोकुळ** | : अलबत्, का नाही? एक सोडून हजार घेईन! प्रत्यक्ष श्रीकृष्णांनी सुद्धा सांगितले. |
| **वकील** | : ते राहू द्या! हे पत्र माहीत आहे का तुम्हाला? |
| **गोकुळ** | : हो! माहीत आहे! लीलाताईंनी जयंतांना पाठविलेले पत्र हे! |
| **वकील** | : किती वेळा पाहिले आहे तुम्ही हे? |
| **गोकुळ** | : एक वेळा! |
| **वकील** | : जयंताचे बायकोशी पटत नाही हे खरे आहे की नाही? |
| **गोकुळ** | : हे खरे आहे! जयंत बायकोचा अत्यंत तिरस्कार करीत असत. |
| **वकील** | : तुमची बायको तुम्हाला वागवून घेता येत नाही हे खरे आहे ना? |
| **गोकुळ** | : त्याच्याशी तुम्हाला काय करावयाचे आहे? तुम्ही आपली बायको संभाळा- |
| **न्यायाधीश** | : गप्प बसा; ते विचारतात त्याचे उत्तर द्या. |

**गोकुळ** : न्यायमूर्तींना माझी एक विनंती आहे. माझ्या मते आमची घरगुती भांडणे न्यायासनासमोर आणण्याचे काही कारण नाही; असल्या प्रश्नांची उत्तरे आम्ही देणार नाही! नाही तर आम्ही मुळी साक्षच द्यायला तयार नाही!

**न्यायाधीश** : असे कसे चालेल? साक्ष दिलीच पाहिजे! न्यायाला मदत ही प्रत्येकाने केलीच पाहिजे!

**गोकुळ** : हा चांगला न्याय आहे! यांनी आमच्या बायकांच्या वाटेल तशा चौकशा कराव्या आणि आम्ही यांच्या बायकोचे नाव काढिले, की आपण आम्हाला गप्प बसा म्हणून म्हणता! मी जरा तोंडाचा फटकळ आहे- आपण आणि हे वकील लोक नेहमी एक ठिकाणी काम करिता तेव्हा आपला त्यांच्याकडे थोडासा ओढा असणे स्वाभाविक आहे. त्याला कोण गैर म्हणले? (लोक हसतात.) हं साहेब, हशावारी बाबत घालवू नका! आपण न्यायाधीश आहा, असा पक्षपात आपल्याला शोभत नाही! आपल्याला वकील आणि साक्षीदार सारखेच! मीही थोडाबहुत कायदा जाणतो! चार पुस्तके पाहिली-

**न्यायाधीश** : (हसून) काय वेडगळ मनुष्य! (वकिलास) चालू द्या तुमचे सवाल!

**वकील** : तुमचा स्वभाव थोडासा विसराळू आहे की नाही?

**गोकुळ** : असेल, तुम्हाला काय त्याचे? तुम्ही आपले प्रश्न विचारा; उत्तर मिळाले नाही, मग बोला! आमच्या वकिलांनी पढविलेले सारे जबाब सवालावाचून पाठ म्हणून घ्या हवे तर.

**वसंत** : अरे गोकुळ, मी कधी तुला पढवून ठेविला आहे रे?

**गोकुळ** : अरे का बरे वसंतराव? मी नाही प्रतिज्ञेवर खोटे बोलावयाचा!

**वसंत** : (स्वगत) चांगली सोय! आणि हा आमच्यातर्फेचा साक्षीदार!

**वकील** : काय हो, हे पत्र तुम्ही किती वेळा पाहिले आहे?

**गोकुळ** : काय हो, हा प्रश्न किती वेळ विचारणार?

**वकील** : तुम्ही उत्तर द्या आधी.

**गोकुळ** : दोन वेळा.

**वकील** : मघाशी एक वेळ पाहिले म्हणाला, आता दोन वेळा पाहिले म्हणता हे काय?

**गोकुळ** : मघाशी विचारले त्यापूर्वी एक वेळा पाहिले होते, आताच्या विचारण्याला मघाशी पाहिले ती वेळ हिशेबी धरिली पाहिजे! पूर्वीची एक व मघाची एक मिळून दोन!

**वकील** : वसंतराव, झालेल्या प्रश्नोत्तरांवरून तुमच्या साक्षीदाराची नालायकी दिसून येत आहे. या मनुष्याला व्यवहारज्ञान नाही, हा विसरभोळा आहे; त्याची आणखी फेरतपासणी केली तर तुमचे नुकसान होणार! तेव्हा तुमची इच्छा असल्यास त्याची साक्ष काढून घेण्याची मी संधी देतो.

**वसंत** : या संधीबद्दल मी आपला आभारी आहे! न्यायमूर्तींनी असे करण्याचा हूकूम द्यावा.

**न्यायाधीश** : गोकुळ, तुझ्या नालायकीमुळे तुझी साक्ष काढून टाकण्यात येत आहे. तुला बाहेर येण्याची परवानगी आहे.

**गोकुळ** : इतकेही करून मी नालायक! शहाण्याने कोर्टाची पायरी चढू नये म्हणून वाडवडील म्हणत आले ते काही खोटे नाही! (पिंजऱ्यातून बाहेर येतो.)

**वकील** : ही साक्ष होण्यापूर्वी जो पुरावा आला त्यावरून मला काय सांगावयाचे ते मी मघाशी सांगितले आहे! अधिक बोलण्याची माझी इच्छा नाही.

**वसंत** : त्याचप्रमाणे मलाही काही बोलावयाचे नाही. फक्त न्यायमूर्तींनी व पंचांनी आरोपीच्या स्थितीकडे लक्ष द्यावे एवढीच माझी विनंती आहे.

**न्यायाधीश** : पंचांतील सद्गृहस्थ हो, आपल्याला आत जावयाचे आहे काय?

**प्रमुख पंच** : नाही.

**न्यायाधीश** : मग आपले मत काय आहे?

**प्रमुख पंच** : दोषी!

**न्यायाधीश** : आपल्या सर्वांचे एकमत आहे?

**प्रमुख पंच** : होय, सर्वांचे एकमत आहे.

**न्यायाधीश** : आरोपी जयंत, आमच्यापुढे आलेल्या पुराव्यावरून तुझ्यावर खुनाचा आरोप शाबीत होत आहे! पंचांचा निकालही तुझ्याविरुद्ध आहे! तुझ्या बायकोबद्दल तुला अत्यंत तिटकारा होता. तिचा नापत्ता झाल्यानंतर तीन चार दिवसांनी तिच्या प्रेताचे तुकडे विहिरीत टाकताना तुला पुराव्यानिशी शिपायांनी पकडले आहे! पेटीतील दागिन्यांवरून व पत्रावरून आणि लीला व सुशीला यांच्या साक्षीवरून ते प्रेत मनोरमेचेच होते हे सिद्ध होते. तुझी बायको नापत्ता होण्यापूर्वी, लीला व तू यांना अयोग्य रीतीने बोलताना सर्वांनी पाहिल्यावर त्यावरून तुझा व मनोरमेचा मोठा तंटा झाला असे कमलाकराच्या साक्षीवरून सिद्ध झाले आहे. तुझा आणि लीलेचा पत्रव्यवहार होत असे हेही सिद्ध झाले आहे. बाबासाहेबांनी लीलेला पुनर्विवाहाची परवानगी दिलेली

ऐकल्यापासून तुझ्या मनाची चलबिचल होऊ लागली असेही ठरलेच आहे. त्या अर्थी हा खून तू बुद्धिपुरस्सर केलास, याबद्दल मुळीच संशय उरत नाही. अशा अमानुष रीतीने खून करणारावर दया करणे म्हणजे दयेचा दुरुपयोग करण्यासारखे आहे. तुझ्या शिक्षेबद्दल तूच जबाबदार आहेस. ह्याची जबाबदारी परमेश्वराकडे नाही; राजाकडे नाही; मनुष्याकडे नाही! सबब आपली बायको मनोरमा हिचा बुद्धिपुरस्सर खून केल्याचा आरोप तुझ्यावर पूर्णपणे शाबीत होत असल्यामुळे तुला मेरपर्यंत फासावर लटकविण्याची शिक्षा देण्यात येत आहे.

**जयंत** : हा दुर्दैवा!

(न्यायाधीश सही करतात, व टाक मोडून टाकतात. पडदा पडतो.)

## अंक चवथा समाप्त

## अंक पाचवा
# प्रवेश पहिला

(फाशीचा देखावा. सर्व मंडळी.)

**जयंत** : जगावर शेवटची दृष्टी टाकताना आज त्यातली अपूर्व शोभाच दृष्टीस पडत आहे, लीले! पुन्हा हा देखावा मला कधीच पहायला मिळणार नाही ना?

**लीला** : अशीच त्या दीनदयाळू परमेश्वराची इच्छा दिसते; स्वर्गात तरी तो तुम्हाला सुखात ठेवो!

**जयंत** : लीले, स्वर्गाबद्दलची माझी कल्पना क्षणोक्षणी ढासळत चालली आहे. स्वर्गाची प्रत्यक्ष साक्ष अजून कोणाला पटली आहे का? त्यापेक्षा परिचयाने प्रिय झालेली ही पृथ्वी किती तरी हवीशी वाटत आहे. खरोखरीच स्वर्ग असेल का? परमेश्वर असेल का? ही देखता डोळ्या दृष्टीआड होणारी प्रेमाची सृष्टी पुन्हा कल्पनातीत काळी तरी लाभेल का? एक ना दोन, हजारो तर्कांनी आत्मा व्याकुळ झाला आहे; स्वर्गात अप्सरा असतील पण अशी बाळपणाची सोबतीण, संस्कारजन्य प्रेमाची खाण, अशी लीला असेल काय? स्वाभाविक रीतीने मरण येताना मनुष्य बेशुद्ध होतो हे त्याचे केवढे भाग्य! पण अगदी जाणीवपणाने जगाचा निरोप घेताना संशयाच्या भोवऱ्यात सापडून माझी काय स्थिती झाली ही!

**सुशीला** : बाळा जयंता, धीर धर, ही केवळ ईश्वरश्रद्धेची कसोटी आहे. दृढभावाचा भुकेला भगवान कोणालाही अंतर देत नाही. त्याच्यावर दृढविश्वास मात्र ठेव.

**जयंत** : अहाहा! सुशीले, बोल बोल; तुझ्या अमृतवाणीचा या कानास शेवटचा लाभ होऊ दे. यापुढे मानवी शब्दांचा नाद त्यांना पारखा होणार. मृत्यूच्या राज्यातल्या अज्ञात प्रदेशात माझे समाधान कोणती सुशीला करणार? पाहा, लीले, अशीच प्रेमदृष्टीने पाहा. काळ, काही वेळ आपली गती थांबवून माझी भरत आलेली मृत्यूची घटका थोडी तरी लांबणीवर टाक. पण लीले, अशी रडू नकोस, माझे हृदय आता बायकांच्या हृदयापेक्षाही कोमल झाले आहे. तुझ्या डोळ्यांतले पाणी पाहून, हे पाहा, माझेही डोळे पाण्याने भरून येतात आणि त्यामुळे माझा पुढचा मार्ग मला स्पष्ट दिसत नाही. मृत्यूची वेळ दूर असली म्हणजे तात्कालिक निर्भयतेमुळे स्वर्गाच्या गोष्टीवर सहज विश्वास बसतो; पण जसजशी, ती सगळ्या जगाच्या ज्ञानाच्या कसोटीची वेळ जवळ

येते तसतसा विश्वास डळमळू लागतो. नको, लीले, रडू नको! ते अमोलिक अश्रू जपून ठेव. या अभाग्यासाठी असे उधळू नकोस.

**लीला** : रडू नको तर काय करू? आता या जगात मला कोणाचा हो आधार? माझे समाधान कोण हो करील? ही आपली लाडकी लीला दु:खाने गांजली म्हणजे यापुढे अशी कोणाच्या हो गळ्यात पडणार?

(त्याच्या गळ्याला मिठी मारते.)

**जयंत** : इहलोकाचा संबंध सुटल्यावर त्याची लाज तरी कशाला धरू आणि या अखेरच्या वेळी लीले, तुला दूर तरी कशाला लोटून देऊ? आता स्वर्गात हे सुख लाभेल काय? अप्सरांच्या डोळ्यांतून दिव्य तेज लकाकत असेल पण या डोळ्यांच्या आरशांप्रमाणे त्यांच्यात बाळपणाची हजारो चित्रे दिसतील काय? नंदनवनातल्या वायूला या श्वासासारखी हुषारी आणिता येईल काय? या तनुलतेसारखे स्पर्शमुख स्वर्गातली ती कल्पकता कुठून देणार? आणि या एकेक अश्रूची संजीवनशक्ती तर अमृताच्या सागरात सुद्धा सापडणार नाही.

**शिपाई** : बाई दूर व्हा; अगदी काळाच्या दाढेत सापडलेल्या माणसाचा लोभ धरून काय कामाचा!

**सुशीला** : बाबारे, अगदी प्रेताला वारा लागू नये म्हणून त्याच्यावर सुद्धा पांघरूण घालण्याची माया जेथे आवरत नाही तेथे जिवंता माणसाचा लोभ कसा सुटणार?

**जयंत** : लौकर, फारच लौकर, हे सुख सोडावे लागत आहे. आजपर्यंत लोकलज्जेमुळे, पापाच्या ऐहिक कल्पनेमुळे, या सुखाचा कधीच अनुभव घेता आला नाही. आता या घाईच्या एका क्षणात साध्या आयुष्याचे सुख एकदम कसे अनुभवता येणार? दृढ अलिंगनाने या कायेचा चुराडा होईल; हपापलेल्या मुखाच्या श्वासाने हे ओठ करपून जातील आणि तीव्र प्रेमाच्या दृष्टीने हा देह छिन्नविछिन्न होईल!

**लीला** : सावध व्हा, जयंत, सावध व्हा; मी आता तुमची बाळपणची अल्लड लीला नाही; पण समाजाने मानसिक संन्यास दिलेली, प्रेमाच्या शिवेपलीकडे लोटलेली, अशुभमूर्ती बालविधवा आहे!

(त्याच्यापासून दूर होऊ लागते.)

**कमलाकर** : (स्वगत) या हतभाग्याचे हे शेवटचे सुख पाहून सुद्धा अंगाची आग होते आहे. (उघड) तात्यासाहेब, हे कधीच आटोपणार नाही. आपणच पुढे व्हा. सरकारी माणसांची खोटी करणे गुन्हा होईल.

**तात्यासाहेब** : तेही खरेच! जयंता, बाळा चल; सावध हो.

**जयंत** : हो; खरेच; आता सावध झालेच पाहिजे. लीले, दूर हो! त्या दिवशी एक क्षणभर नसत्या कल्पनेला मनात थारा दिला त्याचे हे प्रायश्चित्त भोगतो आहे! आता मरता मरता कशाला हवा हा मोह! लीले, आजन्म तुझ्याशी केवळ बंधुप्रेमाने वागत आलो त्याची आठवण करून आताच्या माझ्या या पवित्र निर्दयतेची क्षमा कर; हा पहा मी तुला शुद्धत्वाच्या कठोरतेने अस्सा दूर लोटून या स्वर्गाच्या मार्गाला लागतो.

( फासावर चढून जातो.)

**लीला** : ताई, हा प्रसंग कसा गं पाहू? नुसत्या कल्पनेनेच मला घेरी येऊ लागत आहे; सारे शरीर लटपट कापत आहे.

**सुशीला** : त्यापेक्षा मन दगडासारखे घट्ट करून तू घरी जा. इथे उभे राहून तरी आपल्याच्याने काय होणार आहे? जा, तिकडे आपली गाडी आहे; गाडीवाल्याला सांग म्हणजे तो तुला घरी घेऊन जाईल. जा.

(लीला रडत रडत जाते.)

**जयंत** : जा, लीले, जा; आता कायमचे डोळे झाकताना अंगावर अजून शहारे येत आहेत. (डोळे अर्धवट मिटून पुन्हा उघडतो.) छे:, पृथ्वीमातेकडे, भोवतालच्या प्रियजनांकडे पाहण्याचा मोह पुन्हा अनावर होत आहे. आजन्मचरित्र एकदम डोळ्यांपुढे येऊन उभे राहते. बस्स, पुरे हा मोह. आता झाकलेले डोळे उघडल्यानंतर काय दृष्टीस पडेल त्याची कल्पना, परमेश्वरा, फक्त तुलाच!

(डोळे मिटून घेतो. घाईने विद्याधर प्रवेश करतो.)

**विद्याधर** : (न्यायाधीशास) थांबा, थांबा, अन्यायाने निरपराध्याला ठार मारू नका. न्यायमूर्तींनी हे दोन दाखले पाहण्याची कृपा करावी. आरोपी जयंत याच्यावर कोणताच आरोप नाही, अशी या दाखल्यांवरून आपली खात्री होईल. मित्रा जयंता, खाली ये तू.

(दाखले देतो.)

**कमलाकर** : (स्वगत) हा काय घोटाळा आहे आणखी? असे आड उभे राहून पहावे काय आहे ते! आणि प्रसंग पाहून पुढे कसे वागावयाचे हे ठरवावे.

(जातो.)

**न्यायाधीश** : तात्यासाहेब, आपल्याला सांगावयाला मोठा आनंद वाटतो की, जयंत हे अगदी निर्दोष आहेत. मनोरमाबाई काल एका भलत्याच गावी दवाखान्यात वारल्या. (शिपायांस) अरे त्यांना उतरवा खाली!

(जयंत खाली उतरतो.)

**तात्यासाहेब** : मग ते प्रेत कोणाचे?

**विद्याधर** : ते द्रुमनचे! तिने आत्महत्या केली; आणि ती मात्र कमलाकरच्या अधमपणामुळे.

**तात्यासाहेब** : म्हणजे हा सर्वच प्रकार विलक्षण आहे!

**विद्याधर** : (पत्र देऊन) हे पत्र पहा, द्रुमनने मरताना लिहून ठेवलेले पत्र! यात एकंदर प्रकार खुलासेवार लिहिला आहे. (न्यायाधीशास) मला वाटते आता खटला पुन्हा चालवीपर्यंत आरोपीला जामिनावर सोडता येईलच!

**न्यायाधीश** : ही गोष्ट सरन्यायाधीशांच्या अधिकारातली आहे. चला, जयंतांना घेऊन आपण कचेरीतच जाऊ.

**तात्यासाहेब** : काय उरफाट्या काळजाचा राक्षस! कमलाकर! अरे, इतक्यात हा येथे होता आणि गेला कुठे?

**विद्याधर** : तो येथे कशाला राहतो?

**तात्यासाहेब** : हे पत्र तुमच्या हाती कसे लागले?

**विद्याधर** : कमलाकराच्याच एका रामोशाने चुकून मला दिले आणि त्यावरून मला सारा पत्ता लागत गेला. ती एकंदर हकिकत फार मोठी आहे. पण तात्यासाहेब, खटल्याची मजल येथपर्यंत आली कशी? तहकुबी मागण्यासाठी मी आपल्याला तार केली होती ना?

**तात्यासाहेब** : मला तार केली होती? मला तर नाही मिळाली-

**विद्याधर** : ती सुद्धा त्या हरामखोराने नापत्ता केली असेल. चला, त्याचाही तपास केला पाहिजे. तात्यासाहेब, आपण न्यायधीशसाहेबांबरोबर कचेरीकडे चला; मी त्या रामोशाला घेऊन येतो आणि साधल्यास तारेबद्दलही चौकशी करितो.

**तात्यासाहेब** : ठीक आहे. चला.

(सर्व जातात. सुशीला जाऊ लागते.)

**विद्याधर** : सुशीले, सुशीले, जरा थांब; आज मी तुला आणखी पुनर्विवाहाबद्दल विनंती करणार आहे!

**सुशीला** : काय? या वेळी?

**विद्याधर** : हो, या वेळी आणि याच जागी! जी जागा जयंताची अमंगल मृत्यूभूमी म्हणून आपल्या स्मरणात राहणार होती तीच आता आपली विवाहभूमी म्हणून लक्षात रहावी अशी माझी इच्छा आहे.

**सुशीला** : या भलत्या विषयाची अशा गडबडीच्या वेळी-

**विद्याधर** : आता गडबडीची वेळ कसली? संकट नाहीसे झाल्यावरही ते फार भयंकर होते म्हणून भिण्यात काय अर्थ? भयंकर स्वप्नाचे जागेपणी भय बाळगणे हे खंबीर मनाचे लक्षण नाही. शिवाय कैदेतून मुक्त झालेल्या जयंताला आपण दोघे विवाहपाशात बद्ध झालेली दिसलो पाहिजे, असा माझा कृतनिश्चय झालेला आहे! सुशीले, अजून तुला माझी दया येत नाही काय? किती दिवस मला तू अशी अलोट दुःखात ठेवणार?

**सुशीला** : विद्याधर, मला असा आग्रह करू नका! तुमच्या विनवणीच्या प्रत्येक शब्दाने मी अधिक अधिक संकटात पडत आहे. त्या दिवशी तुम्ही त्या मांगाच्या हातून मला सोडविले त्या वेळी माझे मन बेभान झाले होते म्हणून रागाच्या आवेशात मी तुम्हाला भलतेच शब्द बोलून गेले; त्याची मला क्षमा करा! आणखी मोठ्या मनाने हा पुनर्विवाहाचा हेतू सोडून द्या!

**विद्याधर** : सुशीले, मी तुझ्या गुणाला योग्य नाही का? का एकदा तुझा उपमर्द केला म्हणून अजून तू माझा तिरस्कार करीत आहेस?

**सुशीला** : नाही, मी तुमचा तिरस्कार करीत नाही! माझ्या खोलीत तुम्ही पाऊल टाकिले तेवढ्या गोष्टीचा चांगला उलगडा करा, म्हणजे जी स्त्री तुमच्याशी लग्न करील तिला मी जन्माची धन्य समजेन!

**विद्याधर** : पण माझा तर तुझ्याबरोबरच जन्म काढण्याचा संकल्प आहे.

**सुशीला** : तो संकल्प कधीच पुरा व्हावयाचा नाही! तुम्ही त्या मांगाच्या हातून मला सोडविले, जयंताला जवळजवळ तुम्हीच जीवदान दिले. तुमचे आम्हा सर्वांवर अगणित उपकार आहेत. पण विद्याधर, तुमच्या पाया पडते. त्या उपकाराच्या मोबदल्यात या देहाची मागणी करू नका! त्याच्यावर माझ्या पतीची सत्ता आहे.

**विद्याधर** : सुशीले, किती दिवस त्या पतीची सत्ता चालणार? पतीच्या लहानशा मूर्तीच्या आठवणीवर सारा जन्म घालविणार काय?

**सुशीला** : विद्याधर, मोठमोठ्या साध्वींची चरित्रे असेच करायला सांगत नाहीत का?

गिरिधरलालाच्या बालमूर्तीच्या चिंतनात मिरादेवीने सारा जन्म घालविला ना?

**विद्याधर** : दंतकथेच्या राज्यातल्या या गोष्टी! सुशीले, गिरिधरलालाने भक्तीसाठी मिरादेवीच्या पदरात उडी टाकली तसा तुझा पती स्वर्गातून तुझ्यासाठी उडी टाकील का?

**सुशीला** : या हतभागिनीसाठी त्या कोमल बालमूर्तीला इतके श्रम? विद्याधर, माझा एवढा अधिकार नाही. त्यांच्या बाललीलांचे चिंतन करावयाचे, कल्पनेच्या वातावरणात वाढणाऱ्या त्यांच्या बालमूर्तीचे प्रेमाने संगोपन करावयाचे एवढाच या त्यांच्या दासीचा अधिकार! त्या सुखाआड येऊ नका!

**विद्याधर** : पण अशा नुसत्या चिंतनात सारा जन्म गेल्यावर या तुझ्या दैवी रूपाचा, लोकोत्तर गुणांचा काय उपयोग? ईश्वरदत्त देणगीचा हा दुरुपयोग नाही का? हे सारे एकदा गेले की कामयचे गेले!

**सुशीला** : एका जन्मानेच झाले का? विद्याधर, माझ्या यत्किंचित् रूपगुणांचे तर राहू द्या; पण जगात स्वैर पसरलेल्या साऱ्या सुंदरतेचा एवढ्यापुरताच का अवतार आहे? अतुल सामर्थ्य खर्च करून ईश्वराने एवढा सुंदर वस्तूंचा पसारा निर्माण केला तो काय क्षणिक वृत्तीने नाश पावण्यासाठी? पुष्पांचा सुवास एकदा वाऱ्यावर वहात दिगंतराला जातो एवढीच त्याची कामगिरी? आकाशातल्या तारका नुसत्या चमकतात हाच त्यांचा उपयोग? पवित्र प्रेमाची भाषणे, निर्दोष हास्याचे मंजुळ ध्वनी, आजाण बालकांचा उत्कट आनंद- आजपर्यंत जे जे क्षणिक, सुंदरतेचे सर्वस्व क्षणमात्र चमकून नाहीसे झाले ते काय कायमचे? या जगात त्यांचा जो तात्पुरता खेळ झाला तेवढ्यासाठीच ईश्वराने अनंत श्रमाने त्यांना निर्माण केले का? विद्याधर, आपले जग म्हणजे सुखदुःख निर्माण करण्याचा ईश्वराचा प्रचंड कारखाना आहे. इथे जे जे चांगले निर्माण होते ते ते एका जागी साठवून परमेश्वर त्याचा स्वर्ग तयार करितो आणि जे जे वाईट त्याची रौरवाकडे रवानगी होते. या जगाच्या कारखान्यात खेळणारा आत्मा म्हणजे ईश्वराची ईच्छाशक्ती. तुम्हाला नाही का असे वाटत? आपण आपल्या पुण्याईने स्वर्गाला गेलो तर या सर्वांचा कायमचा उपभोग घेऊ. अनंत कालाच्या हिशेबात या क्षणमात्र आयुष्याची काय कथा!

**विद्याधर** : सुशीले, ही सारी तुझ्या कल्पनेची भरारी आहे. वस्तुस्थिती कदाचित् याहून फार निराळी असेल. हे वेड आहे, हे सोडून दे!

**सुशीला** : असेल, हे वेड असेल; तरी मला ते फार सुखकारक आहे! ते काढून टाकण्याची माझी इच्छा नाही.

**विद्याधर** : शाबास, गुणिले, शाबास!

**सुशीला** : (चपापून) काय म्हणालात; काय नाव घेतले आता आपण?

**विद्याधर** : गुणिला! का बरे, इतका चपापलीस तू?

**सुशीला** : गुणिला हे नाव माझ्या पतींनी लग्नाच्या गडबडीत मला सांगितले; घाबरत घाबरत चटकन् माझ्या अगदी कानात सांगितले; त्यांनी मोठ्या आवडीने माझे हे गुजराथी नाव ठेविले. माझ्या पतीखेरीज हे नाव दुसऱ्या कोणालाही ठाऊक नव्हते!

**विद्याधर** : गुणिले, तू म्हणतेस ते अगदी अक्षरश: खरे आहे!

**सुशीला** : म्हणजे? (त्याच्याकडे सारखी पहात उभी राहते.)

**विद्याधर** : वाढू दे, तुझी कल्पना स्वैर वाढू दे, आणि कल्पनेच्या राज्यातली तुझ्या पतीची बालमूर्ती पण वाढू दे! हं, आता नीट पाहा, त्या वाढलेल्या दृष्टी तरळू देऊ नकोस, हा पाहा हातावरचा डाग. लाजाहोमात मी आहुति टाकताना चोरट्या दृष्टीने तू सारखी त्याच्याकडे पहात होतीस ना?

**सुशीला** : मला नसती आशा लावून विद्याधर-

**विद्याधर** : विद्याधराचा अवतार मघाशीच संपला; गुणिले, अजून या गुणाकराला ओळखले नाहीस?

(सुशीला त्याला अलिंगन देते.)

**सुशीला** : ओळखले, चांगले ओळखले. पण हे सारे खरे का हा भ्रम?

**विद्याधर** : हे खरे आहे हे तुला पूर्वीच समजायला पाहिजे होते! मी जरी खरोखरी स्वर्गात असतो तरी सुद्धा भूलोकी या स्वर्गसुखासाठी उडी टाकिली असती! सुशीला, तुझ्या पातिव्रत्याच्या शक्तीची तुला कल्पना नाही. मी जर परपुरुष असतो तर, पतिव्रते, त्या दिवशी तुझ्या खोलीत पाऊल टाकताच जळून भस्म झालो असतो!

**सुशीला** : मग ती दुष्ट बातमी-

**विद्याधर** : अगदी खोटी! आपल्या लग्नानंतर मी जाताना, आमच्या लहानग्या जहागिरीच्या आशेने काकांनी मला समुद्रात ढकलून दिले खरे, पण बंदरावर होड्यांची गडबड असल्यामुळे एका नाखव्याच्या मदतीने मला आपला जीव वाचविता आला! पुढे ही सारी हकिकत मी गुप्तपणाने तेथल्या अधिकारीसाहेबांस कळविली. काकांचा स्वभाव दीर्घद्वेषी आणि पाताळयंत्री, त्यामुळे लहानपणी

मला त्यांचे भय वाटले आणि दुसरे एखादे संकट टाळावे म्हणून नाव बदलून साहेबांच्या संमतीने उत्तर हिंदुस्थानात गेलो! साहेबांनी ही सारी गोष्ट गुप्त ठेवून आमच्या उत्पन्नातून मला विद्याभ्यासाचा खर्च मिळण्याची व्यवस्था करून बाकीचे उत्पन्न मी कायद्यात येईपर्यंत सरकारजमा ठेविले! पुढे काकाही वारले. माझा विद्याभ्यास संपला आणि मी इथे आलो!

**सुशीला** : आणि इतके दिवस मला फसविले ना?

**विद्याधर** : त्याची मात्र मला क्षमा कर! तुमच्या घरी चालणाऱ्या फाजील सुधारणेचा तुझ्यावर किती परिणाम झाला आहे त्याची परीक्षा पाहिल्यावाचून- लाडके क्षमा कर- मला स्वीकार करवेना.

**सुशीला** : पण आता तरी स्वीकार-

**विद्याधर** : आता तूच माझा स्वीकार कर! चल, हे सारे वर्तमान तात्यासाहेबांना कळवू आणि जयंताच्या आणि लीलेच्या पुनर्विवाहाचा आनंद द्विगुणित करू. हो, पण आधी एवढे सांग की, तुझे माझ्याबद्दलचे मत एका क्षणात तुला बदलावयाला लावीन असे मी म्हटले होते ते खरे झाले ना?

**सुशीला** : विद्याधरावरचा माझा राग काही कमी व्हायया नाही.

(जातात.)

## प्रवेश दुसरा

(तात्यासाहेबांचे घर. लीला)

**लीला** : माझे आता या जगात काय उरले आहे? जयंतांचा दिव्य आत्मा त्यांच्या नश्वर शरीराला सोडून स्वर्गाला जाऊन खास पोहोचला असेल. इतके दिवस पुनर्विवाहाची आशा- पापावर उभारलेली, मनोरमावहिनींच्या मरणाच्या इच्छेवर उभारलेली पुनर्विवाहाची आशा- अगदी हृदयाच्या हृदयात, कल्पनेच्या पलीकडे, शक्यतेच्या शेवटच्या टोकावर तरी, तर्काच्या डोळ्यांनी दिसत होती! पण तीही गेली! त्यांच्या आत्म्यावाचून जसे त्यांचे शरीर, तसे त्यांच्यावाचून सारे जग मला झाले आहे! माझ्या जगाचा आत्मा आज निघून गेला! गळ्यात फास बसून आत्म्याचा अखेरचा कोंडमारा होताना त्याचे हाल पाहू नयेत म्हणून डोळे फाटून बाहेर आले असतील, त्यांनी रक्ताचे अश्रू ढाळले असतील, त्यांचे दु:ख सांगण्यासाठी जीभ हातभर बाहेर आली असेल.

अनाथ विधवांच्या सुखकल्पनांप्रमाणे त्यांच्या हातापायांनी तिथल्या तिथेच निर्वाणीची धडपड केली असेल, आणि अखेर आत्मतेज तिथून जाताच सर्व शरीर काळेठिक्कर पडले असेल. त्यांचे त्या काळचे भेसूर रूप माझ्यापुढे सारखे उभे रहात आहे. पण नको गं बाई, जगाने आपल्या हाती सापडलेल्या त्यांच्या मूर्तीचे जसे हाल केले तसे मी माझ्या कल्पनासृष्टीतल्या त्यांच्या मूर्तीचे एक क्षणभरही करणार नाही. डोळे फोडून टाकीन, पण ती करुणमूर्ती पाहणार नाही! त्यापेक्षा त्यांच्याबरोबर- मागोमाग जाऊन वर स्वर्गात माझ्या दिव्य जयंतांचे अखंड दर्शन घेत बसेन! पण कोणत्या मार्गाने अगदी लवकर मृत्यू आणिता येईल? मंडळी घरी येण्याच्या पूर्वीच त्यांच्या मागोमाग या जगातून धाव ठोकली पाहिजे! स्वर्गातल्या एखाद्या अप्सरेने त्यांना भुरळ पाडण्यापूर्वीच- पण छे, माझे जयंत इतक्या क्षुद्र मनाचे का आहेत? देवा, प्रणयी जनांना इच्छामरण का बरे दिले नाहीस? उत्कट इच्छेने हेतू पूर्ण होतात असे म्हणतात; मग माझी इच्छा का बरे पूर्ण होत नाही? अहाहा! ते इतके उदार आहेत की, मला इथे टाकून स्वर्गात सुद्धा जाणार नाहीत! शरीराच्या कैदेतून सुटलेला त्यांचा आत्मा या हवेतच माझ्याभोवती घोटाळत असेल! मग या श्वासासरशी या साऱ्या वाऱ्याचे हृदयात साठवण करून ठेवू का? देवा, किती अनुदार तू! मला मरणाची सुद्धा शिक्षा देत नाहीस ना? पण ही पाहा, अशी मी इच्छेच्या एकाग्रतेने प्राण सोडणार.

(स्तब्ध उभी राहते, कमलाकर घाईने येतो.)

**कमलाकर** : (स्वगत) अंत:करणात पेट घेऊन आतल्या आत भडकणाऱ्या सूडाच्या नि:श्वासांनी या वातावरणाला अजून आग कशी लागत नाही? द्वेषाने भरलेल्या या दृष्टीपाताने ही भूमी फाटून अगदी दुभंग का होत नाही? आणि आकाश तुटून खाली का कोसळत नाही? माझ्या पराभवाची सारखी परमावधी होत आहे. त्या दिवशी रात्री चुकून ते द्रुमनचे पत्र त्या रामोशाच्या हाती पडले आणि त्याच्या हातून विद्याधराला मिळून सारा घोटाळा झाला! विद्याधराला ती जागा दिली आणि तिथे तो दरोडेखोर ते पत्र बदलण्यासाठी येऊन असा प्रकार झाला असावा! जयंत दोषमुक्त झाला, मनोरमा मेली. आता लीलेचा आणि जयंताचा पुनर्विवाह होणार आणि तो आजन्म सुख भोगणार! विद्याधर हाच सुशीलेचा पती ठरला! सारे सुखी होणार! पण हे सारे मला कसे सहन होणार! ज्याच्या डोळ्यांना चंद्रिकेचा प्रकाश पाहवत नाही, टवटवीत फुले पाहवत नाहीत, ज्याला कोणाच्याही सुखाची कल्पना सहन होत नाही, त्याने स्वत:च्या भयाण निराशेवर उभारलेले, आपल्या लहानपणापासूनच्या वैऱ्याचे सुख कसे पहावे? मी तेथून इतक्या वेगाने धावत आलो- पण मार्गावर तरंगणाऱ्या अणूरेणूहो, माझ्या हृदयातल्या श्वासाशी

तुमची मिळणी झाल्यामुळे तुम्ही साक्ष आहा की, मी केवळ प्राणाच्या भयाने पळालो नाही, तर अजून जयंताचा सूड घेण्यासाठी पळालो आहे. हा सूड घेतला नाही तर मेल्यावरही माझा प्राण जाणार नाही. भूतयोनि अजून उत्पन्न झाली नसली तर यापुढे माझ्या जीवशक्तीच्या चिकाटीमुळे तरी खास होईल. (पाहून) काय? लीला? ही इथे एकटी कशी? करू हिला अशीच ठार? म्हणजे झाले जयंताच्या सुखाचे मातेरे! मग मी फाशी गेलो तरी बेहत्तर! बस्स, हाच बेत ठरला! घरातली माणसे अजून आपल्या आनंदात मग्न आहेत तोच हे फूल चिरडून टाकावे! (प्रकट) लीले, लीलावती!

**लीला** : कोण? कमलाकर? गेलाना हो जयंतांचा आत्मा आपल्याला सोडून?

**कमलाकर** : (स्वगत) अस्से! जयंत मेला अशी हिची कल्पना आहे काय? ठीक! पण हा काय चमत्कार? ही अजून मरत कशी नाही? नुसत्या विषारी श्वासाने फुले कोमेजून जातील, ज्वालामय दृष्टीने तारका जळून त्यांचा काळोखाचा कोळसा होईल, ही कल्पना खोटी ठरू पाहते!

**लीला** : कमलाकर, का हो बोलत नाही? आता कशाला कचरता? वाटेल ती कठोर बातमी ऐकायला मी आता तयार आहे! बोला, झाला ना त्यांचा शेवट? नका सांगू, तुमच्या तोंडावर ती वार्ता स्पष्ट लिहिलेली दिसते.

**कमलाकर** : लीलाताई, काय सांगू? अखेर जयंत आपल्याला सोडून गेलेच.

**लीला** : त्यात विशेष काय आहे? कमलाकर, माझा सुद्धा निश्चय ठरलेला आहे! ज्या जगात जयंतांचा वास नाही त्यात राहून मला काय करावयाचे आहे? मी पण माझ्या आयुष्याचा शेवट करणार!

**कमलाकर** : अहाहा! लीले, धन्य आहे तुझ्या प्रेमाची! खऱ्या प्रणयिनीप्रमाणे बोललीस तू! असे तीव्र प्रेमाचे उद्गार या भरतभूमीत पूर्वी एकदा मात्र ऐकू येत होते. प्रियजनांच्या मृत्यूनंतर मागे रहाते ते कशाचे प्रेमळ हृदय?

**लीला** : होय ना? मला सुद्धा असेच वाटते. आत्महत्येचा माझा विचार तुम्हाला आवडला ना?

**कमलाकर** : नुसता आवडला? माझ्या विचाराशी पुरेपूर जमला!

**लीला** : म्हणजे तुम्हीही आत्महत्या करणार की काय?

**कमलाकर** : यात काय शंका? एवढ्यासाठी तर सर्वांच्या आधी धावत आलो. मोहात गुरफटलेली आप्तमंडळी आपल्याला अडथळा करील, आणि मग जयंतासारखा मित्र गेल्यावर या शून्य जगात आपल्याला रहावे लागणार,

म्हणून तर मी सर्वांची नजर चुकवून इकडे आलो.

**लीला** : अहाहा! कमलाकर, धन्य आहे तुमची!

**कमलाकर** : यात धन्य कशाची? जयंतासाठी कोण मरणार नाही? हे पहा, मी तेवढ्यासाठी जालीम विष सुद्धा आणून ठेविले आहे. हे इतके जालीम आहे की, एकदा पोटात गेले म्हणजे कोणताही उतारा त्यावर चालत नाही.

**लीला** : तर मग कमलाकर, तुमच्या पाया पडते. ते विष- त्यांची भेट घडविणारे ते अमृत- मला द्या.

**कमलाकर** : काय तुम्हाला हे विष देऊ? आणि मी?

**लीला** : तुम्ही पुरुष आहात, तुम्हाला पुन्हा मिळविता येईल. द्या हो, घालाच एवढी भिक्षा.

**कमलाकर** : तुमची विनवणी ऐकून यमाला सुद्धा दया येईल, मग मी तर काय मनुष्यच आहे! घ्या हे. मी दुसरे मिळवीन.

**लीला** : (विष हाती घेऊन) नेईल ना हे मला जयंतांच्या पायांजवळ? अहाहा, धन्य धन्य मी!

(विष घेते.)

**कमलाकर** : (स्वगत) अहाहा! झाले माझे कर्तव्य. आता सुटलो तरी चालेल किंवा सापडलो तरी चालेल. (प्रकट) सगळे घेतलेस?

**लीला** : हो; आता होईल ना माझे काम?

**कमलाकर** : निखालस! अविचारी लीले, ऐक! जयंत जिवंत आहे, त्याच्यावरचा आरोप दूर झाला, अर्ध्या घटकेत तो येथे येईल. तिकडे मनोरमा मेली. तुमच्या दोघांच्या पुनर्विवाहाला आता कोणतीच आडकाठी नव्हती. पण तशी ईश्वराची- नाही, तशी माझी इच्छा नव्हती! म्हणून तुमच्या प्रेमामृतात मी हे प्रत्यक्ष विष कालविले आहे. बोल, लीले, बोल. पण आता तू कशाची बोलतेस? तुझे डोळे या विषाच्या प्रभावाने तारवटत चालले आहेत. लीले, अशा भयाण सौंदर्याकडे पाहण्याची मला सवय आहे!

**लीला** : पण आता तरी घेतलास ना सूड? मग उगीच का उभा आहेस माझ्यापुढे आपले तोंड घेऊन?

**कमलाकर** : तुझ्या सौंदर्याचे मरण पहावयाला! क्षणोक्षणी तुझे सौंदर्य भयंकर निराशेत सारखे विरत चालले आहे. शुक्लाष्टमीची रम्य चंद्रिका रात्रीच्या ऐन भरात

चंद्राच्या मृत्यूमुळे काळ्याकुट्ट काळोखात विरघळून जात असते, त्याप्रमाणे तुझ्या आत्म्याची चंद्रिका- शरीरावर पसरलेली ही जिवंत शोभा आत्म्याचा लय होताना हा हा म्हणता मृत्यूच्या काळोखात- प्रेताच्या भयाणपणात विरून जाईल! आणि मग या हाताने, नीट ऐक- द्रुमनच्या काळवंडलेल्या रक्ताने रंगलेल्या हाताने, मनोरमेच्या संसाराची होळी करताना तिच्या शिव्याशापांच्या आगीने करपून कोळसा झालेल्या या हाताने, द्रुमनच्या पोराच्या मुक्या किंकाळ्यांच्या प्रतिध्वनीने दुमदुमलेल्या या हाताने, तुझ्या या जिवंत प्रेताला असे धरून तुझ्या ओठावर उरलेल्या विषाचा- त्या अधरविषाचा आस्वाद घेईन, आणि मग येथून, त्या जगातूनही बाहेर जाईन! लीले, द्रुमन अशीच आत्महत्या करून मेली आणि तिच्या प्रेताकडे पाहताना मला अशीच मेलेल्या चुंबनाची इच्छा झाली होती; पण त्या वेळी तिचे ओठ साकळलेल्या रक्ताने काळे पडले होते आणि माझे ओठ आशेच्या जिवंतपणाने स्फुरत होते. पण आज तुझे ओठ जसे विषाने काळे पडत आहेत तसे माझे ओठही क्रूरपणाच्या काळिम्याने रंगले आहेत. त्यांची विषारी चुंबनाची आशा आज पूर्ण करीन. लवकर जयंत येथे येईल आणि तुझ्या ओठांजवळ आपल्या ओठांनी मेलेल्या प्रेमाची मुकी गाणी गाईल; त्या वेळी त्याच्यासाठी तुझ्या ओठांवरच्या विषात माझ्या सुडाची भर घालून ठेवून नंतर तो नेत्रोत्सव पाहता पाहता मोठ्या आनंदाने मी आपले डोळे मिटीन!

**लीला** : कमलाकर, आता उगाच कशाला बोलता? माझ्या मनावर त्या बोलण्याचा परिणाम होण्याची वेळ निघून गेली आहे! इहलोकच्या सुखाची मी मुळीच पर्वा करीत नाही! हे सुख किती झाले तरी चंचल; आज जरी मिळाले असते तरी उद्या खास नाहीसे झाले असते! माझी दृष्टी, माझी आशा आता स्वर्गातल्या सुखाकडे लागली आहे! आज ना उद्या जयंत तिथेच येतील आणि मग आम्ही जगन्नाथाच्या कृपादृष्टीच्या अक्षय्य किरणात अनंत सुखाचा उपभोग घेऊ! तिथे तर तुमचे विष बाधणार नाही ना?

**कमलाकर** : लीले, कालनिद्रेतले हे तुला स्वप्न पडायला लागले आहे! अहाहा! हा पहा जयंत पण आलाच! (हातात फुलांची माळ घेऊन जयंत येतो.) त्याला तरी माझा सूड चांगलाच मानवेल! लीले, बाळपणी तुम्ही दोघे ज्या दृष्टीने माझ्याकडे पहात होता त्या दृष्टीने मी आज तुमच्याकडे पाहणार आहे.

**जयंत** : आनंदी आनंद गडे! इकडे तिकडे चहूकडे!

**लीला** : अहाहा! आनंदी आनंद गडे! इकडे तिकडे चहूकडे!

**कमलाकर** : खरोखर, आनंदी आनंद गडे! इकडे तिकडे चहूकडे!

**जयंत** : लीले, आपल्या बालकवींच्या 'आनंदी आनंदाचे' खरे रहस्य मला आज कळत आहे! मी आज ब्रह्मानंदात आहे! लीले, जे सुख कायमचे नाहीसे झाले म्हणून वाटत होते त्याचा खराखुरा आरंभ मात्र झाला आहे! लीले, माझ्यावरचा नसता अपराध दूर झाला! सुशीलाताईंचे भाग्य पुन्हा उदयाला आले! विद्याधर हेच गुणाकर! त्यांचा अंत मुळी झालाच नव्हता! आणखी, लीले, आपल्या पुनर्विवाहाला बाबासाहेब सहानुभूती देत आहेत!

**कमलाकर** : पुनर्विवाह आता पुनर्जन्मी!

**जयंत** : कोण कमलाकर? जा; इथून लौकर बाहेर निघून जा. सरकारचे शिपाई तुला धरण्यासाठी तपासात आहेत! पण मी ब्रह्मानंदात बुडालो आहे आणि माझ्या उत्कट आनंदाच्या वेळी दुसऱ्याला दु:ख व्हावे ही कल्पना सुद्धा मला सहन होत नाही! जा. पळ, कमलाकर आपले प्राण वाचीव! माझ्या आनंदाचा उत्कट प्रकाश, लीलेची लावण्यचंद्रिका आणि तुझ्या कृष्णकर्माचा दाट काळोख ही सारी एकाच जागी, एकाच वेळी शोभत नाहीत! लीले, या कमलाकराचे अपराध तुला माहीत नाहीत; पण ते कळण्यापूर्वीच तू त्याला क्षमा कर! हा पाहा सुंदर फुलांचा झेला! याच्याच वासाने मी वेडा झालो आहे! हा मी तुला अर्पण करणार आहे. याच्या वासाने- पुन्हा फुललेल्या प्रेमाच्या या वासाने तू गुंग होशील, माझ्यासारखी वेडी होशील! पण लीले, तू बोलत का नाहीस?

**कमलाकर** : ती काय बोलणार! जयंता, असा बेफाम होऊ नकोस! माझ्यासारखा जिवलग मित्र जिवंत असताना तो तुला आनंदाचे वेड कसे लागू देईल? दु:खाचा तुला चांगलाच अनुभव आहे आणि तोच मी यापुढे तुझ्या कपाळी कायमचा लिहून ठेविला आहे.

**जयंत** : अरेरे! मला तुझी दया येते! पण बोल, कमलाकर, तुला वाटेल ते बोल. मी जसा प्रेमाच्या ब्रह्मानंदात वेडा झालो आहे तसे तुला तरी निराशेच्या तीव्रतेने वेड लावल्यावाचून कसे राहील? तुझ्या बोलण्याचे मला काहीच वाटत नाही.

**कमलाकर** : अरेरे! जयंत, माझे योगसाधन अजून पूर्ण झाले नाही त्याला माझा नाइलाज आहे! माझ्या कृतीची शक्ती अजून माझ्या वाणीत, माझ्या दृष्टीत भिनली नाही! अजून माझ्या नुसत्या रागाने तुझे हृदय फाटून जात नाही! दृष्टीने तुझ्या हातातली फुले कोमेजून जात नाहीत; पण कृतीने मात्र तुझ्या हृदयातले नाजूक फूल- तुझी-लीला-अगदी करपून, पार जाळून टाकिली आहे! तुझ्या मरणाची बातमी कानी पडू नये म्हणून घाईने लीला इकडे निघून आली, नंतर मी इथे

आलो; लीलेच्या गैरसमजाचा फायदा घेऊन मी तिला हे विष घातले आहे; या विषाला कसलाही उतारा चालत नाही! ऐकलेस हे? आता सोड आपल्या आनंदाचे वेड!

**जयंत** : लीले, काय ऐकतो हे मी?

**लीला** : अगदी सत्य; विषापेक्षाही कडू सत्य!

**जयंत** : हाय! लीले! काय केलेस हे? कमलाकर, तुझ्या राक्षसी वृत्तीचा अपमान केला त्याची क्षमा कर! तुझ्या वाणीने खरोखरीच माझं हृदय फाटून गेले आहे. तुझ्या दृष्टीने ही फुले खरोखर एका क्षणात करपून गेली आहेत. त्यांच्यात आता फूलपण राहिले आहे कुठे? लीले, लीले, लाडके लीले, काय केलेसे हे? (तिच्या गळ्याला मिठी मारतो.)

**कमलाकर** : बस्स! झाले माझे काम! आता माझा पराक्रम सुशीलेला- त्या दुसऱ्या मानी पोरीला- कळवितो! आणि मग- मग काय होईल ते होवो.

(जातो. वसंत घाईने प्रवेश करतो.)

**जयंत** : वसंता, घात! सर्वस्वी घात झाला रे! धाव, आधी बाबासाहेबांना घेऊन ये! लीलेने हे भयंकर विष घेतले आहे!

**वसंत** : (पुडीचा कागद पाहून) आणि तेही हे विष!

**जयंत** : जा तू आधी! बाबासाहेबांना घेऊन ये! धाव.
(वसंत जातो.)

**लीला** : जयंत, काय हे? यात रडण्याचे काय बरे कारण आहे! इहलोकच्या कृत्रिम ताटातुटीने हृदयाचा प्रेममय ऋणानुबंध कामयचा का तुटणार आहे? दोन दिवस धीर धरा! क्षणिक सुख गेले म्हणून काय झाले? ही पाहा विषाच्या जोराने आतल्या आत माझी दृष्टी ओढत चालली आहे, दृश्यसृष्टी आकुंचित दिसून अदृश्य सृष्टीचे वैभव दिसावयाला लागले आहे! उठा, अनंत सुख, अनंत प्रेम, अनंत ऐक्य, मिळवायची आशा धरा.

**जयंत** : प्रणयसृष्टी, माझी प्रणयसृष्टी जळून खाक झाली! लीले, भेट, मला कडकडून भेट; इतकी कडकडून भेट, की देहाच्या स्पर्शाबरोबर त्यातल्या विषाच्या लहरी माझ्याही देहात भिनू लागतील! लीले, माझे सारे शरीर जड झाले आहे. शरीरातले अणुरेणु जागच्या जागी खिळून एकाची वृत्ती दुसऱ्याला कळत नाही. परमेश्वरा, राक्षसी परमेश्वरा, सुखदु:खाचा काय खेळ मांडला आहेस हा! चल, लीले, चल, मी पण तुझ्याबरोबर येतो! या पापी जगाचा संग

सोडून आपण केवळ प्रेमाचे देह धारण करून एखाद्या कळीच्या हृदयात लपून बसू; प्रेममय काव्यबंधाने तिचे तोंड कायमचे बंद करून टाकू; आणि अनंत काळपर्यंत त्या कलिकेच्या गर्भातल्या परागरेणूंच्या सृष्टीत, या रेणूवरून त्या रेणूवर सारखा प्रेमाचा लपंडाव खेळत बसू! लीले, त्या कलिकेच्या सुगंधी ब्रह्मांडात घटकेत एका रेणूच्या आडपडद्याने सुखमय विरहाचे सुख भोगू. त्या स्थितीत या बाहेरच्या जगात खेळणारा वारा सुद्धा आत येताना कलिकेच्या कोमलपणातून गाळून शुद्ध करून घेता येईल!

**लीला** : नाही, लीले, परमेश्वर प्रेममय नाही! नको, त्याच्या सृष्टीतली कलिका नको, त्याचा स्वर्गलोकही नको! लीले, मघाशी फासावर चढताना मी मरणाला भीत होतो; पण आता मला प्रेमाचे विलक्षण धैर्य चढले आहे. मी पण विष घेतो आणि दोघे बरोबरच मरून प्रणयाची निराळी सृष्टी निर्माण करू. ही भूमी नको, ते आकाश नको. तारांचा रस पिळून त्याने मेघमंडळातल्या गारांचा वाडा बांधू आणि चिरकाल त्यातच राहू; पण या परमेश्वराचे आता नाव सुद्धा नको! पूर्वसंचितामुळे तुझ्यासारख्या नाजूक फुलाला सुद्धा जो कोमेजून टाकतो, तिचे अपराध- मग ते किती का असेनात, ज्याला माफ करता येत नाहीत, तो परमेश्वर निर्विकार आहे असे कोणी म्हणावे? लीले, मनुष्याला एखादे फूल निर्माण करिता आले तर तो त्याला नुसते हातावर झेलील आणि आजन्म त्याचे पोवाडे गात बसेल! पण परमेश्वर दररोज हजारो फुले फुलवितो आणि दुसरे दिवशी निर्दयपणाने ती सारी चिरडून टाकितो. एखाद्या कवीने तुझ्यासारखी नायिका निर्माण करून तिचा असा निर्दय शेवट करण्याचे मनात आणले असते तर ते भयंकर शब्दचित्र रेखाटताना त्याची लेखणी बंद पडली असती आणि त्याच्याच अश्रूंच्या ओघात ती कठोर अक्षरे पार वाहून गेली असती. पण अमानुष परमेश्वर हे सारे खेळ सहज करीत असतो! लीले, हा ईश्वरी कोप मी कसा सहन करू?

**लीला** : नका, जयंत, परमेश्वराला दोष देऊ नका! परमेश्वराची कृती सुद्धा अजून बाल्यावस्थेत आहे! ही ब्रह्मांडाची कळी अजून उमलायची आहे! ब्रह्मांडाचे फूल कायमचे फुलविण्यासाठी परमेश्वर दररोज हजारो फुले निर्माण करण्याचा अभ्यास करीत आहे! बालपरमेश्वर आकाशाच्या पाठीवर विजेच्या वेड्यावाकड्या रेघोट्याच ओढीत आहे; त्याचा हा सृष्टीचा अभ्यास पुरा झाला, अक्षयतारुण्य प्राणिमात्राला देता आले, सूर्यप्रकाशात चंद्रिकेची शीतलता आणिता आली, फुले कायमची फुलविता आली, म्हणजे प्रेममय परमात्मा या ब्रह्मांडकलिकेचा अक्षय्य विकास करील आणि आज या गोलकलिकेत अटकलेल्या तारका- मृतांच्या आत्म्यांचे हे परागरेणू, विश्वाचे पुष्प उमलताच अमर्याद अनंतात चहूकडे उधळू लागतील! तोपर्यंत खऱ्या

सुखासाठी आपण धीर धरिला पाहिजे!

**जयंत** : लीले, या आशीर्वादाने मला धीर कसा येईल? लीले, लीले, मला आज्ञा दे, मी पण आत्महत्या करून तुझ्या पाठोपाठ येतो; या लीलाशून्य जगात मी कसा राहू?

**लीला** : मरणकाळच्या शब्दांइतके सत्य दुसऱ्या कशातही नसते. जयंत, तुम्हाला माझी शपथ आहे, तुम्ही आत्महत्या करू नका! तुमचे कार्य अजून झाले नाही! माझी करुणकथा सर्व जगाला सांगा. माझ्यासारख्या हजारो बालविधवा हृदयात मेलेल्या आशेच्या समाधीवर अश्रूंची फुले वाहत असतील त्यांचा उद्धार करा. कठोर समाजाचे पाषाणहृदय भेदून त्यातून शुद्ध प्रेमाचे पाट वहावयाला मार्ग मोकळा करून द्या आणि मग कालावधीने परमेश्वराजवळ या, म्हणजे आपण अक्षय्य सुख भोगीत बसू!

**जयंत** : लीले, या जडवृत्ती, निर्जीव प्रेताच्या हातून हे काम कसे होणार? कोणत्या संजीवनीच्या सामर्थ्याने मला हालचाल करण्याची शक्ती मिळेल?

**लीला** : असे निराश होऊ नका! माझी इच्छा, माझी आज्ञा, मूर्तिमंत प्रेमाचे उद्‌गार समजून तरी माझ्या शब्दांना मान द्या!

**जयंत** : ठीक आहे, तुझी आज्ञा मला शिरसावंद्य आहे! पण तू मात्र मला असा अनाथासारखा भूलोकावर टाकून स्वर्गात जाऊ नकोस! तेजोमय तारका होऊन आकाशात सारखी चमकत रहा म्हणजे मला नेहमी धीर मिळत जाईल! लीले, लीले, मनात होते काय, आणि हे झाले काय?

(सुशीला, गोकुळ, विद्याधर वगैरे मंडळी येतात.)

**गोकुळ** : लीलाताई, काय हो केले हे? आता या तुमच्या गोकुळाला वेळोवेळी सांभाळून कोण हो घेईल? भाऊबिजेच्या दिवशी या दरिद्री भावाची आसवांची ओवाळणी आनंदाने घ्यावयाला माझी कोणती लीलाताई पुढे येईल?

**सुशीला** : लीलाताई, काय ही तुझी दशा! पहा गं या तुझ्या सुशीलेकडे, तुझ्या त्या तेजस्वी डोळ्यांनी एकदा तरी पाहा! लहानपणी तुझ्या गजऱ्यातली फुले एखादे वेळी कोमेजून जात आणि तू रडू लागलीस म्हणजे मी माझ्या गजऱ्यातली फुले तुला देत होते; पण आज तुझ्या डोळ्यांची ही फुले कोमेजून जाताहेत तेथे कोणती फुले बसवू? या माझ्या डोळ्यांची की माझ्या जिवाची?

(लीला जयंत व सुशीला यांच्या अंगावर पडते.)

**लीला** : (हसत) गोकुळ, सुशीलाताई, काय हा मोह! ताई, तू मला नेहमी धीर देत

होतीस आणि आज हे काय मांडिले आहेस? आज ना उद्या आपल्या भेटी होणार खास! विद्याधर, तुम्ही तरी साऱ्यांना धीर द्या! हो, पण तुम्ही तर माझ्या ताईचे गुणाकर! गुणाकर, ताईला, जयंतांना, गोकुळला नीट सांभाळा.

**सुशीला** : लीले, लीले, तू नाजूक कळी, तुझ्या अंगी हे धैर्य कुठून गं आले? नको, अशी हसू नकोस; माझ्या हृदयाचे कसे पाणी पाणी होते आहे! तुला होते आहे तरी काय? ही कठोरता कोठून आणलीस? या तुझ्या स्थितीला म्हणू तरी काय?

**लीला** : काय म्हणू? केशवसुतांचे ते गाणे आठवते ना तुला? अहाहा!

हर्षखेद ते मावळले। हास्य निमाले, अश्रू पळाले।
कंटकशल्ये बोथटली। मखमालीची लव वठली।
काही न दिसे दृष्टीला। प्रकाश गेला, तिमिर हरपला।
काय म्हणावे या स्थितीला। झपूर्झा गडे झपूर्झा॥

ताई, हाच बरे झपूर्झा! ताई, येते मी आता! जयंत, माझी विनंती लक्षात ठेवा! अहाहा! झपूर्झा, गडे झपूर्झा!

(निश्चेष्ट मरते.)

**जयंत** : गेली, गेली, शापभ्रष्ट देवी, माझ्या हृदयाची देवी, या जगातून निघून गेली! लीला, हाय हाय, लीला! लीलालालस हृदया! आता तुझ्या उड्या बंद ठेव! लीला अखेर काय बरे म्हणाली? झपूर्झा गडे झपूर्झा! हेच खरे! हीच स्थिती आता मलाही स्वीकारली पाहिजे. तुटला- जगाचा आणि जयंताचा पार संबंध तुटला! लीले, आता फक्त एक तुझी आज्ञा हीच माझ्या हृदयाची गीता! दुसरे काही नको! या जगातले आपले जीवन संपले; आपला अवतार संपला! (उठून उभा राहतो.)

जल् गई है दिलसे ये जहा, अब् क्या रहा है यहा।
ऐ कलिया दिले चमनकी, अब् फूल फिरसे और कहा।
न फिक्र है बागे जहाकी, न उसके कुलमुखत्यारकी।
है तुटगई कडिया कडिया, अब् जंजिरे प्यारकी॥

(फुलांची माळ तोडून फुले लीलेच्या प्रेतावर पसरतो. पडदा पडतो.)

## प्रवेश तिसरा

(बाबासाहेब प्रवेश करतात.)

**बाबासाहेब** : अरेरे, कोण भयंकर स्थिती ही! साऱ्या आनंदाचा कळस झाला! लीले, काय केलेस हे! असे किती तरी प्रेममय जीव समाजाच्या राक्षसी पावलांखाली चिरडून जात असतील याची आम्हाला कल्पना तरी आहे काय? अरेरे! बदललेल्या परिस्थितीमुळे तरुणांच्या मनाची स्थिती काय होत चालली आहे हे लक्षात घ्यावयाचे नाही; हजारो वर्षांच्या वहिवाटीप्रमाणे लग्न करताना वधूवरांची हृदये कशी आहेत हे पहायचे नाही; आजन्म सुख ज्यावर अवलंबून रहावयाचे तो एकदा बिनसला की कायमचा- असा लग्नविधी निव्वळ आंधळेपणाने घडवून आणावयाचा; एकदा लग्नाची घडी मोडल्यावर ती कोणत्याही मार्गाने पुन्हा नीट बसवावयाची नाही; अनाथ विधवांच्या अश्रुजलात त्यांच्या हृदयाचे प्रतिबिंब दिसू लागले की जुनाट श्रुतिस्मृतींची फाटकी पाने डोळ्यांपुढे धरावयाची! हरहर! राक्षसी समाजा! किती दिवस तू असे भयानक खेळ करणार? जुनेपणाच्या नसत्या अभिमानात किती दिवस डोळे झाकून पडणार? राक्षसी पण निर्जीव रूढीला आणखी किती कोमल आणि जिवंत हृदयांचे बळी देणार? लीले, काय भयंकर जागृती करून गेलीस ही!

(गोकुळ येतो.)

**गोकुळ** : बाबासाहेब, चला लौकर! तिकडे मंडळी वाट पहात आहेत.

**बाबासाहेब** : चल; संकटाला तोंड हे दिलेच पाहिजे.

(जातात.)

## प्रवेश चवथा

(भूतमहाल. कमलाकर प्रवेश करतो.)

**कमलाकर** : त्या दरोडेखोराला इतक्या तातडीने यायला सांगितले तरी अजून का बरे आला नाही? त्या रामोशाच्या तोंडात एकदा चांदीसोन्याचा बोळा कोंबून त्याला कायमचा मुका केला म्हणजे माझ्याविरुद्ध प्रत्यक्ष पुराव्यानिशी ओरडायला दुसरे कोणते तोंड उरणार? एवढा साक्षीदार नाहीसा केला म्हणजे माझ्यावर कायद्याची कुरघोडी करण्याची कोणाची छाती होणार आहे हेच मला पहावयाचे आहे! अजून माझ्या कर्तबगारीने मी या बावळ्या जगाला या हातावर खेळवीन! या दुनियेच्या बाजारात अशी एकही चीज नाही की, जिचे मोल ठरले नाही- की

जी पैशाने विकत घेता येत नाही! माझा सारा विश्वास माझ्या कसलेल्या कर्तबगारीवर आहे! माझी कर्तबगारी, माझी एवढी कर्तबगारी- पण कमलाकर, तुझी कर्तबगारी तरी काय किमतीची ठरली? तुझ्या मनाची आशा, तुझ्या कर्तव्याचे कर्तव्य, लीला जयंतांवर दु:खाचा वर्षाव करून त्यांची मने मारून टाकायचा तुझा हेतू खरोखरीच साधला आहे का? नाही, नाही, माझ्या मनाच्या तळातून या प्रश्नाचे 'नाही, नाही,' हेच उत्तर निघत आहे. लीलाजयंतांवर मी संकटे आणिली खरे; पण त्यांना दु:ख मात्र मनासारखे मुळीच झाले नाही! त्यांचे दु:ख सुद्धा सुखाचे, लीलेचे मरण शांतवृत्तीच्या सुखाचे, आणि जयंताचा उद्वेग सुद्धा सुखमय प्रेमकल्पनांत गुरफटलेला! ही पाहा मी कोंडून ठेविला असता आत्महत्या करून सुटून गेलेली द्रुमन, माझ्या हाताला झटका देऊन गाडीतून उडी टाकताना तिरस्काराने माझ्याकडे पाहणारी मनोरमा, ही चढत्या विषाच्या अमलात सुद्धा मला तुच्छ समजणारी लीला, तिघी विजयी मुद्रेने माझ्याकडे पाहून हसून माझा उपहास करीत आहेत! मग मी त्यांना खरेखुरे दु:खी ते काय केले? छे: छे:! ही नुसती माझ्या कर्तबगारीची थट्टा झाली! उलट त्यामुळे माझ्या मनाला आग लागून राहिली आहे! नाही; झाले एवढ्याने माझे समाधान व्हावयाचे नाही. अजून जयंत जिवंत आहे, सुशीला आहे, माझा दोन वेळा घात करणारा तो विद्याधर आहे, या सर्वांना अजून माझ्या सुडाची जाणीव करून देईन, तेव्हाच मरायला तयार होईन. तोपर्यंत, यम खरोखरीच असला, आणि प्रत्यक्ष त्याने जरी 'कमलाकर, कमलाकर' म्हणून सारख्या हाका मारल्या-

(पडद्यात 'कमलाकर, अहो कमलाकर-')

**कमलाकर** : (दचकून; नंतर हसून) कमलाकर, काय हे? यमाच्या प्रत्यक्ष कृती हसून थट्टा करणारा तू, आता नुसत्या त्याच्या कल्पनेने दचकलास! हा तो दरोडेखोर! मनुष्यरूपाने वावरणाऱ्या या यमदूताची भीती मला काय म्हणून वाटावी? (दरोडेखोर येतो.) ये, जरा उशीरसा केलास?

**दरोडेखोर** : अरेच्चा, ही काय चुकामूक आहे? कमलाकर कोण? तुम्ही का मी त्या दिवशी ज्यांना कागद दिला ते? आणि मला बोलाविले कुणी?

**कमलाकर** : तुला बोलाविले मीच. कमलाकर मीच. पण तू ज्याला पत्र दिलेस तो मात्र निराळा! आणि त्या तुझ्या चुकीमुळेच मोठा घोटाळा झाला आहे!

**दरोडेखोर** : तो कसा काय?

**कमलाकर** : ती भानगड सांगायला फार वेळ लागेल, आणि मी तर अगदी डोळ्यांच्या पापण्यांची उघडझाप मोजावयाच्या बेतास आलो आहे. त्या दिवशी त्या पेटीची

जी भानगड केली ती आता जिवावर येऊन बेतली आहे. तिच्यामुळे मी सापडणार आहे एका खटल्यात. तुलाही त्यात बराच शेक लागणार आहे. माझा साथीदार म्हणून माझ्याविरुद्ध खरा साक्षीदार तू एकटाच आहेस, तुझ्या साक्षीमुळे तू आणखी मी दोघेही गोत्यात येणार आहोत; म्हणून त्या भानगडीची मिटवामिटव करण्यासाठी मी तुला बोलाविले आहे.

**दरोडेखोर** : कशी काय मिटवामिटव करणार सांगा पाहू?

**कमलाकर** : त्यात काही विशेष नाही. हे पाचशे रुपये तू घे आणि कोठे तरी दूर देशी निघून जा. तू निघून गेल्यावर मला शहाजोग पकडण्याची कोणाची छाती नाही. आणि यामुळे तुझ्या मागचा जंजाळ चुकेल. समज, या साक्षीसाठी तू सरकारी लोकांच्या एकदा नजरेस आलास म्हणजे तुझ्या धंद्याच्या बाबतीत तुला पहिल्यासारखा मोकळेपणा मिळेल का? अरे वेड्या, कदाचित या बाबतीत तू सुद्धा खोड्यात पडशील! त्यापेक्षा आपले ठाणेच इथून हलविलेस तर आपण दोघेही सुखी होणार नाही का? पहा! फार विचार करीत बसण्याची ही वेळ नाही. हे पाचशे रुपये; आणखी लागले तर मागून घे आणि इथून आपला पाय काढ! काय पसंत आहे का हा विचार?

**दरोडेखोर** : पसंत आहे. द्या ते रुपये. (रुपये घेतो.) ठरला माझा विचार कायम! आता तुम्हाला युक्ती सांगतो. जरा जवळ या; कान करा इकडे!

(कमलाकर जवळ येतो. दरोडेखोर त्याच्या मानेवर हात देतो.)

**कमलाकर** : अरे, हे काय! माझ्यावर का-

**दरोडेखोर** : गप्प, रावसाहेब, अगदी गप्प. आरडाओरड करून काही उपयोग नाही. नीट मुकाट्याने उभे रहा. माझ्या कामात कोणी अडथळा आणलेला मला खपायचा नाही.

**कमलाकर** : म्हणजे तू माझा जीव घेणार की काय?

**दरोडेखोर** : अगदी सहज! तुमच्यासारखा उगीच विचार करीत बसणारा हा गडी नव्हे!

**कमलाकर** : अरे पण, या संथपणाने माझा प्राण घ्यायला तयार झालास त्याला कारण तरी काय?

**दरोडेखोर** : हे बघा रावसाहेब, तुम्हा पांढरपेशा लोकांशी भागीबट्ट्याने एकदा धंदा केला की त्यात ही कुलंगडी निघायची! समजा, आज एक मी पळून गेलो; पण पुढे तुम्हाला पकडले; आणि तुम्ही माझे नाव घेतले म्हणजे पुन्हा येरे माझ्या मागल्या! आणि अशी भागूबाई वाटेल त्याचे नाव घ्यावयाची! तेव्हा ही तुमची

शिकलेली अक्कल आम्हाला नको! सरकार तरी तुम्हाला पकडून शिक्षाच करणार ना? मग मीच ते काम केलं तर काय वाईट! मग तर झालो ना मी मोकळा?

**कमलाकर** : काय राक्षस आहेस रे! तुला काही अंत:करण- विचार-

**दरोडेखोर** : रावसाहेब, बस्स करा हे चऱ्हाट! दयामाया तुम्हाला दाखवायची? अहो, घरच्या बायकांना तुम्ही बाहेर विकणारे! आणि मला हे विचारता? रावसाहेब, देवाला पण डोळे असतात! देव नेहमी काट्याने काटा काढतो! अहो, पापच पापाला गिळते. बिचारी भली माणसे का आपली कामे सोडून तुमच्या आमच्या मागे धावत येणार आहेत? तुम्ही आम्ही एकमेकांच्या उरावर बसायचे! आज तुमच्या गळ्यावर आमचा हात; उद्या आमच्या गळ्यावर आणखी तिसऱ्याचा हात! (त्याला खाली पाडून त्याचा गळा दाबतो.) हं, रावसाहेब, ताकद ओळखून मग अशी धडपड करा! उगीच का मरताना अशी मेहनत करिता?

**कमलाकर** : अरेरे, अखेर हेच तत्त्व खरे की-
कलजुग नही करजुग है, तू दिनको और रात ले।
क्या खूब सवदा नग्द है, इस हाथ दे इस हाथ ले॥

(दरोडेखोर त्याचा गळा दाबून प्राण घेतो. पडदा पडतो.)

## प्रवेश पाचवा

(लीलेची चिता जळते आहे. संन्यासवेष घेतलेला जयंत व इतर मंडळी.)

**जयंत** : हर्षखेद ते मावळले। हास्य निमाले, अश्रू पळाले॥
कंटकाशल्ये बोथटली। मखमालीची लव वठली॥
काही न दिसे दृष्टीला। प्रकाश गेला, तिमिर हरपला॥
काय म्हणावे या स्थितीला। झपूर्झा गडे झपूर्झा॥
अहाहा! विद्याधर, ही पाहा माझ्या हृदयाची होळी! या पाहा आशेच्या ज्वाळा आणि हा पाहा माझ्या मनोरथाचा धूर! प्रीतीचे प्रेत जाळण्यासाठी आणखी किती कठोर व्हावयाला पाहिजे? स्मशानात अदृश्यरूपाने वावरणाऱ्या पिशाच्चांनो, भूतांनो, सांभाळा, या पवित्र होळीची जागा कल्पान्तापर्यंत नीट सांभाळा! तुमच्यापेक्षा भयंकर, क्रूर अशा मनुष्यांचे- दयामाया यांचे स्मशान झालेल्या जगातल्या मानवी भुतांचे या पवित्र प्रणयसमाधीवर

पाऊलसुद्धा फिरकू देऊ नका. हे लीलाभक्षक अग्निनारायणा, मनुष्याच्या श्वासाने पापी झालेला वारा जर या चितेत शिरू लागला तर त्याला जाळून दिव्य करून मग लीलेजवळ येऊ दे! आणखी तुझ्या तेजाने जसा या रात्रीच्या वेळी हा स्मशानातला काळोख नाहीसा केला आहेस तसा आमच्या समाजातल्या अंधारावर या लीलाललित ज्वाळा पसरून चोहीकडे प्रकाश पाड! अहाहा! माझ्या लीलेच्या पवित्र देहाच्या अंशाअंशासाठी पंचमहाभूतांची कोण धडपड चालली आहे ही! हा अग्नी तिच्या जडदेहाला आपल्या ज्वाळांशी एकजीव करीत आहे; भूदेवी आपल्या प्रेमळ बालिकेची रक्षा मातृप्रेमाने ओढीत आहे; सोसाट्याचा वारा तिच्या रक्षेचा एखाद-दुसरा कण मिळाला तेवढाच घेऊन दिगंतराला पळून जात आहे! लीलेचा आत्माच आपल्याला मिळणार म्हणून हे आकाश आनंदाने तारकारूपी नेत्र मिचकावीत आहे, आणि ही जलदेवता तर राखेत मिळून एकरूप होण्यासाठी अश्रूंच्या पवित्र रूपाने माझ्या डोळ्यांतून सारखी धावत आहे! आणखी लीलेसाठी असे कोण होणार नाही? तरी पण हे पवना, तू असा निर्दय होऊन सारेच रक्षाकण उडवून नेऊ नकोस! हिच्या प्रेमासाठी खराखुरा संन्यास घेण्यासाठी थोडीशी रक्षा तरी राहू दे; म्हणजे ती प्रेमाची राख माझ्या अश्रूंत भिजवून या माझ्या शरीराला मी लावीन!

**विद्याधर** : जयंत, झाले ते झाले, आता शोक करून काय फळ?

**जयंत** : विद्याधर, हा तुम्ही शोक समजता? नाही, हा शोक नाही; माझे हृदय, माझे प्रेम, माझा जीव, माझे सर्वस्व मी या होळीत टाकले आहे. लीलेची आज्ञा पाळण्यासाठी मी एक दगडाचा पुतळा झालो आहे. आणि लीलेच्या प्रेताला स्वाहा करणाऱ्या अग्नीच्या या ज्वालारूपी हजारो जिभांतून धडधड निघणारे निराशेचे उद्‌गार माझ्या पाषाणहृदयावर आदळून तोंडावाटे हा त्यांचा प्रतिध्वनी मात्र बाहेर पडत आहे. मला जर शोक करावयाचा असता तर सारे ब्रह्मांड हालवून सोडिले असते. माझ्या करुणारवाने पाषाणाच्या हृदयाचा भेद केला असता, आणि अश्रूंच्या ओघाने ही धडधडणारी चिता एका क्षणात विझवून टाकली असती! पण मी तसे करणार नाही. अग्नी नारायणा, तुझा भयानक खेळ चालू दे. तुझ्या ज्वालांच्या पंखांनी माझ्या लीलेच्या आत्म्याला स्वर्गात उडून जाऊ दे! अहाहा! विद्याधर, पाहा, पाहा, बोलता बोलता आकाशात कशी गर्दी होत चालली आहे ती! पण या तारका, तुमच्या नेहमीच्या निर्दय तारका- सुखात रमलेल्या किंवा दु:खात करपलेल्या जिवांकडे फत्तराप्रमाणे सारख्याच दृष्टीने डोळे मिचकाविणाऱ्या, भविष्यात होरपळून काढणाऱ्या पण चालत्या काळी खऱ्या वाटणाऱ्या, आशेच्या समुद्रावर शेवटी बुडण्यासाठी आपण होऊन तरंगणाऱ्या अल्लड बालकांच्या हृदयभेदक मनोरथांना हसणाऱ्या-

नेहमीच्या तारका नाहीत बरे! या माझ्या लीलेच्या प्रेमतारका! तिच्या कोंडलेल्या मनात उरलेल्या प्रेमाचा एक एक बोल या आगीच्या लाटात मंगलस्नान करून दिव्यरूपाने वर जात आहे- लीलेच्या प्राणज्योतीबरोबर या चितेच्या ठिणग्या पावन होऊन तारकापदाला पोहोचत आहेत! आणि विद्याधर, उद्याच्या या नव्या तारामंडळात, या ताराक्षरांनी खचिलेल्या प्रेमस्वस्तिकात माझ्या लीलेचा आत्मा कौस्तुभासारखा चमकताना दिसेल! तो देदीप्यमान, प्रणयतारा आजच्या हतभागी पण उद्याच्या भाग्यशाली जयंतावर स्वर्गीय, तेजोमय प्रेमस्वर्गाची दृष्टी करील! काय, विद्याधर, तुम्हाला हे खरे वाटत नाही? छे:; माझी लीला मला तसे वचनच देऊन गेली आहे! आणि तिने एकदा शब्द काढला की तो कायमचा! लहानपणी तिने मला प्रेमाचे वचन दिले, आणि - पण तिचे प्रेम तुम्हाला कसे कळणार! विद्याधर, तुमची आमची लीला साक्षात देवता होती बरे! आता उद्या तुम्हाला कळेल, उद्या आकाशात चमकणाऱ्या तारामंडळांतून माझ्यावर जेव्हा प्रेमाश्रूंचा पाऊस पडेल, लीलेच्या ताराकिरणांशी माझ्या डोळ्यांची किरणे प्रेमप्रलाप बोलू लागतील तेव्हा तुमची खात्री होईल! विद्याधर, तिने मरताना असेच ठरविले आहे! अरे, पण, किती वेडा मी! (चितेकडे जाऊ लागतो.)

**विद्याधर** : (त्याला थांबवून) जयंत, काय हे- चालला कुठे त्या आगीत?

**जयंत** : आगीत? अहो तुम्हाला ती आग वाटते; पण माझ्या आत्म्याची ती चंद्रिका आहे बरे! लीला जिथे आहे तिथे आगीचे सुद्धा चांदणे होईल! सोडा हो, एकदा तिच्या ओठाला ओठ लावून एवढेच विचारून घेतो की, माझा उद्धार केव्हा करशील म्हणून? ते विचारायचे राहिले आहे! एकच चुंबन! सोडा हो- किती निर्दय आहात हो तुम्ही! नाही जाऊ देत? नशीब माझे! लीले! जा, तू बिनदिक्कत जा. तुझी आज्ञा मी अक्षरश: पाळीन. ईश्वराने निर्मिलेल्या सुंदर आणि भेसूर, साऱ्याच वस्तूंत तुझ्या चितेचेच चित्र पाहीन; साऱ्या नादब्रह्मात या चितेचा धडधड आवाजच ऐकत राहीन, आणि केवळ तुझ्या आज्ञेचा उच्चार करण्यासाठीच तोंडातून शब्द काढीन. अहाहा! काय ही चिता भडकली आहे! जितकी भीषण तितकी सुंदर! पाहा, पाहा; विद्याधर, पाहा ही भयाण शोभा! ही चिता समाजाच्या चिखलांतून निघालेल्या कमलपुष्पासारखी रमणीय दिसत नाही का? आणि या चितारूपी कमळाच्या ज्वालामय दळांच्या आड माझी लीला, माझी प्रणयलक्ष्मी, साक्षात लक्ष्मीप्रमाणेच निजली असेल नाही? सुंदरता भयानक वस्तूवर सुद्धा आपली छाप बसविते, हेच या चितेत तुम्हाला दिसत नाही काय?

**विद्याधर** : हरहर! जयंत, काय उत्तर देऊ तुम्हाला? एकीकडे सुशीलेची प्राप्ती आणि एकीकडे जिवलग मित्राचा असा घात, यामुळे मी अगदी दिङमूढ झालो आहे! एकाच काळी जलवृष्टी आणि विद्युत्पात यांचा अनुभव घेणाऱ्या वृक्षाप्रमाणे माझी स्थिती झाली आहे!

**जयंत** : विद्याधर, असे भांबावून जाऊ नका; हृदयाच्या पडद्यावर आतल्या आत गिळलेल्या अश्रूंनी या चित्तभेदक चितेचे चित्र चांगले रंगवून ठेवा! उद्या या राखेच्या ढिगात कणाकणागणिक, जळलेल्या आशा, मेलेले मनोरथ, प्रेमाचे प्रेतप्राय प्रलाप, करपलेल्या कल्पना, मुक्या मनाच्या मातीत मिसळलेल्या महत्त्वाकांक्षा सापडतील त्या मोजून ठेवा! आणि ईश्वराच्या कृपेने उद्या तुमचं घर गोजिरवाण्या लीला-जयंतांनी गजबजून गेले म्हणजे स्मृतीच्या तीव्र डोळ्यांनी हृदयातल्या त्या चिताचित्राकडे पाहा, आणि मग त्यांच्या आयुष्यांच्या दिशा ठरवा! कोमल हृदयात ताबडतोब रुजून फोफावणाऱ्या प्रेमवृक्षाचे अंकुर दिसतात न दिसतात तोच त्याचे निर्बीज करून, तुमच्या लीला-जयंतांना समाधानाचे धडे शिकवा! जे आहे ते आपले आणि नाही ते नको हेच तत्त्व त्यांच्या मनात लहानपणीच बिंबवून द्या; बाळपणी वाढत्या प्रेमाकडे, आवडीनावडीकडे दुर्लक्ष करून त्यांना वाढू दिल्यावर तारुण्याच्या जोमात अवेळी समूळ उपटून टाकू नका! बाळपणी बीजारोपण झाल्यामुळे तारुण्यात हृदयाच्या तळापर्यंत दूरवर मुळे पसरणारा प्रेमवृक्ष एकदम समूळ उपटताना हृदयाच्या चिंधड्या होतात हे लक्षात ठेवा! विवाहसंबंध घडवून आणताना डोळ्यात या चितेतल्या राखेचे चांगले अंजन घाला. विवाहसंबंधाने एकतर स्वर्ग तरी हाती येतो नाही तर पाताळात तरी पडावे लागते, हाच अनुभव यापुढे बदलत्या परिस्थितीमुळे येत जाणार आहे! का, मी म्हणतो हे खरे आहे ना!

**विद्याधर** : अगदी अक्षरश: खरे!

**जयंत** : कडू अनुभवाचे औषध पाजणाऱ्या ईश्वराचे खेळ अगाध आहेत!

**विद्याधर** : हे लीलालाघवी जगत्सूत्रधारा, या तुझ्या संसारनाटकाला म्हणावे तरी काय?

**जयंत** : प्रेमसंन्यास! प्रेमसंन्यास! विद्याधर, या सामाजिक खेळाचे नाव प्रेमसंन्यास!

''ब्रह्मार्पण ब्रह्म हविर्ब्रह्माग्नौ ब्रह्मणा हुतम्।
ब्रह्मैव तेन गन्तव्यं ब्रह्मकर्मसमाधिना ॥''

- श्रीभगवद्गीतोपनिषत्सु श्रीभगवान्।

**समाप्त**